**नागपूर महानगरपालिकेची विशेष सभा गुरुवार दिनांक १३/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले नगरभवनात भरलेल्या स्थगित विशेष सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | **३७** | **क** | **संदीप दिवाकर जोशी** | **महापौर** | |
| २. | **२०** | **ड** | **मनिषा सुनिल कोठे** | **उपमहापौर** | |
| ३. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या | A७ |
| ४. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या | C२५ |
| ५. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य | C१९ |
| ६. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या | D५ |
| ७. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य | D२३ |
| ८. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या | D११ |
| ९. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य | C५ |
| १०. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य | D२२ |
| ११. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य | B१३ |
| १२. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या | A८ |
| १३. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या | C२१ |
| १४. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य | B१९ |
| १५. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या | C२२ |
| १६. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य | C१३ |
| १७. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य | B१० |
| १८. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या | C२४ |
| १९. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य | C१४ |
| २०. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य | D२८ |
| २१. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या | D३० |
| २२. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या | D३१ |
| २३. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य | D२९ |
| २४. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या | D३२ |
| २५. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य | C२ |
| २६. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या | D३३ |
| २७. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य | C६ |
| २८. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या | D८ |
| २९. | ८ | ब | अंसारी सय्यदा बेगम मो. निजामुद्दीन | सदस्या | D२७ |
| ३०. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य | C७ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३१. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या | D७ |
| ३२. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या | D३४ |
| ३३. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् | D३६ |
| ३४. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या | D१२ |
| ३५. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य | B१ |
| ३६. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या | A६ |
| ३७. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या | C३० |
| ३८. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य | B९ |
| ३९. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या | D१५ |
| ४०. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य | D२० |
| ४१. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य | B८ |
| ४२. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य | C१५ |
| ४३. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या | C२९ |
| ४४. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य | B४० |
| ४५. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य | B३९ |
| ४६. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य | B११ |
| ४७. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य | C२० |
| ४८. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या | A२१ |
| ४९. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या | A२० |
| ५०. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य | B४ |
| ५१. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य | B२० |
| ५२. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या | A१९ |
| ५३. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या | D२ |
| ५४. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य | B२१ |
| ५५. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य | B२ |
| ५६. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या | A२३ |
| ५७. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य | B१४ |
| ५८. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या | A९ |
| ५९. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या | A२४ |
| ६०. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य | B३ |
| ६१. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या | A२५ |
| ६२. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य | D१८ |
| ६३. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य | D२४ |
| ६४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या | D१ |
| ६५. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य | B१५ |
| ६६. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या | A२७ |
| ६७. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या | A२८ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ६८. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य | B२३ |
| ६९. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या | A११ |
| ७०. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या | A२९ |
| ७१. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य | B५ |
| ७२. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य | B२४ |
| ७३. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या | A३ |
| ७४. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य | B१६ |
| ७५. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य | A३० |
| ७६. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य | D१९ |
| ७७. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या | A३१ |
| ७८. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य | B२५ |
| ७९. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य | B२६ |
| ८०. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या | A३२ |
| ८१. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या | A१२ |
| ८२. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या | B२७ |
| ८३. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य | C८ |
| ८४. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या | A२ |
| ८५. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या | A३३ |
| ८६. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य | B१७ |
| ८७. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या | D३ |
| ८८. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य | B२८ |
| ८९. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य | A३५ |
| ९०. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या | A३६ |
| ९१. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य | B२९ |
| ९२. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या | A१४ |
| ९३. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या | B३० |
| ९४. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या | A३७ |
| ९५. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य | C९ |
| ९६. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या | A३८ |
| ९७. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य | B६ |
| ९८. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य | B७ |
| ९९. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य | B३१ |
| १००. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या | C३७ |
| १०१. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य | B१८ |
| १०२. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या | C३८ |
| १०३. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या | C३९ |
| १०४. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या | C४० |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १०५. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य | D२५ |
| १०६. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य | B३२ |
| १०७. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य | B३३ |
| १०८. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या | C३१ |
| १०९. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या | C३२ |
| ११०. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य | B३४ |
| १११. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या | A१६ |
| ११२. | ३५ | क | विशाख प्रकाश मोहोड | सदस्या | C३३ |
| ११३. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य | B१२ |
| ११४. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या | C३४ |
| ११५. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या | A१७ |
| ११६. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य | B३५ |
| ११७. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य | B३६ |
| ११८. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य | B३७ |
| ११९. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या | C३५ |
| १२०. | ३८ | अ | उज्जवला वसंतराव बनकर | सदस्या | D६ |
| १२१. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य | C४ |
| १२२. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या | D१६ |
| १२३. | ना.स. | | सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य | C९ |
| १२४. | ना.स. | | गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य | C१० |
| १२५. | ना.स. | | किशोर रामकृष्ण वानखेडे | सदस्य | C११ |
| १२६. | ना.स. | | निशांत गिरीश गांधी | सदस्य | C१२ |
| १२७. | ना.स. | | किशोर दामोदर जिचकार | सदस्य | D९ |

**अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य | C१८ |
| २. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या | C१७ |
| ३. | ५ | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या | C२३ |
| ४. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या | D१० |
| ५. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य | D३५ |
| ६. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या | D१३ |
| ७. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य | D२१ |
| ८. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या | D१४ |
| ९. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या | A४ |
| १०. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या | C२७ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ११. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या | C२८ |
| १२. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या | A५ |
| १३. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य | D१७ |
| १४. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या | A१ |
| १५. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या | C२६ |
| १६. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या | A१८ |
| १७. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या | A२२ |
| १८. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य | D२६ |
| १९. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या | A१० |
| २०. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या | A२६ |
| २१. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य | B२२ |
| २२. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य | C३ |
| २३. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या | A१३ |
| २४. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य | D४ |
| २५. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या | A३४ |
| २६. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या | A१५ |
| २७. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या | A३९ |
| २८. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या | C३६ |
| २९. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य | B३८ |

**<u>उपस्थित अधिकारी</u>**

**श्री. तुकाराम मुंढे निगम आयुक्त**
**श्री. राजेश मोहिते निगम सचिव**

मा. महापौरजी यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

श्री.मनोज सांगोळे:- मा. महापौरजी, नवीन अधिकारी आले आहेत त्यांनी आपला परिचय करुन द्यावा अशी आपल्याला विनंती करतो.

निगम आयुक्त:- नमस्कार, मी तुकाराम मुंढे आयुक्त म्हणून २८ तारखेला जाँईन झालेलो आहे.धन्यवाद

**<u>ठराव क्र. 57:-</u>** नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांच्यातील हस्तांतराच्या प्रक्रियेवर विशेष चर्चा करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

महापौर:-सर्व गटनेत्यांना विनंती आहे त्यांनी त्यांच्या गटातील ज्यांना या ठिकाणी बोलावयाचे आहे त्यांच्या नावाची यादी द्यावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, विषय क्र. ५६ च्या अनुसरुन विषय जो आहे. नागपूर सुधार

प्रन्यास आणि महानगरपालिका यांच्यातील हस्तांतरणाच्या प्रक्रियेवर विशेष चर्चा करण्याच्या संदर्भातील हा विषय आपण आणला आहे. या विषयाच्या पाठीमागची पार्श्वभुमी काय आहे ही पहिल्यांदा स्पष्ट झाली पाहिजे. हा विषय कशासाठी आणलेला आहे त्याच्या पाठीमागचा आपला दृष्टीकोन काय आहे. सर्व कायद्याच्या प्रक्रियाकाय काय पुर्ण झालेल्या आहेत या संदर्भातील माहिती दिली तर त्या योग्य चर्चा करणे आम्हांला सोयीचे होईल.

श्री.संदीप सहारे:-मा.महापौरजी, हा विषय न्यायप्रविष्ठ आहे. मा.उच्च न्यायालयाने एक निर्णय दिला होता दिनांक १३.०७.१८ आणि आणखी एक पीआय हायकोर्टात ॲडमीट आहे २६.०२.२०२० ला त्यावर उच्च न्यायालयात चर्चा होणार आहे. या दोन्ही प्रत माझ्याकडे आहेत या दोन्हीची प्रत मी आपल्या स्वाधीन करीत आहे. उच्च न्यायालयात यावर निर्णय आहे त्याच्यावर चर्चा करु शकत नाही.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर, विधी विभागाचे कुणी असतील तर त्यांनी या विषयावर निवेदन केले तर बरे होईल.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, जर उच्च न्यायालयामध्ये हे प्रकरण असेल तर यावर चर्चा होवू शकत नाही. त्या दिवशी संदीप सहारेच्या एका प्रकरणामध्ये उच्च न्यायालयात प्रकरण असल्यामुळे चर्चा करता येणार नाही असे सभागृहामध्ये आपण आदेश दिले होते.

श्री.मनोज सांगोळे:-मा.महापौरजी, मी पुन्हा विनंती करतो. अशी किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत आणि त्यात आपली बाजूने निकाल लागलेले आहे त्याची माहिती देण्यात यावी.

श्री.धर्मपाल मेश्राम:-मा.महापौरजी,पाईंट ऑफ इन्फोंमेशन,आपण न्यायप्रविष्ठ प्रकरणात चर्चा करीत नसुन आपण नागपूर सुधार प्रन्यास आणि महानगरपालिका हस्तांतरण प्रक्रियेच्या स्थितीबाबतचा हा विषय येथे आलेला आहे.

(बेल)

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी,या विभागाचे उपायुक्त कोण आहेत त्यांना उत्तर द्यावे लागेल.

महापौर:- लॉ ऑफीसर यांनी माहिती दयावी.

विधी अधिकारी (श्री.कपले):-मा.महापौरजी, आता मा.सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न होता की ही पीआय न्यायप्रविष्ठ आहे.परंतु ही जी पीआय होती तीनासुप्र व महानगरपालिका यांच्या बजेट संबंधी शिर्षाखाली नासुप्र सेक्शन १२१(२) अंतर्गत मर्च झाला होता. त्याच्यामध्ये न्यायालयाने आदेश पारीत केले होते १० ऑक्टोबर १८ ला आणि जे निर्देश दिले होते ते कंटीन्यु केलेहोतेत्यात त्यांनी म्हटले होते की स्टेट ऑफ महाराष्ट्र सेक्रेटरी टू टेक अ फेथ डिसीजन व्हिथ निडेड म्हणजे स्टेट गर्व्हमेंटला नव्याने निर्णय घ्यावयाचा असेल तर मुभा दिली होती. आता जी.आर.आलेला आहे २७ ऑगस्ट २०१९ तो एमआयटीपी कलम २ (१५) प्रमाणे आलेला आहे. त्यामुळे तो विषय वेगळा होता आणि हा विषय वेगळा होता.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, माझा आक्षेप मी सुरवातीलाच नोंदविला होता. हा विषय आणला असतांना फाईलमध्ये कुठल्याही संदर्भातील माहिती दिलेली नाही. हा कुठल्या हेतूने आणलेला विषय आहे. मर्च हा विषय वेगळा आहे आणि एमआरटीपी ॲक्ट चा नवीन ॲथारिटीचा हा वेगळा विषय आहे. एनआयटीचा हस्तांतरणाची प्रक्रिया जो मंत्रीमंडळातील निर्णयाच्या अनुषंगाने झाली होती तो वेगळा विषय आहे. परस्पर संबंध एकमेंकाशी प्रत्येक प्रकरणाशी आहे. आपण स्पेसिफिक स्पष्ट केले पाहिजे की आम्हांला हया फ्रेममध्ये चर्चा करावयाची आहे.

महापौर:- विषय कसा आला ते मी सांगतो. मागच्या सभागृहामध्ये बहुदा आपण नव्हता. त्यावेळी एनआयटी च्या संबंधात, गुंटेवारीच्या संबंधात, एनआयटीची प्रकरणे, एनआयटीच्या भागातील अनेक प्रकरणे ही महानगरपालिकेतकडे यायला पाहिजे होती ती एनआयटी पाठवत नाही. सर्वसाधारण जनता असे म्हणते, एनआयटी गेले तर एनआयटी म्हणते महानगरपालिकेला हस्तांतरीत केले आणि महानगरपालिकेकडे गेले तर कागद दाखवतांना कर्मचारी म्हणतात की आमच्याकडे आलेलेच नाहीत असे म्हटले जाते. मा.सदस्य श्री.सतीश होले यांनी सांगितले, १ लक्ष ९९ हजार फाईल पेंडिंग आहेत त्यावेळेस असे म्हटले की यासाठी एक वेगळे सभागृह लावावे. हस्तांतरीत प्रक्रियेची आजची काय स्थिती आहे,आपल्या लोकांचे काय म्हणणे आहे. हस्तांतरीत प्रक्रियेवर चर्चा करण्यासाठी हे सभागृह बोलाविले.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, म्हणजे आपल्याला गुंटेवारी ॲक्टच्या संदर्भामध्ये ज्या नस्ती हस्तांतरीत करावयाच्याआहेत आणि सोबत सोबत एनआयटीचे महानगरपालिकेत होवू घातलेले मर्च या दोन्ही संदर्भात चर्चा घडवून आणावयाची असे आपले म्हणणे आहे.

महापौर:- हस्तांतरणाची काय स्थिती आहे.

श्री.प्रविण दटके:- पाईंट ऑफ आर्डर, मा.पालकमंत्र्यांनी मा.मुख्यमंत्र्यांना एक पत्र दिले. मा. मुख्यमंत्र्यांनी महानगरपालिका आणि नासुप्र ला त्यांचे मत मागितले. एनआयटीचे मत माझ्या हातात आहे. महानगरपालिकेचे मत देण्याकरिता त्यांना सांगितले आहे. सभागृहात हा विषय आणून ते मत द्यावयाचे आपण असे आदेश दिले आणि या विषयावरही आम्हांला चर्चा करावयाची आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, आता मा.दटके साहेबांनी म्हटले बरोबर आहे परंतु चर्चेची व्याप्ती निश्चीत झाली तर त्या अनुषंगाने चर्चा करता येईल. हा विषय फार मोठा आहे. १९३६ची एनआयटी आपण बरखास्त करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्या बरखास्तीच्या अनुषंगाने त्याचे विविध अंग काय आहेत. कोणकोणत्या ॲन्गलने चर्चा करावयाची हे जर निश्चित झाले. बरखास्तीच्या चर्चेत मा.सहारे साहेबांनी म्हटले न्यायप्रविष्ठ प्रकरण आहे त्यामुळे त्यावर चर्चा करु शकतो काय? आता त्यांनी म्हटले, काही ॲथारिटी बदलली आहे त्या प्रक्रियेवर त्यावर चर्चा करणार आहे. त्यामुळे आपण चर्चा कुठल्या विषयावर केलीपाहिजे हे निश्चित झाले तर मला वाटते सत्तापक्षातील सदस्यांना सुध्दा यावर चर्चा करणे सोयीचे होईल.

श्री.संदीप सहारे:-मा. महापौरजी, सरळसरळ आर्डर दिलेले आहेत. असे उच्च न्यायालयाने आर्डर दिल्या गेल्यामुळे यावर चर्चा होवू शकत नाही. मागच्या वेळेस आपण भुमिका घेतली होती.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, कार्यालयाने मत व्यक्त केले आहे आपण चर्चेला सुरुवात करावी.

श्री.संदीप सहारे:-मा. महापौरजी, कार्यालयाने क्लिअर मत स्पष्ट करावे. मला काही हरकत नाही. चर्चा करता येत असेल तर प्रशासनाने तसे स्पष्ट सांगावे.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा. महापौरजी, इसके पहिले भी ऐसा हुआ है। मा.सदस्य श्री.संदीप सहारे इन्होने विषय रखा था आपने विषय न्यायप्रविष्ठ है करके चर्चा करने नही दी।

श्री.विजय झलके :-मा.महापौरजी, विरोधी बाकावरच्या मा.सदस्यांना चर्चा करावयाची आहे किंवा नाही ते त्यांनी ठरवून घ्यावे.

श्री.संदीप सहारे:-मा. महापौरजी, चर्चा करावयाची आहे.

(बेल)

महापौरः- मी पुन्हा एकदा विधी अधिका-यांना या ठिकाणी निर्देश देतो. चर्चा करता येते किंवा नाही ते त्यांनी स्पेसिफिक सांगावे.

विधी अधिकारी (श्री.कपले):-मा.महापौरजी, हा जो विषय होतातो एनआयटी मर्च करण्याचा विषय होता. सेक्शन १२१एनआयटी ॲक्टचा होता.आता जो जीआर निघाला आहे२७ ऑगस्ट २०१९ तो एमआरटीपी ॲक्ट सेक्शन २ सत्व १५ मध्ये आहे. दोन्ही ॲक्टही वेगळे आहे आणि दोन्ही सेक्शनही वेगळे आहेत. मर्च च्या विषयामध्ये पॉलिसी डिसीजन घेवू नये असा विषय होता. आता जो जी.आर. निघाला आहे २७ ऑगष्ट २०१९ यामध्ये प्लॉनिंग ॲथारिटीचा प्रमाणे दिलेलाआहे तर चर्चा करण्यास काही हरकत नाही

श्री.संदीप सहारे:-मा. महापौरजी, २६ तारखेला यामध्ये सुनावणी होणार आहे आणि ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरण असेल तर त्याच्यावर चर्चा करता येत नाही.

विधी अधिकारी (श्री.कपले):-मा.महापौरजी, २६ तारखेला जे मॅटर लागलेले आहे ते मर्च बद्दलचे आहे ते एनआयटी ॲक्ट कलम १२१ अंतर्गत आहे.

श्री.संदीप सहारे:-मा. महापौरजी, आताच सांगितले ते मर्च बद्दलचे मॅटर आहे त्यावर चर्चा करता येवू शकत नाही. त्यावर २६ तारखेला सुनावणी आहे.यांनी आताच सांगितले मग त्यावर येथे चर्चा कशी काय करता येणार. तुम्ही स्पष्ट सांगावे, चर्चा करता येवू शकते किंवा नाही. कारण हे येथे रेकार्ड होत आहे. तर चर्चा करता येवू शकत नसेल तर त्याला आपण दोषी राहणार आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, सभागृहाचा वेळ नाहक जात आहे.

श्री.संदीप सहारे:-मा. महापौरजी, तुमच्या म्हटल्याने सभागृह चालणार नाही. मी बोललो तर सभागृहाचा वेळ जातो काय?

महापौरः- संदीप सहारे यांच्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

विधी अधिकारी (श्री.कपले):-मा.महापौरजी, २७ ऑगष्ट २०१९ चा जो जी.आर. आहे तो एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत जी.आर. आहे. या सदनात मी तेच सांगत आहे की २७ ऑगष्ट २०१९ चा जो जी.आर. आहे त्याच्या अगेष्टमध्ये कोणतेही न्यायप्रविष्ठ प्रकरण नाही. हे प्रकरण एमआरटीपी ॲक्ट कलम २ सत्व १५ वर आहे. २७ ऑगष्ट २०१९ च्या जी.आर.वर चर्चा करावयाची असेल तर चर्चा करता येईल.

महापौरः- चर्चेकरिता गटनेत्यांनी नाव द्यावे.

श्री.मनोज सांगोळे:- मा. महापौरजी, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही तर माझ्या प्रभागातील सुयोग नगर येथील ग्राऊंड हे १हजार रु.मध्ये देवून दिले तर त्यावर सुध्दा बोलू द्यायला पाहिजे.

महापौरः- प्रत्येकाला बोलण्यासाठी वेळ देण्यात येईल. चर्चेला प्रारंभ करु या.

श्री.हरीश ग्वालबंशी:-मा.महापौरजी, विरोधी पक्ष के सदस्य ने प्रश्न उपस्थित किया तो आपने कहां न्यायप्रविष्ठ विषय है और चर्चा नही कर सकते ऐसा इसके पहले सभागृह मे हुआ है और आज ऐसा क्या हुआ की सत्तापक्ष के सदस्य ने विषय उपस्थित किया तो उसपर चर्चा ले रहे है आपकी कार्यप्रणाली पर मुद्दा उपस्थित हुआ है की आप न्याय देनेवाले महापौर हो क्या ?
(बेल)

महापौरः-प्रशासनाने उत्तर दिले, आपण चर्चेला सुरवात करु या.

श्री.धर्मपाल मेश्राम:-मा.महापौरजी, मानवतेच्या शत्रुसंगे युध्द आमचे सुरु,मी विनंती करतो, माझ्या भाषणात अडथळा आणीत असतील तर मी खाली बसतो. नागपूर शहरासाठी सुधारीत

विकास योजना महाराष्ट्र प्राधिकरण एनआयटी १९६६ चे कलम २१/१ मध्ये एनआयटी बरखास्त करुन नागपूर महानगरपालिका प्लॉनिंग ॲथारिटी एकच असावी. हा मागच्या पाच वर्षाच्या कालखंडात मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या सरकारने घेतलेला निर्णय आहे. मी या महानगरपालिकेचा सत्तापक्षाचा नगरसेवक म्हणून आणि या नागपूर शहराचा एक सामान्य नागरिक म्हणून मा.देवेंद्र फडणवीसांनी घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करतो. दिनांक २७ ऑगस्ट २००२ चे एक पत्र वाचून दाखवितो.(वाचले) मी एक विनंती करतो. हे पत्र सहा. संचालक नगररचना विभागाला मिळालेले आहे. कृपया ते जर याची शहानिशा करतील तर ही चर्चा पुढे नेता येईल. नागपूर सुधार प्रन्यासला ७ योजनेमध्ये काम करण्याची संधी देवून उर्वरित योजनेच्या बाबतीत नागपूर महानगरपालिकेला प्लॉनिंग ॲथारिटी म्हणून घोषित केल्याचे आमच्या ऐकण्यात आहे किंवा वर्तमानपत्रामध्ये आहे. एडीटीपीने त्या पत्राची शहानिशा करुन दिली तर बरे होईल.

महापौर:- प्रशासनाने सांगावे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी, नागपूर शहर ७ योजनेअंतर्गत क्षेत्र नागपूर सुधार प्रन्यास अखत्यारित घोषित केले होते. त्या अनुषंगाने ७ डिसेंबर २००२ अंतर्गत संपुर्ण नागपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील गुंटेवारी अधिकार क्षेत्र नागपूर सुधार प्रन्यासला देण्यात आले होते. तथापि २७.०८.१९ च्या निर्णयान्वये ७ योजना अंतर्गत जे क्षेत्र महानगरपालिका नियोजन प्राधिकारणी म्हणून घोषित केलेले आहे. त्या अनुषंगाने त्या भागातील विकास परवानगी देणे, गुंटेवारी अंतर्गत पुर्ण बांधकाम परवानगी, रेग्युलायजेशन देण्याचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम:-मा.महापौरजी, गुंटेवारी संदर्भात एनआयटीला ७ योजना सोडल्या होत्या ते याच्यामध्ये जोडल्या आहेत.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी, ७ योजना आणि गुंटेवारी संपुर्ण क्षेत्रासाठी नागपूर महानगरपालिका ही प्राधिकारीणी म्हणून २७.०८.२०१९ च्या शासननिर्णयाने घोषित करण्यात आलेले आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, २७.८.२०१९ च्या शासननिर्णयामध्ये ७ योजनेचा उल्लेख आहे परंतु गुंटेवारीचा उल्लेख मला दिसत नाही. कृपया सहा.संचालक नगररचना यांनी स्पष्ट करावे. त्यामध्ये कुठे गुंटेवारीचे क्षेत्र इन्क्ल्युड केले आहे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी, ६ डिसेंबर २००२अन्वये महाराष्ट्र शासनाने संपुर्ण महानगरपालिका क्षेत्राकरिता निर्देश दिले आहे. त्या निर्देशाच्या अनुषंगाने नागपूर शहरासाठी संपुर्ण क्षेत्रामध्ये गुंटेवारीच्या विकासासाठी नियोजन व नुतनीकरण एनआयटीला करण्यात येईल असे नमुद करण्यात आले होते. त्या अनुषंगाने २७.०८.२०१९ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने ७ योजना सोडून नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केल्यामुळे त्या संपुर्ण क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण आणि विकास प्राधिकारण या नात्याने नागपूर महानगरपालिकेकडे हे कार्य आले आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, गुंटेवारी कायद्याअंतर्गत जे ६ डिसेंबर २००२ चे जे परिपत्रक आहे. गुंटेवारी कायद्याच्या कलम २१ च्या तरतूरीनुसार नागपूर शहरातील संपुर्ण क्षेत्रामध्ये गुंटेवारी क्षेत्रामध्ये विकास नियंत्रण व नियमितीकरण एनआयटी कडून करण्यात येईल असे स्पष्ट आहे. आता गुंटेवारी कायद्यामध्ये काही एमीडमेंट सरकारने केले आहे काय?

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी,गुंटेवारी अधिनियम कायद्याच्या २००१ कलम २१ अन्वये राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधिपत्याखाली हा जी.आर.काढला आहे. एमएटीपी ॲक्टच्या कलम २/१५ च्या नियंत्रण प्राधिकारीणी ची व्याख्या नमुद केली आहे. त्या व्याख्येच्या अनुषंगाने एमआरटीपी ॲक्ट १९६६ च्या कलम २/१५ नागपूर महानगरपालिका संपुर्ण क्षेत्रासाठी घोषित करण्यात आले आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, आपल्या गुंटेवारी ॲक्टमध्ये स्पेसिफिक नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकारीणी म्हणून नेमलेले आहे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी,निर्देश काढले होते शासन निर्णय नाही. त्यामध्ये स्पष्ट लिहिले होते की २४०१/८५५/२७.०२.२००९ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. ७ योजना त्यांच्याकडे आणि उरलेले क्षेत्र महानगरपालिकेकडे होते. ७ डिसेंबर २००२ च्या शासन निर्देशामध्ये त्याचा अधिकार देण्यात यावा असे शासन निर्णयात स्पष्ट केले आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, गुंटेवारी कायद्या कोणत्या तारखेपासून लागू झाला होता.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी,०१.०१.२००१ च्या पूर्वी पासून गुंटेवारी कायद्या लागू झाला आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, या जी.आर.च्या शेवटच्या पॅरामध्ये एनआयटीने काय करावयाचे आहे हे स्पष्ट केले आहे. एनआयटीला जे करावयाचे आहे ते सर्व सोडून महानगरपालिकेला करावयाचे आहे. मा.महापौरजी आपण गावंडे साहेबांना आदेश दयावे, त्यांनी त्या जी.आर.चा शेवटचा पॅरा वाचून दाखवावा.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी, शेवटच्या पॅरात लिहिले आहे. नागपूर सुधार प्रन्यास याने त्यांच्याकडील विकास परवानगी संदर्भात त्यांना विकास करावयाचे असे स्पष्ट त्या शेवटच्या परिच्छेदात दिलेले आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम:-मा.महापौरजी, महानगरपालिकेकडे जवळपास १० हजार पेक्षा जास्त अधिकारी आणि कर्मचारी वर्ग आहे. नागपूर शहरामध्ये ३५ लक्ष लोकसंख्येच्या या शहरामध्ये निवडून आलेले जेवढे प्रतिनिधी आहेत ते सगळे आपआपल्या प्रभागामध्ये आणि वस्तीमध्ये आपआपल्या नागरिकांचे प्रतिनिधीत्व व नेतृत्व करतात. त्यामुळे मा. महापौर साहेब मला असे वाटते, नागपूर महानगरपालिका ही लोकांच्या सहभागातून ,लोकांच्या मतदानातून अस्तित्वात आलेली संस्था आहे. दुसरीकडे एनआयटी ही अपाईंट केलेली संस्था आहे. शासनाने विशिष्ट उद्देश ठेवून डोक्यात ज्या काही योजना असतील त्या राबविण्यासाठी नागपूर शहराच्या ३५ लक्ष लोकसंख्यावर जबाबदारी बसविण्याकरिता नागपूर सुधार प्रन्यासची निर्मिती केली. जर नागपूर शहराचे प्रतिनिधीत्व व नेतृत्व करिता मी ज्या प्रभागातून निवडून आलो त्या लोकांची जबाबदारी ही माझी आहे. मी विचारलेल्या विकासाच्या प्रश्नावरती उत्तर देण्याची जबाबदारी ही प्रशासनाची आहे. त्यामुळे मा.महापौरजी जेवढया तातडीने एनआयटीला प्रश्न विचारु शकतो तो महानगरपालिकेच्या आयुक्तांना देखील विचारण्याची देखील मी ताकद ठेवतो. मा.महापौरजी, अशा पध्दतीच्या स्थितीमध्ये नागपूर शहरामध्ये एनआयटी पुनर्जिवीत करण्यामागची भुमिका काय असेल, त्या मागची मनिषा काय असेल ते प्रशासनाने सांगावे. या नागपूर शहरात लोकांना न्याय देण्याची व्यवस्थापन मजबूत करावे लागेल. मा.आयुक्तांचे या ठिकाणी स्वागत करतो आणि अभिनंदन करतो आणि सांगू इच्छितो की या शहरातील ३५ लक्ष लोकसंख्याच्या अपेक्षा आपल्याशी

जुळलेल्या आहेत. मग आम्ही लोकप्रतिनिधी आहेत. आमच्या सुध्दा अपेक्षा तुमच्याशी जुळलेल्या आहेत. मा.महापौरजी, जर ख-या अर्थाने आपल्याला नागपूर शहराच्या लोकांना न्याय द्यायचा आहे तर आपली प्रशासकीय व्यवस्था पुर्ण करावी लागेल. प्रशासकीय व्यवस्था समजून घ्यावी लागेल. एखादया विभागाचे प्रेझेंटेशन म्हणजे काय ? मी उदाहरण सांगतो. एनआयटी प्रोसेसिंग २०/२० चे प्रेझेंटेशन प्रकल्प विभागाच्या आयुक्ताकडे आले. काय केले प्रेझेंटेशनचे आयुक्तांनी, हे प्रेझेंटेशन परिपुर्ण आहे काय? निश्चितपणाने नाही. हँजरच्या प्रकरणामध्ये या सभागृहाच्या निर्देशानुसार मी स्व:त चौकशी करीत आहे. आमची पाच लोकांची समिती आहे. या सगळया गोष्टी सोडविण्याचे आयुक्त म्हणून जबाबदारी नाही काय? हा माझा प्रश्न आहे. जोपर्यंत प्रशासन मजबूत करणार नाही तोपर्यंत  या शहरातील लोकांना ख-या अर्थाने न्याय देणार नाही. मी एडीटीपींना या हस्तांतरणाच्या संदर्भाने पत्र दिले आणि पत्राद्वारे त्यांना म्हटले की सहा.संचालक नगररचना महानगरपालिकेच्या वतीने  मनपात अंतर्गत  येणारे विविध विभागातील इच्छुक कनिष्ठ अभियंते त्यांचे मुळ कार्य सांभाळून गुंटेवारीच्या संदर्भात अतिरिक्त कार्ये ठरविण्यात येईल अशा विहित वेळेत करता येईल किंवा कसे या संदर्भात प्रस्ताव मागविण्याचे सुचित केले होते. त्याप्रमाणे नागपूर शहराच्या महानगरपालिकेत कार्यरत जवळपास १० कनिष्ठ अभियंत्यांने तसे प्रस्ताव एडीटीपी विभागाला दिले होते. अडचण कशी आहे. आमचे प्रशासन किती चुस्त आणि दुरुस्त आहे. तत्कालीन आयुक्तांची बदली झाल्यामुळे सगळा प्रस्ताव तो रखडला आाणि थांबला त्यामुळे नागपूर शहरातील गुंटेवारी अधिनियमा अंतर्गत जे जे प्रस्ताव होते ते थांबले. मी असे म्हणत नाही ते पुर्णत: थांबले. त्यातील अनेक स्टॉफची कमतरता असल्यामुळे, अशी व्यवस्था आपण उभी करु न शकल्यामुळे त्यामुळे अडचणीत आले. मा.महापौर साहेब, जर मला ख-या अर्थाने अशा पध्दतीने निर्णय घ्यावयाचा असेल आणि खरोखर ३० लक्ष लोकसंख्येला ख-या अर्थाने न्याय दयावयाचा असेल तर आम्हांला दोन्ही बाजूने समजून घ्यावे लागेल. प्रशासनातील अडचणी आणि प्रशासनात जे काम करतात त्यांच्या सुचना आणि त्याचे पलिकडे जावून लोकप्रतिनिधींना जनतेच्या माध्यमातून ज्या काही सुचना प्राप्त होतात त्यांचा देखील विचार करुन या सगळयांना सांभाळून पॅरलल नेवून कुठेतरी यंत्रणा दुरुस्त करावी लागेल असे मला वाटते. मा. पालकमंत्र्यांनी जे पत्र लिहिले असेल आणि प्रशासनामध्ये अशा पध्दतीची त्रुटी राहणार असेल तर आज पालकमंत्र्यांनी पत्र लिहिले उद्या या शहरातील ३५ लक्ष लोक अशा पध्दतीने शासनाला पत्र लिहितील काय ? असा मला संशय आहे. ते करायचे नसेल तर आपल्याला प्रशासकीय व्यवस्था चांगली दुरुस्त करावी लागेल असे मी सांगू इच्छितो. मा.महापौर साहेब, या प्रेझेंन्टेशन आणि हँजरच्या प्रकरणामध्ये विधानसभेमध्ये आमदार गिरीश व्यास यांनी प्रश्न ठेवला आहे.

(बेल)

महापौर:- विषयावर बोलावे. आपल्याला महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यासच्या हस्तांतरण प्रक्रियाच्या विषयावर बोलावयाचे आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम:-मा.महापौरजी, मला प्रशासनाच्या गोष्टीवर बोट ठेवावे लागेल आपल्याला परवानगी दयावयाची नसेल तर माझे बोलणे चुकीचे होईल.

महापौर:-  बोट शंभर टक्के ठेवावयाचे आहे परंतु आता हँजरचा विषय नाही आहे. एनआयटीचा विषय आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम:-मा.महापौरजी, मला हॅजरचा विषय म्हणावयाचा नाही. मी उदाहरण देत आहे. नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करणे ही काळाची गरज आहे. जर अशा पध्दतीने या राज्याचे कृत्रिम सरकार आणि नागपूर शहराचे पालकमंत्री अशा पध्दतीचे पत्र देवून निर्णय घेणार असेल आणि मुख्यमंत्र्यांना निर्णय घेण्यासाठी बाध्य करणार असेल तर या सभागृहाचा सदस्य म्हणून आणि या शहराचा एक नगरसेवक म्हणून पालकमंत्र्यांचा निषेध करतो.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर, मा.सदस्य मा.पालकमंत्र्यांच्या पत्राचा उल्लेख वारंवार करीत आहे. असे कुठले पत्र नागपूर महानगरपालिकेला प्राप्त झाले आहे का? ते सांगावे.

(बेल)

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):-मा.महापौरजी, मा.पालकमंत्र्यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना २ जानेवारी २०२० रोजी एक निवेदन दिलेले आहे. त्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने दि. १०.०१.२०१९ रोजी महानगरपालिकेला त्यावरती अहवाल अपेक्षित आहे असे पत्र दिलेले आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, मा.पालकमंत्र्यांनी मा. मुख्यमंत्र्यांना काय पत्र लिहिले त्याचा आपला काय संबंध आहे. काहीही संबंध नाही. त्यामुळे त्या पत्राच्या अनुषंगाने पालकमंत्र्यांचा निषेध करणे बरोबर नाही. मा.महापौरजी, या संदर्भातील..........

श्री.धर्मपाल मेश्राम:- मा. महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर, मा.पालकमंत्र्यांनी मा. मुख्यमंत्र्यांना जे पत्र लिहिले त्या पत्राचे समर्थन या सभागृहातील जेष्ठ सदस्य करतात काय ?एवढा माझा प्रश्न आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, सर्वात महत्वाचा विषय मा. पालकमंत्र्यांच्या पत्राच्या अनुषंगाने शासनाने जो अहवाल महानगरपालिकेला मागितला तो अहवाल देण्यासाठी ही महानगरपालिका स्वतंत्र आहे. परंतु हा अहवाल देत असतांना आपण एका व्यक्तिचा निषेध नोंदविता यावर अजून चर्चाच झालेली नाही. निश्चितपणाने तुमची भावना असेल तर मा.पालकमंत्र्यांचा निषेध व्यक्त करण्यास हे सभागृह मागेपुढे पाहणार नाही. मात्र या संपुर्ण प्रक्रियेमध्ये नागपूर सुधार प्रन्यासला जिवंत ठेवण्याचे पाप ज्या कुणी लोकांनी केले त्यांचा नावाचा निषेध करण्याचा ठराव या सभागृहात करावा लागेल. आम्ही पालकमंत्र्यांचा निश्चितपणाने निषेध करु जर त्यांच्या पत्रात या शहराचे वाईट करण्याचा काही हेतू असेल तर आम्ही सुध्दा या सदनाच्या माध्यमातून त्यांचा निषेध करु.परंतु एनआयटीला जिवंत ठेवण्याचे पाप ज्या ज्या लोकांनी केले आणि ज्या ज्या कालखंडात केले त्यांचे नामनिर्देशन करणार आहे काय ?

श्री. प्रविण दटके :-मा. महापौरजी,पाईंट ऑफ आर्डर, त्या त्या लोकांचे पत्र असतील तर पटलावर ठेवावे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मा.दटके साहेबांनी ज्या गोष्टीसाठी पाईट ऑफ आर्डर घेतला त्या त्या सर्व गोष्टी मी पटलावर ठेवतो. परंतु तुम्ही कनविन्स होण्यासाठी तयार आहे का ?

श्री. प्रविण दटके :-मा. महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मा. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्राची प्रत आमच्याकडे आहे. एनआयटीचा अहवाल आमच्याकडे आहे. पत्र दिले त्या पत्रावर चर्चा सुरु आहे. प्रविण दटके यांनी जर कुणाला पत्र दिले असेल तर प्रविण दटके यांचा निषेध करणारा ठराव ठेवावा.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, या अनुषंगाने आपण चर्चा करु. चर्चेच्या निश्कर्षाअंती जे जबाबदार आहेत त्यांचा निषेध करा.

श्री. प्रविण दटके :-मा. महापौरजी, मा. महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, आपण सर्वांना भाषण करण्याची संधी दिली. त्यांना भाषण करु दयावे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, दटके साहेब, माझी एवढीच विनंती आहे. मा. पालकमंत्र्यांचा निषेध करण्याच्या आधी चर्चा होवून जावू दया.

श्री. प्रविण दटके :-मा. महापौरजी, नवीन सदस्य निवडून आलेले आहेत ते कधी आवेशामध्ये बोलून देतात त्यामुळे निषेध करण्याची गरज नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा. महापौरजी, मग मान्य आहे.

श्री. सतिश होले:-मा. महापौरजी, सरळ विषयावर चर्चा केलेली बरी. सगळयांचे विचार ऐकुन घ्यावे.

श्री.संदीप सहारे:-मा.महापौरजी, हस्तांतरणावर बोलावे असे तुम्ही रुलिंग दिले. आपण हस्तांतरणावर बोलावे तुम्ही आता आदेश दिले. हस्तांतरण हा विषय बरखास्तीला जोडून आलेला आहे काय ? हस्तांतरण करावे म्हणजेच बरखास्त करावे म्हणून पुनश्च आपल्याला सांगतो, हा विषय कोर्टात असल्यामुळे यावर चर्चाच होवू शकत नाही.

श्री.धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाचे महत्व अधोरेखित करुन कनिष्ठतेचा आणि जेष्ठतेचा वाद बाजूला सारुन एक माणुस, एक मत आणि एक मुल्य. मला एकदा निवडून आला की दहांदा निवडून आले याच्याशी मला काही कर्तव्य नाही. मी या सभागृहाचा सदस्य आहे. मला एक मत देण्याचा अधिकार आहे ते मी देईल. आणि त्याचे मुल्यमापन देखील एकच होईल. त्याचबरोबर या देशाच्या संविधानाने मला विचार अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. मला माझे मत मांडण्याचा आणि देण्याचा अधिकार आहे. निश्चितपणाने मा.पालकमंत्री चुकणार असेल तर त्यांचा निषेध देखील करण्याचा मी माझे कर्तव्य समजतो आणि निश्चितपणाने तेवढया ताकदीने अशा पालकमंत्र्यांचा या सभागृहात निषेध करतो. कोणत्याही एनआयटीचे चित्र महाराष्ट्रातील कोणत्याही शहरामध्ये दोन प्लॉनिंग अँथारिटी नाहीत. असे असतांना नागपूर शहर, शहर आहे की खेडे आहे. मागास आहे की विकसीत आहे की विकसनशील आहे. याचाही विचार आपल्याला करावा लागेल. जर असे असेल तर या मा.महापौरजी, सोबत या शहराचे नियोजन प्राधिकरणी फक्त एकच असावी ती म्हणजे नागपूर महानगरपालिका असावी. आपल्या शहरामध्ये नवीन लोक येण्याचे सत्र सुरु झाले आहे.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, एक सुचना होती पुर्ण वेळ धर्मपाल मेश्राम यांनाच देवून टाकावी.

श्री.धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, मी सभागृहात बसलेल्या सर्व विरोधी पक्ष नेत्यांचा मनापासून ऋणी आहे. कारण ते बोलू शकत नाही ते मी बोलू शकतो म्हणून ते मला समर्थन देत आहे. या शहराची नियोजन प्राधिकारीणी ही एकच असावी. मी असे म्हणेन की आज नागपूर शहरामध्ये नवीन नवीन लोकांचा येण्याचा सपाटा सुरु आहे. एकीकडे पालकमंत्री नवीन आले आहे. ते नवीन नाही परंतु पुन्हा आले त्यांना काय निर्णय करावयाचा किंवा घ्यावयाचा किंवा मुख्यमंत्र्यांना काय पत्र द्यावयाचे किंवा कोणत्या पध्दतीचा निर्णय या शहराच्या लोकांवर लादावयाचा आहे. पण एक ऐकुन घ्या, तुम्ही निर्णय घेण्यास मोकळे आहात परंतु या शहरातील

जनता तुमचे निर्णय स्विकारणार नाही हे आमच्यावर आहे. या शहरातील जनता ही या वाहयाद निर्णयाच्या विरुध्द जातील त्या दिवशी या नागपूर शहरातील वातावरण वेगळे होईल. हे जर होवू द्यावयाचे नसेल तर या शहरासाठी एकमेव प्लॉनिंग ॲथारिटी महानगरपालिकाच असली पाहिजे. मी आपले भाषण समाप्त करतो परंतु हे करीत असतांना नागपूर महानगरपालिकेच्या प्रशासनाला नवीन दमाचे आयुक्त मिळाले त्यांचा इतिहास असे सांगतो की १३ वर्षाच्या कालखंडामध्ये त्यांच्या १४ बदल्या झाल्या. यावर एक शेर आहे एक तो आदमी अच्छा होगा या शहर मे तनहा होगा असा जो काही शेर आहे. मी असे म्हणणे, त्यांनी प्रशासनातील ज्या काही अडचणी आहेत त्यावर बोट ठेवून ज्या सुधारणा केला त्या सुधारणांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांचे आयआयटी मुंबई तील सभागृहातील भाषण मी ऐकले होते, मॅनेजमेंटवरती बोलले, दुदैवाने मी एक सुचना देवू इच्छितो, मी त्या पातळीचा नाही. मीआयएएस ची परीक्षा दिली नाही तर क्रॅक करण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु मी असे म्हणेण की आजकाल जो नवीन मॅनेजमेंटचा फंडा आला आहे तो अत्यंत चुकीचा आहे. माणसाच्या माणुसकीचा मॅनेजमेंट ज्या दिवशी ख-या अर्थाने होईल, ज्या दिवशी त्यांची भावना समजून घेवू त्या दिवशी ख-याअर्थाने आम्ही समस्येच्या मुळाशी जावू शकू असा विश्वास व्यक्त करतो. अशाच प्रकारची सुचना नागपूर जिल्हयाच्या पालकमंत्र्यांना करु इच्छितो. या शहरात सगळे नवीन आलेल्या लोकांचे स्वागत करुन पुनश्च एनआयटीला कोणत्याही पध्दतीने जिवंत करण्याचा प्रयत्न झाला तर नागपूर शहरातील सर्व लोकप्रतिनिधी शहरातील लोकांना याच्या विरोधाकरिता बाहेर येवू असे बोलून मी थांबतो.

श्री.मनोज सांगोळे:-मा.महापौरजी, मला वेळ दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सावित्रीबाई तिच्या एका लेकीचे एका माथेफिरुने पेट्रोल टाकून आग लावली त्यात ती मृत्यू पावली तिला विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो. एनआयटी बरखास्त केल्याबद्दल आपल्या सरकारचे अभिनंदन सुध्दा करतो. हे सभागृह नागपूर महानगरपालिकेचे ११ वे झोन विकते, एका महापुरुषाचा बंगला विकते. हे सभागृह फुटबॉल असोसिएशनने दिलेली जागा विकते, यशवंत स्टेडिअम गहाण ठेवते. ५०० कोटी रुपये आपल्या कडे ठेवून ते स्टेडियम गहाण ठेवते हे सर्व आमच्या नजरेखालून गेलेले आहे. एनआयटीची ही बरखास्त झाली तर त्यांच्या इमारती आपल्याला भेटल्या काय ? त्यांचे संसाधने भेटली त्या लोकांसोबत,कर्मचा-यांसोबत बरखास्त झाली काय? किती कोटीच्या जमीनी विकल्या यावर काही निर्णय झाला नाही.ज्या ज्या जमिनी विकल्या गेल्या त्या परत करणार आहे काय?आजपर्यंत ५७२, १९०० लेआऊट आणि २३०० लेआऊट मध्ये नागपूर शहराच्या सिमांकनामध्ये जे जे बिल्डर अवैधरित्या बांधकाम काम करतात. त्या बिल्डरवर महाराष्ट्र सरकारने हात घातला आहे काय? नागपूर शहरातील लोकांना याची सुध्दा माहिती पाहिजे. विकास कामे होत आहे यात काही शंका नाही. या शहरात राजस्व वाढीसाठी किती लोकांनी प्रयत्न केले. शहरात अवैधरित्या रस्त्यारस्त्यावर बाजार भरतात. सभागृहात यावर कित्येकदा चर्चेच बोललो. यात उत्पन्न वाढविण्याकरिता काही लोक लावा व त्या लोकांना शिस्त दया. या शहरात किती जनता दरबार भरले, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब असो, माजी पालकमंत्री बावनकुळे साहेब असोत. माजी महापौर असोत यांचे जनता दरबार झाले. या सभागृहात एनआयटीचे सदस्य बसलेले आहेत त्यांनी हा विषय कधी घेतला काय, कधी लावून धरला काय याचीही चर्चा व्हायला पाहिजे. कोणाचा पक्ष कोणाला मुर्ख बनवितो हे समजत नाही. जनतेचा नुसता कोंडमारा होत आहे. त्याच्याकडे सगळयांचेदुर्लक्ष आहे. जनतेला कोणताही त्रास न होता विकास शुल्क घेवून सर्वांना

समान मुलभूत सुविधा मिळायला पाहिजे अशी मी येथे विनंती करतो. तुम्ही सक्षम आहात, सभागृह सक्षम आहे यात शंका नाही. देशामध्ये ६ वर्षापासून केंद्र सरकारचे चालू आहे. बेटी बचाव बेटी पढाव, झाड लगाव झाडे जगवा, पाणी जिरवा,पाणीवाचवा याच्यावरतीच चर्चा होते. परंतु न्यायालयीन प्रक्रियेत महानगरपालिकेच्या विरोधात जे जे प्रकरण आहे त्या त्या प्रकरणावरती वकीलसाहेबांसोबत महानगरपालिकेच्या माध्यमातून केसेस लढतो. किती तरी गोष्टी प्रलंबित आहेत. त्यात महानगरपालिकेचा अमाप पैसा खर्च होत आहे त्याची गिनती नाही. सिमेंट रस्ता तयार होतो त्यात खालचे मटेरियल काढतात आणि त्याला साइडला लावतात त्यांच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे. या सभागृहाने फॉरेस्टवाल्यांना शेकडो रुपयाच्या जमिनी दिल्या आहेत. मा.महापौरजी, माझी एक विनंती आहे एक पीआय एनआयटी आणि महानगरपालिकेच्या विरोधात फुटबॉल असोसिएशने दाखल केली आहे ती न्यायप्रविष्ठ आहे. माझ्या परिसरातील लोकांकरिता ती सोडलेली जागा होती एनआयटीने फुटबॉल असोसिएशनला दिलेली आहे, जी धनाढय आहे.ती सोडविण्याचा प्रयत्न करावा. एनआयटी बरखास्त झाली तर त्याचे कर्मचारी आपल्याकडे घ्यावे. संपुर्ण म्हाडा, खाजगी मौज्याच्या जागा आणि अविकसित जागा आपल्या महानगरपालिकेकडे आल्या पाहिजेत. जे कुणी म्हणतात एनआयटी बरखास्त होवू नये असे म्हणणारे काही लोक असतील त्यांचा विचार महानगरपालिकेत पुन्हा होणार नाही ही जनता ठरवेल. हे सर्व तुम्ही बघणारच आहोत. शिकले सवरलेले लोक आहेत ते सर्व बघून घेईल. केजरीवाल यांनी चांगले काम केले म्हणून निवडुन आले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.जयभीम, जयभारत.

श्री.संजय महाकाळकर:- मा.महापौरजी, ब-याच वर्षापासून या नागपूर शहरामध्ये या नागपूर शहराची जी जनता आहे ती या दोन प्राधिकारीणी या शहरात असल्यामुळे बरेच नागरिक बरेच वर्षापासून त्रस्त होते. एक चांगला निर्णय एनआयटी बरखास्त करुन संपुर्ण प्राधिकरण एकत्रित राहावे हा निर्णय घेवून महानगरपालिका एकच प्राधिकारणी राहावे हा निर्णय झाला त्याबद्दल अभिनंदन करतो. परंतु मा.महापौरजी, विषय क्रमांक ५६ हा जो येथे आलेला आहे. नासुप्र आणि महानगरपालिका यांच्यातील हस्तांतरण प्रक्रियेविषयी विशेष चर्चा करण्याकरिता आलेला आहे. मग हस्तांतरण प्रक्रिया पुर्ण झाली नाही आहे काय? जर आपण म्हणता की एनआयटी बरखास्त होवून महानगरपालिकेकडे आली मग हा चर्चेला विषय आज एवढया दिवसानंतर कां आला. महानगरपालिका आणि एनआयटीचे जे काही काम सुरु आहे. आज आमच्या प्रभागामध्ये १९०० आणि ५७२ लेआऊट गुंटवारी अंतर्गत कामा करिता महानगरपालिकेकडे गेला ते एनआयटी कडे पाठविते आणि एनआयटीला गेले तर ते महानगरपालिकेकडे पाठविते. आपल्या सरकारने निवडणुकीच्या आधी निर्णय घेतला एनआयटी बरखास्त करुन एकच नियंत्रण प्राधिकारीणी राहणार. एवढा निर्णय झाल्यानंतर सुध्दा ही प्रक्रिया पुर्ण झाली नाही. इतक्या उशिरा याच्यावर चर्चा करतो आहे ही दुर्दैवी घटना आहे. मा.महापौरजी, हे सर्व होत असतांना महानगरपालिकाकडे एकच प्राधिकारीणी राहावी या विचाराशी मी सहमत आहे. नागपूर समजा या शहरामध्ये एखाद्याला बांधकाम करावयाचे असेल किंवा आपला प्लॉट रेग्युलाईज करावयाचे असेल तर महानगरपालिकेकडे ती सर्व यंत्रणा उपलब्ध आहे काय? आजही मी काही दिवसापूर्वीचा एक अनुभव सांगतो, गुंटेवारी अंतर्गत, ५७२ आणि १९०० लेआऊटमध्ये एनआयटीकडे एखादा नकाशा मंजुरीकरिता टाकल्यास काही दिवसातकाही त्रुटया काढून तो पुढे येतो परंतु नागपूर महानगरपालिकेत आल्यानंतर असा अनुभव राहिला एक नकाशा दहावेळा आपले जे अधिकारी

आहेत विभागाकडे वापस पाठवितात. बांधकाम नकाशा मंजूर करण्याकरिता महानगरपालिकेच्या चकरावर चकरा मारुन परेशान करतात. यामध्ये लोकांना होणारा त्रास कमी व्हायला पाहिजे. एनआयटी निश्चितपणाने बरखास्त होवून महानगरपालिका एकच प्राधिकारीणी राहिली पाहिजे. धन्यवाद.

श्रीमती नेहा निकोसे:-मा. महापौरजी, ही एनआयटी बरखास्त झाली याबद्दल महापौर आणि महानगरपालिका यांचे अभिनंदन करते. परंतु आजही एखादी फाईल बनवूनमहानगरपालिकेत गेलो ते ते म्हणतात एनआयटीमध्ये जा, आणि एनआयटी मध्ये गेलो तर ते म्हणतात महानगरपालिकेत जा. असे हे आमच्या सोबत होते तर जे सर्वसामान्य नागरिक आहेत त्यांचे किती प्रश्न असतील. ते सांगतात की महानगरपालिकेत गेलो तर ते म्हणतात एनआयटीमध्ये जा आणि एनआयटीत गेलो तर ते महानगरपालिकेत जायला सांगतात. त्यामुळे लोकांचे प्रश्न तसेच आहेत. मा.महापौरजी, एक विनंती करते, माझ्या एरियामधली एक गार्डनची फाईल बनविली होती ती फाईल एनआयटी कडे होती ती महानगरपालिकेकडे आली आहे. ती कुठपर्यंत पोहचली याची माहिती देण्यात यावी.

श्री.राजेंद्र सोनकुसरे:-मा.महापौरजी, सर्वप्रथम नवीन आयुक्त साहेबांचे मी मनपुर्वक स्वागत करतो. आज आपण एनआयटी व महापालिकेमध्ये हस्तांतरण करण्याच्या प्रकियेवर चर्चा घेतली. त्याबद्दल मा.महापौरजी आपले स्वागत करतो. भारतीय जनता पार्टीचे जे सरकार होते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी जो निर्णय घेतला. या नागपूर शहराची ३५ लक्ष लोकसंख्यासाठी हा निर्णय घेतलेला आहे. तो सर्व जनतेच्या हितासाठी योग्य आहे. ३५ लक्ष लोकसंख्येकरिता योग्य आहे. कारण मी ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतो त्या भागामध्ये जवळपास ७० टक्के एनआयटीचे लेआऊट आहेत त्यापैकी २० टक्के म्हाडा आहेत ते महानगरपालिकेत हस्तांतरीत झाले ते महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेले नाही आणि त्यामध्ये १० ते १५ टक्के आरक्षण आहे. काम करीत असतांना महानगरपालिकेला विकास कामे सांगितले तर एनआयटीकडे जावे लागते. एनआयटीकडे गेलो तर त्यांना एनओसी मागावी लागते आणि ते देत नाही म्हणून शहराच्या विकासामध्ये बाधा होतो, देशाचा विकास होतो आणि राज्याचा विकास होत असतो. तसा या शहराचा विकास व्हायला पाहिजे म्हणून ही महानगरपालिका मायबाप आहे. ही जबाबदारी आपण घेत असतांना एनआयटीला जे हस्तांतरीत करावयाचे आहे ज्यामध्ये ब-याच चुका झाल्या आहेत. मागील कित्येक वर्षापासून लोकांना ५७२ लेआऊटमध्ये पैसे भरुन डिमांड भरलेली आहे. त्यामुळे १९०० लेआऊटमध्ये पैसे भरणा-या लोकांना हेही बघायला मिळाले की ५७२ लेआऊटचे डिमांड नोटचे पैसे आणि १९०० लेआऊटचे पैसे घेतल्यानंतर सुध्दा त्या लेआऊटमध्ये विकासाची कामे झालेली नाही. १९०० लेआऊटमध्ये डिमांड नोटचे पैसे घेतले ते ५७२ लेआऊटमध्ये लावले. एनआयटीची डिमांड नोट करोडो रुपयेची असतांना जनतेकडून पैसेही घेतले तरीही विकास परिपुर्ण कां झालेला नाही. लेआऊटमध्ये विकास कां करण्यात आला नाही. हा माझा प्रश्न आहे. दुसरे, गुंटेवारी ॲक्ट अंतर्गत १ हजार रुपयाची भरण्याची डिमांड नोट देण्यात आली. असे किती तरी लोकांनी एग्रीमेंट केले. १ हजार रुपये भरले गेले त्यामध्ये काही प्लॉटची डबल रजिस्ट्री झालेली आहे आणि दुस-याला डिमांड दिली आहे. आधीचा भुखंड जो विकल्या गेला होता तो दुस-याला दिलेला आहे. असे कितीतरी केसेस चालत आहेत. या नागपूर शहरातील जनतेला त्यांना भुखंड मिळायला पाहिजे ते मिळाले नाही. एनआयटी हस्तांतरणाच्या या विषयामध्ये या नागपूर शहराच्या जनतेकरिता माझी एक सुचना आहे महानगरपालिकेच्या दहाही झोनमध्ये एनआयटीचे सर्व

कर्मचारी ज्या विभागाचे आहेत त्यामध्ये हस्तांतरीत करावे. योग्य सरळ पध्दतीने महापालिकेला या शहराचा विकास करण्याकरिता प्रशासनाकडून त्यामध्ये कार्यवाही करण्यात यावी. दुसरी गोष्ट या एनआयटीने ज्या लेआऊटमध्ये काम केले जी सिवरलाईन टाकली होती, जी ड्रेनलाईन टाकली होती त्याच्यामध्ये डिझाईन मॅप महानगरपालिकेच्या विभागाला मिळालेला नाही. महानगरपालिकेला विचारले तर एनआयटीकडे बोट दाखविते आणि एनआयटीकडे गेलो तर ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेले आहे असे सांगितले जाते. आजच्या घडीलाएखाद्या नागरिकाने सिंगल मजली जर घर बांधलेले असेल तर आणि त्याला डबल मजली जर घर बांधायचे असेल तर त्याला नकाशा मंजूर करावा लागतो त्याला नकाशा मंजूरीसाठी आरएल मिळत नाही. येणा-या भविष्य काळात त्यांना मुलांना शिकविण्याकरिता कर्ज घ्यावयाचे असेल तर ते घेवू शकत नाही त्यामुळे त्यांच्या मुलांचे नुकसान होत आहे. कारण काही पालक जे मध्यमवर्गीय आहेत आपल्या पाल्यांसाठी शिक्षणासाठी ऋण घेतांना आपले घर मार्गेज करुन शिक्षण पुर्ण करावे लागते. या तिकडम सरकारमुळे कुठलाही निर्णय होत नाही यामुळे त्यांच्या मुलांचे नुकसान होत आहे. कुठेतरी मुलांच्या भविष्याचा खेळखंडोबा होत आहे हे सरकार करीत आहे. त्यांना आरएल मिळत नाही त्यामुळे त्यांचे मुटयेशन होत नाही त्यांना लोन मिळत नाही आणि त्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही ही बाब लक्षात आणून दयावी. प्रशासनाला तसे निर्देश दयावे एवढेच बोलणे आहे.

श्री.मो.इब्राहीम:-मा.महापौरजी, नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त होनी चाहिए इस का तमाम कामकाज नागपूर महानगरपालिका ने अपने हाथ मे लेना चाहिए इस प्रस्ताव का मै समर्थन करता हूॅं अपने दो शब्द खतम करता हू l

श्री.प्रकाश भोयर:-मा.महापौरजी, एक बाजू आहे एनआयटी बरखास्त व्हावी, आणि दुसरी बाजू आहे एनआयटी पुनर्जीवीत व्हावी. ती पुनर्जीवीत होवू नये याकरिता आपण जे सभागृह घेतले, याकरिता आपले व्यक्तिश: आभार मानतो. मा.महापौरजी, आम्ही नगरसेवक जेव्हा आपआपल्या भागामध्ये काम करीत असतो. मा.महापौरजी काम करीत असतांना कोणता एरिया, कोणता लेआऊट हा एनआयटीमध्ये आहे आणि कोणता महापालिकेत येतो या संबंधी मा.सदस्यांना ब-याच गोष्टी माहीत नसतात आणि त्यामुळे त्यांचे हाल होत असतात. महानगरपालिकेचे एनआयटीवर ॲक्च्युअल चार-पाच ट्रस्टी असतात त्या ट्रस्टी व्यतिरिक्त मा.सदस्य त्या ठिकाणी गेला, किंवा काही लोकांना घेवून गेला, लोकांना घेवून गेल्यानंतर त्यांना उत्तर देणारे तेथे कुणी वाली नसतो. एनआयटी मध्ये जितके काही अधिकारी असतात ते हुकुमशाह प्रमाणे वागत असतात. या पध्दतीने नगरसेवकांचा अपमान सुध्दा होतांना मी स्वत:च्या डोळयांनी पाहिला आहे. मा.महापौरजी, स्थिती अशी होते, जेव्हा नगरसेवक कामाने एनआयटीमध्ये जातो, किमान या एरियातील डेव्हल्पमेंट कामे करावयाची आहे. विकासाची कामे करीत असतांना एनआयटी वेळोवेळी सांगतो. तुमच्या लेआऊटमध्ये १४ लक्ष रुपये आहेत आणि तुमच्या लेआऊटमध्ये काम करण्याकरिता ३५ लक्ष लागत आहे. त्यामध्ये होते असे, एखाद्या लेआऊटमध्ये १०० प्लॉट असतील आणि५० लोक राहत असतील आणि त्या ५० लोकांनी शुल्क् भरलेले असेल तरी त्यांच्या लेआऊटमध्ये डेव्हल्पमेंट होत नाही. एनआयटीचे अधिकारी आम्हांला असे सांगतात की आमच्याकडे इतका पैसा नसल्यामुळे आम्ही विकासाचे कामे करु शकत नाही. मग आमच्या सारखे सर्वसामान्य नगरसेवक वर त्या लेआऊटमध्ये डेव्हल्पमेंट करण्याची जबाबदारी असते. मी दक्षिम पश्चिम क्षेत्राचा नगरसेवक असून ती २०१७ मध्ये निवडून आलो. ही घटना माझ्यासोबत झालेली आहे. १४ लक्ष रु. त्या

लेआऊटमध्ये असूनही आम्हाला महानगरपालिकेमध्ये अर्ज करावा लागला आहे आणि महानगरपालिकेतून एस्टीमेट बनवावे लागते. एस्टीमेट बनविल्यानंतर जर मी तुमच्याकडे आलो तर आमच्या भागातील नगरसेवक आणि नागरिक जे पैसा एनआयटीमध्ये भरीत असतात आणि जेव्हा डेव्हल्पमेंटची गोष्ट येते तेव्हा महानगरपालिकेतून करावे लागते तर मग या एनआयटीची गरज काय? एनआयटी कोणते काम करते. मी  मागच्या अडीज वर्षापासून जितके लेआऊटमध्ये एनआयटी डेव्हल्पमेंट करीत नव्हती त्या त्या सर्व लेआऊटमध्ये मा. मुख्यमंत्र्यांच्या विशेष निधीसाठी त्यांना विनंती केली आणि त्या विनंतीच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्र्यांनी मला पैसा दिला. एनआयटीचे असलेले लेआऊटमध्ये डेव्हलमेंट झाले. एनआयटीमध्ये पैसा नाही असा भाग नाही, यांनी जर निश्‍चितपणे वेळोवेळी त्या भागात डेव्हलमेंटचे काम केले असते तर माझ्या माहितीप्रमाणे ६०-७० कोटी एनआयटीकडे शिल्लक आहेत. हे पैसे कां शिल्लक आहेत ते कां वापरले नाहीत. ते याकरिता शिल्लक राहिले की त्यांनी विकास कामांकरिता पैसे खर्च  न करता ते पैसे बॅकेंत ठेवण्याचे आणि त्यावर येणारे कमिशन खायचे काम केले. अशा अनेक बाबीआहेत ज्यावर बोलण्यात येत नाही. एनआयटी या सभागृहाला जबाबदार असते तर माझ्या प्रश्नाचे उत्तर त्यांना द्यावे लागले असते. मा.महापौरजी, ज्याप्रमाणे माझ्या प्रश्नाला आयुक्त साहेब जबाबदार असतील, आयुक्तांना उत्तर दयावे लागत असेल तर एनआयटीवर १५५ नगरसेवकांच्या प्रश्न मांडायचा आणित्याला उत्तर कां देवू शकत नाही. मग एनआयटी कशाला पाहिजे.  यासाठी हा माझा निषेध आहे. एनआयटी ही बरखास्त झाली पाहिजे. एनआयटी ही भ्रष्टाचाराचे एक मोठे कुरण आहे. मी जेव्हा नवीन नवीन २०१७ मध्ये निवडून आलो होतो. एका एरियात गेलो तेथे फार मोठे ग्राऊंड आहे. १५०० फुटाचे ग्राऊंड होते, ३५०० की ४५०० फुटाचा प्लॉट असेल. त्या एरियात त्या भागातील महिला योगा करीत होत्या. नंतर कालांतराने सहा-सात महिन्याने त्या ठिकाणी एक बोर्ड लागला. एका नेत्याच्या नावाने तो प्लॉट चालला गेला. मी काही नागरिकांना विचारले,एनआयटीला विचारले, त्या प्लॉटवर डेव्हल्पमेंट झाले होते त्यावर कम्पाऊंडिंग वॉल तयार करण्यात आली होती. ३५०० की ४५०० फुटाचा प्लॉट एका नेत्याने नावाने तो प्लॉट झाला होता. मला समजले नाही. एनआयटी ही पुनर्जीवीत कां करण्यात येते आहे. आदरणीय देवेंद्र फडणवीस यांनी एनआयटी कां बरखास्त केली.  यामध्ये एकच हा मुद्दा म्हणजे भ्रष्टाचार वाढविण्यात येत आहे. मा.महापौरजी, अनेक असे उदाहरण आहेत. संस्थेकरिता नाममात्र पैश्याने जागा दिल्या आहेत. मी कुणाचे नाव घेवू इच्छित नाही. ती या शहरातील मोठमोठी व्यक्ति आहेत. मी एक सर्वसाधारण नगरसेवक आहे. अशा या शहरातील नामवंत व्यक्तिंनी त्यांच्या स्व:तच्या संस्थेकरिता नाममात्र पैश्यात जमिनी घेतल्या. हे भ्रष्टाचाराचे कुरण आदरणीय देवेंद्र फडणवीस यांना २५-३० वर्षात संपवायचे होते. तत्कालीन मुख्यमंत्री असतांना त्यांनी ही एनआयटी बरखास्त केली. मा.महापौरजी, एनआयटीचा एक मोठा प्राब्लेम आहे. एनआयटीचे जितके लेआऊट असतात त्यावर नागरिकांकडून ग्राऊंड रेंट घेतला जातो. या शहरातील जनतेने एनआयटीचे ग्राऊंड रेंट भरावयाचे आहे तर दुसरीकडे नागपूर महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरावयाचा आहे. या नागपूर शहरातील जनतेवर दोन-दोन कर कशाकरिता लावावयाचा.  एकीकडे महानगरपालिकेचा मालमत्ता कर आणि दुसरीकडे नासुप्रचा ग्राऊंड रेंट अशा प्रकारे पैसे सर्वसामान्य जनतेला भरावे लागतो. या नागपूर शहरातील जनतेवर अन्याय होवू नये म्हणून एनआयटी बरखास्त केली. परंतु आजची स्थिती अशी आहे या नासुप्रला पुनर्जीवीत करण्याचा प्रयत्न होत आहे. हे भ्रष्टाचाराचे कुरण संपवायचे आणि या नागपूर शहरातील

लोंकावर असलेला ग्राऊंड रेंट आणि मालमत्ता कर असे दोन कर न राहता एकच रेंट लावण्यात यावा. मा. महापौरजी, येथे जे सरकार येते ते येथे आपला अधिकारी आणतात. एनआयटीवर जो सभापती येतो तेथे सरकारचे प्रतिनिधीत्व करणारे लोक आणले जातात. आपल्याला माहीत असेल सध्या साता-याचे खासदार शरद पवार याचे जवळचे मित्र श्री. पाटील हे एनआयटीचे सभापती आहेत. आपआपल्या अधिका-यांना बसवायचे हा भ्रष्टाचाराचा अड्डा चालवायचा त्याकरिता हा भ्रष्टाचाराचा अड्डा संपवायचा असेल तर एनआयटी बरखास्त करणे गरजेचे आहे. आता नवीन आयुक्त साहेब आले. एका सिनेम्यात मी बघितले, एक इन्स्पेक्टर शहरात येतो आणि पाच-सहा दिवस चार्ज घेत नाही तर तो इन्स्पेक्टर शहरात कुठे कुठे अड्डे आहेत, कुठे कुठे भ्रष्टाचार आहे. कुठकुठल्या एरियात क्रिमीनल आहेत याचा अभ्यास करतो तर आयुक्त साहेबांनी सुध्दा असा अभ्यास केला असेल आणि एनआयटीचा सुध्दा अभ्यास केला असेल. माझी आयुक्तांना विनंती आहे. त्यांचे उत्कृष्ठ नाव आहे त्या नावानुरुप एनआयटीचा किती भ्रष्टाचाराचा अड्डा आहे याचा आयुक्तांनी अभ्यास केल्यानंतर ते जावून सरकारला सांगावे. हया भ्रष्टाचारासाठी एनआयटीला पुनर्जीवीत करणे हे नागपूर शहरावर अन्याय करणारे आहे. मा.महापौरजी, आमची विचारधारा एक आहे. ती देशासाठी असो, महाराष्ट्र राज्यासाठी असो की नागपूर शहरासाठी असो. देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजी यांनी या देशामध्ये दोन संविधान, दोन निशान आणि दोन प्रधान नही चाहिए म्हणून ३७० कलम बरखास्त केली. याचा धागा पकडून आदरणीय देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर शहरामध्ये दोन डेव्हल्पमेंटअॅथारिटी नसावी, दोन अधिकारी नसावेत. ही भावना वरचे राजकीय नेते तय करतात. त्याप्रमाणे महाराष्ट्राचे नेते आदरणीय देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर शहरात दोन विकास प्राधिकारणी नकोत आणि दोन अधिकारीही नकोत. आम्हांला एकच अधिका-यावर एकच संस्थेवर विकास करण्याचा अधिकार घेतो. त्याप्रमाणे खालचे हे सर्व नगरसेवक या एनआयटीचा विचार करतात आणि सर्वांचे एकच धोरण आहे. या नागपूर शहरामध्ये दोन विकसनशिल संस्था, विकास करणा-या संस्था नकोत ती एकच असावी. ज्या कुणी व्यक्तिने अशाप्रकारचे पत्र पाठविले असेल त्याच्या मनातील उद्देश या महाराष्ट्रातील जनता जाणून आहे. त्याचा धडा योग्य वेळी कशाना कश्या ना कश्या रुपाने शिकविला जातो. या पत्राचा मी निषेध करतो आणि मी माझ्या शब्दांना विराम देतो.

श्री.किशोर जिचकार:- मा.महापौरजी, एनआयटीच्या हस्तांतरणाच्या प्रश्नावर आपल्या येथे सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. मा.महापौरजी, या सभागृहामध्ये बरखास्तीचे असे ३ ठराव झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारने बरखास्तीचा निर्णय घेतला आहे. आजपर्यंत हस्तांतरणाची कार्यवाही झालेली नाही. म्हणून आपल्याला ही सभा घ्यावी लागली. मा.महापौरजी, आपल्या सभागृहामध्ये आजही दोन-तीन मागील एनआयटीचे ट्रस्टी बसलेले आहेत आणि आताचे एक ट्रस्टी बसलेले आहेत त्यांची चर्चा आधी घ्यायला पाहिजे होती नंतर आम्हांला बोलू द्यायला पाहिजे होते. मा.महापौरजी, ७३-७४ घटना दुरुस्तीनंतर ज्या काही पॅरलल संस्था होत्या त्या सर्व संस्था बरखास्त झाल्या. आपण इतके दिवस या इलिलिगल संस्थेला या नागपूर शहरात स्थान दिले. ज्या संस्थेने या नागपूर शहराचे खुप नुकसान केले. या सभागृहात सर्व नगरसेवकांनी आपआपल्या भाषणात आपल्या भावना व्यक्त केल्या. माझी सभागृहाला विनंती करतो. हस्तांतरणाची प्रक्रिया त्वरित पुर्ण करुन सर्व त्यांचा पैसा आणि मालमत्ता ८ दिवसांत आपण महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करावी.

श्रीमती उज्वला बनकर:- मा.महापौरजी, नवनियुक्त आयुक्त साहेबआले आहेत त्यांची पहिली सभा आहे त्यांचे सुध्दा मी अभिनंदन करते. आज आपण बघता नागपूर शहरात महिलांवरती अत्याचार मोठया प्रमाणात होत आहेत. नुकतीच या अत्याचाराला बळी पडलेली हिंगणघाटच्या मुलीचा दाहक मृत्यू झाला. अशी ही निंदणीय घटना घडली त्याचा मी निषेध करते आणि श्रध्दांजली अर्पण करते. आज एनआयटीचा विषय या ठिकाणी घेतलेला आहे. मला असे म्हणावयाचे आहे की एनआयटी बरखास्त करीत असतांना जे एनआयटीचा मॅनपावर आहे जेवढे अधिकारी आणि कारकुन वर्ग आहे. जो काही सगळा स्टॉफ आहे तो सगळा महानगरपालिकेत येईल. यांचा जो काही पेमेंटआहे तो महानगरपालिकेवर बसणार नाही काय?एवढा पैसा आपल्याकडे आहे काय? आपले महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांचा पेमेंट वेळेवर होत नाही. एनआयटीने ५७२ आणि १९०० लेआऊटच्या डेव्हल्पमेंटचे पैसै घेतले परंतु त्याचा विकास झाला नाही याची माहिती देण्यात यावी. जेव्हा आम्ही त्या लेआऊटमध्ये नगरसेवक म्हणून काम करायला जातो तेव्हा आमची गोची होते. इतक्या वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. एनआयटीने डेव्हल्पमेंटचा पैसा घेतला परंतु डेव्हल्पमेंट केले नाही. त्या ठिकाणी महानगरपालिकेला डेव्हल्पमेंट करावे लागते. त्या ठिकाणी महानगरपालिकेचा पैसा खर्च होतो.एनआयटीने डेव्हलपमेंटचा पैसा घेतला परंतु त्या लेआऊटमध्ये डेव्हल्पमेंट केला आहे काय? याची माहिती द्यायला पाहिजे. त्यांनी लेआऊटमध्ये डेव्हल्पमेंट केले नसला तरी डेव्हल्पमेंटचा पैसा घेवून घेतलेला आहे त्यामुळे तो भुर्दंड महानगरपालिकेवर येणार असे मला वाटते आणि म्हणून त्यांची पूर्व दिशा काय आहे ते एनएमसीने पुर्व दिशा पुर्ण करावी. ते लेआऊट एनआयटी डेव्हल्पमेंट करुन देणार आहे काय? त्याचा पुर्ण पैसा भरलेला आहे की महानगरपालिकेला करावे लागणार आहे याची सुध्दा पुर्ण माहिती मला देण्यात यावी. आणि जेव्हा डेव्हल्पमेंट करावयाचा असो, या ५७१, १९०० मध्ये असो की झोपडपटट्यामध्ये असो. या संपुर्ण परिसरामध्ये नागरिकांकडे आम्हांला जावे लागते कारण आम्हांला वोट मागावे लागते. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्हांला लोक निवडून देतात. मग महानगरपालिका आहे, एनआयटी आहे हा भाग नसतो. लोकांची एकच अपेक्षा असते आमचे काम झाले पाहिजे. नगरसेवकानी आमचे काम केले पाहिजे. या दुविधेत आम्ही असतो की जेव्हा एनआयटी काम करीत नाही तर महानगरपालिकेकडून काम करावे लागते. नगरसेवकाचा फंड देवून काम करावे लागते. अशा परिस्थितीत नगरसेवक फसलेला असतो. तेव्हा मला असे वाटते की एनआयटीचे काय आहे ते क्लिअर करावे. ५७२ आणि १९०० लेआऊट करिता लोकांकडून जो विकास शुल्क घेतला आहे तो पुर्ण खर्च केला काय? किती लेआऊट डेव्हल्प केले त्याचा तपशील, किती लेआऊट मध्ये डेव्हल्पमेंट व्हायला आहे त्याचा तपशील, पैसे घेतले तर काय केले त्याचा तपशील देण्यात यावा. किती पैसा उर्वरित राहिला, किती पैसे लागले याचा तपशील दिल्यानंतर महानगरपालिकेला हस्तांतरीत कशी होईल हे सांगण्यात यावे. याच्या नंतरच संपुर्ण प्रक्रिया काय आहे ती करावी. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते आणि माझ्या शब्दांना विराम देते. धन्यवाद.

श्री.परसराम मानवटकर:- मा.महापौरजी, एनआयटी बरखास्त व्हावी या मताचा मी आहे. परंतु कोर्टात केस असल्यामुळे कोर्ट जो निर्णय देईल त्याचे पालन करावे अशी माझी विनंती आहे.

श्री.दिनेश यादव:-मा.महापौरजी, मै जिस प्रभाग का नेतृत्व करता हूँ ६० परसेंट एरिया एनआयटी का है I वहां पर ५० परसेंट लोगो ने एनआयटी मे डेव्हल्पमेंट चार्ज भर दिया है परंतु

एनआयटीने न रोड डाली, न गडरलाईन, न लाईट है I मेरा यह कहना है की एनआयटी एमएमसी मे डिझॉल्व हो रही है तो डेव्हल्पमेंट करेगी क्या ? हम जब एनआयटी को डिलॉल्व कर रहे है तो वहां पर पुरा डेव्हल्पमेंट होना चाहिए। क्योंकी लोग एनआयटी मे डेव्हल्पमेंट चार्ज भर चुके है I एनआयटी मे जाओ तो वहा कहते है की महानगरपालिका को एनआयटी डिझॉल्व हो चुकी है यह हम एक देड साल से सुन रहे है। हमे एखादी फाईल बनाना है तो बना नही पाते I तो मेरा इतना ही कहना है की होता है तो सबसे पहले उन्ही लोगों का डेव्हल्पमेंट हो।

श्रीमती दर्शनी धवड:-मा.महापौरजी, नवीन रुजू झालेले आयुक्त यांचे सदनात आणि या शहरात खुप खुप स्वागत. आज आपण येथे महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यांच्यातील हस्तांतरीत प्रक्रियेच्या विषयावर चर्चेसाठी एकत्रित झालेलो आहे. २०१७मध्ये आपण सगळे या ठिकाणी निवडून आलेलो आहेत. २०१७ पासून एनआयटी बरखास्त होत आहे असे मी ऐकत आहे. मी अशा प्रभागाचे नेतृत्व करते प्रभाग क्र. १२ दाभा. दाभा प्रभागामध्ये दाभा वस्ती आणि टेकडीवाडी सोडून सगळे एनआयटीचे सॅग्शन लेआऊट आहेत. एनआयटीच्या लेआऊटमध्ये विकास कामे करतांना किती त्रास होतो हे सगळे अनुभवत आहात. त्या ठिकाणी विकास करतांना किती त्रास होतो हे मी ३ वर्षापासून मी सहन करीत आहे. एखादी फाईल तयार केली तरी काम करतांना खुप त्रास होतो. कारण फाईल मंजूर करीत असतांना सॅग्शन लेआऊट असल्यामुळे प्रत्येक एरियामध्ये ओपन स्पेस आहेत त्याची स्थिती अत्यंत वाईट आहे. कितीही इच्छा असली की त्या ठिकाणी एखादे गार्डन असावे, एखादी स्पोर्ट ॲकाडमीअसावी परंतु एनआयटी कडून एनओसी घेण्यासाठी भरपूर वेळ लागतो. मा.सदस्य श्री.नागेश सहारे हे क्रिडा समितीचे सभापती होते तेव्हा मी त्यांना म्हटले की माझ्या परिसरात एक स्पोर्ट ॲकाडमी तयार करुन दयावी. ते माझ्या सोबत आले संपुर्ण परिसरात ते माझ्या सोबत फिरले. परंतु संपुर्ण एनआयटीचे लेआऊट आणि एनआयटीच्या जागा असल्यामुळे वारंवार पत्र देवूनही एनआयटीची एनओसी मला मिळाली नाही आणि त्या वर्षामध्ये कितीही फॉलोअप घेतल्यावरही मला एकही ग्राऊंड मिळाले नसल्यामुळे मी तयार करु शकले नाही. मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांनी एक वाक्य म्हटले स्वर्गीय राजीव गांधीच्या बाबतीत की हम उपर से एक रुपया भेजते है और हमे १५ पैसे मिलते है तो या वाक्याचे एवढे मुळ जर कळले असेल तर गेल्या ३ वर्षापासून केंद्रात तुमची सत्ता होती, राज्यात तुमची सत्ता होती आणि महानगरपालिकेत तुमची सत्ता होती तर एवढे वर्षापासून या कामाला कां वेळ लागत आहे. गेल्या ३ वर्षापासून आज या विषयावर चर्चा करीत आहे. मान्य करते कोर्टात केस असल्यामुळे वेळ लागतो ते पहिले व्हायला पाहिजे. हा त्रास मलाच होत आहे असे नाही सभागृहातील सगळया नगरसेवकांना हा त्रास होत आहे. मी यासाठी म्हणत आहे की मी आऊटर एरियाची नगरसेविका असल्यामुळे याचा खुप जास्त त्रास होतो. ८०-९० टक्के सॅग्शन लेआऊट एनआयटीचे असल्यामुळे आम्ही विकास कामे कशी करणार आहे. रोज आमच्या दारावर नागरिक येतात आणि विचारतात. ते झोनमध्ये जातात तर त्यांना सांगितले जाते की एनआयटीमध्ये जा, एनआयटीमध्ये जातात ते म्हणतात आणि महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेले आहे तर महानगरपालिकेकडे जा त्यामुळे हे सगळे प्रश्न लोक नगरसेवकांना विचारतात. उज्वला ताई अगदी बरोबर बोलल्या, लोकांनी आम्हांला निवडून येण्यासाठी मत दिले आहे तर ते आम्हांला प्रश्न विचारणारच. त्यांना एनआयटी आणि एनएमसीशी काही घेणेदेणे नाही. त्यांना नगरसेवकांना उत्तर दयावे लागते. नागरिकांना काम हवे आहे. एवढया पत्राची माहिती विचारण्याकरिता एवढे

नगरसेवकांनी म्हटलेले आहे. तुम्हांला वाटत आहे भ्रष्टाचार होत आहे, भ्रष्टाचार होत आहे तर मग एवढया वर्षापासून कळत आहे तर मग एनआयटी बरखास्त कां केली नाही. ती ३ वर्षापासून या विषयावर सांगत आहे आता तरी व्हायला पाहिजे. नगरसेवकांना माहीत नसते की कोणती फाईल कशी बनवायची. माझे असे झाले की लेआऊटच्या फाईली तयार झाल्या आणि नंतर कळले की एनआयटीचे लेआऊट असल्यामुळे काम करता येणार नाही. मग माझा तो फंड वापस गेला. आमची केलेली मेहनत वाया गेली. मला या गोष्टीची खंत वाटते की ३ वर्षानंतर या विषयावर आपण चर्चा करीत आहे. चला उशिर झाला तर झाला. मा.महापौरजी तुमच्याकडून खुप अपेक्षा आहेत आणि नविन रुजू झालेले आयुक्त आपणाकडूनही अपेक्षा आहेत. आतातरी लोकांना न्याय मिळेल. ही एनआयटी लवकरात लवकर बरखास्त झाली पाहिजे आणि सगळे लेआऊट महानगरपालिकेला हस्तांतरीत व्हायला पाहिजे. धन्यवाद.

श्री.अनिल गेंडरे:-मा.महापौरजी, हमारे प्रभाग मे आदीवासी प्रकाश नगर झोपडपट्टी है l २००२ ने रघुजीनगर से लोगो के हटाके आदीवासी प्रकाश नगर मे डिप्टी सिंग्नल कलमना मार्केट अंतर्गत बसाई गई है l हमारे आमदार पूर्व नागपूर के कार्यसम्राट  कृष्णाजी खोपडे और प्रभाग  २४ के चारो नगरसेवक मिल के एनआयटी को डेप्युटेशन दिये थे वह आज तक जिसतरह से व्यवस्था है वहां पर अभी तक लोग गडरलाईनपर रहते है l गडरलाईन की व्यवस्था बिगडी हुई है आजतक एनआयटीने इस ओर ध्यान नही दिया l मा.कृष्णाजी खोपडे इनके मेहनबानी से हमने गडरलाईन डाली तो कुछ हद तक राहत मिली है l एनआयटी जिस तरीके से लोगो से डेव्हल्पमेंट चार्ज के पैसे जमा करवाती है। परंतु आज तक वहां  पर डेव्हल्पमेंट नही हुआ, वह बस्ती २००२ से वैसे की वैसे है l जिस तरीके एनआयटी लोगो को लुटने का काम कर रही है l लोग एनआयटी मे रजिस्ट्री के लिए जाते है तो वहां के कर्मचारी कागदपत्र के लिए लोगो को झुलवाते है तो मा.महापौरजी, आपसे अनुरोध है की एनआयटी बरखास्त होनी चाहिए आणि पुर्न महानगरपालिका  का दावा होना चाहिए l

श्री.प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, आज येथे एनआयटीच्या विषयावर आपण चर्चा ठेवली आहे. या शहरामध्ये मधला क्षेत्र आहे त्याचा विकास बघा आणि जो आऊटर क्षेत्र आहे त्याची परिस्थिती बघा. या सभागृहामध्ये बरेच नगरसेवक आऊटर क्षेत्रातील आहे त्यांची परिस्थिती काय आहे आणि तेथील जनतेला काय त्रास होतो. या त्रासाला बघून आमचे नेते मा. देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय घेतला हा अतिशय योग्य निर्णय घेतला आहे. अनधिकृत लेआऊट, २१००, ५७२, १९०० या भागातील उदाहरण घ्यायचे असेल तर मी उभा आहे. त्या क्षेत्रात माझा जन्म झाला आणि मी लहानचा मोठा त्या क्षेत्रात झालो. या भागात विकास तर दुरची गोष्ट आहे. या सभागृहात उपस्थित नेते त्यांनी आजपासून नाही तर मी लहान असतांना बघितले आहे. मा. प्रवीणजी दटके असोत, मा. प्रफुल्लजी गुडधे असो. माझ्या घराकडील क्षेत्राची परिस्थिती त्यांनी बघितली आहे. लोक जनप्रतिनिधी म्हणून नगरसेवकांकडे येतात परंतु कोणताही नगरसेवक त्या अनधिकृत लेआऊटमध्ये २१००, १९०० लेआऊटमध्ये काम करु शकत नाही. १९९२दमध्ये महाराष्ट्र राज्याचे जे मंत्री होते, महाराष्ट्र राज्याचे जे पालकमंत्री रणजीत देशमुख होते. यांनी एक जी.आर.काढला होता. अनधिकृत लेआऊटमध्ये नगरसेवक आपल्या फंडातून काम करु शकत नाही. नगरसेवक आणि जनता हे तेव्हापासून झेलून राहिले, हा त्रास आपण बघितला असेल. या सभागृहामध्ये माझे मित्र उपस्थित असेल हजारे साहेब, त्यांनी २ हजार लोकांचा मोर्चा या ठिकाणी आणला होता.याचे कारण अनधिकृत लेआऊटमध्ये जी गैरसोय लोकांची होते. या शहरातील आऊटर भागाचा विकास

झाला नाही. एनआयटीचे काय काम होते, नागपूर शहरातील जनतेला त्याच्या परिस्थितीप्रमाणे ४०० फुटाचा प्लॉट असेल, ६०० फुटाचा किंवा १००० फुटाचा प्लॉट असेल त्यांना आऊटर भागाची शेती घेवून डेव्हल्पमेंट करुन स्टॉलमेंटमध्ये प्लॉट द्यायचे होते. १९९० मध्ये या एनआयटीने एकही लेआऊट जनतेसाठी डेव्हल्पमेंट करुन दिला नाही. या उलट जी जागा कमर्शियल उपयोगासाठी आरक्षित जागा होती, पोलीस क्वार्टरसाठी आरक्षित होती, डी.पी.करिता आरक्षित होती. वेगवेगळया मार्केटकरिता आरक्षित होती. ज्या जागा वेगवेगळे डेव्हल्पमेंट करण्याकरिता डी.पी.मध्ये आरक्षित करुन ठेवल्या होत्या. त्या एनआयटीने आरक्षित तर केल्या परंतु त्यावर कोणतेही बोर्ड लावले नाही. जसजसे शहर वाढत गेले कास्तकारानी भितीने शेती विकल्या आणि स्टॉलमेंटवर लोकांनी ते घेवून त्यावर घरे बांधले. लोक त्या ठिकाणी राहत आहे. या शहरामध्ये डेव्हल्पमेंट करण्यासाठी डीपीमध्ये कोणतीही जागा शिल्लक असल्याचे दिसणार नाही. अशी परिस्थिती जी झाली आहे ती या एनआयटी मुळे झाली आहे. एनआयटीने वेळेवर लक्ष दिले असते तर या शहराचा डेव्हल्पमेंट झाला असता. आम्हांला स्मार्ट सिटी आणण्याची गरज राहिली नसती. स्मार्ट सिटी १७०० लेआऊटमध्ये सॅंग्शन केले आहे संपुर्ण अनधिकृत लेआऊटमध्ये करण्यासाठी आम्हांला भाग पडले इतकी वाईट परिस्थिती आली आहे. मा.महापौरजी, एनआयटीने व्यवस्थित लक्ष दिले असते तर आपल्याला सांगू इच्छितो जे लहान लहान नाले जे एनआयटीच्या क्षेत्रातील लेआऊटमधून गेले आहेत त्यावर लेआऊटमधील प्लॉटधारकांनी आपले प्लॉट जास्त पाडण्याकरिता आपल्या नाल्याला, नदीला छेडले आहे मा.महापौरजी. अशी परिस्थिती या नागपूर शहराची केली आहे. एवढेच नाही तर एनआयटी मध्ये गेले  तर आपल्या महानगरपालिकेत केव्हाही नागरिक येवू शकते आपले अधिकारी, कर्मचारी बसले आहेत परंतु एनआयटीमध्ये गेलो तर पोलीसवाला गेटवरच थांबवितो. कुठले काम आहे, आता भेटण्याची वेळ नाही. अधिकारी, कर्मचारी यांना भेटण्यासाठी एनआयटीने काही दिवस ठरवून दिले आहेत. एखादा नकाशा टाकला तर वर्षानुवर्ष सॅंग्शन होत नाही. अशी परिस्थिती या एनआयटीने या नागपूर शहराच्या जनतेची केली आहे. सगळयात जास्त त्रास कुणी दिला असेल तर एनआयटीच्या अधिका-यांनी आपल्याला दिला. या ठिकाणी आमच्या मागच्या सरकारने जनतेच्या हिताचा निर्णय घेतला. याच्या मागे एनआयटीचे अधिकारी यांनी अगोदर मी बोर्डात होतो, बोर्डावर विषय घेतला होता त्यावेळी बांगर साहेब होते. एनआयटीने फाईल दिल्या परंतु कर्मचारी दिले नाही. हा फार मोठा विषय आहे. एवढेच नाही तर आपल्याकडे एनआयटीकडे जितक्या पेंडिंग फाईल आहेत त्याचे गुंटेवारीचे जे काम घेतले आहे. मा.महापौरजी आपल्याला विनंती करतो, मा.आयुक्त साहेब आपली सुध्दा विनंती करतो. त्यांचे अधिकारी आणि कर्मचारी आपल्याला मिळायला पाहिजे. जो निर्णय आमच्या सरकारने घेतला आहे त्याचे मी अभिनंदन करतो, धन्यवाद.

श्री.जुल्फेकार भुट्टो:- मा.महापौरजी, नवनियुक्त आयुक्त साहेब. पिछले कुछ दिनो से नागपूर शहर मे आयुक्त साहब आये है और नागपूर शहर को नई दिशा देने के लिए मेहनत कर रहे है। इस सभागृह मे सभी नगरसेवक, सभी अधिकारी और पत्रकार बंधू. सभी जगह एक एजन्सी काम करीत है और नागपूर शहर मे दो एजन्सी काम करती है । उनमे तालमेल न होने की वजह से इसका खामियाजा आम जनता को झेलना पडता है। नागपूर शहर मे आऊटर मे जहां पर एनआयटीने ड्रेनेज बनाया था, ३६ इंच, ३८ इंच की ड्रेनेज बहोत सारी जगह से जाम होने की वजह से बरसात मे बोलो या ऑफ सिजन मे भी कही जगह मे उनके बेसमेंट की जगह मे पानी जमा होता है। जब

एनआयटी इतने बडे पैमाने पर चार्ज लेती है तो तत्काल मे उसकी सोय करवानी चाहिए । सोय बरोबर नही होने की वजह से बहोत बाते सामने आती है। यह दो एजन्सी होने से तालमेल व्यवस्थित नही बैठता है। और तालमेल व्यवस्थित ढंग से नही बैठने के कारण नागपूर शहर का सुचारु रुप से डेव्हल्पमेंट नही होता है। मै पिछले दिनो एनआयटी को डिझॉल्व करके नागपूर महानगरपालिका मे समावेश किया । मै मा.महापौरजी से पुछना चाहता हूँ की इतनी स्लो प्रक्रिया क्यु चल रही है। हम इतने दिन पहले से निर्णय लेते है, महाराष्ट्र सरकार ३ वर्षा से चल रहा है एनआयटी डिझॉल्व हो रही है। डिझॉल्व कर दिया तो हमारी नागपूर महानगरपालिका की तरफ से वह काम क्यु नही हो रहा है । डेव्हल्पमेंट चार्ज भरने के लिए लोग तैयार है और कई लोगो ने डेव्हल्पमेंट चार्ज भर दिया है । यह लोक जिनकी केस है वह जब एनआयटी मे जाते है तो वहा बताया जाता है की महानगरपालिका के तरफ गया है और एनएमसी मे जब लोग आते है तो उनको बताया जाता है की अभी काम शुरु होने का है। यह जो डिले प्रक्रिया चल रही है उसकी स्पीड बढाना चाहिए । नागपूर शहर मे एक ॲथारिटी रहनी चाहिए और नागपूर शहर का सुचारु रुप से डेव्हल्पमेंट करना चाहिए ऐसा मेरा सुझाव है।

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मा.आयुक्त, मा.नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू. निश्चितरुपाने नागपूर सुधार प्रन्यास आणि महानगरपालिका यांच्यातील हस्तांतरण प्रक्रिया या विषयावर चर्चा करण्याकरिता आजची ही विशेष बैठक मा.महापौरजी यांनी आयोजित केली. याविषयी मी आपले अभिनंदन करतो. परंतु इतक्या दिरंगाईने या महत्वपुर्ण विषयावर चर्चा इतक्या विलंबनाने आणली याकरिता खेदही व्यक्त करतो. सर्वप्रथम ॲड धर्मपाल मेश्राम साहेब या संदर्भातील वक्तव्य करण्याकरिता उभे राहिले. त्यांनी अनेक विषयाचे दाखले दिले. त्यांनी त्यामध्ये असे म्हटले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला संविधान बहाल केले आणि या संविधानात वन मॅन वन व्होट, वन व्होट वन व्हॅलू हा गुणमंत्र या देशामध्ये आम्हांला बहाल केला. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान या देशाला बहाल करीत असतांना एक वाक्य उच्चारले होते. नभोवाणीवरुन भाषण देत असतांना आपण राजकीय समानता तर प्रस्तावित केली परंतु आर्थिक आणि सामाजिक विषमता या देशात आजही कायम आहे. या देशाला २६ जानेवारी १९५० ला ही घटना अस्तित्वात आली आणि ७२ वर्ष लोटल्यावरही या नागपूर सारख्या शहरात ३५ संख्या लोकसंख्या असतांना त्यापैकी २४ ते २५ लक्ष मतदाता आहेत.हे मतदाताच्या मतानेच पार्लमेंटचे प्रतिनिधी, विधानसभेचे प्रतिनिधी आणि महानगरपालिकेचे प्रतिनिधी नियुक्त केले जातात. परंतु खेदाने म्हणावे लागते या लोकसत्तेचे प्रतिनिधी जे लोकांनी निवडुन दिलेले असतात. विधानसभेचे प्रतिनिधी हे सुध्दा नागपूर शहराच्या मतदाता नियुक्त करीत असतात हे होत असतांना त्यावेळेस या एनआयटीचे ट्रस्टीचे धोरण चांगले असावे याविषयी दुमत नाही त्यांना वाईटही म्हणणार नाही. ज्यावेळी सन १९३६ मध्ये एनआयटी नावाची ट्रस्ट डेव्हल्पमेंट ॲथारिटी म्हणून स्थापन करण्यात आली. भारताची देशभरात लोकशाही राष्ट्रात गणना होत असतांना भारताचे संविधान निर्माण होत असतांना ६७० च्या वर गणराज्य होते. या घटनेने या सगळयांना विलिन करुन भारताचे एकसंघ राज्य या देशात झाले. केंद्राने दिलेले निर्देश राज्यांने पालन करावे आणि राज्याने दिलेले निर्देश स्थानिक स्वराज्यांनी त्याचे पालन करावे. हे करीत असतांना नागपूर शहराच्या आराखडयामध्ये दोन प्राधिकारीणी संस्था आहेत.या मागचे कोण मुख्यमंत्री होते, आज कोण मुख्यमंत्री आहेत, कोण पालकमंत्री आहेत, कुठल्या पालकमंत्र्यांनी काय केले यावर मी भाष्य करणार नाही. जनप्रतिनिधींना निवडून दिलेले राज्यकर्ते जमात ज्याला म्हणतो त्या जमातीने

घेतलेला निर्णय सर्वांगिण आहे, सर्वांच्या हिताचा आहे असे मी ग्राहय धरतो. परंतु मागच्या मुख्यमंत्र्यांनी घेतलेला निर्णय निश्चितपणे १९३६ पासून नागपूर शहराच्या जनतेच्या ज्या भावना होत्या त्यांचा आदर करण्यासाठी हा निर्णय घेतला. कारण २०१७ च्या सार्वजनिक निवडणुका मध्ये निवडून आलो. प्रथमच या शहरासाठी, माझ्या प्रभागाचा प्रतिनिधीत्व करणारा म्हणून निवडून आलो. तेव्हा प्रथमच बंदेनवाज, हनुमाननगर सोसायटी, पंचकुआ विधाता नगर, पंचशिलनगर ते खोब्रागडे नाल्याला जुळणारा नाला आहे. या नाल्याच्या संदर्भात तत्कालीन आयुक्त श्री. हुमणे साहेबांना प्रत्यक्ष दौरा करायला गेले. तेव्हा त्यांनी म्हटले, साहेब ही गुंटेवारी एनआयटीमध्ये असल्यामुळे गडरलाईनचे काम या ठिकाणी काही करु शकत नाही. उतुंग भरलेल्या गडरलाईन, छोटया छोटया लाईन मोठे लेआऊट असलेले त्यामध्ये ५ ते ६ हजार लोक प्रभावित झाले होते ती फाईल करु शकत नाही असे सहा.आयुक्तांनी सांगितले. तोच प्रश्न हनुमाननगर सोसायटी मधील वळणारा नाला. त्या वेळेस सुध्दा त्या वेळचे तत्कालीन आमदार मा.मिलींद माने होते त्यांना सुध्दा तसेच कुकरेजा साहेब आणि अधिनस्त अधिका-यांची बैठक एनआयटीच्या स्टॅन्डिंग कमेटीमध्ये चर्चा होत असतांना या नाल्याची चर्चा केली होती. एनआयटीने त्या नाल्यावरती अतिक्रमण केलेले लेआऊट त्या लोकांना विकले. त्या नाल्याला बंद करुन टाकले. त्या नाल्याला ओपनिंग जवळ पाईपमध्ये कनवर्ट केले. त्या नाल्याला ओवर फ्लो झाल्यानंतर खोब्रागडे वस्तीतून पानी वाहून चांभार नाल्याला मिळतो. चांभार नाल्याला ओवर फ्लो झालेल्या पाण्यामुळे लोकांच्या घरचे बेड, टी.व्ही., धान्याचे नुकसान होते. रात्रीच्या वेळेस पाऊस आल्यास कंबरेभर पाण्यामध्ये लोकांची परिस्थिती मी बघितली आहे. याचे प्रत्यक्ष वाचन आपल्या भाषणातून आणि प्रत्यक्ष दर्शन मी सभागृहात केलेले आहे. परंतु याची कुणाला सुद आली नाही. दीड करोडची नाला डायव्हरशनची फाईल तयार झाली नाही ती कच-याच्या टोपलीत गेली. तेव्हा स्थायी समिती अध्यक्ष कुकरेजा साहेब होते. आमदार साहेबांनी म्हटले मी ५० लक्ष देतो बाकी तुम्ही टाका परंतु काम काही झाले नाही. जेथे दहा हजार नागरिक प्रभावी होता त्यांना काही न्याय मिळाला नाही. बंदेनवाज नगरच नाही तर माझ्या प्रभागात ७० टक्के एनआयटीचे लेआऊट आहेत. त्या ठिकाणी यादव नगर येथे बिनाकी लेआऊट खस-यामध्ये साडे चार एकर जागा मोकळी पडलेली आहे. त्या ठिकाणी एनआयटीने कम्पाऊडिंग वॉल टाकली आहे ती आता जिर्ण झाली आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे तेथे लोक फिरायला जातात त्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते. गवत वाढलेले असते, दलदलीची जागा निर्माण झाली आहे. त्या ठिकाणी डास निर्माण होतात आणि त्यामुळे अनेक प्रकारच्या रोगराईचा सामना नागरिकांना करावा लागतो. या अनुषंगाने एनआयटीला अनेकदा पत्र लिहिले आहे ती फाईल महानगरपालिकेकडे पाठवा. त्याचा युझर चेंज करावयाचा आहे. त्या ठिकाणी प्लेग्राऊंड आहे त्या ठिकाणी उद्यानाची मागणी लोकांची आहे. महेंद्र नगर येथे सुध्दा विद्यमान महापौर असलेले श्री.संदीप जोशी ज्यावेळी स्थायी समिती चेअरमन होते तेव्हा उद्यान हवे म्हणून सतत तेथील नागरिक महानगरपालिकेला मागणी करीत होतो. या अनुषंगाने एनआयटीला गेलो, चार नगरसेवकांचे पत्र घेवून गेलो ती फाईल आता पाठविली. परंतु काहीही झाले नाही. १२ वर्षापासून त्या असुविधा असलेल्या वस्तीमध्ये राहणा-या लोकांसाठी एनआयटीने डेव्हल्पमेंट केले नाही. त्या मैदानाचे देखील डेव्हल्पमेंट केले नाही. या अनुषंगाने नागपूरचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी साहेब असतांना मागचेचुनावाचे बिगुल लक्षात घेता १३६ मैदानाचे लेव्हलींग आणि चेंजींग रुम तयार करण्यासाठी पैसा दिला. एनआयटी मार्फत ते काम सुरु आहे. त्या त्या स्थानिक संस्थामध्ये काय

काय डेव्हल्पमेंट केले पाहिजे. त्या जागेचे काय युझर असले पाहिजे. त्या जागेचा युझर चेंज करण्याचा अधिकार आपल्याला नाही. या नागपूर शहराचे जनप्रतिनिधी म्हणून आम्ही आपल्याला समजत असतो. एनआयटीचे बजेट हे पब्लिश होत नाही. नागपूर शहरात दोन प्राधिकारीणी असतांना नागपूर शहरातील १५५ नगरसेवक नागपूर शहराचा आराखडा तयार करीत असतांना या शहरासाठी बजेट प्रस्तावित करीत असतात. एनआयटी सुध्दा डेव्हल्पमेंट प्राधिकारीणी असतांना सुध्दा ही कमर्शियल ॲथारिटी आहे ती लेआऊट टाकते आणि विकते. ही प्राफिट कमविणारी संस्था आहे. या संस्थेद्वारे जनतेच्या हिताचे दृष्टीने काम होत नाही. कारण कोणताही जनप्रतिनिधी एनआयटीमध्ये कामासाठी जातो तेव्हा त्याचे काम होत नाही. जनप्रतिनिधीचे कोणत्याही प्रकारचे कंट्रोलिंग या एनआयटीवर नाही. मग राज्य शासन असो की येथील आमदार असो त्यांचे सुध्दा कंट्रोलींग नाही. जे १५५ नगरसेवक आहे यांची सुध्दा गा-हाणे निश्चितपणे एनआयटी ऐकुन घेत नाही. ७० टक्के प्रभागामध्ये जे एनआयटीशी संबंधित लेआऊट आहेत. मैदाने आहेत त्या मैदानाशी संबंधित प्रश्न जनप्रतिनिधीकडे तेथील नागरिक घेवून जातात आणि म्हणतात की या ठिकाणी विकास हवा. आम्ही मागच्या दोन वर्षापासून सांगत आहे की या ठिकाणी गडरलाईन टाकलेली नाही, रस्ते तयार झालेले नाही, उद्यान तयार झाला नाही, प्लेग्राऊंड तयार झालेले नाहीत. तेथील लेआऊट, ती जागा महानगरपालिकेला हस्तांतरीत होत नाही त्यामुळे जनप्रतिनिधी तेथील विकासाची कामे करण्यासाठी फाईल मुव्ह करु शकत नाही. त्या कामासाठी त्यांना निधी उपलब्ध होत नाही. हा गोचात येणारा प्रश्न आहे. त्यामुळे नगरसेवकांना अशा समस्यांना तोंड दयावे लागते. हा जो प्रश्न या शहरामध्ये राज्य सरकारच्या वतीने आला. २७ ऑगस्ट २०१९ ला जो निर्णय झाला. त्याचे मी यासाठी समर्थन करतो कारण की एनआयटीकडे १लक्ष९१ हजार फाईली आहेत त्या महानगरपालिकेकडे आलेल्या नाहीत. जे डेव्हल्पमेंट चार्जेस एनआयटी घेते परंतु त्या ठिकाणी डेव्हल्पमेंट करीत नाही. घराच्या बांधकामापासून अनधिकृत लेआऊटमधील बांधकाम हे सर्व महानगरपालिकेला बघावे लागते. नागपूर शहरामध्ये स्वच्छ भारत सर्वेक्षणामध्ये लोकांचा टॅक्सचा पैसा खर्च केला जातो. म्हणून एनआयटीची मालमत्ता नव्हे तर त्यांना सातवा वेतन आयोग लागू झाला आहे त्याचे भुगतान करण्यास तयार आहे. हे करीत असतांना एनआयटी महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याकरिता नाकारीत आहे, हेवादेवा करीत आहे. दूर पळत आहे. याचा मी निषेध करतो. एनआयटी महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात यावी. डेव्हल्पमेंट ॲथारिटी म्हणून जनप्रतिनिधीची ही संस्था म्हणून महानगरपालिकेचे वर्चस्व या नागपूर शहरावर असावे अशा मताचा मी नगरसेवक म्हणून बोलत आहे. निश्चित रुपाने या बजेटचा आढावा सादर करीत असतांना एनआयटीचा ४०० की ५०० कोटीचा दरवर्षीचा बजेट असतो. त्याच्यावरती खर्च केले जाते किंवा नाही हा मात्र शंकेचा विषय आहे. त्यामुळे अनेक पदाधिका-यांनी आणि नेत्यांनी जे मत मांडले की ही एनआयटी भ्रष्टाचाराचा अड्डा बनलेला आहे निश्चितरुपाने हे बरोबर आहे. महानगरपालिकेवर ज्या पध्दतीने नगरसेवकांचे नियंत्रण आहे. प्रशासनावर नियंत्रण आहे. एनआयटीवर मात्र कुणाचेही नियंत्रण नसल्यामुळे हा भ्रष्टाचाराचा अड्डा बनलेले आहे. अनेक लेआऊट आतल्या आत धापे करुन कुणाला तरी बळकट करण्यासाठी, कोणत्या तरी धनाढय व्यक्तिला,पोलिटीकल नेत्याच्या प्रभावाने ते प्लॉट किंवा लेआऊट हस्तांतरीत केले आहे. त्यामुळे निश्चितरुपाने संपुर्ण आराखडयासहीत आणि डेव्हल्पमेंटच्या पैश्यासहीत हस्तांतरणाचा प्रश्न महानगरपालिकेला हस्तांतरीत करावे अशा मताशी मी सहमत आहे. अशा पध्दतीने जी विशेष सभा

मा. महापौरजी यांनी बोलाविली त्याचे मी पुनश्च अभिनंदन करते आणि येथे थांबतो. जयभीम, जयभारत.

श्रीमती स्वाती आखतकर:-मा.महापौरजी, या शहरामध्ये दोन डेव्हल्पमेंट एजन्सी नकोत असे मी सांगेल. कारण एनआयटीचे अधिकारी आणि महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यात ताळमेळ आणि संयुक्त नियोजन  नसल्यामुळे अनेक विकास योजना अपुर्ण राहतात. मी उदाहरण सांगते, माझ्या प्रभागामध्ये न्यु म्हाळगीनगर, नेहरुनगर, न्यु रामभाऊ म्हाळगीनगर येथे ई.डब्लू.एस.अंतर्गत प्लॉट टाकलेले आहेत. त्या ठिकाणी नियोजन नसल्यामुळे अतिक्रमण झालेले आहे. अतिक्रमण काढण्यासाठी असो, तेथे सुविधा देण्याचा प्रश्न असो, तेथे डेव्हल्पमेंट करण्याचा प्रश्न असो, अनेक समस्यांना आम्हांला सामोरे जावे लागते. ते लेआऊट एनआयटीचे असल्यामुळे त्या ठिकाणी महानगरपालिका काम करु शकत नाही. मा.महापौरजी, ही समस्या माझ्या प्रभागाताच नाही तर संपुर्ण नागपूर शहरात ही समस्या आहे. नागपूर शहराची ही जनता या समस्येचा सामना करीत आहे. आमच्या ताईने आताच सांगितले, महानगरपालिकेचा लेआऊट असो की एनआयटीचा लेआऊटअसो या शहराच्या नागरिकांच्या प्रश्नाचे उत्तर नगरसेवकच देत असतात. त्यामुळे या नागपूर शहरामध्ये ज्या दोन एजन्सी आहेत त्या नकोत या मताची मी आहे. एनआयटी हे बरखास्त करण्यात यावे अशी विनंती करते.धन्यवाद, जयहिंद, जयभारत.

श्रीमती दिव्या धुरडे:- मा.महापौरजी, नवनियुक्त आयुक्त, सर्व अधिकारी, सर्व मा.सदस्य.सर्वप्रथम मी मा.महापौरजी यांचे खुप खुप अभिनंदन करते. वॉक अॅन्ड टॉक विथ मेअर आणि दहाही झोनमध्ये मा.महापौरजी जनता दरबार घेत आहे. याद्वारे सर्व जनतेचे प्रश्न नागपूर शहरातील समस्या जाणून घेवून त्यांचे निराकरण करीत आहे. त्यासाठी आपल्या महापौरांचे खुप खुप अभिनंदन करते. एका शहरामध्ये एनआयटी आणि महानगरपालिका अशा दोन संस्था आहेत. एनआयटीने केलेले पाप आज नागपूर शहरातील जनताच नव्हे तर नगरसेवकांना सुध्दा भोगावे लागत आहे. कोणत्याही कामाची फाईल बनविली आणि ते काम करण्याकरिता गेलो तर हा एनआयटीचा भाग आहे ही महानगरपालिकेचा भाग नाही. त्यामुळे नगरसेवकांचे काम अडून जाते. माझ्या प्रभागामध्ये नेहरुनगर क्षेत्रिय कार्यालय आहे त्या लगतचा एक रस्ता बंद आहे. एनआयटीचा हा भाग आहे नागरिकांनी जायचे कुठून, तो रस्ता बंद करुन दिला. ज्यांनी घर बांधले त्याला बांधकामासाठी परवानगी कशी दिली. एक घटना घडली किंवा एखादी एम्बुलन्स गाडी न्यायची आहे तर सरळ घेवून गेल्यानंतर युटर्न करुन गाडी बाहेर काढावी लागते. हे एनआयटीने कधी विचार केला नाही. तसाच नंदनवन पेट्रोल पंपाच्या बाजूने ३० फुटाचा रस्ता बंद करुन दिला होता. तो रस्ता मोकळा करुन देण्यासाठी मला १० वर्ष लागले. त्याचप्रमाणे हा रस्ता बंद आहे हा रस्ता मोकळा करुन दिला तर लोकांना जवळून जाण्यासाठी रस्ता होवून जाईल. त्या रस्त्यावर एकच कार जावू शकते. मागे मा.महापौरजी यांनी सुध्दा दौरा केला त्यांनाही माहीत आहे. एक गाडी गेल्यानंतर दुसरी गाडी त्या ठिकाणाहून जावू शकत नाही. युटर्न गाडी करुन गाडी बाहेर काढावी लागले. एनआयटीने ज्या मोकळया जागा असतील त्यावर आपल्या नावाचे बोर्ड लावून टाकले. एखाद्याच्या प्लॉटच्या बाजूने रिकामी जागा असेल तर हिरे लेआऊटमध्ये एका व्यक्तिने सांगितले की येथे माझे घर आहे. मग नागरिकांनी जायचे कुठून. माझ्या प्रभागात कबीरनगर आहे तेथे उद्यान बनवून ठेवले. मी त्या ठिकाणी फाईल तयार केली, ७८ लक्ष रु.सॅग्शन झाले. मी फाईल फिरविली तर अधिका-याने त्या फाईल वर लिहिले की येथे उद्यान नाही. त्या ठिकाणी सध्या स्थितीत उद्यान आहे. डीपी प्लॉनमध्ये

प्ले ग्राऊंड आहे तर एनआयटीने त्या जागेवर उद्यान कसे बनविले. नगरसेवक हा १ लक्ष जनतेचे प्रतिनिधीत्व करतो. नागरिक आपल्या समस्या घेवून नगरसेवकांकडे येत असतात आणि नगरसेवक त्यांच्या समस्या सोडवित असतात. नागरिकांच्या समस्येवर जनप्रतिनिधी काम करीत असतो. ही एनआयटीची जागा आहे. हे एनआयटीने केलेले पाप आहे. लोकांच्या जागेवर ग्राऊंड तयार करुन ठेवले. एनआयटी बरखास्त करण्याचे काम मा.माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी केले. त्यावर चर्चा करण्यासाठी मा.महापौरजी यांनी आज विशेष बैठक लावली त्यांचे खुप खुपअभिनंदन करते. नक्कीच ही एनआयटी हस्तांतरीत या महानगरपालिकेला व्हायला पाहिजे. बरखास्त करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय अंमलात आणला आहे परंतु ज्या काही हस्तांतरणाच्या फाईली आहेत त्या संपुर्ण महानगरपालिकेला यायला पाहिजे. तेव्हाच नगरसेवकांना सहजतेने काम करता येईल. नगरसेवक जेव्हा काम करतो आताच स्वाती आखतकर यांनी सांगितले की आऊटर भागामध्ये नगरसेवकांना काम करण्यास अडचणी येतात. काम करण्यास जेव्हा नागरिक एनआयटी कार्यालयामध्ये जातो तेव्हा त्याला चांगली उत्तरे मिळत नाही. त्यामुळे नागरिकांना खुप त्रास होतो. त्यांनी जायचे कुणाकडे. आता एनआयटीचे हस्तांतरण झाल्यानंतर एखादा एनआयटी कडे गेला तर तेथील कर्मचारी म्हणतात ते महानगरपालिकेकडे गेले आहे आम्ही एनओसी देणार नाही. अरेरावीची भाषा नागरिकांशी बोलली जाते. एनआयटीचे संपुर्ण महानगरपालिकेकडे आल्यास आपल्याला सहजतेने काम करता येईल आणि नागपूर शहराची विकास कामे करता येईल. आपल्यामा.महापौरजी यांनी सभा ठेवली मी त्याबद्दल त्यांचे खुप अभिनंदन करते. मला दोन शब्द बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देते. जयहिंद, जयभारत.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, मा.आयुक्त. अभी जो विषय चालू है की नागपूर सुधार प्रन्यास का महानगरपालिका मे विलीनीकरण होना चाहिए या नही होना चाहिए। पिछले पाच साल से गल्ली से लेकर दिल्ली तक भारतीय जनता पार्टी की सरकार थी। जैसे विदर्भ का जुमला निकला वैसे नागपूर सुधार का जुमला निकला। आप विदर्भ अलग करने वाले थे वहा पर विदर्भ की जनता के साथ मे धोका किया। वैसे ही नागपूर सुधार प्रन्यास नागपूर महानगरपालिका मे विलीनीकरण करनेवाले थे यहां पर भी नागपूर शहर की जनता के साथ धोका किया। अभी वकील साहब ने बोला मानवतेच्या शत्रु सोबत युध्दआमचे सुरु, वैसे ही संत तुकडोजी महाराज इन्होने बोला है मनी नाही भाव, देवा मला पाव, देव बाजारचा भाजीपाला नाही रे, देव बाजारचा भाजीपाला नाही रे यह ग्रहण करना चाहिए।तुम्हारी इच्छा थी क्या की नागपूर सुधार प्रन्यास नागपूर बरखास्त होनी चाहिए। जैसे विदर्भ की जनता साथ मे अन्याय किया वैसे ही नागपूर शहर की जनता के साथ मे अन्याय किया। इतने सालो बाद नागपूर शहर की जनता को आपकी असलियत का पता चल गया है। आप की इच्छा रहती तो आपके नुमायंदे को ट्रस्टी के रुप मे नागपूर सुधार प्रन्यास मे भेजते नही। क्यो भेजे, याने की आपकी कथनी और करनी मे जमीन आसमान का फर्क है। मा.महापौरजी आप नागपूर जनता के साथ न्याय करो। नागपूर महानगरपालिका को आयुक्त के रुप मे एक डॅशिंग पर्सनालिटीवाले आयुक्त मिले है। उनके बारे मे पेपर मे बहोत पढने को मिला है, जनता मे लोकप्रिय हुए आयुक्त इस शहर को मिले है। उनका हाथो मे हाथ लेकर नागपूर शहर की जनता का जितना विकास हो सकता है वह करे। अब देखो, नागपूर महानगरपालिका के स्कुलो का क्या हाल है, नागपूर शहर मे २४ घंटे पानी मिलने वाला था कितने घंटे पानी मिल रहा है तो दो घंटे पानी ठिक से

मिलता नही। हम घर घर मे कचरा लेने जाने वाले थे, क्या हुआ। आठ आठ दिन कचरा लेने गाडी वाला पहुॅचता नही। अब आप नागपूर शहर के जनता को जुमले देना बंद करो, आप नागपूर शहर को स्मार्ट सिटी देने वाले थे, क्या हुआ। नागपूर सुधार प्रन्यास भी बरखास्त करेगें ऐसा जुमला दिया था, उसका क्या हुआ।

श्री.राजकुमार साहू:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मा.सदस्य जुमला दिया, जुमला दिया क्या कह रहे है। हमारे आदरणीय देवेंद्र फडणवीस इन्होने हमारी सरकार आने पर वादे के हिसाब से नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करने का प्रस्ताव पारीत किया और बरखास्त करके दिखाया। मगर यह अनैतिक विचारधारावाली सरकार आने से इन्होने नागपूर सुधार प्रन्यास को पुर्नजिवीत करने का पत्र भेजा। हम सार्वजनिक रुप से इसका निषेध करते है, यह शब्द उन्होने वापस लेना चाहिए। हमने जनता से वादा किया की हम जैसे सरकार मे आयेगें एनआयटी बरखास्त करेंगें और जनता को लुटने से बचायेंगे। जैसी हमारी सरकार आयी, हमारी सरकारने एनआयटी बरखास्त करने का निर्णय लिया। जैसे ही अनैतिकधारावाली सरकार आने के बाद मे एनआयटी पुर्नजिवीत करने का पत्र भेजा। हम उस पत्र का निषेध करते है।

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, नगरसेवक साहूजी के विचार उनका बरोबर है उनको बाकी के लोगो को बचाना है। १५ सालों से भारतीय जनता पार्टी की सत्ता है। नागपूर सुधार प्रन्यास मे दो ट्रस्टी है। इन्होने कहां नागपूर सुधार प्रन्यास मे भ्रष्टाचार हो रहा है तो अभी दुध का दुध और पानी का पानी हो जायेगा। तो नागपूर सुधार प्रन्यास मे भ्रष्टाचार हो रहा है तो उसमे ट्रस्टी कौन है उनपर इन्वॉयरी बिठाओ। अभी नवनियुक्त आयुक्त साहब है उनकी अधिकार मे इन्वॉयरी बिठाओ, चोरो की सरकार है, दुध का दुध और पानी का पानी हो जायेगा।नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त तुम्हारी सरकार करने वाले थे, किये क्या ?

श्री.राजकुमार साहू:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर,नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त नही किया होता तो यह चर्चा सत्र आज बुलाना नही पडता। हमारी सरकार आने पर नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करने का निर्णय लिया गया है।

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त हुई है तो यह चर्चासत्र क्यो बुलाया गया है।

श्री.राजकुमार साहू:- मा.महापौरजी, अभी यह अनैतिक विचारधारावाली सरकार आने से इन्होने पत्र लिखा है इसलिये यह चर्चासत्र हो रहा है।

(बेल)

उपमहापौर:- एनआयटी का विषय है उसपर चर्चा करो।

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, मा.सदस्य को बोलने का सलिका नही रहा उन्होने हमारे उपर आरोप लगाये। मा.महापौरजी इन्होने यहां पर नियम बनाया है की जिनका नाम आयेगा उन्होने बोलना चाहिए।परंतु यह बीच मे बोले जा रहे है।अपने महापौरजी के आदेश का पालन नही कर रहे है।हमने विरोध करना की क्योंकि हम विरोधी पार्टी के है, हम उनके आदेश मान रहे है। मा.महापौरजी, आपने विदर्भ की जनता के साथ, नागपूर की जनता के साथ जो वादे किये थे वह पुरे नही किये। जम्मू सरकार की सरकार जो बनी थी वो क्या नैतिक थी क्या?और जो बिहार मे सरकार बनाये वो नैतिक थी क्या? अपने गिरेबान मे झांक कर देखो, मनी नाही भाव म्हणे देवा मला देवा मला पाव. देव बाजारचा भाजीपाला नाही रे, देव बाजारचा भाजीपाला नाही रे.

श्री. विजय झलके:- मा.महापौरजी, मा. आयुक्तजी. नागपूर शहरात दोन विकास संस्था काम करीत आहेत. दोन विकास संस्था काम करीत असतांना त्यापैकी नागपूर सुधार प्रन्यासची स्थापना १९३६ साली झाली, आपण २०२० मध्ये चर्चा करीत आहे. म्हणजे ८३ वर्षापासून नागपूर सुधार प्रन्यास नागपूर शहरात काम करीत आहे. या संस्थेमध्ये सेवन स्ट्रीट, ग्रीन बेल्ट आणि अभ्यंकर रोड वांयडिंग अशा योजनेअंतर्गत एनआयटी काम करीत होती. मा.महापौरजी, मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते, ज्या लोकांना या एनआयटीचे इतके प्रेम उतू चालले आहे त्यांनी सांगावे की ही संस्था ८३ वर्षापासून या नागपूर शहरात काम करीत होती. त्यांनी प्रापर या शहराचा डीपी प्लॉन कां तयार केला नाही. या शहराला सिमेंट क्रांक्रीटचे करण्याचे पाप जर कुणी केले असेल तर या नागपूर सुधार प्रन्यास ने केले आहे. या संस्थेजवळ डीपी इम्प्लीमेंट करण्याची जबाबदारी होती तर ५७२ आणि १९०० अनधिकृत लेआऊट कसे निर्माण झाले. एनआयटी जर इतक्या उत्तम रितीने काम करीत होती आणि लेआऊटचे व्यवस्थित नियोजन केले तर महानगरपालिकेला अधिकार नसून तत्कालीन पालकमंत्री यांनी तर एक जीआर काढून नगरसेवकांना १९०० आणि ५७२ लेआऊटमध्ये कामच करता येणार नाही त्या जी.आरने सांगितले. मग ही जबाबदारी ज्या संस्थेकडे होती त्यांनी प्रापर या नागपूर शहराचे नियोजन करायला पाहिजे होते, या शहराचे रस्ते प्रापर राहायला पाहिजे होते, लेआऊटमध्ये १० टक्के ओपन लॅन्ड आणि १० टक्के पियू लॅन्ड नियमाप्रमाणे करायला पाहिजे होते. तर त्या एनआयटीच्या लेआऊट मध्ये बघावे काय स्थिती आहे. तर या लेआऊटमधले ओपन स्पेस विकून खाल्ले, नाले विकून खाल्ले असे प्रदीपजीने सांगितले. मी माझ्या प्रभागातील उदाहरण सांगतो, योगेश्वर नगर लेआऊट मध्ये पुर्ण नाला होता. माझ्या सहकारी नगरसेविका मंगलाताई सुध्दा येथे आहेत. त्या लेआऊटमधील नाल्यावर पुर्ण प्लॉट लोकांनी टाकले आणि एनआयटीने त्याची डिमांड देवून, आरएल देवून मंजूरी दिली. आणि तेथे नागरिकांच्या घरात पावसाळयात पुर्ण पाणी घुसते. अशा या संस्थेसमोर कुठलेच व्हिजन नाही अशा संस्थेला पुर्नजिवीत करण्याचे पत्र मा.पालकमंत्री देते हे आश्चर्यच वाटते. ज्या संस्थेला काम करण्याकरिता ठेवले, ती कामच करीत नाही. एकीकडे एनआयटी तर एकीकडे नागपूर महानगरपालिका. एनआयटीत ज्यावेळेस लोक जातात त्यांना ३ वाजेनंतर यायचे नाही. त्यांचे काम करण्याचे दिवस ठरले आहेत. बुधवारी, शुक्रवारी यायचे, ४ वाजेनंतर यायचे असे सांगितले जाते. ही संस्था जनतेचे काम करण्यासाठी बसली आहे की जनतेची पिळवणूक करण्यासाठी बसली आहे. एकीकडे पंचायत राज नुसार स्थानिक संस्थेमध्ये लोकप्रतिनिधींचे हस्तक्षेप राहणे अनिवार्य आहे. एनआयटीमध्ये मात्र काम करीत असतांना पाच लोकांना ट्रस्टी म्हणून निर्माण केले. पाच लोक निर्णय घेत असतात आणि पाच लोकांनी घेतलेला निर्णय या संपुर्ण शहराला बंधनकारक असतो. महानगरपालिकेत मात्र एखादा विषय मंजूर करण्यासाठी महानगरपालिकेच्या हाऊसमध्ये आणला जातो. सभागृहात १५१ नगरसेवक आणि चार-पाच मनोनित नगरसेवक यांची चर्चा होते आणि चर्चेअंती एकमताने निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी आपण करतो. हे सर्व होत असतांना नागपूर सुधार प्रन्यासची कार्यपध्दती आणि नागपूर महानगरपालिकेची कार्यपध्दती यामध्ये प्रचंड तफावत आहे. एखाद्या नगरसेवकाचे काम होत नसेल तर आपण सभागृहात प्रश्न विचारु शकतो. आयुक्तांना प्रश्न विचारु शकतो परंतु एनआयटीमध्ये सभापतींना लोकप्रतिनिधींना भेटण्यासाठी वेळ नाही अशी व्यवस्था आहे. दुसरीकडे, ५७२, १९०० लेआऊटचे या नागपूर शहरात डेव्हल्पमेंटचे काम सुरु असतांना २००२ पासून रस्त्यांचे निर्माण कार्य सुरु आहे आज आपण २०२० मध्ये चर्चा करीत आहे आणि

आता एनआयटी बरखास्तीची प्रक्रिया झाली. आतापर्यंत आऊटर भागाचे प्रतिनिधीत्व करणारे बरेच नगरसेवक आहेत. तसेच १९०० आणि ५७२ लेआऊटचे प्रतिनिधीत्व करणारे नगरसेवक आहेत. माझ्या प्रभागात प्रगती नगर हे एकमेव लेआऊट सोडले तर ९०टक्के लेआऊट ५७२ आणि १९०० लेआऊट अंतर्गत येतात. नगरसेवकांनी विकास कसा करायचा. जनतेचे म्हणणे असते की त्यांच्या भागात विकास झाला पाहिजे.जेव्हा आम्ही विकास करण्याकरिता जातो तर महानगरपालिकेचे अधिकारी म्हणतात एनआयटीची एनओसी घेवून या. आणि एनआयटीमध्ये गेलो तर एनआयटीवाले म्हणतात एनओसी देवू शकत नाही. लेआऊटमध्ये काम करण्यासाठी पैसे संपले आहे. समजा ज्या रस्त्याचे २००२ मध्ये डांबरीकरण झाले तर डांबरीकरण झालेल्या रस्त्याचे डीएलपी पिरेड किती वर्षाचा असतो. तर माझ्या माहिती प्रमाणे डीएलपी पिरेड दोन वर्षाचा असतो. २००२ पासून ज्या रस्त्याचे डांबरीकरण झाले असेल त्या रस्त्यावर डांबरीकरण करण्यासाठी २०२० पर्यंत वाट पाहावी लागत आहे. आम्ही जनतेला भेटतो आणि आमची हतबलता सांगतो तेव्हा लोक आम्हांला म्हणतात की आम्हांला रस्ता पाहिजे, आम्हांला पाणी पाहिजे. आम्हांला तुमच्या नियमाशी काही लेणेदेणे नाही. अशी परिस्थिती आमच्या समोर उपस्थित होत असते. ज्यावेळी एनआयटी डेव्हलपमेंट योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन टाकल्या, गडरलाईन टाकल्या. ज्यावेळेस मी जलप्रदाय समितीचा सभापती होतो. मी सांगतो जेव्हा एनआयटीने कागदोपत्री पाईपलाईन टाकल्या परंतु प्रत्यक्ष त्या ठिकाणी पाईपलाईन नाही. प्रत्यक्ष त्या ठिकाणी इनप्लेट लागलेल्या नाही. प्रत्यक्ष त्या ठिकाणी वॉल लागलेले नाही. प्रत्यक्ष त्या ठिकाणी टेस्टिंग झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत अमृत सारख्या योजना कां आणाव्या लागत आहे. हे पाप जर कुणी केले तर ते एनआयटीने केले आहे. २७२-२७३ कोटी रु.खर्च करुन अमृत योजनेअंतर्गत नेटवर्क टाकण्याची कां गरज पडली मा.महापौरजी. एनआयटीने या नागपूर शहरातील पाण्याच्या टाक्या नागपूर महानगरपालिकेकडे कां हस्तांतरीत केल्या नाहीत. या सर्व गोष्टीचे उत्तर एनआयटीने दिले पाहिजे. एनआयटीने जे ड्रेनेज टाकण्याचे काम केले, गडरलाईन टाकल्यानंतर कुठे चेंबर नाही, कुठे जॉईंट नाही. आज नागपूर शहरातील ज्या विहिरी खराब झाल्या असेल तर त्याचे संपुर्ण पाप हे एनआयटीचे निकृष्ठ दर्जाचे जे काम केले त्यामुळे झाल्या आहेत असा माझा आरोप आहे. एनआयटीने जे जे काम केले ते सर्व निकृष्ठ दर्जाचे काम केले आहे. त्यांचे कुणी मायबाप नाही. नगरसेवकांने ते ऐकत नाही. एनआयटी ही नागपूर महानगरपालिकेच्या नगरसेवकांना ऑन्सररेबल नाही. २००२ पासून एनआयटीने जे काम सुरु केले आणि आजपर्यंत जेवढे काम केले ते सर्व निकृष्ठ दर्जाचे काम केले. नियम धाब्यावर बसवून लेआऊट मधले ओपन स्पेस खाऊन बसले. आपले विधी सल्लागार आहेत त्यांना विचारावे, एडीटीपी आहेत त्यांना विचारावे. अनेक लेआऊटमध्ये जे ओपन स्पेस आहेत त्यावर लेआऊट टाकले त्यामुळे गैरसोयी निर्माण झाल्या. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे. एकीकडे त्यांच्या अधिका-याचे वागणे बरोबर नाही. आता एनआयटी बरखास्त झाल्यानंतर यावेळी एमएमआरडीए तयार झाली. एमएमआरडीए अंतर्गत नागपूर शहराच्या बाहेर एनआयटी एकही काम करीत नाही. त्यांचे अधिकारी हातावर हात ठेवून बसले आहेत. त्या अधिका-यांचा पगार तुमच्या आमच्या टॅक्सच्या पैशातून होतो. ते आपले कर्मचारी कां देत नाही. महानगरपालिकेत काम करीत असतांना अधिका-यांना काम करण्यासाठी अडचण येत आहे ते मात्र हातावर हात ठेवून बसले आहेत आणि मजा मारतात. अत्यंत महत्वाचा निर्णय तत्कालीन राज्य सरकारने आणि मा.देवेंद्र फडणवीस यांनी

घेतला. मा.देवेंद्र फडणवीस यांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. परंतु मा.पालकमंत्री यांनी जे मा.मुख्यमंत्र्यांना पत्र दिले की नागपूर सुधार प्रन्यास पुर्नजिवीत करावे त्यामुळे अनेक प्रश्नचिन्ह सर्व नगरसेवकांपुढे उभे केले आहे. विरोधी पक्ष नेत्यांच्या आणि अनेक मा.सदस्यांच्या हे मनात आहे परंतु त्यांचे सरकार असल्यामुळे ते बोलू शकत नाही. उद्धवा, अजब तुझे सरकार.आणखी एक गोष्ट सांगतो मा.महापौरजी, शिवसेनेचे गटनेते आणि माझे मित्र हे उपस्थित नाहीत. परंतु सभागृहातील त्यांचा भाषणाचा रेकार्ड बघितला तर त्यांच्यापक्षाचे मुख्यमंत्री जे राज्य सरकार चालवीत आहेत. त्या गटनेत्याने प्रत्येक वेळी आपल्या भाषणात म्हटले आहे एनआयटी ही नालायक संस्था आहे. असे म्हणणारे लोक तेच लोक एनआयटी पुर्नजिवीत करण्याचे म्हणत आहे मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते. आमची सरकार जरी गेली असेल परंतु आमचीच सरकार आली होती. कशा पध्दतीने महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाली हे सर्वांना माहीत आहे. मी माझ्या भाषणाचा शेवट करतांना असेच म्हणेल की असफलता एक चुनौती है स्विकार करो, I

क्या कमी रह गई है, देखो सुधार करो।

सफल नही होते तब तक निंद चैन जागो तुम,

संघर्ष का मैदान छोड भागो मत तुम,

कुछ किये बिना ही जयजयकार नही होती।

कोशीश करने वाले की हार नही होती,कोशीश करने वाले की हार नही होती I

आपल्या माध्यमातून एकच सुचना करतो, नागपूर सुधार प्रन्यास तात्काळ बरखास्त करुन सर्वच्या सर्व यंत्रणा महानगरपालिकेकडे समावेश करुन मा.आयुक्तांनी या गोष्टीसाठी इनीसेटीव्ह घ्यावे. नागपूर सुधार प्रन्यासला बरखास्त करुन नागपूर शहरासाठी नागपूर महानगरपालिका या एकच संस्थेच्या माध्यमातून या नागपूर शहराचा सर्वांगिण विकास करावा.धन्यवाद.

श्री.भुषण शिंगणे:-मा.महापौरजी, आपल्या सदनाने मला नागपूर सुधार प्रन्यास ट्रस्टमध्ये विश्वस्त म्हणून पाठविले. सर्वप्रथम मी माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो आणि मा. हरीश यांना सांगू इच्छितो. निर्णय लेने वाली कोई पार्टी है तो हमारी भारतीय जनता पार्टी है I कश्मीर जैसा मुद्दा, ऐसा बोलते थे की ३७० कलम को हाथ लगायेंगे तो भुचाल आ जायेगा तो उसपर ४८ घंटे मे निर्णय लिया I ६५ वर्ष कॉग्रेस पार्टी का राज था, परंतु पाच साल मे भारतीय जनता पार्टी के सत्ता आने पर नागपूर सुधार प्रन्यास को बरखास्त करने का निर्णय हमारे आदरणीय देवेंद्र फडणवीसने लिया I जब मै सदन से एनआयटी मे गया तो देखा की वहां पर गोरगरीब जनता की सुनावणी नही होती I वहा के सभापती के चेंबर मे आम आदमी की जाने की अनुमती नही है। यह सारे बंधन तोड दिये और मा.मुख्यमंत्री के हाथ से कमसे कम पाच से सात डिसीजन नागपूर शहर के लिये किये I एक ऑटोवाला मेरे घर मे आया उसके आंखो से ऑसू निकल रहे थे, ११२ रुपये डेव्हल्पमेंट चार्ज आया तो वह कहना लगा मै भरु तो भरु कैसे, मुझे प्लॉट बेचना पडेगा I मैने मा.मुख्यमंत्री को बोला की मा.मुख्यमंत्रीजी थोडे गावरानी शब्द मे बोला, जिनकी औकात है उन्होने धरमपेठ मे प्लॉट लिया और नही है तो उन्होने गोरेवाडा, नारा मे प्लॉट लिया I उनको १२ रुपये और १६ रुपये और इनको ११२ रुपये, तत्कालीन मुख्यमंत्रीने निर्णय लिया और ११२ रुपयेका ५६ रुपये करने का निर्णय किया I एनआयटी के छोटे छोटे विषय थे, छोटे प्लॉट के लिए आरएल दिया जाता था और बडे प्लॉट के लिए नही वह भी अपन ने निर्णय लिया I एक लिज का विषय नागपूर सुधार प्रन्यास मे था, पुरे फ्लॅट मे एक व्यक्तिने कहां की मुझे लीज मंजूर नही है तो सालो लगते थे, हमने

निर्णय लिया ५१ परसेंट लोग आते है तो लिज मंजूर ऐसा भी निर्णय हमने लिया। एनआयटी मे जाने के बाद अविकसित लेआऊट के लिए १०० कोटी दिये, हमारे नागपूर शहर मे १२ से १३ प्रभाग आऊटर है। जहां पर एक बाल्टी मुरुम नही था वहा पर जाके देखे पुरे के पुरे डब्लूपीएल रोड बनाने का सौभाग्य मुझे प्राप्त हुआ। पुरा लेआऊट डेव्हल्पमेंट होने के बाद एखादा किसी का सिंगल प्लॉट बचता है तो हमने उसके अंदर १ हजार रुपये भर के हमने वो काम किया। मेरा ऐसा लगता है की १५१ नगरसेवकोवाली महानगरपालिका और ५ लोगो के हाथ मे एक इतनी बडी संस्था देना इस बात का मै समर्थन नही करता हूँ। आज मा.महापौरजीने जो यह सभा बुलाई उसमे मै एनआयटी बरखास्त करने का समर्थन करता हूँ।

श्री.पुरुषोत्तम हजारे:-मा.महापौरजी, एनआयटी बरखास्त करण्याच्या या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. जेव्हा मी पहिल्यांदा या सदनाचा सदस्य बनलो त्यानंतर सर्वात जास्त एनआयटी बरखास्तीसाठी मोर्चे आणणारा नगरसेवक म्हणून मी या सदनात आहे. कमीतकमी ७-८ मार्चे आणणारा १० हजार १५ हजार लोकांचे मोर्चे मी आणलेले आहे. एनआयटी बरखास्त झाली पाहिजे आणि महानगरपालिकेला त्या ठिकाणी काम करण्याची संधी मिळाली पाहिजे म्हणून मा.महापौरसाहेब मी खुप प्रयत्न केला आहे. आज येथे आऊटर क्षेत्रातील माझे मित्र आणि माझे सहकारी नगरसेवक, एनआयटीचा कारभार असा होता रोजगार हमी आणि काम करतो आम्ही कमी. तसेच एक म्हण आहे. अर्धे आम्ही तर इतर उरलेले जनता तुम्ही, असे एनआयटीचे काम चाललेले होते. या एनआयटीचा त्रास कुणाला झाला असेल तर सर्वात जास्त त्रास हा आऊटर भागात राहणा-या नगरसेवकांना झाला आहे. बरसातच्या वेळी एनआयटीच्या भागात कुठेही ड्रेनेज लाईन नाही, स्ट्रार्म ड्रेनेजची व्यवस्था नसल्यामुळे जागोजागी खाली प्लॉट असल्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण होते. त्यामुळे संपुर्ण जनतेचा आक्रोश नगरसेवकांवर येतो. मी प्रशासनाला आपल्या माध्यमातून विचारु इच्छितो, आपण एनआयटी बरखास्त करीत आहे तर एनआयटीकडे जे शिल्लक पैसे उरले असतील त्याची माहिती दिली तर खुप चांगले होईल. एनआयटीकडे किती रुपये शिल्लक राहिलेले आहे. आता नविन आयुक्त साहेब आले आहेत त्यांच्या विषयी पेपरमध्ये खुप ऐकलेले आहे. मा.महापौरजी आपण मा.आयुक्त साहेबांसोबत आऊटर भागांचा पुर्ण दौरा करावा. ज्या ज्या ठिकाणी गडरलाईनची व्यवस्था आहे. आताच शिंगणे साहेबांनी सांगितले, एनआयटीच्या क्षेत्रात डब्लुपीएम चे रस्ते केले. शिंगणे साहेब, माझ्या प्रभागात येवून बघा, एकही रस्ता बनविला नाही. जेव्हा कुकरेजा साहेब एनआयटीचे चेअरमन होते तेव्हा मी २० हजार लोकांचा मोर्चा घेवून गेलो होतो. २०० गाडया मुरुम मला आऊटर भागात टाकण्यासाठी दयावा. परंतु मुरुम काय, मला एक डल्ला सुध्दा मिळाला नाही. म्हणून मा.महापौर साहेब आपण या संपुर्ण भागाचा विकास करण्यासाठी त्या भागातील नगरसेवकांना विश्वासात घेवून दौरा घ्यावा. जेव्हा मी पहिल्यांदा निवडून आलो तेव्हा आपले चेअरमन वरीष्ठ नेते मेरे दाता श्री. दयाशंकरजी तिवारी इनको कहा की साहब मेरे प्रभाग की स्थिती देखने के लिए चलो, जब उन्होने प्रभाग स्थिती को आके देखा तो उन्होने कहां की पुरषोत्तम यह लोग कैसे रहते है , दलदल मे कैसे रहते है तो सच मे मा.महापौरजी आपको नागपूर शहर की जनता को न्याय देना है तो आपण वहां के नगरसेवक को विश्वास मे लेकर, मा.आयुक्त को विश्वास मे लेके उस एरिया का सर्वे करे और विकास कार्य करे। जी जमीन आपल्या नागपूर महानगरपालिकेने एनआयटीच्या अंतर्गत सरस्वती तलमले यांच्या १८ एकराच्या जागेत डीपीमध्ये स्मशानभूमी, शाळेसाठी, हॉस्पीटलसाठी आरक्षित केली होती. ती जमीन

एनआयटीद्वारे स्मार्ट सिटीमध्ये कां गेली. हा माझा प्रश्न आहे. कारण ती महानगरपालिकेने आरक्षित केली होती. स्मार्ट सिटीमध्ये आरक्षण रद्द करण्याचे काम एनआयटीच्या माध्यमातून केले आहे. त्याचे उत्तर देण्यात यावे. कारण ती जमीन श्मशानभूमीसाठी महानगरपालिकेने आरक्षित केली होती. एनआयटीने ती जमीन स्मार्ट सिटीमध्ये देण्याचे काम केले आहे ते कां केले आहे याचे उत्तर देण्यात यावे. त्या ठिकाणी प्रेत जाळण्यासाठी आणि प्रेत काढण्यासाठी जागा राहिली नाही. मा.महापौरजी आणि मा. आयुक्त मुंढे साहेब आपणांस विनंती करतो. यावर कमेटी गठीत करण्यात यावी आणि कुणी हा भ्रष्टाचार केला आणि कुणी जागा पळविण्याचा प्रयत्न केला हे जनतेसमोर विहीत करावे. तसेच एक विषय आहे तो सभागृहात ठेवता येतो किंवा नाही माहीत नाही. ज्या ज्या लोकांनी आऊटर भागामध्ये प्लॉट घेतले आहे त्या प्लॉटचे जे मालक आहेत, जे प्रापर्टी डिलर आहेत त्यांनी त्या ठिकाणी विकास कामे केली नाही. विकास कामाच्या नावाने ३० रु फुट डेव्हल्पमेंट चार्ज लोकांकडून घेण्याचे काम केले आहे. आता किती दिवसापासून अनधिकृत लेआऊटचे रजिस्ट्री सुध्दा बंद होत्या. त्या रजिस्ट्री सुध्दा करुन दिल्या आहेत. हा सगळा आऊटर नगरसेवकांचा प्रश्न आहे. ते प्रापटी डिलर कारण सांगून नागरिकांकडून, प्लॉट धारकाकडून दोन-तीन लाख रुपये घेवून रजिस्ट्री करुन देत आहे. मा.महापौरसाहेब याकरिता एक कमेटी गठीत करावी. लोकांकडून पैसे हडपण्याचे काम हे प्रापर्टी डिलर करीत आहेत. त्यांच्यापासून या नागरिकांना मुक्त करावे आणिजो गर्व्हमेंटचा रेडी रेक्नरचा रेट आहे त्याप्रमाणे लोकांना रजिस्ट्री करुन दयावी. यासाठी मा.महापौरसाहेब आणि मा.आयुक्त साहेब आपण एक कमेटी गठीत करुन या प्रापर्टी डिलरला नोटीस दयावी अशी मी सभागृहाच्या माध्यमातून आपणांस विनंती करतो. मा.आयुक्त साहेब, ज्या लोकांनी एनआयटी आणि महानगरपालिकेचे भुखंड हडपण्याचे काम केले त्यांच्यावर कार्यवाही करुन त्यांना जेल मध्ये टाकण्याचे काम करावे एवढीच विनंती करतो. मा.महापौरसाहेब, आयुक्त साहेब याच्या अगोदर मी एक मुद्दा आपल्या महानगरपालिकेची जी आरक्षित जागा होती जी १८ एकर जागा महानगरपालिकेने ॲक्वॉयर केली होती. ती जागा एनआयटीला देतांना ही जागा आमची कुठल्याही कामाची नाही म्हणून महानगरपालिकेने एनआयटीला एनओसी दिली. जी जागा श्मशानभूमी, शाळा, हॉस्पीटलसाठी आरक्षित केली होती. ती जागा भुमाफियाने विकत घेतली. स्मार्ट सिटीचे नाव देवून वेगळा रंग देण्याचे काम केले. ती जागा ज्या योजनेकरिता आरक्षित होती त्याच कामासाठी ठेवण्यात यावी. कारण आमच्या एरियामध्ये दूर दूरच्या भागातून मय्यत घेवून येतात. त्यामुळे प्रेताला जाळण्याकरिता आणि गाडण्याकरिता जागा नाही. त्यामुळे या जागेची चौकशी करण्याचे काम करण्यात यावे. ज्या आरक्षणासाठी ही जागा तेच आरक्षण त्या ठिकाणी ठेवण्यात यावे. मी एनआयटी रद्द करण्याच्या हक्कामध्ये आहे. मला बोलण्याची संधी यदिली त्याबद्दल धन्यवाद देतो.

श्री.मो.जमाल:- मा.महापौरजी, मा.आयुक्तसाहब, मा. नगरसेवक, मा.अधिकारी वर्ग. सबसे पहिले मै मा.आयुक्त साहब का स्वागत करता हूॅ। एनआयटी बरखास्त किया जाये या नही किया जाये इस पर मा.महापौरजी इन्होने आज चर्चा रखी इसके लिए मै उनका स्वागत करता हूॅ। सभागृह मे चर्चा जो चर्चा है वह चर्चा मे नगरसेवको की भावना है और नगरसेवक अपनी भावना व्यक्त कर रहे है। तो कृपा करके उनकी भावना मे दखलअंदाजी न करे, उनको क्रास न किया जाये। सभी को बोलने का अवसर दिया जायेगा ऐसे आपने कहां है इसलिए इसका इस का ध्यान रखा जाये मा.महापौरजी। तीन-चार महिने पूर्व चुनाव हुए थे। चुनाव का रिझल्ट आया। सरकार गठीत हुई फिर

बरखास्त हुई फिर दुसरी सरकार गठीत हुई I मा.महापौरजी, हम यहां पर एनआयटी को बरखास्त करने के विषय पर चर्चा रखी है I इसी सभागृह मे उस सरकार के लिए एनआयटी की चर्चा रखी थी और एनआयटी की कौन कौन सी चिजे महानगरपालिका को हस्तांतरीत होनी चाहिए इसके उपर भी सदन मे चर्चा हो चुकी है मा.महापौरजी I मुझे समझ मे नही आ रहा है मा.महापौरजी की एक चिठ्ठी का असर क्या रंग ला रहा है I उस चिठ्ठी का असर इसलिये रंग ला रहा है मा.महापौरजी की पिछली सरकारने इसपर निर्णय लिया था उसमे कोई ना कोई खामियॉ रह गई थी I यह एनआयटी के विषय पर जो चर्चा हो रही है उसपर एक शेर बोल ही देता हूॅ मा.महापौरजी I आग लगी जब घर मे, उसने पुछा बचा क्या ? मैने कहा, मै, तो उसने कहां फिर जला क्या ? सरकार को आग लगी डूबने की तो दुसरी सरकार आ गई तो, उन्होने भी बताया एनआयटी को भ्रष्टाचार का अड्डा बताया I राज्य मे तत्कालीन सरकार भारतीय जनता पार्टी की थी उस सरकारने निर्णय लिया हमने उनके निर्णय का स्वागत किया I यहां पर सत्तापक्ष और विरोधी पक्ष का कोई विषय नही था आज के दिन ऐसी कोई चर्चा करने की बात नही थीI आज यह भी बात सुनने को मिली की विरोधी पक्ष की सरकार राज्य मे बन गई है तो राज्य मे इनके तेवर बदल गये, ऐसा तो कुछ मुझे दिख नही रहा Iविरोधी पक्ष भी चाहता है एनआयटी ना रहे सरकार भी चाहती है की एनआयटी ना रहे परंतु जिस तत्परता के साथ जिस जज्बा के साथ आज सत्तापक्ष एनआयटी का विरोध कर रहा है I ऐसा ही जज्बा पहिले दिखाया रहता तो आज एनआयटी का विषय इस सभागृह मे नही आता I एक शेर याद आ गया है, कुछ तो तुझे मजबुरीयां रही होगी, यु कोई बेवफा नही होता, जी बहोत चाहता है सच बोल दू, क्या करु हौसला नही होता I इसीतरहा एनआयटी के बारे मे जो कुछ यहा पर कहां गया उसमे कुछ भी असत्य नही है I नागपूर महानगरपालिका एक अखिल भारतीय स्वतंत्र संस्था का एक उपक्रम है I नागपूर महानगरपालिका एक संवैधानिक संस्था है I यहा पर १५६ नगरसेवक नागपूर शहर के डेव्हल्पमेंट के बारे मे सोचते है I मा.आयुक्त साहेब अब नवनियुक्त यहा पर आये है I उन्होने इस शहर के बारे मे सोचा, समझा और जाना और अपने निर्णय लिये I मा.महापौरजी, पाच लोक जिनके बारे मे इस शहर की जनता को कोई ज्ञान नही है I वो नागपूर सुधार प्रन्यास ट्रस्ट का काम देखते हैI नागपूर शहर की चुनावी प्रकिया से होके नगरसेवक यहां तक पहुचते हैI पब्लिक की आशा नगरसेवक पर टिकी होती हैI शहर का नागरिक अपनी समस्या लेके नगरसेवक के पास जाते है, अपनी समस्या उनको बताते है I कौन सा ट्रस्टी है जो जनता की समस्या का समाधान करने के लिए जनता के पास जाता है I कौन सा आमदार है जो जनता की समस्या सुनता है, कौन सा खासदार है जो जनता की समस्या का समाधान करता है I यह सब जबाबदारी एक नगरसेवक की है I वह जब काम करने को निकलता है तो उसे परेशानी का सामना करना पडता है I इस बात का वाकिफ पुरे नगरसेवक है और पुरा सभागृह है I एक नगरसेविका ने कहां की पहिले ही महानगरपालिका आर्थिक स्थिती से जुझ रही है I नागपूर महानगरपालिका की आवक कम है तो एनआयटी को महानगरपालिका मे विलीन करेगी तो महानगरपालिका इतना फंड कहां से लायेगी I उसको चलाने के लिए इतना फंड कहा से आयेगा I एनआयटी को राज्य सरकार से कुछ ना कुछ फंड मिलता है I और एनआयटी कई वर्षो से डेव्हल्पमेंट चार्ज वसुल कर रहा है वो पैसा कहां गया, इस का हिसाब किताब होना चाहिए मा.महापौरजी I पैसा कहां और किसने लेके गया इस बात पर भी सभागृह का ध्यान आकर्षित होना चाहिए I मा.महापौरजी, तत्कालीन सरकारने एनआयटी को बरखास्त करने मे इतना विलंब क्यो लगाया I एनआयटी आजभी बरखास्त नही हुई है, उसमे कुछ

ना कुछ कमजोरी रह गई होगी क्योकि एनआयटी मे कुछ लोक राज्य सरकारने नियुक्त करके भेजे थे वो सरकार के विरोध मे कोर्ट मे चले गये ।मा.महापौरजी, मेरी जानकारी के नुसार पुरे देश मे दो शहर ऐसे है जिसमे दो संस्थाये काम करती है । एक नागपूर शहर है और दुसरा चंढीगड है । नागपूर शहर की जनता इन दो संस्थाओ का भार सहन कर रही है । नागपूर शहर की जनता बहोत त्रस्त हो गई है । आज भी इनका विचार नही किया तो यह जनता किस के पास जायेगी । मैने पहले भी कहां आमदार, खासदार बडे बडे प्रोजेक्ट के बारे मे सोचते है । यह जो लोगो की छोटी छोटी समस्या है वह समस्या सिर्फ और सिर्फ नगरसेवको तक आती है।  महानगरपालिका की यह हालत है बजेट के अंदर कटौती है । तत्कालीन कमिशनर ने ७० परसेंट कॉरबेज लगा दिया और आये हुए कमिश्नरने सारे वर्कआर्डर रुकवा दिये । सिर्फ एक कारण पैसा नही है । हम शहर के विकास की बात करते है, शहर की विकास की जिम्मेदारी हमारे उपर है । यह कब तक चलेगा मा.महापौरजी । अतिक्रमण कार्यवाही शुरु है, मा. महापौरजीने इस के लिए एक सभागृह लगाया था, उसमे इस विषय पर चर्चा हुई और निर्णय लिया गया, मा.महापौरजी ने यह कदम उठाया था शुरुवात उन्होने की  यह स्वागतर्ह है । परंतु मा.महापौरजी, जो दो वक्त की रोजी रोटी कमा रहे है उनके बारे मे भी सोचना है । उनका दो वक्त का खाना, उनका चुल्हा कैसा जले, उनका जिवन किस तरह से चल रहा है इसके बारे मे भी सोचना है । उनके लिए पहिले कोई ना कोई व्यवस्था करनी होगी मा.महापौरजी, एनआयटी और महानगरपालिका का झगडा चलता रहेगा, यह झगडा समाप्त करना होगा ।मा.आयुक्त निर्णय लेने वाले व्यक्ती है ऐसे मैने सोशल मिडीया से सुना हूँ, । मा.महापौरजी, मा.आयुक्त का जीवन संघर्षमय है, हमारा जीवन भी संघर्षमय रहा है, छोटे से घरो से निकल के हम आज इस सदन के सदस्य है। लोगो की सेवा करने का जज्बा है उनकी सेवा करने का मौका मिला है तो लोगो का काम कैसे हो और कितनी जल्दी हो यही हम चाहते है। इस का माध्यम नागपूर महानगरपालिका,स्टॅन्डिंग कमेटी यह है मा.महापौरजी । इस तरह जो काम जरुरी है, काम जरुरी तभी आते है । नही तो एनआयटी और नागपूर महानगरपालिका के नाम के पदाधिकारी बननाकोई बडी बात नही है। एनआयटी बरखास्त हो इस के लिए मेरा १०० प्रतिशत समर्थन है क्योंकि एक म्यान मे नागपूर महानगरपालिका और एनआयटी ऐसी दो तलवारे नही रह सकती । इतने सालो से यहां रह रहे है और बरदाश कर रहे है, बरदाश करने की एक सीमा होती है मा.महापौरजी । मेरा यह कहना है की एक ऐसा निर्णय हमारे सभागृह से जाये । राज्य सरकार के चिठ्ठी के बारे मे  सोचे परंतु नागपूर शहर के डेव्हल्पमेंट की जिम्मेदारी जिसपे है उनकी भावना की कद्र यह सरकार करे । उनको जो निर्णय करना है वो करे बस इतनी सी आपसे गुजारिश है मा.महापौरजी ।  इतना कहते हुए मै अपनी शब्दो को विराम देता हूँ , जयभीम, जयभारत.

श्री. विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, सबसे पहिले तो मै आपका बहोत बहोत धन्यवाद करता हूँ की इस विषय को आपने सदन मे रखा ।  नागपूर सुधार प्रन्यास यह बहोत पुरानी संस्था है जिस समय मे नागपूर शहर की प्लॉनिंग नागपूर सुधार प्रन्यास ने की । परंतु मा.महापौरजी, पिछले कुछ सालो से जिसतरह नागपूर सुधार प्रन्यास ने नागपूर महानगरपालिका की विकास को एक गलत दिशा दी यह सारी की सारी जानकारी यहां के सभी नगरसेवक जानते है।  गुंटेवारी के माध्यम से २००२ से जिसतरह से पुरे नागपूर शहर मे स्लम तयार करने का काम नागपूर सुधार प्रन्यास के माध्यम से किया गया है । जितने भी आऊटर के नगरसेवक है वह भली भांती जानते है । मै नारी प्रभाग से आता हूँ तो मेरे प्रभाग मे ५० प्रतिशत से भी ज्यादा गुंटेवारी क्षेत्र है । जब हम वहां पर

डेव्हल्पमेंट के काम करने को जाते है तो हम वहां पर डेव्हल्पमेंट के काम नही कर सकते क्योंकि वह क्षेत्र नागपूर सुधार प्रन्यास मे आता है। मा.महापौरजी मै आपके माध्यम से पुछना चाहता हूँ की हम जो नगरसेवक चुनके आये, हम जिस प्रभाग से चुनके आये वह एनआयटी के क्षेत्र है जहां हम काम नही कर सकते तो यह कहां का न्याय है। वहा के नागरिक हमारे पास मे अपनी समस्याये लेकर आते है। एक तरफ डेव्हल्पमेंट का क्षेत्र देखने को मिलता है और दुसरी तरफ गुंटेवारी का ऐसा क्षेत्र देखने को मिलता है। जहा प्रॅक्टीकली २००२, २००२, २००५, २००७ मे सॅग्शन किये गये लेआऊट है पर वहां पर अभी तक रास्ते बने हुए नही है। नागपूर सुधार प्रन्यास ने यह लेआऊट मंजूर किये है। १६ रु के माध्यम से, ३२ रु के माध्यम से, ५६ रु के माध्यम से और ११२ रु. के माध्यम से एनआयटीने विकास शुल्क लिया है। वो लेआऊट मे डेव्हल्पमेंट हुआ है की नही हुआ इस का लोगो का कोई वास्ता नही है। नागरिको का कहना यह रहता है की हमने डेव्हल्पमेंट चार्ज एनआयटी को भरा है, तुम उस क्षेत्र के नगरसेवक हो तो हमारे क्षेत्र का विकास अभी तक क्यु नही हुआ। मुझे भी नागपूर सुधार प्रन्यास मे ट्रस्टी होके काम करने का मौका मिला तो मैने कोश्चन पुछा की काम क्यु नही हो रहा है तो उन्होने जवाब दिया की गुंटेवारी कायदे के अंतर्गत हमने यह मंजुर किया है, इसमे जितनी भी निधी जमा होगीं उस निधीसे हम काम करेगें। मा.महापौरजी, परिस्थिती ऐसी रहती है की वह १६ रु लेकर डेव्हल्पमेंट का काम करते है तो सिवरलाईन नही डाल सकते। डेव्हल्पमेंट का काम नागपूर शहर के अंदर मे आता है तो वह महानगरपालिका के माध्यम से होना चाहिए। महानगरपालिका मे हमने फाईल बनाई तो वहा पर नागपूर सुधार प्रन्यास का क्षेत्र रहने के वजह से हम काम नही कर पाये। गुंटेवारी अंतर्गत लेआऊट को नागपूर सुधार प्रन्यासने मंजुरी दे दी है। यह चिंताजनक विषय है। नागपूर सुधार प्रन्यास ने पेपरवर लकीरे खिचके यह लेआऊट बेच दिये और डेव्हल्पमेंट करनेवाली ॲथारिटीपर पुरी जिम्मेदारी डालने का पाप इस नागपूर सुधार प्रन्यास ने डाला है। मा.महापौरजी, परिस्थिती ऐसी है ६ मीटर के रस्ते पर एनआयटीने लेआऊट मंजूर कर दिया। ३ मीटर, ४ मीटर के रस्ते मे भी नागपूर सुधार प्रन्यास ने लेआऊट मंजूर किये दिये। डेव्हल्पमेंट की बात करते है हमने किस तरह से डेव्हल्पमेंट करना चाहिए। मा.पूर्व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीसजी यह पुरे शहर को भलीभांती जानते है, पहचानते है। गुंटेवारी अंतर्गत लेआऊट मे क्या तकलीफे है यह अच्छी तरह समजते थे। नागपूर सुधार प्रन्यास की काम करने की जो पध्दत है मा.महापौरजी, जो लेआऊट मंजूर किये है उसका कोई अता पता नही है। आरएल पर जो ठप्पा मारते है उसपर लिखा रहता है की इसकी लिगल जाँच नागपूर सुधार प्रन्यास ने की है। मा.महापौरजी उसपर बस इतनी ही माहिती रहती है, जो व्यक्ति ने डाक्युमेंट सबमीट किये उसके माध्यम से वह सॅग्शन कर दिया जाता है। उनके तरफ से डाक्युमेंट पुरे होते है बाद मे यह जानकारी आती है की दुसरे दो व्यक्ति को सेलडीड करके दी है। आज के तारीख मे पजेशन एक व्यक्ति के नाम पर और सेलडीड दुसरे व्यक्ति के नाम पर रहती है। इसतरह से नागपूर सुधार प्रन्यास ने काम करके रखा है की जिसके काम मे न सर है न धड नही है। इसपर कोई चर्चा नही होती। मा.महापौरजी, मेरे प्रभाग मे ८ से १० हजार लेआऊट गुंटेवारी के माध्यम से मंजुर किये गये है। परंतु प्रभाग मे चार-पाच गार्डन भी मुझे दिखते नही है। वो भी कितना दिखता है तो एक लेआऊट मे २ हजार फुट का ओपन स्पेस दिखता है। तो एक लेआऊट मे ३ हजार फुट का ओपन स्पेस दिखता है। वहां के लोग हमे पुछते है की डेव्हल्पमेंट किया है तो हमारे बच्चो के लिए प्लेग्राऊंड कहां है। यहां पर भी गाडी रुकती नही है उसके आगे जाके गुंटेवारी अंतर्गत २००० पुर्व उस लेआऊट मे ओपन

स्पेस रखी होगी तो नागपूर सुधार प्रन्यास मे जाके १ हजार रुपये भरके नागपूर सुधार प्रन्यास आज भी ऐसे ओपन स्पेस मे आरएल देने मे तैयार बैठी है l नागपूर सुधारप्रन्यास मे बहोत भ्रष्टाचार हो रहा है मै इस बात का निषेध करता हूँ l मा.महापौरजी, निश्‍चित रुप से गाडी यहां भी नही रुकी है, नागपूर सुधार प्रन्यास ने लोगो को छोटे छोटे मकान बनाके दिये है, म्हाडा के माध्यम से ३००, ५००, ५५० स्केअर फीट के छोटे छोटे स्लम डेव्हल्प कर के जनता को दिये है l वहा पर ३०-३० साल हो चुके है, वहा ३० साल के बाद लीज रिनीव्हल करने की बात आती है तो बहोत सारे लिगल पाईंट निकाल कर आज नागपूर शहर मे नागपूर सुधार प्रन्यास की माध्यम से ७० हजार मकान उनको मंजूर करके दिये है परंतु उनके लीज रिनीव्हल की बात जब आती है तो एनआयटी के लोग उनको अलग अलग तरह की बाते बनाते हुए रोकते है l मा.महापौरजी , एक तरफ मे गरीब आदमी अडचण मे रहता है और दुसरी तरफ मे नागपूर सुधार प्रन्यास के अंदर मे कोई सुनावनी नही है l मै धन्यवाद करना चाहूंगा आदरणीय देवेंद्रजी फडणवीस को जिन्होने बहोत अच्छा निर्णय नागपूर शहर के अंदर लिया l मै सदन के माध्यम से पुछना चाहता हुँ की इस शहर मे दो ॲथारिटी का क्या काम है। मा. पालकमंत्री एक पत्र लिखते है, मै पुछना चाहता हूँ की ऐसी क्या आवश्यकता आ गई है की पूर्व सरकार ने नागपूर सुधार प्रन्यास को बरखास्त किया, उसमे कुछ लिगल पाईंट के वजह से वह रुका था वह आज जिंदा करने की क्या आवश्यकता आ गई ।डेव्हल्पमेंट के अंदर मे नागपूर का के अंतर्गत एक समिती बहोत अच्छा काम कर रही है, वहां चुने हुए लोग यहां पर काम कर रहे है l मुझे ऐसा लगता है, अगर सही मायने मे हम नागपूर सुधार प्रन्यास की बात करे तो मुझे लगता है पुराने जमाने के सावकार रहते थे ये आधुनिक प्रकार के सावकार जैसे काम करने वाली नागपूर सुधार प्रन्यास संस्था है और मै इसका निषेध करता हूँ l मा.महापौरजी, मुझे इस बात की खुशी हो रही है की ये सदन के बहुतांश सर्वपक्षीय नगरसेवकोने नागपूर सुधार प्रन्यास का विरोध किया है किसी भी प्रकार नागपूर सुधार प्रन्यास जिवंत होना नही चाहिए l जो आम नागरिक, गोरगरीब लोग है इसके अंदर मे उनका नुकसान होता है यह देवेंद्रजी फडणवीस के सरकार ने निर्णय लिया इस का मै समर्थन करता हूँ , मुझे बोलने का अवसर दिया इसलिये मै आपको धन्यवाद देता हूँ l

श्री संदिप सहारे :- मा.महापौरजी, आजची ही सभा जेव्हा सुरु झाली तेव्हा मी बोललो होतो कि हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे आणि याच्यामध्ये सुरुवातीला एकदा आदेश ही झाले होते, आणि त्या आदेशाला धरुन मी आज या चर्चेमध्ये सहभागी होत आहे. न्यायालयाचा आदेश सर्वपरी मानत आहे. आज सुरुवातीला काही सदस्य या सभागृहामध्ये चर्चा करतांना विशेष करुन नागपूर जिल्हाचे पालकमंत्री यांना टारगेट बनविण्याचा काम करीत आहे. त्यांनी सांगीतले कि एनआयटी बरखास्त नाही झाली पाहिजे असा त्यांनी पत्र दिले. फार वेळेपासून चर्चा सुरु आहे आम्ही एनआयटीच्या विषयावर त्यांना दोष देत आहे निश्‍चितच एनआयटी चांगल्याप्रकारे काम करते अशातला भाग नाही. परंतु आम्ही नागपूर महानगरपालिका म्हणुन आमचे किती दायित्व चांगल्याप्रकारे करतो हे सुध्दा पाहणे गरजेचे आहे. आम्ही एनआयटी ला दोष देत आहे, आम्ही या शहराचा विकास करतांना जे योग्यप्रकारे महानगरपालिकेचे दायित्व होते त्याप्रमाणे विकास केलेला आहे काय ? मघाशी तुमच्या सत्ताधारी सदस्यांनी बोलुन दाखविले कि एनआयटी मुळे नागपूर शहर खिळखिळे झालेले आहे तर नागपूर महानगरपालिका काय करीत आहे. याचा अर्थ आपली सत्ता या महानगरपालिकेमध्ये गेल्या पंधरा वर्षापासून आहे. ज्याप्रकारे विकासाचे काम व्हावयास पाहिजे होते त्याप्रमाणे आपण विकासाचे काम केलेले नाही असाच त्याचा अर्थ होतो. अनेकदा आपण पाहिले कि,

आपण आमचे दायित्व होते कि नागपूर महानगरपालिकेच्या शाळा चांगल्या राहिल्या पाहिजे होत्या, आम्ही त्या शाळा विकुन टाकल्या आहे, अनेक महानगरपालिकेच्या शाळा बंद झालेल्या आहेत आणि आता आपण आर्डर काढले म्हणे प्रायव्हेट संस्थेला ते द्याव्यात. वाठोडयासारख्या एरीआत सिम्बोसिस सारखी कर्मशियल शिक्षण संस्था आहे, त्या सिम्बोसिसला करोडो रुपयांची जमिन देवून टाकली आणि आमच्या शाळा बंद पाडल्या, निश्चितच एनआयटीचे कर्तव्य आहे कि, त्यांनी याकडे लक्ष द्यावयास पाहिजे होते. आमचे ही कर्तव्य तितकेच होते परंतु आम्ही पाहत होतो कि आमचे सिमेंट रस्ते चांगले झाले पाहिजे, आम्हाला गाडी चालविणे सोयीचे होईल. परंतु पावसाळयामध्ये लोकांच्या घरामध्ये पाणी जाते, त्याच्यावर आम्ही काही चर्चा करावयास पाहिजे. आम्ही दोष देतो एनआयटी ला आम्ही पण तितकेच दोषी आहे. नागपूर महानगरपालिकेमध्ये अनेक भ्रष्टाचार झाले परंतु आपण एनआयटीच्या भ्रष्टाचाराची गोष्ट करीत आहे, मग नागपूर महानगरपालिकेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराला कुठे आळा बसला. स्वत: आम्ही एनआयटी कडे बोट दाखवुन राहिलो तर चार बोटे आमच्याकडे आहे. आम्हाला ही सुधारणा करणे आवश्यक आहे मगाशी एक मा.सदस्य, अमृत योजनेबद्यल बोलले, ठिक आहे. एनआयटी ने आउटर एरीआमध्ये काम केले नसेल मान्य करतो परंतु ओसीडब्लु ला आम्ही ठेका दिल्यानंतर त्यांची अवधी पुर्ण झाल्यानंतर ही त्यांचे फाईन माफ करतो, त्यांना बक्षिस देतो तर महानगरपालिकेचा दोष नाही काय ? फक्त एनआयटी ला दोष द्यावयास पाहिजे काय ? अनेकदा मोबाईल टावर्सवर चर्चा झाली उच्च न्यायालयाचे आदेश असतांना ही आम्ही त्याच्यावर कार्यवाही केली नाही. मा.महापौरजी, निवडणुकीच्या पूर्वी शहराचा विकास करण्याकरिता एनआयटी च्या माध्यमातुन ही काही काम झाले आणि नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातुन ही काही काम झाले. आश्चर्याची गोष्ट अशी आहे कि आमची जी हक्काची निधी आहे त्या निधीवर कटौती आणण्यात आली. काय झाले मागच्या दिवसामध्ये दक्षिण पश्चिम नागपूर मध्ये राज्य शासनाचा निधी आला नाही. १५,७५० लक्ष रुपये आजपर्यंत निधी आला नाही तरी एकुण ८७ कामापैकी ८४ कामाचे कार्यादेश निघाले आहे. त्यापेकी काही काम ही झाले.

श्री अविनाश ठाकरे :-पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, प्रशासकीय मान्यतेनंतर टेंडर काढता येते काय ? कार्यादेश देता येते काय ? यासाठी निधीची आवश्यकता असते काय ? महाराष्ट्र शासनाकडुन प्रशासकीय मान्यता मिळाली त्याचे टेंडर निघाले वर्क आर्डर झाले. निधी तर बिलाच्या वेळेस येईल.

श्री संदिप सहारे :-जर शासन बदललेला आहे आणि निधी नाही आला तर कोण बिल देणार आहे. राज्य सरकारकडुन अजून एक पत्र आलेले आहे त्या पत्राचा मी अभ्यास केलेला आहे, तुम्ही ही पाहुन घ्या. राज्य सरकारनी निधी देण्यांस मनाई केलेली आहे.

महापौर :- प्रशासनानी उत्तर द्यावे.

श्री तालेवार( अधिक्षक अभियंता ) :- मा.महापौरजी, शासनाचे अनुदान १५७ कोटी रुपयांचे आले होते त्यात आपल्याला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे, त्याप्रमाणे आपण कार्यादेश दिलेले आहे.

श्री संदिप सहारे :- मा.महापौरजी, एक पत्र असा ही आला कि नवीन शासनानी त्या निधीवर रोक लावली आहे.

श्री अविनाश ठाकरे :-मा.महापौरजी, शहराच्या जनतेला माहिती झाला पाहिजे कि शासनानी काय रोक लावली त्या पत्राचे वाचन करण्यांत यावे, मा.महापौरजी, नवीन सरकारनी अश्याप्रकारचे पत्र काय दिले व कोणत्या आशयाचे पत्र दिले त्याची माहिती शहरातील जनतेला झाली पाहिजे. त्याचे वाचन सभागृहात झाले

पाहिजे.

महापौर :- हे जे १५७ करोड आहे त्यावरती या शासनानी रोक लावलेली आहे काय ?

श्री तालेवार( अधिक्षक अभियंता) :- मा.महापौरजी, ज्या कामाचे कार्यादेश झालेले आहे त्यासंदर्भात रोक लावण्यांत आलेली नाही, ज्या कामाचे कार्यादेश झालेले नाही अश्या कामाच्या बाबतीत आदेश देवु नये असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

श्री संदिप सहारे :- मा.महापौरजी, श्री तुकाराम मुंडे आयुक्त साहेबांचे एक पत्र तयार झालेले आहे. ते मी पाहिलेले आहे. ते शासनाला निधीकरीता पाठविण्यात आले आहे तो पत्र मी पाहिलेले आहे.

श्री प्रविण दटके :- पाइंट ऑफ आर्डर, जर ते पत्र तयार झाले असेल तर मा.आयुक्त येथे बसलेले आहेत, आपल्या माध्यमातुन मा.आयुक्तांचे स्पष्टीकरण करुन घेण्यांत यावे.

श्री संदिप सहारे :-जी निधी आहे त्या निधीच्या मागणीकरिता आयुक्तांच्या नावांनी काल मी एक पत्र पाहिलेले आहे. श्री संजय बालपांडे, कनिष्ठ अभियंता त्यांच्याकडे ते पत्र आहे.

श्री तालेवार, अधिक्षक अभियंता :- मा.महापौरजी, मा.सदस्यांना विनंती आहे कि ते पत्र जर आपल्याकडे असेल तर ते आपण सादर करावे, जेणेकरुन मा.आयुक्तांना तो पत्र दाखविता येईल.

श्री संदिप सहारे :- तो पत्र मला कसा मिळेल, मी काल पाहिले.

श्री धर्मपाल मेश्राम -: पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, ज्येष्ठ सदस्य, श्री संदिप सहारे यांनी जो आरोप केलेला आहे त्याची शहानिशा झाली पाहिजे. खराच असा पत्र तयार करण्यांत आले आहे काय ? असेल तर आमची काही हरकत नाही, नसेल तर त्यांनी आयुक्तांची माफी मागावी.

श्री संदिप सहारे :- मा.महापौरजी, संजय बालपांडे कनिष्ठ अभियंता आहे डीपीडीसी सेल मध्ये मी काल एक माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात त्या विभागात गेलो होतो, डाक्युमेंट मी मागितले आहे कारण त्यांना माहिती कळली नव्हती, कालच मी त्या विभागात जावून आलो त्यांना विचारा.

महापौर :- डीपीडीसी सेलचे कार्यकारी अभियंता कोण आहे.

श्री दयाशंकर तिवारी -: पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, संदिपजी ने जो विषय रखा वह संदिपजी ने स्वयं की आँखो से देखने के बाद विषय रखा है, सभागृह मे संदिपजी ने माफी मांगनी चाहिये ऐसा कोई विषय नही है, विषय यह चालु है कि मा.आयुक्त महोदय ने पत्र लिखा या नही लिखा, यस आर ऑर नो आयुक्त महोदय बोल दे तो विषय समाप्त हो जायेगा किसी को और बली का बकरा बनाने की आवश्यकता क्या है, अगर उन्होने कहां कि नही लिखा तो नही लिखा.लिखा तो लिखा.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, यांचे उत्तर मिळेल काय ? आम्ही पण काही गोष्टी ऐकल्या आहे त्याचे उत्तर मिळुन जाईल तर चांगले होईल. ज्या सिमेंट रोडचे कार्यादेश झाले ते सुरु झाले नाही तर त्याठिकाणी डांबरीकरण करावे, सीई साहेबाला लेटर दिले आहे अशी माहिती आहे. आणि ज्या कामाचे टेंडर झाले आहे, ज्याचे कार्यादेश झाले आहे त्या फाईल्स इम्प्लीमेंट झालेल्या नाहीत. हे सगळे काम याच्यानंतर होणार नाही, ज्याचे वर्क आर्डर झाले पण काम सुरु होणार नाही, आणि ते काम कधीच होणार नाही काय ? आणि मा.महापौरजी, याच्यानंतर नगरसेवकांना कुठल्याही विकास कामाची फाईल बनविता येणार नाही अश्या अनेक बातम्या गेल्या अनेक दिवसापासून मी महानगरपालिकेत ऐकतो आहे. त्यामुळे या सर्व विषयाचे उत्तर मिळाले तर चांगले होईल, कारण आयुक्तांबद्यल गैरसमज पसरविणे सुरु आहे.कोणालाही विचारला तर स्टँन्डींग आदेश, कोणालाही विचारला तर तोंडी आदेश, एका शिस्तप्रिय आयुक्तांबद्यल अश्या

जर चर्चा बाहेर चालल्या असेल तर ही आपल्या महानगरपालिकेची बदनामी आहे, त्यामुळे मी या सभागृहाच्या सर्व गटनेत्यांना विनंती करतो कि, त्यांनी आयुक्तांची भेट घ्यावी, आम्ही सर्व नगरसेवक आपआपल्या गटनेत्यांसोबत आयुक्तांकडे जावु आणि आयुक्तांना विचारु कि साहेब हे काम होणार आहे किंवा नाही. आयुक्त साहेबांचे जे उत्तर असेल ते ऑफिशियली असेल मग आमचे निर्णय घेण्यासाठी आम्ही मोकळे आहे.त्यामुळे या सर्व गोष्टीवर जर तुम्हाला पडदा टाकावयाचा असेल तर त्यांचे उत्तर याठिकाणी घेण्यांत यावे. अशी माझी विनंती आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, नियमाप्रमाणे मा.आयुक्तांना सभागृहाची पध्दत काय आहे ती सांगुन देण्यात यावी, ते आपल्याकडे नवीन आहे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मा.सदन, पहिला जो विषय समोर आणलेला आहे मा.सदस्यांनी कि, मी असे काही पत्र लिहिलेले आहे काय ? प्रथमत: शासनाकडुन कोणतीही योजना मंजूर झाल्यानंतर त्याचे ज्यावेळेस पैसे येत नसतात त्यावेळेस पैसे मागणे ही नॉर्मल प्रोसेस आहे. त्याच्यामध्ये मी काही नवीन करतो अशातला भाग नाही. परंतु असे पत्र मी अजूनपर्यंत लिहिलेले नाही, हे मला माहित आहे.

श्री दयाशंकर तिवारी :-पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, आयुक्तांचा निवेदन होवु द्या, आणि सहारेजी तुम्ही पण त्या विषयाला घेवून पुन्हा निवेदन करु नका, कारण कि हा एकमेकांच्या रिस्पेक्टचा विषय आहे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, दुसरा जो विषय मा.सदस्यांनी काढला कि, सर्व काम बंद केले आहेत काय ? नगरसेवकांचे काम करावयाचे नाही काय ? याच्यापुढे कोणतेच काम होणार नाही काय ? मी प्रथमत: महानगरपालिकेची आर्थिक स्थिती काय आहे. कोण कोणते प्रोजेक्ट आहे व त्या त्या विभागामध्ये कोण कोणते काम चालु आहे, त्याचे स्टेटस काय आहे त्याचा आढावा घेण्याचे काम सुरु आहे. मा.महापौरांना या बाबीशी मी अवगत केलेले आहे. ज्यावेळेस आपण कोणतेही काम घेतो त्यावेळेस आपल्याकडे निधीची तरतुद असणे आवश्यक असते. शासनानी मंजूर केलेल्या ज्या योजना आहे त्याच्यामध्ये महानगरपालिकेचा जो हिस्सा आहे, तो सुध्दा आपल्याला देणे बंधनकारक आहे आणि म्हणुन त्याचा आढावा घेतांना माझ्या लक्षात असे आले कि आपल्याकडे जे बजेटेट अमाउंट आहे, त्याच्या अगेंस्टमध्ये मंजूर केलेले काम ते कितीतरी पटीने जास्त आहे, त्याची अमाउंटही जास्त आहे. मला ही माहिती मिळालेली आहे कि वित्त विभागाकडे जवळजवळ ४०० कोटी रुपयांचे बिल प्रलंबित आहे. आणि आपण ते पैसे देवु शकत नाही, अश्या परिस्थितीमध्ये नवीन काम घेणे संयुक्तीक होणार नाही. त्या दृष्टीकोणातुन ज्या कामाचे वर्क आर्डर दिलेले आहे, आणि ज्या कामाचे वर्क आर्डर दिले पण चालु झाले नाही, ते चालु करावयाचे नाही, असे मी आदेश दिलेले आहे. ते आदेश फक्त फायनेंशियल डिसीप्लीन आणण्यासाठी आहे. फायनेंशियल जो पर्यंत आपल्याकडे उपलब्ध होत नाही तोपर्यंत पुढचा काम होवु शकत नाही. परंतु आता बजेट बनविण्याचा काम चालु आहे, यावेळेस आपली फायनेंशियल पोजीशन काय आहे, जे शासकीय निधीमधुन काम मंजूर झाले आहे, त्या इतिवृत्त काय आहे, ऑलरेटी जे प्रोजेक्ट हाती घेतलेले आहे, त्याचा स्टेटस काय आहे. त्याचा जेव्हापर्यंत उहापोह होत नाही तोपर्यंत नवीन कामे हाती घेता येणार नाही. ही बाब मी काल मा.महापौरांना अवगत केलेली आहे. आज आपल्या सर्वांना ही बाब अवगत करीत आहे. त्याचा एकमेव कारण हा आहे कि मी ज्यावेळेस वित्त विभागाचा आढावा घेतला होता, त्यावेळेस ब-याच अश्या गोष्टी आहे कि आपण इंकम टॅक्स कापले होते परंतु इंकम टॅक्स विभागाला दिले नव्हते, ते पैसे आपण दुस-या कामासाठी वापरले होते, जीपीएफची अमाउंट आपण पेपरवर कापल्या होत्या परंतु जीपीएफ च्या अकाउंटमध्ये गेल्या नाही.

जेव्हा सिमेंट रोडचा विषय आला, सिमेंट रोड टप्पा २ व टप्पा ३ त्याच्यामध्ये आपला जो शेअर आहे तो आपण अजून दिलेला नाही. मग तो शेअर आपल्याकडे शासनाकडुन येणार नाही, तो शासनाच्या निधीतुन २४०० कोटीच्या आसपास आहे, एनआयटीचा समथिंग आहे, आणि आपलाही आहे आणि आपला भाग आपण दिला नाही, तर त्याचे वर्क आर्डर होणार नाही. म्हणुन माझी सभागृहाला विनंती आहे कि आपण ज्यावेळेस काम सुचविता मला माहित आहे कि आपल्या कार्यक्षेत्राच्या विकासाचे काम आपण सुचवित असता. प्रशासन जे काम करीत असते ते सुध्दा या शहराच्या विकासाकरिताच काम करीत असते. परंतु हे काम करीत असतांना आपल्याकडे इंकम किती आहे आपल्या प्रायरीटीज किती आहे, आपल्या डिमांड मोजक्या असेल तर प्रायरीटीजप्रमाणे करावे लागेल आणि प्रायरीटीमध्ये आपण ऑलरेडी कमिटमेंट केलेल्या आहेत. शासनाच्या योजनामध्ये आपण येवढा सहयोग केला उदाहरणार्थ नागनदी याच्यासाठी आपल्या २४०० कोटी रुपयांचा प्रोजेक्ट मंजूर झाला. महाराष्ट्र शासनानी त्याला २१ जानेवारीला मान्यता दिली आहे. त्याचा शेअर आपला ३२४ च्या आसपास आहे, ही कमिटमेंट आपण टाळु शकणार नाही, तसेच शासनाच्या वेगवेगळया योजना आहे, नगरोत्थान योजना आहे, लॅन्ड अॅक्व्हीजीशनच्या योजना आहे, त्याच्यामध्ये ३० टक्के हिस्सा आपण देणार आहे, किंवा डीपीसी च्या ज्या फाईल्स मंजूर झालेल्या असतील त्यामध्ये सुध्दा आपण कमिटमेंट केलेली आहे तो जर पैसा आपल्याकडे नसेल तर नवीन काम कशाच्या आधारे आपण घेवु हा माझ्या समोर मोठा प्रश्न आहे. म्हणुन त्या दृष्टीकोणातुन ज्या कामाचे वर्क आर्डर दिलेले आहे, व वर्क आर्डर दिल्यानंतर जे काम सुरु झालेले नाही त्यांना तात्पूरती या मोमेंटला पुढचे कोणतेही प्रोजेक्ट करावयाचे नाही, असे मी विभागाला सांगीतले आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, दुसरा आम्ही एक विषय ऐकतो आहे कि स्थायी समितीला प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार नाही, अशी चर्चा आहे, मग स्थायी समितीला काय अधिकार आहे, स्थायी समितीला अधिकार आहे कि नाही याबाबतीत ही खुलासा झाला तर बरे होईल.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, दटके साहेबांनी याठिकाणी मुद्या उपस्थित केला त्याच्या अनुषंगाने मा.आयुक्तांनी निवेदन केले महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीच्या संदर्भात, माझे ही या संदर्भात आपणांस असे निवेदन आहे कि याबाबत नगरसेवकांना अधिक जाणुन घेण्याची इच्छा आहे. महानगरपालिकेला किती थकबाकी द्यावयाची आहे, आपण कोणकोणत्या प्रोजेक्टची हमी घेतली आहे, सध्याची आर्थिक स्थिती काय आहे हे जाणुन घेणे अगत्याचे आहे. म्हणुन आजचा जो विषय आहे एनआयटी व महानगरपालिकेला याच्यावर आज चर्चा घ्यावी व आर्थिक स्थितीच्या संदर्भात एक स्वतंत्र चर्चा वेगळयानी घ्यावी, अनेक कंन्फ्युजन आहे, कारण सहारे साहेबांनी जो विषय याठिकाणी उपस्थित केला होता, तो राज्य सरकारच्या निधीच्या संदर्भातला होता, आणि त्याचा संबंध एनआयटी व मनपा यांच्याशी कसा आहे, या संदर्भातुन त्याच्यावर भाष्य केला होता त्यामुळे ही चर्चा आपण एनआयटी व मनपा यांच्यापूरती करावी मात्र वेगळया पध्दतीने आर्थिक स्थितीच्या संदर्भात आपण चर्चा करावी, कारण कि येवढया वेळेस ही चर्चा संपणार नाही, माझी दटके साहेबांना ही विनंती आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, आर्थिक परिस्थिती आपण म्हणतो, एनआयटीचा मुद्या यासाठी आला कि पुर्ण शहराचा मेंन्टनस् महानगरपालिका करते व लिजचे पैसे एनआयटी घेते, ग्राउंट रेंट एनआयटी घेते तेथला सगळा मेंन्टनस् मनपा करते. स्वच्छता महानगरपालिका करते, रस्ते महानगरपालिका मेंन्टनस् करते, पाणी महानगरपालिका देते, लिजचे पैसे कोणी घ्यावे, एनआयटी ने खावे, ग्राउंट रेंटचे पैसे कोणी

खायचे एनआयटी ने खायचे, मी धन्यवाद देतो संदिप सहारे साहेबाला योग्य मुद्या त्यांनी आणला, एकीकडे नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ठिक नाही, अमका नाही, तमका नाही, एकीकडे असे बोलतात, दुसरीकडे एक अहवाल एनआयटीनी दिला आहे. महाव्यवस्थापक नागपूर सुधार प्रन्यास त्यांचे हे पत्र आहे. आणि हे पत्र सरकारला दिले आणि त्यात असे लिहिले कि आम्ही ७०० कोटी रुपये खर्च केले. माझे म्हणणे आहे कि नागपूर महानगरपालिका सारखी संस्था १५१ वार्डामध्ये आपल्या कमाईतुन सर्व काम करते. एनआयटी चे लेआउट पण स्वच्छ करते. नाला चोक असेल तर ते सर्व काम आपण करतो, विद्युत दिव्यांची व्यवस्था आपण करतो. पण तेथे मेनटेनेंस चार्ज कोण घेते, एनआयटी घेते. तेथे बिल्डींग सॅक्शनची जी डिमांड निघते ती कोण घेते, एनआयटी घेते. सेवन स्कीम मध्ये रामदासपेठ आहे. रामदासपेठ सारखा एरीआत सगळया सोयी एनआयटी करते. माझा मुद्या हाच आहे कि आपण संदिप सहारेला धन्यवाद दिले पाहिजे कारण त्यांनी हा मुद्या आणला कारण हा मुद्या येईल तेव्हा कमाईचा विषय येईल. माझी मा.महापौरजी आपणांस विंनती आहे ज्या कामाच्या टेंडर फाईलवर याच्या आधीच्या आयुक्तांनी सही केली असेल किमान त्याच्या त्याच्या एचओडी नी सही केली असेल तर त्यांनी काय केले. त्यामुळे नगरसेवकांचे जे विषय आहे त्या विषयाच्या संदर्भात माझी मा.महापौरांच्या माध्यमातुन आयुक्तांना विंनती आहे तुमची भावना चांगली आहे कि जितके चादर आहे तितकेच पाय पसरले पाहिजे. नागपूरच्या जनतेच्या कराच्या पैश्यातुन ही महानगरपालिका फक्त कर्मचा-यांच्या पगारासाठी सुरु नाही, त्यामुळे विकास कामासाठी पण काटकसर करुन जे विकास कामे आवश्यक आहे, जे नगरसेवकांनी योग्य पध्दतीने सुचविले आहे, ते सुध्दा झालेच पाहिजे, त्याचे भुगतान झालेच पाहिजे. आणि काही गोष्टी मा.आयुक्त नवीन आहे ते अनेक महानगरपालिकेत जावुन आले, त्यांच्या अनुभवाबद्यल आम्हाला काही बोलावयाचे नाही. पण काही गोष्टी एमएमसी ॲक्टनी चालतील, व काही गोष्टी ॲक्टच्या परंपरेनी चालतील, पण हे करीत असतांना दोन्ही चाके नीट चालावे ही जबाबदारी या सभागृहाची आहे त्यामुळे कायद्यात जे काही दिले आहे ती हायरकी नीट मेंन्टनस् करणे हे सभागृहाचे व प्रशासनाचे काम आहे. येवढे झाले पाहिजे, अशी मी विनंती करतो.

श्री.अविनाश ठाकरे :- :-याच विषयाशी एक पाईंट ऑफ आर्डर आहे, या शहरामध्ये जे काही प्रोजेक्ट सुरु आहे त्या प्रोजेक्टला काही स्थायी समितीनी मंजूरी दिलेली आहे व काही प्रोजेक्टला सभागृहाने मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे त्या प्रोजेक्टला तात्पूरती जरी थांबावायचे असेल तर या दोन्ही सभागृहाला विश्वास घेतले पाहिजे.अश्याप्रकरचे आदेश आपण द्यावे, अशी आपणांस विनंती आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, मा.आयुक्त महोदय ने हमारे सामने जो निवेदन किया, उसमे उन्होने कितनी पेंडेंसी हमारे ऊपर पैसे देने की है यह बात बताई, मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से प्रशासन से पुछना चाहुंगा कि, पिछले १२ वर्षो मे प्रत्येक वर्ष मे कितनी पेंडेंसी रही है उसका आंकडा अगर सभागृह के सामने आ जाये तो इस वर्ष बहोत ज्यादा रही और पहले कभी नही रही, ऐसा तो नही है मेरी जानकारी के अनुरुप इसलिये वह भी स्पष्ट हो जाना नितांत आवश्यक है. महानगरपालिका का बजेट बनाते समय प्रतिवर्ष् प्रशासन हमारा इतना सक्षम प्रशासन है अगर एक फाईल किसी अधिकारी के पास मे गयी तो उस फाईल को तीन महिने चार महिने लग जाते है. ऐसी स्थिती मे महानगरपालिका के प्रशासन के माध्यम से फाईल न होने के कारण अगर वर्क आर्डर हमारे मार्च माह मे होते है उसका नैसर्गिक कारण है कि मार्च माह मे होने वाले वर्क आर्डर का काम अगले फायनेंशियल ईअर मे होंगा. और यह बर्डन हमारे कर्मचारीयो के कारण आ रहा है तो उसका भुर्दंड शहर की जनता और निर्वाचित

लोकप्रतिनिधीयो को भोगने की आवश्यकता नही है, महानगरपालिके का बजेट बनाते समय पिछले १०,१५,२० वर्षोसे महानगरपालिका जबसें बनी तब से लेकर आज तक कितनी पेंडेंसी हमारे पेमेंट की रही है, और यह एक परंपरा नही व्यवस्था की त्रुटीयो के कारण होनेवाली यह प्रशासन की त्रुटी है, तो प्रशासन ने उसमे से मार्ग निकालकर के आज तक प्रशासन का संचालन किया है, वही संचालन आनेवाले कार्यकाल मे होना चाहिये

श्री संदिप सहारे :- मा.महापौरजी, चर्चा करतांना मा.सदस्या, श्रीमती उज्वला बनकर यांनी सांगीतले होते कि.........

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंन्फोंमेशन, जर मी विचारलेले आंकडे प्रशासन आता देत नसेल तर २०.०२.२०२० च्या सर्वसाधारण सभेमध्ये ते आंकडे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत यावे.

महापौर :- मागच्या १२ वर्षाच्या काळातील प्रत्येक वर्षीचे किती जुने देणे प्रशासनाला द्यावयाचे आहे त्याची समग्र आकडेवारी येणा-या दिनांक २०.०२.२०२० च्या सर्वसाधारण सभेच्या पटलावर मा.आयुक्तांनी ठेवावी, त्यावर चर्चा करण्यात येईल.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, मा.सदस्या श्रीमती उज्वला बनकर यांनी चर्चे दरम्यान एक प्रश्न उपस्थित केला होता. तो प्रश्न असा होता कि जे लेआऊट विकास करण्याकरिता जो विकास शुल्क एनआयटीने घेतला परंतु तेथे विकास झाला नाही. आणि आम्ही जर एनआयटी महानगरपालिकेला हस्तांतरण केले तर त्याचा भुर्दंड महानगरपालिकेला करावा लागेल. आम्ही अनेकदा पाहतो , महानगरपालिकेमध्ये अनेक योजना पुर्ण करण्याकरिता, अनेक प्रकल्प पुर्ण करण्याकरिता बॅकेकडून कर्ज घेतो आणि अशा अशा कंडीशनवर कर्ज घेतले आहे की त्यावर ऑडीट ऑब्जेक्शन सुध्दा आले आहे. मागे आम्ही २०० करोड कर्ज घेतले आणि त्यावर २०० करोड पेक्षा जास्त देवून दिले असे महानगरपालिकेमध्ये पाहिलेले आहे. आताच विकासाच्या मुद्दयावर चर्चा झाली असतांना विकासासाठी पैसा नाही म्हणून आमच्या फाईल थांबविण्यात येतात. मग आम्ही एनआयटी हस्तांतरण करुन घेतले तर कुठल्या आधारावर ते एरिया डेव्हल्प करणार आहे याचा विचार करणे गरजेचे आहे. आमचा परिवहन विभागही करोडो रुपये घाटयाने चालत आहे. जी तुट आहे ती भरुन निघून नाही राहिली. मग त्या अनधिकृत लेआऊटमध्ये कशापध्दतीने विकास करणार आहे. मघाशी मी सांगितले, जे सिमेंट तयार केले ते आताच उखडणे सुरु झाले. आमची रोटी आणि आमचे घर नाही सांभाळणे होत आहे आणि आम्ही दुस-याचे घर सांभाळायला चाललो. एक म्हण आहे, घरी नाही खायला आणि चाललो महादेवाला, अशी परिस्थिती आहे. महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत त्या कर्मचा-यांना नियमित वेतन मिळत नव्हते अशी स्थिती होते. त्यांना सातवे वेतन आयोग देवू शकत नाही. सहाव्या वेतन आयोगाचा त्यांना एरियर्स देवू शकत नाही अशी परिस्थिती या नागपूर महानगरपालिकेची आहे. नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत खराब आहे. आयुक्तांचे म्हणणे बरोबर आहे. सगळया गोष्टीचा डोम आणू शकतो, पैश्याचा डोम आणू शकत नाही. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती जर चांगली नसेल तर एनआयटीची हस्तांतरण करता वेळी आमची स्थिती कशी आहे. त्या स्थितीचा विचार करुनच एनआयटीचे हस्तांतरण करायला पाहिजे आणि न्यायालयाने जे आदेश दिलेले आहे त्या आदेशाला अनुसरुन बाकीचे काम व्हायला पाहिजे या मताचा मी आहे.धन्यवाद.

श्रीमती नंदा जिचकार :- मा.महापौरजी, नव नियुक्त आयुक्त आणि सन्माननीय सभागृह. आजच्या या

सभेला सर्वप्रथम हिंगणघाट येथील एका प्राध्यापिकेचा मृत्यू झाला तिला सर्वप्रथम श्रध्दांजली अर्पण करते. समाजातील अशा समाज कंटकांसाठी राज्य सरकारने कडक कायद्या आणावा असे महिलांचे प्रतिनिधीत्व करीत मी माझ्या भाषणाला सुरुवात करीत आहे. आज आपण एनआयटी बरखास्त करावी या विषयासाठी सभागृह बोलाविले त्याकरिता मा.महापौरजी आपले अभिनंदन करते. सभागृहातील सर्व पक्षीय नगरसेवकांची भावना अशी आहे. सर्वांचे मत आहे. सभागृहात बसलेले नगरसेवक आज आपल्या प्रभागातील ६५ हजार जनतेचे प्रतिनिधीत्व करीत आहे. ३५ लक्ष जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे हे सभागृह एकदिलाने एकमताने आज आपली भावना मांडत आहेत की एनआयटी बरखास्त झाली पाहिजे. ही मागणी जनतेतून आली आहे आणि त्याला मा. पालकमंत्र्यांनी पत्र पाठविले आणि हा जनक्षोम उसळला आहे की हे असे होणार नाही. जनतेचे मत या सभागृहाच्या माध्यमातून मांडण्यासाठी आज सभागृह येथे बोलाविले आहे. एनआयटी बरखास्त करावी हे जो भिजत घोंगडे आहे. सन्माननीय माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या विषयाला आपल्या कार्यकाळात न्याय दिला आणि त्यांच्या निर्णयाचे स्वागत संपुर्ण जनतेने केलेले आहे. याचे कारण असे आहे की जनता एनआयटीने पिचलेली होती. एनआयटीने पैसे आने दो हाच कार्यक्रम राबविला. जनतेचे प्रश्न मार्गी न लावता कारण या शहरामध्ये अनेक अनधिकृत लेआऊट ,आऊटर लेआऊट आहेत. ज्यांचे प्रश्न एनआयटीने सोडविले तर नाहीच उलट तो प्रश्न दिवसेंदिवस किल्ष्ठ करुन ठेवला. यातून मार्ग काढण्याचा माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी जो निर्णय घेतला तो स्वागतार्ह होता. आजच्या आज म्हटले की एनआयटी हस्तांतरीत झाली पाहिजे तर ते होवू शकत नाही. ती एक प्रोसेस आहे आणि ती प्रोसेस सुरु झालेली आहे. मी महापौर असतांना मी प्रोसेसचा जवळून अभ्यास केलेला आहे. एनआयटीचे चेअरमेन आणि नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या अनेक बैठका झाल्या आणि त्या कार्याला शुभारंभ होण्यासाठी अनेक दिवस लागली. अनेक अनेक विषयामध्ये निर्णय घेण्यासाठी अनेक अनेक बैठका एनआयटी आणि एनएमसीमध्ये झाल्या. त्यात राज्य सरकारचे पार्टीशिपेशन आपल्याला माहीत आहे. अशा अवस्थेत अनेक दिवस प्रलंबित असलेला विषय जनतेला न्याय देण्यासाठी ही एनआयटी बरखास्तीच्या विषया मागच्या सरकारने लागू केला. परंतु एनएमसीने तातडीने अंमलबजावणी केली नाही. ही एनएमसीची जी काही कार्य करण्याची पध्दत आहे त्यामुळे रोष आहे. दीड दोन लाख फाईली येवून पडल्या आहेत त्यावर काही निर्णय करु शकत नाही. अशा रितीने महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेवर मा.महापौरजी त्याचा सिरीयसनेस घ्यावा. एवढया फाईली एनएमसी येवून पडतात, लोकांची नुसती तारांबळ आहे. एनएमसीत जावे की एनआयटीत जावे. असा हा विषय असून याचा जनतेला त्रास होत आहे. ही जनता मग येथल्या नगरसेवकाकडे धावत आहे की आम्हांला न्याय कधी मिळणार आहे. डिमांड एनआयटीतून निघते एनआयटी म्हणते या या कार्यकाळामध्ये तुम्हांला पैसे भरावयाचे आहे. नागरिक त्या ठिकाणी जातात तर त्यांना सांगण्यात येते की तुम्ही महानगरपालिकेत जा, एनआयटी डिमांड काढते, एनआयटी एक तारीख देते. जेव्हा नागरिक तेथे जातात त्यांना एनएमसीमध्ये जा, एनएमसी पैसे घेईल असे सांगितले जाते. ही नागरिकांची जी झुलावण आहे त्या गोष्टीला आता नागरिक त्रस्त झाले आहे. हा मनोनित विषय वाटला की एनएमसी जवळ पैसे आहेत काय ? परंतु मा.महापौरजी, महानगरपालिकेने उत्पन्न वाढविणे हाही फार मोठा विषय आहे. आता नवनियुक्त आयुक्तांनी प्रायरीटीने हा विषय घेतला पाहिजे. मागच्या कार्यकाळामध्ये आपले माजी पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी हिंमतीने म्हटले होते की एनआयटी जर म्हणत आहे की आमच्या जवळ पैसे नाही तर मी राज्य सरकारकडून ५०० कोटी आणतो हे त्यांचे स्टेटमेंट होते. आजच्या

पालकमंत्र्यांनी तसे बोलून दाखवायला हवे. की एनआयटी एनएमसी मध्ये आलेच पाहिजे. त्यांनी सुध्दा कणखरपणे सांगितले पाहिजे की मी राज्य सरकारकडून ५०० कोटी आणतो. एनआयटीमुळे जे त्रस्त लोक आहेत त्यांना न्याय देईल अशी हिंमत पालकमंत्री यांनी दाखवायला पाहिजे होती. एनएमसी मध्ये पैसे नाही, पैसे नाही असे किती दिवस रडणार आहे. आम्हांला माहीत आहे ही स्वयंसेवी संस्था आहे. आपण जीएसटीच्या भरवश्यावर आहे. आमचा एलबीटी बंद झाला,ऑक्ट्राय बंद झाला. मी सभागृहाच्या माध्यमातून मा.आयुक्तांना विनंती करते, महानगरपालिका ही स्वयंसेवी संस्था असल्यामुळे हिला बळकट करण्याकरिता आयुक्तांनी बळकट पावले उचलावी. दरवेळेस महानगरपालिकेकडे पैसे नाहीत असे रडगाणे गाणे आणि या शहराची विकास कामे थांबविणे हे जनतेला न्याय देणारे होणार नाही. या सभागृहामध्ये सर्वपक्षीय नगरसेवकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मला माहीत आहे. ज्यावेळी मी महापौर होते तेव्हा महापौर आपल्या दारी हा उपक्रम राबविला होता.

श्री.नितीन साठवणे :- मा.महापौरजी, मा. पालकमंत्री महोदयांनी आपल्या झोनमध्ये जनता दरबार घेतले त्यावेळी त्यांनी प्रत्येक नगरसेवकांना दोन कोटी रुपये झोनच्या कामाकरिता दिले होते ते आतापर्यंत मिळाले नाही.

श्रीमती नंदा जिचकार:- मा.महापौरजी, माजी पालकमंत्री महोदयांनी एका झोनला १० कोटी असे १०० कोटी देण्याचे मान्य केले होते परंतु नवीन राज्य सरकारने सर्व पैसे थांबवून सुडाचे राजकरण केले आहे त्याला आमचा निषेध आहे. आज शहराची जी दयनीय अवस्था झाली आहे. जे आऊटर प्रभाग आहे तेथील नगरसेवकांची भावना आपण लक्षात घ्यावी. मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब आपण त्या प्रभागात जा, तेथली कामे बघा, एनआयटीने किती निकृष्ठ दर्जाचे कामे केली आहेत. रस्ते इकडे केले तर तिकडे उखडतात. गडरचे टाके इकडे केले तर तिकडे खचतात. इतके निकृष्ठ दर्जाचे कामे केली आहेत. आता या ठिकाणी आऊटर वार्डामध्ये तेथील नगसेवक पिंटू झलके यांनी सांगितले ती गोष्ट सत्य आहे. काम बघितल्यावर आपल्या लक्षात येईल कि एनआयटीने इतके वर्ष या शहरामध्ये फक्त जनतेचा छळ केला. नागरिकांच्या मागणीनुसारच माजी मुख्यमंत्री यांनी हा निर्णय घेतला आणि जनतेने त्यांच्या निर्णयाचे स्वागत केलेले आहे. म्हणून आपल्या मार्फत एकच विनंती करते की, मला माहीत आहे हा आपल्या अखत्यारितला विषय नसून राज्य शासनाचा विषय आहे. परंतु सभागृहाच्या भावना राज्य सरकारपर्यंत पोहचविणे हे आपले काम आहे. कारण एनआयटी महानगरपालिकेकडे आल्यानंतर आपली एनएमसी सक्षम करणे ही आपली जबाबदारी आहे. आताच आमचे दया भैय्यांनी सांगितले आमच्याकडे वर्कआर्डर निघण्याकरिता तीन तीन महिने लागतात. आमचे ई-गर्व्हनस कच्चे आहे. फाईल मॅनेजमेंटचा साफ्टवेअर नाही. आमच्या प्रोसेस आहेत त्यामध्ये फाईल कुठे जाते ते समजत नाही. त्यामुळे आयुक्तांनी मी विनंती करीन की यामध्ये फार त्रुटया आहेत. ई-गर्व्हनस आहे ते सक्षम करा आणि पर्टीक्युलर टाईम पिरीअडमध्ये त्या फाईलचे वर्कआर्डर झाले पाहिजे.आज आपण म्हणता की वर्कआर्डर झाले नाही. वर्क आर्डर झाले तरी काम वेळेवर सुरु होत नाही याचे कारण असे आहे की विहित कालावधी मध्ये वकआर्डर न झाल्यामुळे काही कामे पेंडींग राहतात. नगरसेवक स्वत: टेबल टेबलपर्यंत फाईल घेवून जाणे हे प्रशासनाकडून अपेक्षित नाही आहे. प्रशासनाने आपली डयुटी निभवली पाहिजे आणि एका विहित कालावधीमध्ये त्या फाईलवर निर्णय केला पाहिजे. त्याचा रिझल्ट लागला पाहिजे. वार्ड निधी हा हक्काचा निधी असतो. वार्ड निधी हा नगरसेवकांचा आहे. महापौर निधी हा महापौरांचा आहे. त्यांच्या हक्काच्या निधीचे जर आपण काम थांबवत असेल तर हे जनप्रतिनिधीवर

अन्याय होईल आणि महानगरपालिकेची कार्यक्षमता चांगली करावी आणि या महानगरपालिकेत स्पीड आणि ट्रांन्पेरेंसी या दोन गोष्टीचा विचार करुन प्रशासन मजबूत करावे. या ठिकाणी सर्व नगरसेवकांची भावना लक्षात आली आहे मी आपल्याला विनंती करील की एनआयटी लवकरात लवकर बरखास्त करुन सर्व कामे आपल्याकडे आणावी. एनआयटी बरखास्त झालेली आहे जी प्रोसेस सुरु आहे यामध्ये जे गुंठेवारीचे बिल्डींग सॅग्शनचे काम आहे ते आपल्याकडे ट्रान्सफर झाले आहे. लीज ट्रांन्सफरचे काम अजूनही आपल्याकडे ट्रान्सफर झालेले नाही. त्यामुळे सगळे विषय येथे आणल्याशिवाय पुर्णत: या नागपूरच्या नागरिकांना न्याय देवू शकणार नाही. त्यामुळे एनआयटी बरखास्त करुन सर्व काम इकडे आणण्याची सभागृहाच्या माध्यमातून मा.महापौरजी आपणांस करीत आहे.धन्यवाद.

श्री.सतिश होले:- मा.महापौरजी, मागच्या सभेमध्ये या महानगरपालिकेकडे विकास प्राधिकरण म्हणून ७२०८.६७ हेक्टर जागा सात स्कीम अंतर्गत आपल्याला देण्यांत आल्या आणि विकास प्राधिकरण म्हणून आपल्याला काम करावयाचे आहे. मागे मी जेव्हा भारतीय जनता पार्टीमध्ये होतो. तेव्हा देवेंद्रजीला एनआयटी बरखास्त करावी म्हणून मी या सभागृहात ओरडत होतो. त्यावेळी नागपूर शहराच्या जनतेची मागणी होती की एनआयटी बरखास्त झाली पाहिजे. कारण की कोणताही व्यक्ति एनआयटीत गेला की त्याचे काम होत नाही. त्याला आरएल मिळत नाही. मॅप सॅग्शनसाठी अडचण निर्माण होते. अशा प्रकारची ओरड नेहमी होत होती. त्यानंतर माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी तो आदेश काढला, त्यांच्या शासनाने तो निर्णय घेतला आणि त्या गोष्टीचा खुप गाजावाजा केला. मा.महापौरजी महानगरपालिकेत विकास प्राधिकरण आले, प्रशासनानी आपला कसा विकास करता येईल याकडे लक्ष दिले. एक महत्वाची गोष्ट , मागच्या बैठकीत आपण सगळे ओरडलात. एनआयटी आपल्याला फाईल देत नाही. मी विना डाक्युमेंटने बोलत नाही. सगळे सांगायचे आम्ही एनआयटीला फाईल मागतो देत नाही. गावंडे साहेब बसलेले आहे. गावंडे साहेबाचे २८.११.२०१९ ला एनआयटीला दिलेले पत्र आहे. आपण नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतीला सांगतो की नागपूर सुधार प्रन्यासकडे असलेले अभिलेखाचे कक्षाकरिता नागपूर महानगरपालिकेकडे जोपर्यंत कायम स्वरुपी जागा उपलब्ध होत नाही तोपर्यंत अभिलेख कक्ष वापरण्यास उपलब्ध करुन दयावे. आपण जागा नाही म्हणून आपण पत्र देतो. त्यांनी फाईल घेवून जा म्हणून म्हटले आहे परंतु आपल्याकडे जागा नसल्यामुळे आपण त्यांच्याकडून फाईल आणत नाही. दुसरे आयुक्तांचे पत्र आहे. एडीटीपीने सांगितले म्हणून आयुक्तांचे पत्र आहे आणि त्यामध्ये कोणकोणते कर्मचारी पाहिजे ते सुध्दा दिले आहे. परंतु विषय असा आहे कि आपल्या महानगरपालिकेत आमचा सुताळा कमी होईल म्हणून दुसरा कोणी हाथ टाकू नये .आमच्या सेक्शनला गर्दी वाढवावयाची नाही. मी मागच्या वेळेस सांगितले होते, किती फाईल आहेत १ लक्ष९९ हजार६८ फाईल्स आहेत. काही नगरसेवक सांगायला लागले, काही पदाधिकारी सांगायला लागले तर काही आमच्यातील मंडळी सांगू लागले की इतक्या इतक्या फाईल्स् आहेत, फाईल्स् आहेत ना, त्या आपण त्या ठिकाणावरुन आणल्या नाहीत ना. मग एनआयटीला का दोष देत आहेत. त्यांचा स्टॉफ आपण आणला काय ? नगररचना विभागात महानगरपालिकेचा स्टॉफ नाही आहे काय ? विकास प्राधिकरण म्हणून जर महानगरपालिका काम करीत असेल तर निश्चितरुपाने महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असते. आपण काय केले आपण एनआयटीमधून फक्त आपल्या कमाईच्या फाईल्स् आणल्या. मा.महापौरजी, मी एक खसरा नंबर देतो, ज्या अर्थी आपला डिसीआर आणि एनआयटीचा डिसीआर सारखा आहे. यानी विकास प्राधिकरण नागपूर महानगरपालिका झाल्यापासून जेवढे नकाशे मंजूर केले ते

नकाशे एकदा तपासले पाहिजे आणि जे नकाशे रिजेक्ट केले तेही तपासले पाहिजे. प्लॉट नंबर ७, ८,९ आणि खसरा नंबर ४८ आणि २/४१ मौजा नारी दिक्षित नगर या छोटया स्कीम आहेत. या स्कीमचे नकाशे मंजूर होत नव्हते. एनआयटीनी ते नकाशे मंजूर केले नाही याचे नकाशे मंजूर न होत नसल्यामुळे नियमाचे उल्लंघन करुन नागपूर महानगरपालिका विकास प्राधिकरण झाल्याबरोबर आपल्या दोन नकाशे मंजूर करुन घेतले. त्याची निश्चितरुपाने चौकशी झाली पाहिजे. म्हणण्याचे तात्पर्य असे की कालपर्यंत एनआयटीमध्ये होते म्हणून लोकांचे ऑब्जेक्शन होते. आज महानगरपालिकेत आहे, एकाचे तरी आरएल मिळते काय ? आपण स्टॉफ आणला नाही आपण काही केले नाही. याकरिता आपण एखादी एजंसी अपाईंट केली आहे काय ? त्याचा जो डेटा आहे तो रितसर घेतला आहे काय ? म्हणायचे तात्पर्य असे आहे कि आपल्याकडे कुठलीही व्यवस्था नाही. एनआयटी डिझॉल होवू नये असे मी कुठेच म्हणत नाही. एनआयटी डिझॉल झाली पाहिजे परंतु आपल्याकडे व्यवस्था नसेल तर दगडापेक्षा वीट मऊ असे म्हणावे लागेल. आपल्याकडे व्यवस्था नसेल तर आपल्यापेक्षा एनआयटीवाले चांगले असे म्हणावे लागेल. त्याच्यामुळे याकडे लक्ष घालून ज्या अडचणी आहेत त्या दूर केल्या पाहिजेत. मध्ये मध्ये काही नगरसेवक सांगत होते की पालमंत्र्यांनी पत्र दिले, कदाचित याच कारणावरुन दिले असेल. विषय तो नाही, विषय असा आहे की महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे, आपली कलाकारी कशी थांबेल, आपले प्रशासन कसे दुरुस्त होईल ते सोडून भलत्याचे विषयाकडे लक्ष दिले जाते. मा.महापौरजी, मी आपल्याला विनंती करेल आयुक्त साहेबांचे खूप नांव ऐकले आहे, एकदा मी सांगितलेले प्रकरण चेक करावे आणि निश्चितरुपाने कार्यवाही झाली पाहिजे. एवढेच बोलतो , एनआयटी बरखास्त झाली पाहिजे परंतु जोपर्यंत आपली व्यवस्था होत नाही तोपर्यंत लोकांना त्रास देणे बरोबर नाही. लोकांचे घरांचे नकाशे थांबलेले आहे, लोकांचे आरएल थांबलेले आहे यासाठी आपण लक्ष घालावे एवढीच आपणांस विनंती करतो.

श्री.रविंद्र भोयर :- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यासची या ठिकाणी चर्चा सुरु आहे. ही चर्चा होत असतांना सर्व मा.सदस्यांचे पहिले अभिनंदन करतो. नागपूर सुधार प्रन्यास ही बरखास्त झालीच पाहिजे या मागणीवर प्रत्येक मा.नगरसेवक हा ठाम आहे, हा त्यांचा निर्णय आहे. महानगरपालिकेत काय त्रुटी आहेत, काय नाही. काय दुरुस्ती कराव्या लागेल, काय नवीन गोष्टी ॲड कराव्या लागतील यावर ही महानगरपालिका निर्णय करु शकते. महत्वाचा विषय असा आहे. २००१ मध्ये गुंटेवारी कायद्यानुसार या शहरामध्ये ५७२ लेआऊट मग १९०० असे एकुण ३८२२ लेआऊट हे अनधिकृत होते. मागील २० वर्षामध्ये ३८२२ लेआऊट पैकी १७३७ लेआऊट हे बाकी राहिले म्हणजे एकाअर्थाने २०८५ लेआऊटपैकी १ लक्ष २७६२० इतके नियमितीकरण करण्यात आले. माझा प्रश्न असा आहे जे १७३७ लेआऊट डेव्हल्प झाले नाही. २१ वर्षापासून त्यांचा न्याय झाला नाही. न्याय झाला नसेल तर वास्तविक गुंटेवारी कायद्याचे महत्व काय होते. तर मघाशी एक मा.सदस्यांनी म्हटले की प्रत्येक व्यक्ति रामदास पेठ, धंतोली येथे घर घेवू शकत नाही. प्रत्येक माणसाचे एक स्वप्न् राहते की माझ्या नावाची एक प्रापर्टी या शहरात असली पाहिजे. या शहरात एक आपले राहते घर असले पाहिजे अशी त्या मागची भावना असते. गुंटेवारी कायद्यात त्या भावनेचा समावेश करुन तत्कालीन लोकांनी तत्कालीन राज्यकर्त्यांनी हा कायद्या

आणला. मुलत: कायद्या नागपूर शहरासाठी आला. परंतु कायद्या हा एका शहरासाठी नसतो. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये हा कायद्या अप्लीकेबल झाला. या गुंटेवारी कायद्या ज्या हेतूने बनविला तो हेतू आमचा पुर्ण झाला आहे काय ? मला आठवते, भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वामध्ये या सभागृहाचे तत्कालीन सदस्य मा.स्वर्गीय प्रभाकर दटके यांच्या नेतृत्वात गुंटेवारी कायद्या कसा अंमलात आला पाहिजे. त्याची डिमांड किती दिली पाहिजे. लोकांना भुर्दंड पडणार नाही, लोकांवरील पैसा कमी करुन सर्वसाधारण जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न प्रभाकर दटके यांनी केला होता. त्यामुळे त्या कालखंडामध्ये आमच्या पक्षाची एक मागणी होती. नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाली पाहिजे. याचे कारण असे होते की त्या ठिकाणची अनियमितता, त्या लोकांना न्याय मिळण्यासाठी लागणारा वेळ, त्या ठिकाणी असणारी व्यवस्था हे सर्वसामान्य लोकांच्या हिताच्या विरोधात होते. याचा विचार करुन आम्ही निर्णय केला. शहरात विकासाची एकच प्राधिकारणी असली पाहिजे आणि ती म्हणजे नागपूर महानगरपालिका असली पाहिजे. ती जनतेद्वारा निर्मित आहे त्या ठिकाणी सर्व नगरसेवक निर्णय घेवू शकतात. या एका व्यापक उद्देशाला धरुन महानगरपालिकेमध्ये नागपूर सुधार प्रन्यासचे विलीनीकरण झाले पाहिजे हा मुद्दा घेतला होता. परंतु हा मुद्दा रेटल्यानंतर आमच्या जवळ सत्ता नव्हती. अनेक नगरसेवक त्या वेळेसच्या कॉंग्रेसच्या नगरसेवकांची सुध्दा इच्छा होती की महानगरपालिकेमध्ये नागपूर सुधार प्रन्यास विलीनीकरण झाले पाहिजे. परंतु त्या वेळेच्या राज्य कर्त्यांना ते जमले नाही. २०१४ मध्ये महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन झाले. सत्तापरिवर्तन झाल्यानंतर तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी निर्णय घेतला, महानगरपालिकेत नागपुर सुधार प्रन्यासचे विलीनीकरण व्हावे. हा एक असा मर्द माणुस होते जो या सभागृहाचा सदस्य होता. या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी पहिला कोणता निर्णय केला असेल तर तो नागपूर सुधार प्रन्यासचे महानगरपालिकेत विलीनीकरण प्रक्रियेला सुरवात केली. मा.देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय केला आणि त्या निर्णयाची प्रक्रिया सुरु झाली. नागपूर सुधार प्रन्यासने एक पत्र राज्य सरकारकडे पाठविले. मा.पालकमंत्र्यांनी जे पत्र मा. मुख्यमंत्र्यांना पाठविले. मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून नागपूर सुधार प्रन्यासला एक पत्र पाठविले. नागपूर सुधार प्रन्यासने त्यावर रिप्लॉय दिला. हा विषय कुण्या एका व्यक्तिच्या अहंपणाचा राहू शकतो. महानगरपालिकेत नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाली पाहिजे की नाही झाली पाहिजे. नागपूर शहरात दोन ॲथारिटी राहिल्या पाहिजे किंवा नाहीत हा आता चर्चेचा विषय राहिला नाही. या शहरासाठी हा विषय होवून गेला आहे. ही महानगरपालिका नागपूर सुधार प्रन्यासला आत्मसात करुन लाखो जनतेला निश्चितपणे न्याय देण्यासाठी कटीबध्द आहे. त्यासाठी १५६ नगरसेवक त्याच ताकदीने उभे आहेत. आम्ही मा.पालकमंत्री यांनी दिलेल्या पत्रावर चर्चा करण्यास तयार आहे. माझे असे म्हणणे आहे की या सभागृहातील १५६ सदस्यांनी एकमुखाने आणि एकदिलाने नागपूर सुधार प्रन्यास बरखास्तीच्या मागे उभे राहत असतील तर या शहरातील या महाराष्ट्रातील कोणाचीही ताकद राहू शकत नाही की नागपूर सुधार प्रन्यास पुर्नजिवीत करण्याची. ज्या लोकांनी आमच्या गरीब लोकांना छळले, ज्या लोकांना प्लॉटचे आरएल दिलेले नाही, डिमांड

दिलेली नाही. महानगरपालिका त्यात काय सुधारणा करु शकते याचा विचार करु शकते. महानगरपालिकेचे क्षेत्र व्यापक आहे. स्थायी समिती अध्यक्ष प्रदीप पोहाणे यांनी एक गोष्टीचा मघाशी उल्लेख केला, त्यांनी २००२ मधील पुर्ण घटनाक्रम सांगितला. २००२ मध्ये तत्कालीन शासन मंत्री रंजीत देशमुख मंत्रीअसतांना या शहरामध्ये एक अध्यादेश काढले होते. नागपूर सुधार प्रन्यासच्या अनधिकृत लेआऊटमध्ये जर कुणी नगरसेवक या लेआऊटमध्ये काम करीत असेल तर त्यांचे सदस्यत्व रद्द होईल. ज्या लोकांनी आम्हांला निवडून दिले त्यांच्यासाठी काम करण्याचे फलीत आम्हांला सदस्यत्व रद्द करणारे असेल तर आमच्या पक्षाने त्याही वेळेस निर्णय घेतला की सदस्यत्व गेले तरी चालेल परंतु नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करुन ज्या गोष्टीत जनतेचे हित दडलेले आहे. त्या हितसाठी आमचा पक्ष काम करेल. या सभागृहाची मला कल्पना आहे. या गोष्टीसाठी बोलणारे अनेक वक्ते असतील. ते म्हणू शकतील या सभागृहातील अनेक लोक नागपूर सुधार प्रन्यासमध्ये ट्रस्टी म्हणून गेले. त्याबद्दल आम्ही जबाबदार नाही. नागपूर सुधार प्रन्यासमध्ये नागपूर महानगरपालिकेचा एक प्रतिनिधी दयावा ही व्यवस्था आहे. महानगरपालिकेचा स्थायी समितीचा अध्यक्ष नागपूर सुधार प्रन्यासमध्ये ट्रस्टी म्हणून एक वर्षासाठी राहील ही व्यवस्था आहे. नागपूर महानगरपालिकेने आम्हांला बसविले. १५-२० वर्षापासून आमचे राज्य आहे. आमचे प्रतिनिधी नागपूर सुधार प्रन्यासमध्ये गेले. नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्याची प्रक्रिया जी केली ती आम्ही केली, याचा मला अभिमान आहे. नागपूर शहरात जी सर्वसाधारण जनता अनधिकृत लेआऊट मध्ये राहतात त्यांच्यासाठी आम्ही नळ दिले, गडरलाईन, रस्ते करुन दिले. त्या ठिकाणी खुप अडचणी आल्यात. मला असे वाटते की नागपूर सुधार प्रन्यासचे विलीनीकरणावरची चर्चा करणे हे व्यर्थ आहे. नागपूर सुधार प्रन्यासने पहिल्या टप्प्यामध्ये ५ हजार फाईली नागपूर महानगरपालिकेकडे पाठविल्या. डिमांड दिल्या, १ लक्ष ५५ हजार फाईल पेंडिंगआहेत. पुर्ण व्यवस्था होईल, कधी होईल, काय होईल. कदाचित ती व्यवस्था तातडीने पुर्ण करण्यासाठी मुंडे साहेब आले असतील. त्यामुळे मला असे वाटते की १ लक्ष ५५ हजार फाईल महानगरपालिकेत जमा होतील. १ लक्ष ५५ हजार फाईलीच्या डिमांड महानगरपालिका काढेल. महानगरपालिकेकडे नव्याने उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होतील. मघाशी संदीपभाऊ सहारे यांनी या सभागृहात चुकीची माहिती दिली. त्यांनी सांगितले या महानगरपालिकेत पगार होत नाही. मी विश्वासाने सांगतो या महानगरपालिकेत एकाही कर्मचा-याचा पगार एकाही महिन्यासाठी अडलेला नाही. एक असा महिना नाही ज्या महिन्यामध्ये महानगरपालिकेने कर्मचा-यांचा पगार दिला नाही.

श्री.संदीप सहारे :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर. जी चुकीची माहिती दिली हा प्रश्नच चुकीचा आहे. मागच्या वेळेस सगळयांना माहीत आहे. पगार थांबलेले होते त्यामुळे चुकीची माहिती दिलेली नाही. परिस्थिती चांगली नव्हती म्हणून ज्या तारखेला पगार मिळायला पाहिजे त्या सफाई कर्मचा-यांचा पगार कायद्यानुसार ७ तारखेला देणे गरजेचे आहे. सफाई कर्मचा-यांचे पगार १५-२० दिवस उशिरा पगार या महानगरपालिकेत झालेले आहे.

(बेल)

श्री.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, विषय फक्त एवढाच आहे या शहराने अनेक राजकीय पक्षाचे हिशेब चुकते केले. ज्यांनी ज्यांनी जनतेचा खेळ केला या शहराने माफ केले नाही. त्यामुळे पालकमंत्र्यांना स्पर्धा करायची असेल ती बावनकुळे यांनी केलेल्या विकास कामाशी करावी. मा.मुख्यमंत्र्यांना स्पर्धा करायची असेल तर या विभागाचे मुख्यमंत्र्यांनी केलेल्या कामाशी स्पर्धा करावी लागेल. डेव्हल्पमेंट वर्क आणण्याचा हा धातीठोक दावा आम्ही करतो. या शहराचा विकासाचा आरसा जर कुणी दाखवला असेल तो मा.नितीनजी गडकरी यांनी दाखविला. या शहरासाठी विकासाच्या योजना आम्ही सुरु केल्या. माझे प्रामाणिकपणे एकच निवेदन आहे. स्पर्धा करा, या महानगरपालिकेच्या विकासासाठी आम्ही जितके काही करोड आणले असेल त्यापेक्षा डबल तुम्ही महानगरपालिकेत आणण्यासाठी प्रयत्न या विरोधी बाकावर बसणा-या नगरसेवकांची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात पाच वर्ष सत्ता असतांना या शहराच्या विकासासाठी एक पैश्याचा निधी कमी पडू दिला नव्हता. संपुर्ण सभागृहात माजी महापौर देवेंद्रजी फडणवीस यांचे अभिनंदन केले पाहिजे, त्यांना धन्यवाद दिले पाहिजे. पुढची जबाबदारी विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे आणि जेष्ठ सदस्य प्रफुल्ल गुडधे यांची असून त्यांनी या महानगरपालिकेला राज्य सरकारकडून एकही रुपया कमी पडू देणार नाही ही हमी शासनाच्या वतीने आम्हांला दिली पाहिजे. यातच विकासाचे चक्र आहे. आम्ही विकास केला, तुम्ही सुध्दा विकास करण्यास मोकळे आहात. जितकी गती आम्ही दिली तितकी गती देण्यासाठी तुम्ही मोकळे आहात. मा.महापौरजी, हा विषय जरी नाजुक असला तरी या शहरातील भवितव्य त्यावर आहे. नागपूर सुधार प्रन्यास ला पुनर्जिवीत करण्याची याचिका जर कुणी करीत असेल तर ती हे सभागृह सहन करणार नाही. नागपूर शहरात येणा-या कालखंडामध्ये एकच प्लॉनिंग ॲथारिटी राहील आणि ती ॲथारिटी फक्त आणि फक्त नागपूर महानगरपालिका राहील हा निर्णय या सभागृहाच्या १५६ नगरसेवकांना घेण्याची आवश्यकता आहे. तो निर्णय आम्ही घेतलेला आहे. या निर्णयासोबत संपुर्ण सभागृह अडून राहील असा विश्वास व्यक्त करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, तत्कालीन मुख्यमंत्रीसाहेब होते यांच्या जनता दरबारामध्ये नारी घाटासाठी मोजणी करावी असे पत्र दिले. मा. पालकमंत्री साहेबांना सुध्दा पत्र दिले होते परंतुआजपर्यंत मोजणी झालेली नाही. त्या ठिकाणी अतिक्रमण आहे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, नवनियुक्त आयुक्त, सभी निगम पार्षद, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग. आज एक बहोत अच्छे विषय पर चर्चा शुरु हुई और जैसे ही चर्चा की शुरुआत हुई तो कुछ सदस्योने प्रश्न किये कि क्या हम इस विषय पर चर्चा कर कर सकते है, या हम इस विषय पर निर्णय ले सकते है तो उसपर यह उत्तर आया की हम सिर्फ चर्चा कर सकते है। हमारे छोटे भाई जो ॲडव्होकेट है उन्होने बहोत अच्छी एक लाईन पढी, माणुसकीच्या शत्रुसमवेत युध्द आमचे सुरु आहे, कई बार छोटे लोगो से बहोत कुछ सिखने को मिलता है। माणुसकीच्या मित्राच्या अनुषंगाने मी येथे सांगू इच्छिते, या विषयावर चिंता नाही चिंतन करावे लागेल, व्यथा नाही व्यवस्थेवर लक्ष द्यावे लागेल, समस्या नाही समाधानाकरिता आपल्याला चर्चा करावी लागेल आणि आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. आमच्या पूर्व महापौर व आदरणीय आमच्या

ताई श्रीमती नंदा जिचकार यांना मी पहिल्यांदाच सभागृहामध्ये खुप चांगले बोलतांना बघितले, मा.सदस्य या नात्याने त्या खुप चांगले बोलल्या. मा. महापौरजीच्या नात्याने आम्ही त्यांचे खुप डिसीजन बघितले, खुप काही बघितले. त्या खुप चांगले बोलल्या आणि त्यांनी सत्य परिस्थिती कबुल केली की महानगरपालिका असक्षम झालेली आहे. आपल्याकडे पैसा नाही, आपली ई-गर्व्हनेस असक्षम आहे. ही सत्य परिस्थिती त्यांनी कबुल केली. याची गंभीरता जर त्यांनी त्या महापौर होत्या त्यावेळेस मॅडमनी घेतली असती तर आज मॅडमला हे म्हणावे लागले नसते.

श्रीमती नंदा जिचकार:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, आभाताई पांडे हया उत्कृष्ठ बोलतात त्यांचा हाथ कुणी धरु शकत नाही हे सगळयांना माहीत आहे. परंतु महानगरपालिका ही कुठल्या गाळातून आलेली आहे आपल्याला माहीत आहे. त्याच्यातून आपण वर आलेलो आहे हे सर्वांना माहीत आहे. २००२ मध्ये जेव्हा कॉग्रेसचे महापौर होते. महानगरपालिका ही लोकांसाठी विकासाचे काम करण्यासाठी असते.

श्रीमती आभा पांडे:-मा.महापौरजी, महानगरपालिकेला चांगल्या परिस्थितीत आणण्यासाठी येथे बसलेल्या सगळया नगरसेवकांनी हातभार लावलेला आहे हे निश्चित आहे. मा.महापौरजी चर्चा येथे सुरु आहे कि नागपूर सुधार प्रन्यास हे महानगरपालिकेमध्ये जे मर्च झालेले आहे. परंतु मी हे सांगू इच्छिते २७ ऑगस्ट २०१९ ला महाराष्ट्र शासनाने एक पत्रक काढले आणि त्या पत्रकामध्ये ७ योजना या एमएमआरडीएकरिता दिल्या आणि गुंठेवारी ही नागपूर महानगरपालिकेकडे देण्यांत आली. मा.महापौरजी त्यावेळेसचे जे मुख्यमंत्री होते त्यांचे आम्ही अभिनंदन केले होते. प्लॉनिंग ॲथारिटी एकच असली पाहिजे याच्यात काहीच वाद नाही. येथे बसलेल्या सगळया नगरसेवकांची हिच मानसिकता आहे आणि ती असावयास ही पाहिजे परंतु एनआयटीची प्लॉनिंग नागपूर महानगरपालिकेत आणत असतांना त्यांचे काय काय निकष आहे किंवा शासनानी घेतलेल्या निर्णयावर सरसकट निर्णय त्या सरकारनी घेतला असता तर आज तुम्हांला हे सभागृह घेण्याची पाळी आली नसती हे तेवढेच सत्य आहे मा.महापौरजी. मी येथे आपणांस सांगू इच्छिते कि, आदरणीय आपले जे लिगल ॲडव्हायझर आहे त्यांनी सांगितले कि कलम १२१ अंतर्गत केस सुरु आहे. मी येथे सांगू इच्छिते कि नागपूर सुधार प्रन्यास याच्या कलम १२१ अंतर्गत नमूद आहे की ती प्रत माझ्याकडे आहे आणि त्यावर हे स्पष्ट लिहिले आहे. की कलम १२१ मध्ये नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्याची आणि त्या प्रन्यासची मत्ता व दायित्व नागपूर शहर महानगरपालिककडे हस्तांतरीत करण्याची तरतूद आहे. परंतु मा.महापौरजी, एकही मालमत्ता हस्तांतरीत केल्या गेली नाही म्हणजेच कलम १२१ अस्तित्वात आली नाही आणि म्हणुनच मा.महापौरजी हा सगळा घोळ झालेला आहे. मालमत्तेबातचे एक फायनल नोटीफिकेशन सुध्दा राज्य सरकारनी काढायला पाहिजे होते ते सुध्दा काढले नाही म्हणून ही परिस्थिती निर्माण झाली. मा.महापौरजी, आपल्याकडे प्लॉनिंग ॲथारिटी आली परंतु खरोखरच प्लॉनिंगला सांभाळण्याकरिता आपल्याकडे मेनपावर्स आहे काय ? मी मागे एक माहिती काढली, त्या माहितीमध्ये मला असे मिळाले की डिसेंबर २०१६ मध्ये एक आकृतीबंध रिक्रुटमेंट रुल तयार करण्यात आले होते. ते शासनाकडे पाठविले तेव्हा शासनाने २०१ पदे जी खुप इफिशियन्सली होती ती मंजूर केली. हे आपल्या सगळयांना माहीत आहे कि महानगरपालिकेत जवळपास ४००० कर्मचा-यांचा व्हक्युम आहे. हे व्हक्युम असतांना आपण ती लायबिलीटी आपल्यावर घेवून घेतली. घ्यायला पाहिजे परंतु ते व्हक्युम पुर्ण करण्याकरिता आपल्याकडे मेनपावर्स, संसाधने आहेत काय ? मा.महापौरजी, मला असे वाटते की जे हाऊस आपण आज घेतलेले आहे ते हाऊस जेव्हा हलचल झाली होती. चर्चा झाली होती त्यावेळेस आपण सभागृह घ्यावयास पाहिजे होते जेणेकरुन एनआयटीचे प्लॉनिंग महानगरपालिकेकडे येणार आहे त्यावेळेस सभागृह घेतले असते तर ते आपल्याला समजले असते कि ती जबाबदारी आपण सांभाळु शकतो की नाही सांभाळु शकतो. मा.महापौरजी, मला एक सांगायचे आहे की शासनाला क्लिअर आर्डर आपल्यालाकडे आला नाही. तो आर्डर आला असता तर आज जी स्थिती एनआयटीची झाली आहे की एका व्हेन्टीलेटरवर जसा पेशंट

असतो वह मरे मे रहता है ना वह जिये मे रहता है आज तीच परिस्थिती एनआयटीची झालेली आहे. आता त्याला जिवंत करण्याकरिता तुम्ही प्लॉनिंग इकडे दिली परंतु आजही प्लॉनिंग तिकडे जिवंत आहे मा.महापौरजी, त्याचे उदाहरण माझ्याकडे उपलब्ध आहे. प्लॉनिंग आपल्याकडे आल्यानंतर मी गावंडे साहेबांकडे एक विषय घेवून गेली होती. प्लॉनिंग आपल्याकडे आल्यानंतर त्यांनी डिमांड घेतली नाही पाहिजे. महानगरपालिकेनी आता एका महिन्या अगोदर डिमांड घेतली आहे कारण ते डिस्पुटेड मॅटर होते. मा.महापौरजी आपल्याला आठवत असेल तर मी आपल्याकडेही एक महिन्यापूर्वी आली होती. काय सुरु आहे मा.महापौरजी, प्लॉनिंग आपल्याकडे आली परंतु तिकडे सगळे कामकाज सुरु आहे. मग आपण कशाला त्यांनी केलेले पुर्ण घोळ सोसायचे. मा. महापौरजी, माझे निवेदन आहे सदनामार्फत, आपल्यामार्फत मा.आयुक्त साहेबांना, ते खुप शिस्तप्रिय आयुक्त आहेत. आता जर प्लॉनिंग जर सरसकट गर्व्हमेंटनी आपल्याकडे पाठविली तर मी सरसकट म्हणत आहे कारण त्यांचे कर्मचारी जर आपल्याकडे आलेत तर त्यांना सातवा वेतन लागु आहे व आपल्याकडचे कर्मचारी आता ही सहाव्या वेतन आयोगावर आहे. ठीक आहे त्यांच्यावर बोजा आहे त्यांना हे काम करावे लागेल परंतु त्यांची मानसिकता कशी आहे. ते काम करीत असतांना त्यांची मानसिकता कशी राहील हे सुध्दा बघणे गरजेचे आहे मा.महापौरजी. मी सदनाच्या मार्फत मा.आयुक्तांना निवेदन करते, अनेक घोळ प्रकरणे एनआयटीमध्ये आहे, एनआयटीने घोळ केलेला आहे किंवा आता जर प्लॉनिंग आपल्याकडे आली तर आपल्याकडून निघणारी जी डिमांड आहे त्याच्यावर सरसकट पुर्ण माहिती घेवूनच डिमांड काढली पाहिजे. कारण हजारो लोकांची आज बेघर होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. जी बेघर होण्याची जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याचा मी निषेध करते. मी कोणत्याही राजकीय पक्षाचा निषेध करीत नाही. मी कुठल्याही राजकीय पक्षाची नाही. मी अपक्ष नगरसेविका आहे. मा.महापौरजी, माझे फक्त हेच म्हणणे आहे कि हया सगळया बाबी घेवून डोक्यात ठेवून आणि सगळे टेबलवर्क करुन जी काही जबाबदारी आपल्याला दिली त्यात हे पहिले पाहण्यात यावे कि आपण याकरिता सक्षम आहे किंवा नाही. माझ्याकडे तेवढा मॅनपावर्स आहे कि नाही हे सगळे समजत नसतांना जर आपण कोणती जबाबदारी घेतली तर ही जनता आपल्याला माफ करणार नाही. आज कसे झाले, एनआयटी प्लॉनिंग ॲथारिटी राहिलेली नाही आणि नागपूर महानगरपालिकेत सुध्दा प्लॉनिंग आलेली नाही. त्यामुळे लाखो लोक एनआयटीमधून महानगरपालिकेत आणि नागपूर महानगरपालिकेतून एनआयटीमध्ये जात आहे. हा खुप चिंतनाचा विषय आहे. या सगळया बाबीकडे लक्ष देवून आपण जबाबदारी सांभाळली पाहिजे. मला मध्येच असे ऐकु आले होते कि एनआयटीचे ज्या सभापती मॅडम आहेत त्यांनी शासनाकडे एक पत्र पाठविले होते मी इथला मॅनपावर्स महानगरपालिकेला देवु शकते काय ? आणि त्यांना शासनाकडून कागद आले आहे की अशी माहिती मी ऐकली आहे की सभापती म्हणुन पुर्ण मेनपावर्स देवु शकता. परंतु १ लाख ५५ हजार प्रापर्टीज को महानगरपालिका मे रखने की व्यवस्था कर सकते है क्या ? उसको संचालित करने के लिए लोग हमारे पास है क्या ? इन सारी बातो पर मा.महापौरजी ध्यान देना चाहिए ऐसा मुझे लगता है।

श्रीमती नंदा जिचकार:-पाईंट ऑफ आर्डर, मा.सदस्यांचे भाषण पुर्ण निगेटीव्हीटीकडे जाण्याचे काही कारण नाही असे मला वाटते.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी पाईंट ऑफ इन्फोंमेशन, मी निगेटीव्हीचे काही बोलले नाही. मी सत्य परिस्थिती आहे ती ठेवली आहे कारण मी कोणत्याही पक्षाची नाही हे तुम्ही लक्षात घेवून घ्या मा.महापौरजी, सभागृहानेही लक्षात घेवून घ्यावे आणि मॅडमने सुध्दा लक्षात घ्यावे. मला कुणाचा निषेध करावयाचा नाही, मला कुणाचे अभिनंदन सुध्दा करावयाचे नाही. मी जी सत्य परिस्थिती आहे ती ठेवली आणि आता सत्य परिस्थितीच निगेटीव्हीटी आहे तर मी दोषी आहे काय ? सत्य बोलणे आपले काम आहे. आपण सत्याची प्रतिज्ञा घेतो निवडून आल्यानंतर. मा.महापौरजी, एक विषय तुम्हांला सांगावयाचा आहे मॅडमने सांगितले कि हिंगणघाटमध्ये जी घटना झाली. आज सभागृहाचा तो विषय नाही परंतु हिंगणघाटची जी घटना झाली त्याच्यावर संपुर्ण देशानी निषेध व्यक्त केला. सभागृहात बसलेल्या सगळे लोक या घटनेचा निषेध करीत

आहे. मॅडम बोलता बोलता बोलल्या की राज्य सरकार कठोर कायदे करीत नाही. राज्य सरकारनी त्याच्याकरिता कायदे बनवावे. मा.उपमहापौरजी चला, आपण सगळया बहिणी मिळून मोदी साहेबांकडे जावू आणि मोदी साहेबांना सांगु कि महिलावर होणा-या अत्याचाराच्या विरोधात तुम्ही एक कठोर कायद्या केलाच पाहिजे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले खुप खुप धन्यवाद.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, या ठिकाणी आलेले नवनियुक्त आयुक्त, पूर्व स्थायी समिती अध्यक्ष, सत्तापक्ष नेते, स्थायी समिती अध्यक्ष, नगरसेवक, अधिकारी वर्ग. विषय क्र.५६ नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांच्या हस्तांतरण प्रक्रियेच्या विषयावर चर्चा करण्याकरिता हे सभागृह आपण बोलाविले आहे. मुळ प्रश्न असा आहे. हा विषय या विषयपत्रिकेवर कां आला हा मुळ प्रश्न आहे. गेल्या अनेक वर्षापासून या नागपूर शहराच्या जनतेची मागणी होती की नागपूर सुधार प्रन्यास च्या माध्यमातून लोकांच्या ज्या मुलभूत सुविधा लोकांना द्यावयाच्या होत्या त्या देण्यात येत नव्हत्या. नागपूर सुधार प्रन्यास चे महानगरपालिकेमध्ये हस्तांतरण करुन किंवा समायोजन करुन लोकांच्या मुलभूत समस्या सुटाव्यात या शहराच्या जनतेचा संघर्ष सुरु आहे. माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस हे ज्या वेळेस सत्तेत आले त्या वेळेस लोकांच्या या मागणीचा त्यांनी विचार केला. साधारणत- दीड वर्षापूर्वी त्यांनी नागपूर सुधार प्रन्यास ला महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याकरिता प्रक्रिया सुरु केली. त्या प्रक्रियेमध्ये त्यांनी सांगितले. नागपूर सुधार प्रन्यास चे जेवढे अधिन्यास आहेत, जेवढे भुखंड आहेत, जो काही निधी आहे, जे काही पियु लॅन्ड आहेत, ओपन स्पेस आहेत ते सर्व महानगरपालिकेला हस्तांतरीत झाले पाहिजे अश्या प्रकारचे आदेश त्या प्रक्रियेमध्ये राज्य सरकारकडून नमूद करण्यात आले . नागपूर सुधार प्रन्यासने वर्षभराच्या कालखंडामध्ये जी प्रक्रिया पुर्णत्वास नेण्याची आवश्यकता होती. ती प्रक्रिया पुर्णत्वास न नेता ती प्रलंबित कशी ठेवावी याचाच प्रयत्न झालेले दिसते. मुळात प्रश्न असा उपस्थित होता. हे सगळे सुरु असतांना जनतेच्या विषयावर निर्णय झाला असतांना अचानकपणे या शहराचे पालकमंत्री एक पत्र मा.मुख्यमंत्र्यांना देतात. मा. मुख्यमंत्री महोदय एक पत्र नागपूर महानगरपालिकेला पाठवितात की तुमचे मत कळवावे. याचा अर्थ असा होतो मा.महापौरजी, कायद्यातील तरतूदीच्या भाषेनुसार आज महानगरपालिकेचे मत राज्य सरकारला कळवित आहे. माझ्या माहितीप्रमाणे ही एक प्रकारची सुनावणी आहे. याचाच अर्थ या प्रश्नाची सुनावणी आपल्या राज्य सरकारला कळवावयाची आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेने जे अधिकार दिले आहे. हे सदन हे १५६ जनप्रतिनिधीचे सदन आहे. या सदनामध्ये जी काही चर्चा नमूद केली ती शासनाकडे जाणार आहे. या शहरातील ३५ लक्ष लोकसंख्येचे ते मत आहे त्यामुळे हे ३५ लक्ष लोकांचे मत जसेच्यातसे शासनापुढे जावे अशी मी आपल्यामार्फत आयुक्तांना विनंती आहे. या मतामध्ये कोणत्याही अन्य किंवा त्यांचा अभिप्राय टाकू नये कारण हे जनतेचे मत आहे. मुळात प्रश्न असा उपस्थित होतो, १९३६ ला नागपूर सुधार प्रन्यास ही एजन्सी म्हणून या शहरात आली. १९३६ ला देश स्वतंत्र व्हायचा होता. सीपी अॅन्ड बेरार अॅक्टनुसार त्या वेळेस स्थानिक स्वराज्य संस्थांना लिमिटेशन होत्या. त्या लिमिटेशनमध्ये त्यांना काम करावे लागत असे. प्लॉनिंग करण्याची तांत्रिकता त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नव्हती. त्यामुळे सरकारला ज्या पध्दतीने प्लॉनिंग आणि डेव्हलपमेंट पाहिजे होते त्या पध्दतीने सरकारच्या अखत्यारित असणारी आणि सरकारच्या गाईडलाईनप्रमाणे असणारी एजन्सी काम करेल या भुमिकेतून नागपूर सुधार प्रन्यास चे गठन झाले होते. या देशात दोन अशी शहरे आहेत ज्या ठिकाणी दोन एजन्सी काम करतात ते म्हणजे नागपूर

शहर आणि कलकत्ता. १९३६ ते २०२० साधारणत: ८४ वर्षाचा कालखंड लोटून गेला. मा.महापौरजी. इतक्या वर्षात नागरिकांचे प्रश्न सुध्दा बदलले, या शहराच्या सीमा बदलल्या, शहराची जनसंख्या सुध्दा बदलली. १९५२ मध्ये आजूबाजूचे खेडे नागपूर महानगरपालिकेच्या हद्दी घेतले त्या सगळयांसाठी प्लॉनिंग आणि नियोजन प्राधिकारीणी नागपूर सुधार प्रन्यास होती. १९८४-८५ ला या शहरात अनधिकृत लेआऊट पडायला सुरुवात झाली. कोणालाही विश्वासात न घेता जमीन मालकाने जमीनीचे पट्टे आपआपल्या सोयीनुसार प्लॉट पाडून ते प्लॉट  विकले. १०८५-८६ मध्ये मोठया प्रमाणात अनधिकृत लेआऊट या शहरात पडले. १९७६ ला शहराचा डीपी प्लॉन तयार झाला आणि हा डीपी प्लॉन नागपूर सुधार प्रन्यासने तयार केला होता. आणि १९७६ च्या डीपी प्लॉनमध्ये ज्या काही डीपी रिझर्व करुन ठेवल्या होत्या. त्यामध्ये स्पोर्टस स्टेडिअम असेल, स्पोर्टस ग्राऊंड असेल, बाजाराचे रिझर्वेशन असेल, शाळेचे, दवाखान्याचे, टाऊन हॉल, डी.पी.रस्त्याचे रिझर्वेशन त्या काळी नागपूर सुधार प्रन्यासने त्या काळी केले. तेव्हा नागपूर महानगरपालिकेला, जमीन मालकाला अवगत केले नाही. त्याचे परिणाम असे झाले १९८४-८५ मध्ये अनधिकृत लेआऊटचे जे पेव या नागपूर शहरामध्ये आले.  या नागपूर शहरातील बाजाराच्या जागा, सर्व शाळेच्या जागा, हॉस्पीटलच्या जागा, स्मशानभुमीच्या जागा, डीपी रस्ते हे सर्व भुखंडमोध्ये परावर्तित झालेल्या दिसत आहे. ज्यावेळी मा.चंद्रशेखर आयुक्त म्हणून या महानगरपालिकेत आले त्यांनी मानेवाडयामध्ये घरांची तोडफोड केली होती. त्या वेळेस फार मोठा उठाव या नागपूर शहरात झाला होता. मघाशीची डॉ. रविंद्र भोयर यांनी सांगितले, मा.स्वर्गीय प्रभाकरराव दटके यांच्या नेतृत्वात एक मोठा मोर्चा चिटणीस पार्कात आला आणि जनतेच्या मागणीनुसार त्या वेळेस राज्य शासनाकडे निवेदन करण्यात आले. या सगळया लेआऊटच्या संदर्भात राज्यशासनाने वेगळा कायद्या करावा. एमआरटीपीच्या कायद्यानुसार हे लेआऊट रेग्युलर करणे शक्य नव्हते. तेव्हा मग मा.महापौरजी, २००१  साली गुंटेवारी कायद्या आला. काय होती या गुंटेवारी कायद्याची व्याख्या तर गोरगरीब जनतेच्या आपल्या घामाचा पैसा खर्च करुन त्यांनी हे भुखंड घेतले आहेआणि त्यावर घर बांधले ही राष्ट्रीय संपत्ती आहे. त्या घरात सिमेंट, विटा , रेती लागलेली आहे आणि ही राष्ट्रीय संपत्ती आहे. या राष्ट्रीय संपत्तीचे, या लोकांच्या घामाच्या पैश्याचे चीज व्हावे म्हणून या घरांचे, लेआऊटचे रेग्युलाईज करण्याकरिता २००१ मध्ये गुंटेवारी कायद्या महाराष्ट्र शासनाने आणला. त्याची प्लॉनिंग ॲथारिटी आणि डेव्हल्पमेंट ॲथारिटी नागपूर सुधार प्रन्यास होती. २००१ ते २००७ या कालखंडामध्ये अनंक आरक्षित जागा प्रायव्हेट लेआऊटवाल्यांना विकल्या. पब्लिक युटिलीटीच्या आरक्षित जागा मग ते खेळाचे मैदान असो, शाळेची आरक्षित जागा असो, मैदानाची आरक्षित जागा असो भुखंड रेग्युलाईज करतांना आपण बघितले आहे त्या ठिकाणी घर बांधलेली नव्हती त्यांना सुध्दा एनआयटीने रेग्युलाईज केलेले आहे. २००७ मध्ये एक मोठा घोटाळा एनआयटीमध्ये झाल्याचा समोर आला. तेव्हा मग २००७ मध्ये बेंझामिन साहेबांनी एक पत्र नागपूर सुधार प्रन्यास ला पाठविले की गुंटेवारी कायद्याअंतर्गत लेआऊट रेग्युलाईज करण्याचा अधिकार दिलेला आहे तरीत्या लेआऊटमधील आरक्षण डिलीट करण्याचा अधिकार आम्ही तुमच्याकडून काढतो आहे असे बेंझामिन साहेबांचे पत्र नागपूर सुधार प्रन्यासला आलेले होते. ज्या वेळेस मा.महापौरजी, गुंटेवारी कायद्या अस्तित्वातआला त्यावेळेस ५७२ अनधिकृत लेआऊट होते. मौजे तेच होते, तेवढयाच मौज्यामध्ये ५७२ अनधिकृत लेआऊट होते. परत २०११ ला १९०० लेआऊटकरिता सरकारला कायद्या आणावा लागला. ज्यांचा उल्लेख मा. छोटू भोयर यांनी केला. इतके सगळे

नागपूर सुधार प्रन्यास कडे असतांना नागपूर सुधार प्रन्यास प्लॉनिंग ॲथारिटी आणि डेव्हल्पमेंट ॲथारिटी असतांना नागपूर सुधार प्रन्यासने प्लॉनिंग आणि डेव्हल्पमेंट किती केले हे आपल्या सगळयांना माहीत आहे. यामुळे शहरातील जनतेला अनेक समस्येला तोंड दयावे लागते. आजही अनेक लेआऊट असे आहेत त्या लेआऊटमध्ये शहरातील जनतेला सुविधा देवू शकत नाही. शंभर टक्के लेआऊट मौजा सोमलवाडा, मौजा बाबुलखेडा, मौजा चिंचभवन असे नागपूर सुधार प्रन्यास चे लेआऊट आहेत. ज्या ठिकाणी डेव्हल्पमेंट करु शकत नाही. लोकांच्या समोर जेव्हा आम्ही जातो त्या ठिकाणी महानगरपालिका काम करु शकत नाही आणि नागपूर सुधार प्रन्यास सुध्दा काम करीत नाही. या ठिकाणी कुणी सांगितले की नागपूर सुधार प्रन्यासने विकास केला. तो नागपूर सुधार प्रन्यासने विकास केला नाही तर राज्य सरकारच्या पैश्यातून विकास झाला आहे. तत्कालीन आमदार यांनी पैसा देवून देवून त्या ठिकाणी विकास केला आहे. एनआयटीने जो डेव्हल्पमेंट चार्ज लोकांकडून घेतला त्यामधून कुठे विकास झाला आहे. १६५ कोटी रुपये नागपूर महानगरपालिकेला जेएनएनयुआरएम अंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी महानगरपालिकेला मिळाले होते. नागपूर सुधार प्रन्यासला या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या योजना करुन देण्यात आल्या. आयआरडीपी योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून आलेला पैसा महानगरपालिकेने नागपूर सुधार प्रन्यास ला वळते करुन नागपूर सुधार प्रन्यास ला विकास कामाकरिता दिले. राज्य शासनाचा पैसा नागपूर महानगरपालिकेला मिळतो तो पैसा नागपूर महानगरपालिका नागपूर सुधार प्रन्यासला देते याचा अर्थ नागपूर महानगरपालिका डेव्हल्पमेंट आणि मेटेंन्स त्या भागासाठी करीत आहे. अशा वेळेस नागपूर सुधार प्रन्यासची गरज काय ? ६ जून २०१० ला महानगरपालिकेने एक ठराव घेतला. २३४ गुंटेवारीचे लेआऊट, ११४ प्रायव्हेट लेआऊट आणि ९६ ईडब्लूएसचे लेआऊट नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरीत करावे अशा प्रकारचा एक ठराव महानगरपालिकेने घेतला. हे एवढेच लेआऊट महानगरपालिकेला ज्या वेळला २०१० मध्ये महानगरपालिकेने हस्तांतरीत करुन घेतले तेव्हापासून त्याचे मेटेंन्स आपण करतो. ज्याप्रमाणे या ठिकाणी आधीच्या लोकांनी सांगितले त्याचा टाऊन प्लॉनिंग ॲथारिटी नागपूर सुधारप्रन्यास असल्यामुळे डेव्हल्पमेंट चार्जेसचे लोकांचे पैसे नागपूर सुधार प्रन्यास कडे जातो आणि मेटेन्सकरिता महानगरपालिकेकडे असल्यामुळे मेटेंन्स करु शकत नाही ही परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत ज्या वेळेला महानगरपालिकेच्या बाजाराच्या निर्मितीचा विषय समोर येतो, प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत जनतेला सुविधा केंद्रामार्फत या नागपूर शहराच्या जनतेला प्राथमिक सुविधा देण्याचा विषय येतो. त्या वेळेस मला आठवते, नानाजी शामकुळे स्थायी समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यासची एक कम्बाईन बैठक त्यावेळी घेतली होती. त्यावेळेला प्रत्येक १ लक्ष लोकवस्तीच्या मागे एक बाजार आणि १० हजार लोकवस्तीच्या मागे एक मटन मार्केट,प्रत्येक १ लक्ष लोकवस्तीच्यामागे एक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा प्रकारची भुमिका मांडून कामाला सुरुवात केली होती. २००७ पासून आपण नागपूर सुधार प्रन्यासला जागेची मागणी करीत आहोत. एकही जागा नागपूर सुधार प्रन्यासने आपल्याला दिलेली नाही. आजच एक पत्र नागपूर सुधार प्रन्यासने दिले की आमच्याकडे काहीच नाही. मग महानगरपालिकेला दोष कां देतो. जागा हस्तांतरण करुन घ्यावयाची आहेत तर त्याचे मेझरमेंट आपल्याकडे पाहिजे नाही काय ?एखादी पीयू लॅन्ड महानगरपालिकेला हस्तांतरीत करुन घ्यावयाची असेल तर त्याची सीमा काय हे कोण निर्धारित करणार आहे. एनआयटीने प्लॉट विकायचे पैसे खायचे त्यांनी आणि नागपूर महानगरपालिकेने ओपन प्लॉटचे जे

नकाशामध्ये दाखवलेली जी जागा आहे त्याचे जे डायमेंशन नकाशामध्ये दाखविले आणि त्याची अर्धी जागा महानगरपालिकेने घेतली तर त्याचा असेटवर सुध्दा परिणाम होणार आहे. या सर्व गोष्टीचा विचार या सभेच्या माध्यमातून शासनाकडे पोहचणे आवश्यक आहे. या ठिकाणी एक महत्वाचा विषय आहे की कां नागपूर सुधार प्रन्यास परत जावू नये. म्हाडा ही गर्व्हमेंटची एजन्सी आहे. त्रिमुर्तीनगर असो, नरेंद्रनगर असो हे सर्व जे लेआऊट होते, जे कुठले मौजे होते ते सर्व नागपूर सुधार प्रन्यास अंतर्गत आहेत. म्हाडा ने जेव्हा लेआऊट पाडले तेव्हा नकाशे सॅग्शन करिता पाठविले होते परंतु त्या लोकांना केव्हा सॅग्शन करुन मिळाले जेव्हा ही प्रक्रिया आपण सुरु केली. मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये जेव्हा बैठक झाली तेव्हा म्हाडा चे नकाशे सॅग्शन झाले मा.महापौरजी. आज सेवन स्ट्रीट सुरु आहे. रामदासपेठ असो, सोमलवाडा असो, बर्डी असो याची चर्चा करतो महानगरपालिकेकडे पैसे नाही. महानगरपालिकेचा खर्च जास्त आहे आणि उत्पन्न कमी आहे. मा.महापौरजी, हा पुर्ण चा पुर्ण कॉरीडोर जर आपण पाहिला तर हा पुर्णचा पुर्ण कॉरीडोर मेट्रोचा कॉरीडोर आहे. या मेट्रो कॉरीडोरमध्ये ५०० मीटरपर्यंत टीओडी अप्लीकेबल आहे. आणि जो नकाशा सॅग्शन करण्याचा अधिकार आहे जी प्लॉनिंग आणि डेव्हल्पमेंट अॅथारिटी आहे. येणा-या काळामध्ये ते पुर्ण नियोजन नागपूर महानगरपालिकेतर्फे आणि नागपूरसुधार प्रन्यासतर्फे करण्यात येणार आहे मा.महापौरजी. या सातच्या सात स्ट्रीट आपल्याला मिळाल्या. गुंटेवारीच्या अंतर्गतचे लेआऊट आपल्याला मिळाले. महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये किती टक्के भर पडणार आहे याचा आपण विचार करु शकत नाही मा.महापौरजी. मी मध्यंतरी मा.आयुक्तांना पत्र दिले होते जे गुंटेवारी अंतर्गत जे गुंटे आहेत त्यातील अनेक टॅक्स ओनर माहीत नाही आहेत. दीड लक्ष प्रापर्टी अशा आहेत जे गुंटेवारीच्या अंतर्गत येतात. त्या ठिकाणचे मेंटेंन्स महानगरपालिका करते परंतु त्याचा टॅक्स महानगरपालिकेला मिळत नाही आहे. त्याची माहिती नागपूर सुधार प्रन्यास कडून घ्यावी लागेल मा.महापौरजी. या सर्व गोष्टीचा विचार करावा लागेल. मी विनंती करतो, या सभागृहाचे मत मा.आयुक्त आपल्याला कळले आहे. ९९ टक्के हे नागपूर शहराच्या नागरिकांचे मत आहे, या शहरातील जनतेचे हे मत आहे की नागपूर सुधार प्रन्यास ही महानगरपालिकेकडे मर्च झाली पाहिजे. त्यांना त्यांच्या क्षेत्रात काम करु दया काय फरक पडतो, एमआरटीपीने कन्वर्ट केले आहे त्यांना नागपूर शहराच्या १० कि.मी.पर्यंत काम करण्याची संधी आहे. शहरात दोन एजन्सी काम करीत आहे त्यामुळे लोकांचे नुकसान होत आहे. नगरसेवकांना जो मानसिक त्रास होत आहे. या मानसिक त्रासाची कल्पना कदाचित पालकमंत्र्यांना नसेल किंवा त्यांना डेव्हल्पमेंट एनआयटीच्या माध्यमातून करावयाचा जर उद्देश असेल तर हे योग्य नाही. कारण पालकमंत्र्यांची जबाबदारी ही जनतेच्या विकासाची जबाबदारी असते. मी काय म्हणतो संदीप भाऊ, पालकमंत्र्यांनी पैसा आणावा, नागपूर महानगरपालिका त्या पैश्याचे विनियोग करणार. परंतु असा उद्देश ठेवून त्यांनी जनतेच्या मताशी खेळू नये हे या सभागृहाचे प्रामाणिक मत आहे, भावना आहे. माझी एक विनंती राहील, संदीप भाऊ, या सभागृहाचे मत, आम्ही जे भाषण करीत आहे तो सर्व अहवाल पालकमंत्र्यांना दयावा आणि त्यांचे मत बदलविण्याचा प्रयत्न करावा. आणि जर त्यांचे मत बदलणार नसेल तर निश्चितपणाने या शहराची जनता त्यांना माफ करणार नाही. त्यासाठी रस्त्यावर उतरण्याची या शहराची जनतेची तयारी राहणार आहे. त्यामुळे मा.आयुक्त साहेब, सर्वपक्षीय नगरसेवकांचे मत, त्या मताप्रमाणे हा जो अहवाल जो महानगरपालिकेला मागितला आहे. मी अधिनंदन करतो की आपण या सभागृहामध्ये मत ठेवण्याचा प्रत्येक नगरसेवकांना या निमित्ताने

दिलेला आहे. प्रत्येक नगरसेवकचे जे मत आहे. जे लेखी स्वरुपात आहे. आपल्या माध्यमातून परत एकदा मा.आयुक्तांना विनंती करतो, त्यांनी हा अहवालचा अहवाल शासनाकडे पाठवावा जेणेकरुन नागपूर सुधार प्रन्यास समायोजनची प्रक्रिया जी आहे ती कंटीन्यू करुन एनआयटी बरखास्तीविषयीचे हे मत शासनाला कळावे या मताशी मी सहमत आहे. एवढेच बोलतो आणि याठिकाणी थांबतो. धन्यवाद.

श्रीमती वैशाली नारनवरे:- मा.महापौरजी, नगरसेवक हा जनता आणि नागपूर महानगरपालिका यांच्यातील दुवा आहे. सर्वप्रथम जनता आपल्या समस्या नगरसेवकांकडे घेवून येतो. त्यानंतर आपण त्यांच्या समस्यांचे निराकरण करीत असतो परंतु ज्यावेळेस ते एनआयटीकडे जातात तेव्हा त्यांची दिशाभुल केली जाते. त्यांचे काम पुर्ण होत नाही. त्यामुळे अशा दोन एजन्सी शहरात काम करु शकत नाही. म्हणतात ना, एक म्यानमे दोन तलवारी नही रह सकती, तशीच परिस्थिती आज झाली आहे. मा.महापौरजी, सन १९८८-८९ मध्ये सांगण्याचे तात्पर्य असे की मी प्लेअर होती. प्लेग्राऊंड एनआयटीकडे होते. त्यावेळेस जी प्लेग्राऊंड अवस्था होती तशी अवस्था आजही आहे. जर एनआयटी काम करण्यास सक्षम नसेल तर आपण एनआयटीला बरखास्त केलेच पाहिजे. त्या ठिकाणी प्लेग्राऊंड अवस्था अशी आहे जागोजागी खड्डे पडलेले आहे. व्हॉल कम्पाऊंड जीर्ण झालेल्या आहेत. त्या ठिकाणी जे मुले खेळतात ते जेव्हा आमच्याकडे येतात, आम्ही त्यांना तात्पुरते डस्ट टाकून देतो, रोलिंग करुन देतो. त्यानंतर ते खेळतात. त्या ठिकाणी प्लेग्रांऊंड व्यवस्था जशी असायला पाहिजे तशी नाही. उत्तर नागपूर मध्ये जवळपास ३५ प्लेग्राऊंड आहेत. त्या प्लेग्राऊंडचा विकास झालेला नाही. त्या ठिकाणी कबड्डीचे ट्रॅक असायला पाहिजे, फुटबॉलचे ग्राऊंड असायला पाहिजे. त्या ठिकाणी प्लेअरकरिता साहित्य असायला पाहिजे परंतु ती अवस्था दिसत नाही. जेव्हा आपण खाली प्लॉटवर स्वच्छता व्हावी म्हणून मोहिम काढतो. ते मग एनआयटीचे प्लॉट असले तरी प्लॉट स्वच्छ करतो. परंतु त्यापासून जे शुल्क येते ते मात्र एनआयटी घेते. आपण जनतेकडून तो प्लॉट कुणाचा म्हणून माहिती घेतो आणि तो जप्त करण्याचा विचारही करतो. परंतु एनआयटी मात्र या विषयाच्या संदर्भात जागृत राहत नाही. एनआयटीने आपल्यातर्फे आर्डर द्यावयास पाहिजे परंतु एनआयटी काम करीत नाही. त्यामुळे त्या खाली प्लॉटवर डास तयार होतात आणि त्यामुळे लोकांना नको ते रोग होतात आणि त्याच्यामुळे जनतेला त्रास होत आहे. अशी अकार्यक्षम अशी एनआयटी आहे आणि त्यामुळे या शहरात त्यांना असण्याचे काही कारण नाही. मा.महापौरजी, १९०० आणि ५७२ लेआऊटचे नियमितीकरण आताही झालेले नाही त्यामुळे जनतेचा आताही त्याचा त्रास होत आहे. मी या एनआयटीचा निषेध करीत आहे परंतु माझे काही नगरसेवक बोलले असेल तरी सुध्दा ते माझ्या वतीने बोलले असतील आणि त्यांनी सुध्दा म्हटले आहे कि एनआयटी या शहरात पाहिजे नाही. मा.महापौरजी, एनआयटीचे एमएमआरडीए असे करण्यात आलेले आहे. आताही ६०० फाईल प्रलंबित आहेत त्यामुळे वार्षिक उत्पन्नात घट झाली आहे. आपण जर महानगरपालिकेत एनआयटी जर आणली तर त्या ठिकाणी असलेले रुजू अधिकारी, कर्मचारी यांना पदमुक्त करण्यात येणार आहे काय ? ते महानगरपालिकेशी जुळलेले असल्यामुळे त्यांचही भविष्य अंधारात जाणार नाही, त्यांच्या भविष्याचा विचार करणे सुध्दा आवश्यक आहे मा.महापौरजी. आपल्याकडे जी गुंठेवारी आलेली आहे त्यावर मा.आयुक्त साहेबांनी अभ्यास करावयास पाहिजे आणि आपण त्यांच्याकडून जी समोरची कार्यवाही करणार आहे तेव्हा त्यावर एक नजर आयुक्तांनी घालावी आणि एनआयटी लवकरात लवकर हस्तांतरीत करण्यात यावी एवढेच बोलते.धन्यवाद

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, विषय क्र. ५६ नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास हस्तांतरण करण्याच्या प्रक्रियेवर चर्चा करण्याकरिता आपण ही सभा बोलाविली आहे. आपण ही जी हस्तांतरणाची प्रक्रिया करुन राहिलेलो आहे आणि त्या अनुषंगाने काय काय निर्णय झाले. यावर चर्चा होणे गरजेचे आहे असे मला वाटते. या सभागृहामध्ये बहुतांश नगरसेवकांनी महानगरपालिकेचे अस्तित्व राहिले पाहिजे व नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाली पाहिजे असे एकच मत जवळ सर्व सदस्यांनी ठेवले. १९३६ मध्ये एनआयटीचे अस्तित्व होते. मा. अविनाश ठाकरे यांनी एनआयटीची स्थापना करण्यामागचा ब्रिटीशाचा उद्देश त्या मागची कारणामुळे एनआयटीची स्थापना करण्यात आली होती ते या ठिकाणी नमुद केलेले आहे त्यामुळे मी रिपीट करणार नाही. त्यांचा एक स्वतंत्र कायद्या होता. त्या कायद्यान्वये एनआयटीचा अस्तित्व अजूनही या शहरामध्ये शिल्लक आहे. या शहरामध्ये अनेक वर्षापासूनची एनआयटीच्या विरोधात एक लोकभावना आपण पाहिलेली आहे. सर्वसाधारणपणे या शहराचा प्रत्येक नागरिक एनआयटीच्या कारभाराबाबत सहमत नाही. एनआयटीच्या या त्रासाला तो कंटाळून गेलेला आहे. म्हणून एक लोकभावना एनआयटीच्या विरोधात सातत्याने निर्माण झालेली आहे. तीस वर्षापासून मी सुध्दा त्याचा अनुभव घेवून राहिलेलो आहे. आणि ही लोकभावना एनआयटीच्या विरोधात असतांना सुध्दा एनआयटीचे अस्तित्व आजपर्यंत कायम राहिले आहे. यामध्येच एनआयटीच्या मागच्या पार्श्वभूमी आहे त्याचा वापर कशासाठी केला जातो हे त्यावरुन लक्षात येते. अनेकदा राज्य शासन त्याचा वापर करतांना राज्य शासनाच्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत राबवायच्या असतात. तेथे जर आपल्या मताचे सरकार नसेल तर सरकारमध्ये बॉडी जर बहुमतामध्ये जर नसेल तर एनआयटीच्या माध्यमातून त्या सर्व योजना राबवायच्या असे याच्या आधी अनेक सरकारनी प्रयत्न केलेले आहेत. सोबत सोबत मा.महापौरजी एनआयटी जे दुसरे जे महत्वाचे काम होते ते राजकीय पुनर्वसनासाठी सुध्दा एनआयटीचा वापर झालेला आहे. की एखाद्या पक्षाचा कार्यकर्ता ज्याला समजा विधानसभेचे तिकीट देता येत नसेल तर त्याला एनआयटीमध्ये ट्रस्टी करायचे आणि त्याचे राजकीय पुनर्वसन करायचे यासाठी सुध्दा एनआयटीचा वापर झालेला आहे. सर्व राजकीय पक्षानी एनआयटीचा वापर केलेला आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, मागचे पांच वर्ष आणि हे पांच वर्ष यात भारतीय जनता पार्टीने कोणत्या माणसाचा वापर केला ते मा.सदस्य श्री.गुडधे यांनी सांगावे.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, कदाचित कॉंग्रेस पक्षानीच वापर केला असावा. अनेक सभासदांच्या भाषणाचा जो रोख होता की नागपूर सुधार प्रन्यास हे भ्रष्टाचाराचे कुरण आहे. त्या ठिकाणी खुप मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होवून राहिलेला आहे. ही गोष्ट खरी आहे आणि या एनआयटीच्या विरोधात लोकभावना राहिलेली आहे. या लोकभावनेच्या आधारावर भारतीय जनता पार्टीने आपल्या मॅनीफॅस्टोमध्ये या शहराच्या जनतेला वचन दिले की जर राज्यामध्ये आमचे सरकार आले तर आम्ही नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करु. मा.महापौरजी, २०१४ मध्ये राज्यामध्ये निवडणुका झाल्या. विधान सभेमध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना युतीचे सरकार आले. या शहराचे आमदार या सभागृहाचे माजी महापौर या राज्याचे मुख्यमंत्री झाले. आणि त्यामुळे या शहराच्या लोकांच्या खुप मोठी अपेक्षा त्यांच्याकडून होती कि नागपूर सुधार प्रन्यास बरखास्तीचे भारतीय जनता पक्षानी जे वचन दिले आहे ते नक्कीच फडणवीस साहेब पुर्ण करतील. मा.महापौरजी, अनेक मा.सदस्यांनी भाषण करतांना ज्यामध्ये कॉग्रेस पक्षाचे सुध्दा नगरसेवक आहेत त्यांनी म्हटले की सरकारनी एनआयटीच्या बरखास्तीचा जो निर्णय घेतला आहे त्याचे आम्ही अभिनंदन करतो.

भारतीय जनता पक्षाच्या मा.सदस्यांनी सुध्दा म्हटले की आमच्या सरकारनी एनआयटीच्या बरखास्तीचा जो निर्णय घेतला त्याचे आम्ही अभिनंदन करतो. जे वचन आमच्या सरकारने दिले होते त्याप्रमाणे जे बोललो ते आम्ही दाखवून दिले, आम्ही एनआयटी बरखास्त करीत आहे. मा.महापौरजी, आता हा समझ कसा झाला, आज वर्तमानपत्रामध्ये मोठया प्रमाणात बातम्या छापून येत आहेत आणि आज बहुतांश शहराच्या नागरिकांचे हेच मत आहे की नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झालेली आहे ही लोकभावना आहे. मा.महापौरजी, वास्तविकता काय आहे जर ही एनआयटी बरखास्त करायची असेल तर एनआयटीचा स्वतंत्र ॲक्ट आहे. त्याची एक प्रक्रिया आहे. एनआयटी ॲक्टच्या १२१ कलमान्वये डिझॉलिशन ऑफ ट्रस्ट हे क्लॉज आहे. ब्रिटीशांनी स्थापन केलेली ट्रस्ट या कलमान्वये डिझॉल करता येते. या ट्रस्टच्या उद्येशाची परिपुर्तता झाल्यानंतर कलम १२१ अन्वये ही ट्रस्ट बरखास्त करता येते. मा.महापौरजी, त्यामध्ये तत्कालीन राज्य शासनाने जो निर्णय घेतला तो नागपूर सुधार प्रन्यास ॲक्ट १९३६ च्या कलम १२१ अन्वये निर्णय घेतला होता काय ? नागपूर सुधार प्रन्यास बरखास्तीचा. त्या कलमा अंतर्गत निर्णय जर राज्य शासनाने घेतला असता तर ख-या अर्थानी ही नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाली आणि नागपूर सुधार प्रन्यासची सर्व मत्ता, त्यांचे सर्व अधिकार महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे हया कायद्यान्वये अनिवार्य होते हयामुळे त्यांचे सर्व असेसट व लायबिलीटी, नागपूर महानगरपालिकेकडे आपोआप आले असते. मग सरकारनी काय केले.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी पाईंट ऑफ आर्डर, मा.सदस्य श्री. प्रफुल गुडधेजी यांनी जो मुद्दा मांडला आहे. ते या भुमिकेशी सहमत आहे कि नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाली पाहिजे. फक्त ते प्रोसेस बद्दल बोलत आहेत. त्यांनी जे म्हटले की ट्रस्ट बरखास्त व्हावी. ट्रस्ट बरखास्त झाली असती परंतु सरकारने त्याच्या मागे उददेश टाकला होता मा.महापौरजी. ती ट्रस्ट बरखास्त करीत असतांना ती ट्रस्ट ॲज इट इज राहावी. शहराच्या आतमधील जे काही लेआऊट आहेत ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत व्हावे आणि शहराच्या बाहेर त्या ट्रस्टचा नामांतरण करुन बाहेरच्या विकासाची जबाबदारी त्यांना द्यावी हा चांगला उददेश होता मा.महापौरजी.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, कलम १२१ वाचून दाखवितो (वाचले) नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीमध्ये ज्या ज्या योजना आहेत त्या संपुर्ण योजनेची अंमलबजावणी या ओपिनियममध्ये राज्य सरकार आले असेल तर तुम्हाला ट्रस्ट बरखास्त करता येते. मग आता एनआयटीकडे कोणकोणत्या गोष्टी होत्या तर एनआयटीकडे फक्त सात स्कीम होत्या शहराच्या गुंठेवारीची जबाबदारी होती. मा.महापौरजी, एनआयटीने सात स्कीमची अंमलबजावणी केली काय यावर चर्चा होणे गरजेचे आहे. गुंठेवारी कायद्यान्वये किती अर्ज आले होते आणि किती लेआऊट आपण मंजूर केले आणि कोणकोणते लेआऊट नामंजूर केले त्याचे स्टेटस् काय आहे या संदर्भामध्ये चर्चा करणे गरजेचे आहे. या प्रक्रियेची सुरुवात मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी केली.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, एक इर्न्फेमेशन पाहिजे होती. एनआयटीच्या संदर्भात मघाशी संदिपजी सहारे म्हणाले होते की याची केस कोर्टात सुरु आहे. कोणता निर्णय सरकारने केला म्हणून ही केस कोर्टात गेली ती माहिती मिळाली तर बरे होईल.

श्री.प्रफुल गुडधे:- मा.महापौरजी,मी माहिती देतो. या प्रक्रियेची सुरवात राज्य सरकारने निश्चितपणाने केलेली आहे. आणि ही सुरवात कश्या माध्यमातून केली. तर २७ डिसेंबर २०१६ ला महाराष्ट्राच्या कॅबिनेटनी एक कॅबीनेट डिसीजन घेतला आणि हा डिसीजन २७ डिसेंबर २०१६ ला घेतला. हा २७ डिसेंबर

२०१६ ला कां घेतला तेही सांगतो. या कॅबीनेट डिसीजनमध्ये नागपूर सुधार प्रन्यास बरखास्तीला तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली होती. वर्तमानपत्रामध्ये मोठया प्रमाणात बातम्या छापून आल्या होत्या. त्यामध्ये नागपूर सुधार प्रन्यासकडील मत्ता आणि दायित्वाचे क्रमश: हस्तांतरण नागपूर महानगरपालिकेकडे आणि नागपूर महानगर विकास प्राधिकरणाकडे एक वर्षाच्या कालावधीमध्ये ठेवण्यांत येईल. याबाबतचा निर्णय तसेच मत्ता आणि दायित्व कोणत्या प्राधिकरणास किती प्रमाणात असावे याबाबतचा निर्णय घेण्यासाठी नगरविकास विभागाचे सचिव आणि नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त, नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्ष यांची समिती शासनाद्वारे नेमण्यात आली असून या समितीकडून नागपूर महानगरपालिका तसेच नागपूर विकास प्राधिकरणास हस्तांतरीत करावयाच्या मत्ता आणि दायित्व बदद्लची शिफारस राज्य शासनास केली जाईल. हा निर्णय २७ डिसेंबर २०१६ ला कां घेण्यात आला. तो निर्णय यासाठी घेण्यात आला मा.महापौरजी, १७ फेब्रुवारीला महानगरपालिकेच्या निवडणुका होणार होत्या.आणि १० जानेवारी २०१७ मध्ये या शहरामध्ये निवडणुकीची आचारसंहिता लागली. आणि आचारसंहिता लागण्याच्या आधी निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कॅबिनेटनी हा डिसीजन घेतला की आम्ही एनआयटीला तत्वत: बरखास्त करण्याची मान्यता दिली आहे आणि या संदर्भातील कायदेशिर प्रक्रिया एका वर्षात आम्ही पुर्ण करु. डिसेंबर २०१७ मध्ये या शहरामध्ये एनआयटीचे अस्तित्व राहणार नाही. मघाशी अविनाश भाऊ म्हणत होते की जनतेच्या मताशी खेळू नये. मी या चर्चेच्या अनुषंगाने सांगू इच्छितो, पालकमंत्र्यांनी असे पत्र दिले असेल तर मी या मताशी सहमत आहे. कॅबिनेटनी तत्वत:मान्यता दिली आणि या तीन सदस्यांची कमेटी बसली. सभापती नागपुर सुधार प्रन्यास, आयुक्त नागपुर महानगरपालिकाआणि प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली यांनी यासंदर्भात चर्चा करावी. या समितीने कुठकुठल्या विषयावर चर्चा केलीआहे त्याचे प्रोसिडिंग मागविले आहे. या समितीची पहिली बैठक १९ जानेवारी २०१७ रोजी संपन्न् झाली. त्या बैठकीमध्ये असे ठरले कि त्याचे इतिवृत्त् आहे. मालमत्तांचे लिस्टींग आपण पहिल्यांदा केले पाहिजे आणि त्याची समितीची कार्यप्रणाली कशी राहील आणि त्याच्या जबाबदा-या कोण कोण स्विकारतील. त्या कार्यप्रणालीमध्ये कोण कोणावर त्या जबाबदा-या राहतील या निश्चित करुन देण्यात आल्या. त्यावेळी महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त सुध्दा त्या बैठकीमध्ये उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये १४ मुद्दे डिसकस करण्यात आले. मला वाटते कि हे थोडे विस्तृत होत आहे परंतु ते विस्तृत झाले पाहिजे. यांना मर्यादा होती यांना डिसेंबर २०१७ पर्यंत यांना त्या मर्यादेमध्ये राज्य सरकारकडे शिफारस करावयाची होती. राज्य् सरकारने तत्वत: निर्णय घेतला होता की ही प्रकिया पुर्ण झाल्यानंतर आर्म्ही एनआयटी बरखास्तीचा निर्णय घेवू. पहिला निर्णय घेतला होता कि एनआयटी हस्तांतरण प्रक्रियेचे कालबध्द वेळापत्रक व प्राथमिकता. दुसरा निर्णय घेतला, साधारणत: एप्रिल महिन्यापासून प्रत्येक महिन्यात करण्यात येणा-या गोष्टीचे उदिद्ष्ठ ठरविणे , तिसरा निर्णय घेण्यात आला होता शासनाकडून अभिप्रेत असलेल्या मुद्दयांची यादी ठरविणे. निर्णयास्तव असलेल्या मुद्दयाबाबत नासुप्र् व निर्णयाबाबत कुठले प्रस्ताव करणे शक्य आहे त्याबाबतची माहिती व अभिप्राय तयार करणे. नासुप्रच्या अखत्यारितील शहरातील सात योजनामधील नागपूर सुधार प्रन्यास च्या लिज अनलिज प्रापर्टीची माहिती. सात योजनेमध्ये ज्या प्रापर्टी ज्या जमिनी एनआयटीनी एक्वायर्ड केल्या आणि भुखंड पाडून शहरामध्ये त्यांनी ते विकले ते लिजवर किती दिले, किती लिजधारकांना किती वर्षासाठी दिले आणि त्यांच्या किंमती काय आहेत या संदर्भातील माहिती. शहरातील नासुप्रच्या सर्व मालमत्ताबाबत विस्तृत माहिती, लिलाव वाटपाद्वारे देण्यात आलेल्या मालमत्ता, नासुप्र कडे सध्या लिलाव वाटपाकरिता शिल्लकअसलेल्या मालमत्ता बाबतची

माहिती, गुंठेवारी क्षेत्राबाबत विस्तृत माहिती, नासुप्र च्या गुंठेवारी क्षेत्राबाबत आवश्यक असलेली कलमे सुरक्षित ठेवण्यांबाबत माहिती, नासुप्र ने विविध संस्था व लोक यांच्यासोबत केलेल्या करारनाम्यानुसार नागपूर सुधार प्रन्यास चे दायित्व् व जबाबदारीची माहिती, विशेषत: नागपूर सुधार प्रन्यास द्वारे राबविण्यात येणा-या बीओटी व पीपीपी प्रकल्पांची माहिती तसेच सदर प्रकल्पाच्या करारनाम्यानुसार नासुप्र कायदा निरसीत झाल्यामुळे होणारे परिणाम, नासुप्र कायदयामध्ये ठेवावयाचे सेव्हींग क्लॉज, सुरुअसलेले छोटे व मोठया प्रकल्पांची माहिती, हस्तांतरीत करावयाच्या मालमत्तेचे अंकेक्षण, करारनाम्यातील दायित्वामध्ये संभावनीय अडचणी इतर अनुषंगित मुद्दे या १४ बाबींवर पहिल्या बैठकीमध्ये चर्चा झाली. दुसरी बैठक मा. महापौरजी तब्ब्ल नऊ महिन्याने झाली. या नऊ महिन्यानंतर काहीही झालेले नाही. दुसरी बैठक,६ ऑक्टोबर २०१७ ला झाली. त्या बैठकीमध्ये पुन्हा विषय तोच, नासुप्रच्या एकुण मालमत्ता किती, लिजवर दिलेले भुखंड किती, त्या लिजचा काळ किती, त्यामध्ये एनआयटीने पहिल्यांदा एक इंन्फोंमेशन दिली ती इंन्फोंमेशन होती कि ५७९४१ मालमत्तेबाबत त्यांनी पहिल्यांदा माहिती दिली. नासुप्रच्या ग्रांऊड रेंटच्या बाबतीत पहिल्यांदा माहिती दिली, १४ कोटी वार्षिक ग्रांऊंड रेंट एनआयटीला प्राप्त् होते. पुन्हा अर्धवट माहिती आली कि नागपूर सुधार प्रन्यासच्या घरकुल योजनेतील किती गाळे शिल्ल्क आहेत. एनआयटीने घरकुल बांधले, वाटप केले, किती शिल्लक आहेत. नासुप्रद्वारे किती विकासपोटी कंत्राटदारासोबत किती करारनामे करण्यात आले, त्या करारनाम्याची सध्या स्थिती काय आहे. विकासकामे किती केले, किती शिल्लक आहेत, त्याच्या लायबिलीटीज किती आहेत. एनआयटीचे किती बीओटीवर प्रकल्प् आहेत त्याचा कालावधी किती आहे. त्यांनी माहिती दिली, सात ते आठ प्रकल्पआहेत आणि त्यात सात ते आठ नवीन प्रकल्प् प्रस्तावित आहेत. त्याच्या निविदा काढण्यात आल्या आणि कार्यदेश निर्गमित करण्यात आले आहेत. नागपूर शहरात एनआयटीची ३ मोठी उद्याने आहेत. ९ बीओटी तत्वावर आहेत आणि लहान ४८ उद्याने आहेत. त्यापैकी १ बीओटीवर आणि बाकी सर्व उद्यानांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च मनपाला करावा लागणार आहे. एनआयटीने सर्वप्रथम सांगितले कि तुम्ही उद्याने घेवुन घ्या, त्याचा देखभाल दुरुस्तीचा खर्च तुम्ही करा. पुन्हा चर्चा झाली तुम्ही किती अनधिकृत अधिन्यास नियमित केले, अधिन्यासातील किती विकास कामे पुर्ण झाली, किती अधिन्यासातील विकास कामे अपुर्ण आहेत. किती विकास निधी आला, किती खर्च झाला, किती आवश्यक आहे, लायबिलीटी किती आहेत, व्यवस्थापन खर्च किती आहे. २००५ पूर्वीच्या सेवानिवृत्त् कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या संदर्भाचा तपशील मागितला की २००५ पूर्वी सेवानिवृत्त् कर्मचारी झाले आहेत ज्यांना सेवानिवृत्ती वेतन अनुज्ञेय नाही त्याची लायबिलीटी किती, २००५ नंतर ज्यांना सेवानिवृत्ती वेतन नाही, एकमुस्त् रिटायर्डच्या वेळेस किती दयावे लागतील. त्याचा हिशेब काढण्यासाठी चर्चा झाली. ते झाल्यानंतर तिसरी बैठक झाली २.११.२०१७ ला त्या बैठकीमध्ये जवळ जवळ तिच्याआधी झालेल्या बैठकीच्या संदभातीलच माहिती मागितली परंतु एका विषयाच्या संदर्भातील माहिती त्या बैठकीमध्ये प्राप्त् झाली नाही. नंतर दोन महिन्यानंतर चौथी बैठक झाली २०.०१.१८ ला, त्या बैठकीमध्ये काय ठरले तर पुढील बैठक फेब्रुवारी महिन्यात घेण्यात येईल असे ठरले. त्यानंतर या समितीची कुठलीही बैठक झालेली नाही. आता दटके साहेबांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला त्या विषयी सांगतो. हे असतांना जो टाईम पिरेड डिसेंबर दिला होता तो निघुन गेला. त्यानंतर या शहराच्या एका नागरिकाने पीआयएल दाखल केली. कॅबीनेट ने जो डिसीजन घेतला होता त्या डिसीजनमध्ये त्या पीटीशनरचे म्हणणे होते कि २७.१२.२०१६ च्या मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार ३१.१२.२०१७ पर्यंत नासुप्रचे बरखास्त् होणे एक वर्षाच्या आतच अपेक्षित होते. तो टाईम पिरेड

संपलाआहे. आता एनआयटी बरखास्तीचा कुठे प्रश्न् राहिला.आता एनआयटी बरखास्त होण्याचा प्रश्न्च उद्भवत नाही अशी एक पिटीशन नागपूर बेंचमध्ये दाखल केली आणि त्याच्यावर सुनावणी होवून मा. उच्च् न्यायालयाने १३.६.२०१८ रोजी अंतरिम आदेश पारित करुन स्टे दिला. एनआयटीच्या बरखास्तीच्या संदर्भात कुठलाही धोरणात्मक निर्णय घेवु नये अशा संदर्भातला निर्णय मा.उच्च् न्यायालयाने दिला.मा.महापौरजी, या हस्तांतरणाच्या प्रक्रियेची प्रगती किती झाली या संदर्भामध्ये मी माझ्या अधिकाराअंतर्गत प्रश्न विचारला त्यावेळेस मा.महापौरजी यांनी अशी भुमिका घेतली की हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहेआणि या प्रकरणामध्ये स्टे असल्यामुळे तुम्हांला या विषयावर चर्चा करता येणार नाही. हे आपल्या प्रोसिडिंगमध्येआहे. त्यावेळेस सत्तापक्षाने अशी भुमिका घेतली, तात्कालीन महापौरांनी अशी भुमिका घेतली की हे एनआयटीच्या बरखास्तीच्या संदर्भातील हे प्रकरण न्यायप्रविष्ठआहे आणि या प्रकरणामध्ये उच्च् न्यायालयानी स्टे आदेश दिल्यामुळे त्याच्यावर कुठलीही चर्चा करता येणार नाही, तुम्हाला या विषयावर बोलता येणार नाही. काही निर्णय घेता येणार नाही. मा. महापौरजी, त्यावेळेस सत्तापक्षाच्या आणि तत्कालीन महापौरांच्या या भुमिकेशी आम्ही सहमत होतो. न्यायप्रविष्ठ प्रकरण आहे आणि न्यायालयाच्या चुकुन आपल्या हातून अवमान होवू नये म्हणून आम्ही ही त्या प्रश्नावर चर्चा केली नाही. दुसरा एक आदेशआला, १०.१०.२०१८ ला उच्च् न्यायालयाचा क्रोनालॉजी फार महत्वाची आहे याच्यामध्ये, त्याला समजा. १०.१०.२०१८ ला उच्च् न्यायालयाने म्हटले, जुना जो स्थगितीचाआदेश आहे तो कायम ठेवतो मात्र (वाचले) उच्च् न्यायालयाने म्हटले,धोरणात्मक निर्णय घेवू नये. मंत्रीमंडळाच्या निर्णयाने, मात्र राज्य सरकारला जर वाटत असेल तर बरखास्तीच्या संदर्भात नवीन आदेश कायद्याप्रमाणे तुम्हांला योग्य वाटतअसेल तर आदेश निर्गमित करु शकता. मा. महापौरजी, हा विषय २०१८ नंतर पुर्णत: थंडबस्त्यात गेला.पुन्हा पहिल्यांदा हा विषय केव्हाआला, ऑक्टोबर महिन्याचा कोर्टाचा निर्णय झाला. ऑक्टोबर महिन्यामध्ये कोर्टानी सांगून दिले की राज्य सरकार या संदर्भात निर्णय घेण्यासाठी मोकळेआहे. यानंतर या समितीची कुठलीही बैठक पुढे सरकली नाही. मा. महापौरजी, या संदर्भात थेट २७ ऑगस्ट २०१९ ला राज्य शासनानी एक शासन आदेश पारीत केला. हा शासनआदेश कशाच्या आधारावर केला. तो केला एमआरटीपी ॲक्ट नुसार, एमआरटीपी ॲक्टच्या कलम २(१५) अन्वये त्या त्या शहराचे नियोजन प्राधिकरण् कोण कोण असावे ते निर्धारित करण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे. त्या अधिकाराचा वापर करीत राज्य शासनाने २७ ऑगष्ट २०१९ रोजी एक निर्णय घेतला. २७ ऑगस्ट लाच कां घेतला त्याचे कारण पुढे सांगतो. त्या काळात आचारसंहिता होती आणि विधानसभेच्या निवडणुकीची पार्श्वभुमी होती. ऑक्टोबर महिन्यामध्ये विधानसभेची निवडणुक होणार होती आणि शहरातील जनतेला पुन्हा एकदा भ्रमित करण्याचे काम या शासन निर्णयाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न झाला. आणि या शासन निर्णयामध्ये सात योजना ज्याचे क्षेत्राफळ ७२०८ हेक्टर आहे. याच्यासाठीचा नियोजन प्राधिकरण नागपूर महानगरपालिका घोषित करण्यात आली आणि एनआयटीचे प्लानिंग ॲथारिटीचे अधिकार विड्राल करुन टाकले. मा. महापौरजी, हा शासन झाल्यानंतर संपुर्ण शहरामध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. हया माणसाने आपल्याला वचन दिले होते त्यांनी आपले वचन पुर्ण केले. आता आमचे अविनाश भाऊ म्हणाले, जनतेच्या मताशी खेळु नये, त्यांचे म्हणणे खरे आहे जनतेच्या मताशी खेळु नये. मोठया जाहिराती झाल्या,आणि जाहिरातीमध्ये सांगण्यात आले की आम्ही जो शब्द दिला होता तो पाळला, नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त केली. वास्तविक पाहता नागपुर सुधार प्रन्यासचा नियोजन प्राधिकारीणी म्हणुन जो अधिकार होता त्या सात स्किमपुरता तो

विड्राल केलाआाणि त्या क्षेत्राकरिता नियोजन प्राधिकरण् नागपूर महानगरपालिका आहे. प्रश्न असा पडतो ज्या एनआयटीच्या प्रापर्टीज आहेत त्या महानगरपालिकेकडे या निर्णयामुळे हस्तांतरीत होणार आहेत काय ? ज्या योजनासाठी एनआयटी मालक आहे. त्याची मालकी या निर्णयामुळे महानगरपालिकेकडे येणारच आहे. आपण खूप वाहवा केली. मा.महापौरजी, डॉ.भोयर यांनी म्हटले या शहराने अनेक राजकीय पक्षाचे हिशेब चुकते केले आहे. डॉ. भोयर साहेबांनी एक चांगला मुद्दा उपस्थित केला कि या शहराचा एक इतिहास आहे या शहराने अनेकाचे हिशेब सेटल करुन टाकले. मा. महापौरजी, २०१४ मध्ये एनआयटीच्या बरखास्तीचे जे आश्वासन घेवून तुम्ही आले होते ते फसवे होते. या शहराच्या जनतेने जसे अंशत: तुमचा हिशेब सेटल केला, सहा वरुन तुम्ही चारवर आले. जसे अंशत: तुम्ही एनआयटी बरखास्त केली होती. पुरुषोत्त्म हजारे यांचे तिकीट जर थोडे आधी जर जाहीर झाले असते तर आमचे दोनचे तीन झाले असते. सत्तेमध्ये काही मिळविण्यासाठी रहावे लागते हा जो आपला विचार आहे तो चुकीचा आहे. मा.महापौरजी,आम्ही सत्तेमध्ये काही मिळविण्यासाठी अजिबात नाही. मी उदाहरण सांगतो. एनआयटीच्या बरखास्तीच्या संदर्भात अनेक मा.सदस्यांनी या ठिकाणी चर्चा केली. १९९५ मध्ये मला आठवते, माझे वडील श्री. विनोद गुडधे पाटील भारतीय जनता पार्टीचे आमदार होते. त्यावेळी राज्यामध्ये युतीचे सरकार होते. आणि विधानसभेचा सदस्य एनआयटीवर ट्रस्टी म्हणून जातो. एनआयटीवर ट्रस्टी म्हणून पाठविण्यासाठी पक्षांनी विनोद गुडधे पाटील यांचे नाव सुचविले होते . ज्या संस्थेच्या बरखास्तीची मागणी मी सातत्याने करतो, मी ज्या संस्थेच्या विरोधामध्ये आहे, ज्या संस्थेच्या विरोधामध्ये लोकभावना आहेत तेथे मी ट्रस्टी म्हणून जाणार नाही असा निर्णय माझ्या वडीलांनी त्यावेळेस घेतला होता. मा.महापौरजी, एनआयटीच्या बरखास्तीचा खेळखंडोबा हा इथपर्यंत आला.मा. महापौरजी, राज्यामध्ये निवडणुका झाल्या आणि त्या सरकारचा घोळ महिनाभर चालला आणि सर्व लोक त्याचे साक्षीदार आहे. त्यावेळेस मी पुन्हा सभागृहामध्ये एक प्रश्न लावला होता की एनआयटीकडून फाईल्स किती आल्या आहेत. तेव्हा मी या इम्प्रेशनमध्ये होतो की नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाली आहे. मी प्रश्न काय लावला होता की नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाल्यानंतर गुंठेवारी नियमाअंतर्गत अनधिकृत अभिन्यास नियमितीकरण नागपूर महानगरपालिका करणार आहे काय ? असा माझा प्रश्न होता. मी प्रश्न चुकीचा टाकला होता परंतु महानगरपालिकेने सुध्दा उत्तर देवून टाकले बरखास्त झाली आहे. २०.१२.२०१९ चे हे पत्र आहे. माझा बेसिक प्रश्न गुंठेवारीचा होता, गुंठेवारीच्या नियमाच्या अंतर्गत, एनआयटी म्हणत होती की आम्हांला अधिकार राहिला नाही. महानगरपालिकेकडे लोकांच्या चकरा सुरु झाल्या होत्या, लोक त्रस्त झाले होते. कार्पोरेशनमध्ये फाईल्स आल्या नाहीत आणि मोठया प्रमाणात तक्रारी येवून राहिलेल्या होत्या आणि त्या तक्रारीच्या अनुषंगाने मी हा प्रश्न टाकला होता. मात्र हा प्रश्न चर्चेला आला नाही. त्याचे जे उत्तर दिले होते त्यामध्ये त्यांनी दिले की आमच्याकडे गुंठेवारी अधिनियमाची अंमलबजावणी सध्या स्थितीत नगररचना विभागाकडून महानगरपालिकेत उपलब्ध मनुष्यबळानुसार सुरु आहे. सध्या महानगरपालिकेकडे मनुष्यबळ कमी असून नगररचना विभागाला एक नगररचनाकार, दोन उपअभियंता, चार कनिष्ठ अभियंता, चार स्थापत्य अभियांत्रिकी सहायक व तीन अतांत्रिक कर्मचारी अधिकारी कार्यरत आहेत. या कार्यालयाचे पत्र २८.११.१९ अन्वये १५ अभियांत्रिकी सहायक, ६ लिपीक, चार चपराशी , दप्तरबंद चार याप्रमाणे महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्याची मागणी केली आहे. तसेच नासुप्रकडे असलेले अभिन्यास कक्ष जोपर्यंत महानगरपालिकेकडे अभिन्यास कक्षांची उपलब्धता होत नाही तोपर्यंत नासुप्र येथिल अभिन्यास कक्ष उपलब्ध करुन देण्यात यावे असे एनआयटीला कळविण्यात आले आहे. तसेच नागपुर

सुधार प्रन्यासकडे प्रतिनियुक्तीने मागविण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचा-यां व्यतिरिक्त १५ अभियांत्रिकी सहायकाची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत प्रस्ताव संबंधित विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.असे टिपीकल उत्तर आले आहे. आपल्याकडे पर्याप्त मनुष्यबळ नाही, आणि पर्याप्त मनुष्यबळ नसेल तर जवळपास लेआऊट बघितले तर १४००-१५०० आहेत आणि साधारणत- ७१००० भुखंडधारक असे आहे ज्यांचे अजुनपर्यंत नियमितीकरण झालेले नाही. त्याचे कारण वेगवेगळे आहे. गुंठेवारीची अंमलबजावणी ज्या कालखंडामध्ये झाली त्या कालखंडामध्ये सरसकट आरक्षण व्यापगत करण्याचे काम एनआयटीमार्फत सुरु होते. त्याही वेळेस एक याचिका दाखल झाली होती. आणि सांगितले की असा आरक्षण वगळयाचा अधिकार या समितीमार्फत एनआयटीला नाही. त्यामुळे ज्या आरक्षणाखाली अभिन्यास आहेत, लेआऊट आहेत. डीपीमध्ये ज्याचे आरक्षण आहे त्याठिकाणी वस्ती होवुन गेलेली आहे. २००० च्या आधीच्या त्यांच्या रजिस्ट्रया होवून गेल्या आहेत अशाही लोकांचे अजूनपर्यंत नियमितीकरण झालेले नाही. त्या संदर्भामध्ये वेगळा निर्णय घेणे अपेक्षित आहे. राज्य शासनाने मधल्या काळात निर्णय घेतला ५० टक्केपेक्षा अधिक भुखंडावर बांधकाम झाले असेल त्याचा आरक्षण वगळण्यात यावा असा एक निर्णय घेतला आहे. म्हणजे एक लक्षात घ्या,गुंठेवारीच्या अभिन्यासातील अंमलबजावणीचे पण काम एनआयटीच्या माध्यमातून राहिलेले आहे. नागरिकांच्या तक्रारी येवून राहिल्या होत्या आणि नागपूर महानगरपालिकेमध्ये मनुष्यबळाच्या अभावी आणि आपल्या प्रशासनीक दिरंगाईमुळे लोकांना त्रास होत होता. त्यामुळे या त्रासामुळे लोकांच्या तक्रारी लोकप्रतिनिधीकडे येत होती. या तक्रारीची दखल घ्यावी म्हणून आम्ही अशा पध्दतीचे प्रश्न टाकले. आम्ही आमच्या स्तरावर ते प्रश्न टाकले. मा.पालमंत्र्यांनी त्याच तक्रारीच्या अनुषंगाने राज्य शासनाकडे पत्र दिले. नागपूर महानगरपालिकेमध्ये गुंठेवारीच्या संदर्भात लोकांच्या अजूनही तक्रारी येत आहेत.आणि एनआयटी बरखास्त झालेली नाही अशा स्थितीमध्ये गुंठेवारी क्षेत्राचे जे नियोजन प्राधिकरण आहे ते रिस्टोर करावे आणि ते एनआयटीकडे दयावे. आणि सात योजनांचे सुध्दा अजून काम पुर्ण न झाल्यामुळे आपण त्या संपुर्ण योजनेसह गुंठेवारी कामाकरिता आपण एनआयटीला प्लॉनिंग ॲथारिटी म्हणून घोषित करावे असे मागणी करणारे पत्र मा.मुख्यमंत्र्यांना गेले.आता मा.मुख्यंमंत्र्यांनी त्याच्या अनुषंगाने एनआयटी आणि महानगरपालिकेला अहवाल मागितला, नैसर्गिक न्याय जनतेच्या दृष्टीकोनातून आपले म्हणणे काय आहे ते कळवा. मा.महापौरजी, ही कृती काही चुकीची आहे काय ? मा.मुख्यमंत्र्यांना वाटते कि, ज्या शहराच्या पालकमंत्र्याकडून अशी मागणी आली आहे आणि ज्या संस्थेचे अधिकार आपण काढून राहिलो त्या संस्थेचे मत मागवून घेतले पाहिजे. म्हणून राज्य सरकारचे पत्र नागपूर महानगरपालिकेला आले आहे. राज्य सरकारचे पत्र जसे महानगरपालिकेला आले या शहरामध्ये एक नवीन गदारोळ सुरु झाला. दटकेसाहेबांनी पण पत्रकारपरिषद घेतली.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, गदारोळ सुरु झाल्याचा काही विषय नाही. एका महान पालकमंत्र्यांनी पत्र दिले.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, गदारोळ मध्ये तुमचा काय पाईंट ऑफ आर्डर आहे.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, गदारोळ म्हणजे काय ते मला सांगावयाचे आहे. मागणी केली, विनंती केली ठीक आहे. गदारोळ म्हणजे काय ? या शहराच्या महान पालकमंत्र्यांनी समजा इतका त्रास होत आहे तर त्या वेळेच्या आयुक्तांशी काय चर्चा केली. येथले महापौर, आयुक्त आणि एनआयटीच्या चेअरमनला घेवून

किती बैठका केल्या. सरसकट पत्र देवून द्यायचे आणि आपला मुद्दा सोडून दयायचा. या शहरात त्यांच्या आधी श्री.बावनकुळे साहेब पालकमंत्री होते, नितीनजी पालकमंत्री होते ते कितीवेळा जनतेसमोर जावून बसले आणि हे किती वेळा जनतेमध्ये जावून बसले. त्यांच्या हेतूवर आमचा मुद्दा आहे. त्यामुळे त्यांनी जस्ट पत्र देवून दिले, पालकमंत्री म्हणून त्यांची जबाबदारी काय आहे. महानगरपालिका भाजप, कॉग्रेसची थोडी आहे.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, दटकेजी मी आपल्या माहितीकरिता सांगतो. पालकमंत्री महोदयांचा हेतू काय होता तो मुद्दा आपण आपल्या भाषणात डिस्कस करु.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, मा.महापौरजीच्या माध्यमातून प्रशासनाला माझी विनंती आहे. या मुद्यावर पालकंमंत्र्यांनी किती बैठका घेतल्या त्याची माहिति सभागृहाला सांगण्यात यावी. प्रशासनीक किती बैठका घेतल्या कि हया नागरिकांच्या तक्रारी येवून राहिल्या आहेत. जनता दरबार घेतला, असे किती पत्र महानगरपालिकेला आले याची माहिती देण्यात यावी.

श्री.गावंडे(उप संचालक, नगररचना):-मा.महापौरजी, अशा प्रकारच्या कोणत्याही बैठका आयोजित करण्यात आलेल्या नाहीत.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, तक्रारी हया लिखित स्वरुपातच येतात असे नाही. नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त कराअसे काही लोकांनी पत्राद्वारे कळविले नव्हते.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, या सभागृहाने एक वेळा नाही तर चार-चार वेळा प्रस्ताव पाठविला आहे.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, या प्रस्तावाला आम्ही पण समर्थन दिलेले आहे. चला, पालकमंत्र्यांनी बैठक घेतली नसेल मा.महापौरजी यांनी बैठक घेतली असेल त्याची माहिती दया.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, मा.महापौरजी माझ्याकडे एक पत्र आहे, ६ डिसेबर २००२ चे, त्या काळच्या सरकारनी हे पत्र काढले हे सत्यप्रत आहे. २७ फेब्रुवारी २०२० ला महानगरपालिकेकडे जे अधिकार, जे लेआऊट आले होते. त्यातील गुंठेवारीचे काम परत एनआयटीकडे पाठविले ते पत्र माझ्याकडे आहे. त्या दिवशी त्यांनी पत्र काढले नसते तर त्याच दिवशी एनआयटी बरखास्त झाली असती.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, हा गुंठेवारी ॲक्ट आहे २००१ चा, हा गुंठेवारी ॲक्ट जो आला २००१ ला त्याच्या कलम २० (ए) अन्वये नागापूर सुधार प्रन्यास ला बाकी शहरासाठी महानगरपालिका होती परंतु नागपूर शहरासाठी नागपुर सुधार प्रन्यास होती. या ॲक्टमध्ये काय म्हटले आहे या नागपूर सुधार प्रन्यासला या क्षेत्राच्यासंदर्भामध्ये जेथे नागपूर सुधार प्रन्यास आहे त्यासाठी प्लॉनिंग ॲथारिटी ही एनआयटी राहील.

श्री.प्रविण दटके:-तुम्ही काय करता मिसप्लीट करता आहा. २७ फेब्रुवारी २००२ ला एक आदेश निघाला की आता हे संबंधित अधिकार नागपूर महानगरपालिकेला जातील. त्या आदेशाच्या विरोधात परत एक आदेश निघाला कि ६ डिसेंबर २००२ यामध्ये नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत येणा-या लेआऊटमध्ये जो गुंठेवारीचे कामकाज एनआयटीकडेच राहील. हा आदेश आहे. हे पाप केले तुमच्या सरकारनी.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, आमचे पापी सरकार आहे, आमचे जुलमी सरकार आहे हे आम्ही करतो. या शहरामध्ये संभ्रम निर्माण झाला. गुंठेवारी रेग्युलाईजेशन एकाच शहरामध्ये दोन ॲथारिटी करुन राहिलेली

आहे. त्यामुळे काही लोक नागपूर सुधार प्रन्यासकडे अर्ज करुन राहिले तर काही लोक नागपूर महानगरपालिकेकडे अर्ज करुन राहिले. त्यामुळे ६ डिसेंबर २००२ मध्ये राज्य शासनाने पुन्हा एक आदेश काढला कि या सात स्कीम व्यतिरिक्त गुंठेवारीची अंमलबजावणी एकाच शहरामध्ये एनआयटीला राहील. मा.महापौरजी, हा जो शासन आदेश आला,तो गुंठेवारी अधिनियमाच्या कलम २१ अन्वये आला. एक कलम २० (३) अन्वये झाला आणि एक २१ अन्वये, जर राज्य शासनाला वाटत असेल तर (वाचले) या कलमामध्ये म्हटले आहे की वेळोवेळी जे जे प्लॉनिंग ॲथारिटी निर्धारित करेल, त्यांनी अंमलबजावणी करावयाची आहे. त्या अनुषंगाने या ॲक्टची अंमलबजावणी करण्यासाठी हे शासनाने २००२ मध्ये शासन आदेश निर्गमित केले. त्यामुळे इंटायर शहरासाठी गुंठेवारीच्या अंमलबजावणीसाठी प्लॉनिंग ॲथारिटी म्हणून एनआयटी झाली आणि आता आपण ज्या मंत्रीमंडळाच्या निर्णयाच्या आणि २७ऑगष्ट २०१९ च्या शासन निर्णयाचा उल्लेख करता आणि खुप मोठा ढिंढोरा पिटला की आम्ही एनआयटी बरखास्त केली, आम्ही एनआयटी बरखास्त केली. तर हा शासन निर्णय काय आहे तर एमआरटीपी ॲक्टच्या २(१५) अन्वये प्लॉनिंग ॲथारिटी चेंज केली. कुठल्या क्षेत्रासाठी केली तर फक्त त्या सात स्कीमसाठी केली.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, , पाईंट ऑफ आर्डर, माझी आपल्या माध्यमातून प्रशासनाला विनंती आहे कि, त्या जी.आर.चा शेवटचा पॅरीग्राफ येथे वाचावा आणि त्याचे इन्टरप्रीट्रीशन प्रशासनाने काय आहे ते सांगावे

महापौर:- प्रशासनाने वाचन करावे.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, तो कुठल्या कायद्याच्या, कुठल्या कलमान्वये तो शासन निर्णय झाला हे पण वाचन करा.

श्री.गावंडे(उप संचालक, नगररचना):-मा.महापौरजी, शासनाने दिनांक २७.०८.२०१९ ला जो निर्णय पारीत केलेला आहे तो महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २(१५) हा नियोजन प्राधिकरणाच्या व्याख्येबाबत नमुद केलेला आहे.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, याच्या सोबत ६ डिसेंबर २००२ चा तो कुठल्या कायद्याच्या कुठल्या कलमान्वये झाला तेही वाचावे.

श्री.गावंडे(उप संचालक, नगररचना):-मा.महापौरजी,(वाचले) एनआयटीच्या स्कीम अंतर्गत आणि एनआयटीनी भुसंपादन केलेल्या आणि त्यावर अभिन्यास केलेल्या आणि लिजवर दिलेल्या सरसकट...

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, गुंठेवारी कायद्याच्या कलम २१ अन्वये राज्य शासनाला जो अधिकार आहे. त्या अधिकारा अन्वये एनआयटीला प्लॉनिंग ॲथारिटी केली आहे. हा राज्य शासनाने रद्द केली आहे काय ?

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, सन्माननीय सदस्य पुछ रहे है की एनआयटी ने जो प्लॉट अलॉट किये है अर्थात एनआयटीने जिन स्कीमो को डेव्हल्प किया है, उसके अलावा गुंठेवारीमे किये गये जो क्षेत्र है, एनआयटी के है या नही है यह विवाद का विषय नही है. हम जो आर एल लेटर देते है यह आर एल लेटर देने का अधिकार किस संस्था को किस अवस्था मे प्राप्त होता है

श्री.गावंडे(उप संचालक, नगररचना):-मा.महापौरजी, रेग्युलेशन लेटर महाराष्ट्र गुंठेवारी ॲक्ट अधिनियमाच्या अनुषंगाने एनआयटीनी ज्या ज्या भागामध्ये अनधिकृत लेआऊटच्या विकासासाठी जे भुखंड पाडले होते त्याचे अभिन्यास मंजूर केले होते. त्याच्या मधल्या भुखंड नियमितीकरणा संदर्भात जे विकास

शुल्कआकारुन नियमितीकरणाच्या संदर्भात आपण भुखंडधारकाला जो भुखंड १.१.२००० च्या पूर्वी त्यांनी कब्जा पत्र केलेले असेल किंवा शासनाने निर्णय नमुद केले असेल की १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर कब्जा पत्राची प्रत उपलब्ध असेल तर त्याला सुध्दा आर एल हा देयक होतो परंतु त्यांनी विकास आकार संबंधित संस्थेत भरणा केला पाहिजे.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, प्लॉनिंग ॲथारिटी कार्पोरेशन राहिली पाहिजे. हा अजूनही विड्राल झालेला नाही आहे. आता प्रश्न असा आहे की या शहराचे नियोजन कुणी करावे. शहराचे नियोजन नागपूर सुधार प्रन्यासनी करावे की नागपूर महानगरपालिकेने करावे. मा.महापौरजी, या शहराची लोकभावना सातत्याने नागपूर महानगरपालिका असली पाहिजे हे एवढयासाठीच आहे. कारण लोकशाही मध्ये आपण ऑन्सरेबल आहे. एनआयटी ऑन्सरेबल राहत नाही. निर्वाचित लोकांनी चांगले केले, वाईट केले, चुक केले, बरोबर केले त्यासाठी लोकप्रतिनधी जबाबदार असतात आणि दोन-चार वर्षानी त्यांना उत्तर दयावे लागते. त्यांनी सांगितले हे शहर हिशेब चुकते करते, हिशेब चुकते करावे लागते. त्याला जबाबदारी आमची आहे. एनआयटीकडे अशी कुठलीही जबाबदारी निश्चित होत नाही. केल्या जात नाही म्हणून सातत्याने लोकभावना एनआयटीच्या विरोधात आहे. मा.महापौरजी, मात्र एनआयटीचे राजनैतिक वापर फक्त कॉग्रेसने केला, आम्ही मात्र स्वच्छ धुतलेल्या तांदुळासारखे आहोत या अविर्भावात आपण असेल तर मला असे वाटते कि हे म्हणणे चुकीचे होईल. मा.महापौरजी, मी आताच सांगितले, महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर, विधानसभा निवडणुकीच्या पाश्वभुमीवर एनआयटी बरखास्त करण्याची कार्यवाही न करता फक्त शासन निर्णय घेवून राहिलो. वेगवेगळया कलमांचा आधार घेत आपण प्लॉनिंग ॲथारिटी चेंज करुन राहिलो त्यामुळे आपला जो विषय आहे या मालमत्ता हस्तांतरीत करण्याचा, मग या स्थितीमध्ये आपल्याकडे काय हस्तांतरीत होणार आहे. गुंठेवारी अंतर्गत सगळे कागदपत्रे, उर्वरित डिमांड काढणे हे आपले काम राहील. त्या संदर्भात माझे वेगळे मत आहे. त्या मताच्या संदर्भात अजून निश्चिती झालेली नाही. दुसरे काय होईल, प्लॉनिंग ॲथारिटी म्हणून पुढच्या काळाकरिता डीपी प्लॉन तयार करावयाचे आहे. तो डयु झालेला आहे. २००१ ला डीपी तयार झाला आता २०२० आलेला आहे. त्या क्षेत्रासाठीचा डीपी प्लॉन आता आपण तयार करु. पण एनआयटीचे जे प्रोजेक्ट आहेत ते हस्तांतरीत होणार आहेत काय ? मा.महापौरजी. हस्तांतरीत काय करुन घेवून राहिलो त्याचे कर्मचारी हस्तांतरीत होणार आहे काय ? आपल्या पक्षाच्या कार्यकाळामध्ये जो निर्णय झाला, त्या निर्णयाच्या अनुषंगाने कुठल्या कुठल्या गोष्टी हस्तांतरीत करुन घेणार आहे. मा.महापौरजी, फक्त बिल्डींग प्लॉन मंजूरी आणि आरएल लेटर काढण्याचे काम याशिवाय नियोजन करणे या शहराचा विकास आराखडा तयार करणे आणि जुन्या विकास आराखडयामध्ये जे आरक्षण आहे ते आरक्षण अधिगृहीत करणे या पलिकडे कुठलेही एक इंच जमीन आपल्याकडे हस्तांतरीत होणार नाही त्यामुळे आपण कुठल्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेवर चर्चा करीत आहे. या सात स्कीममध्ये जयताळा, शिवणगांव पण आहे. त्याला सॅक्शन आम्ही एनआयटीच्या माध्यमातून आतापर्यंत घेत होतो पण बिल्डींग प्लॅन सॅग्शन करावयाचा असेल तर कार्पोरेशनकडे जाईल. त्या लेआऊटची नस्ती एनआयटीकडे होती ती आता कार्पोरेशनमध्ये येईल आणि फक्त बिल्डींग प्लॅन सॅग्शन होईल. एनआयटी डिमांड काढीत होती आता कार्पोरेशन काढणार आहे. मा.महापौरजी, या शहरामध्ये सर्व नागरिकांना वाटते कि एनआयटी बरखास्त झाली आहे आणि त्यांच्या सर्व मालमत्ता कार्पोरेशनकडे आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने एक इंच ही जमीन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणार नाही. बीओटीच्या तत्वावर जे प्रकल्प सुरु आहेत ते एक प्रकल्प

महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणार नाही. त्यामुळे खरी फसवणुक कोणी केली या चर्चेच्या उत्तरामध्ये आपल्या लक्षात येईल

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमेशन, आज या सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये हस्तांतरण शब्द युज होत आहे.

श्री.प्रफुल गुडधे:-मा.महापौरजी, पाइंट ऑफ इन्फोमेशन, मा.महापौरजी, हा विषय क्रमांक ५६ नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यांच्या हस्तांतरणाची प्रक्रियेवर विशेष चर्चा करण्यासाठी हे सभागृह भरलेले आहे. आपल्याला हस्तांतरण काय करुन घ्यावयाचे आहे आणि हस्तांतरण कशाच्या आधारावर करावयाचे आहे. २७ ऑगष्ट २०१९ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने करुन घ्यावयाचे आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, २७ ऑगष्टचा जो आदेश आहे तो एमआरटीपी अॅक्टचा आहे, मुद्या हाच महत्वाचा आहे, एम.आर.टी.पी. अॅक्ट पहिलेपासून अस्तित्वात होता, राज्य सरकारला जो अधिकार एमआरटीपी अॅक्टनी दिलेला आहे त्या अधिकाराच्या अंतर्गत हया सगळया गोष्टी सुरु आहे, आणि त्याच्यामध्ये एनआयटीच्या मालकीच्या ज्या प्रापर्टी आहे, त्या सगळया हस्तांतरीत होणार आहे.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, त्या मालमत्तांची मालकी आपली होणार आहे काय ? जर त्या मालमत्ता आपल्या होणार असेल तर कार्यालयानी याची माहिती द्यावी.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, सामान्य माणसाला त्याच्याशी काही घेणेदेणे नाही, समजा माझी अडचण असेल तर मी ट्रस्टीला भेटण्यापेक्षा माझी अडचण मी माझ्या प्रभागातील नगरसेवकांना सांगुन मी अडचण दुर करीन. आरएल मिळणार आहे, मॅप सॅक्शन होणार आहे, अमका तमका झाला काय, बीओटीचे प्रोजेक्ट झाले काय ? याच्याशी सामान्य व्यक्तिला काही देणेघेणे नाही.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, तुम्ही लक्षात घ्या, राजकीय पक्षांनी एनआयटी चा राजकीय वापर केलेला आहे, कदाचित काँग्रेस पक्षांनी ही केला असेल, हा मुद्दा अत्यंत स्पष्ट आहे, विधान सभेच्या महानगरपालिकेच्या निवडणुका लक्षात घेवून आपण शहरातील जनतेला एनआयटी बरखास्तीचे खोटे आश्वासन दिले, निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर शहरातील जनतेची फसवणुक केली. आणि एनआयटी अजूनपर्यंत बरखास्त झालेली नाही, ही वास्तविकता आहे. मी तेच सांगतो आहे कि एनआयटी बरखास्तीचा आपण भ्रम निर्माण केला आहे. हे काम निश्चितपणाने आपल्या सरकारच्या काळामध्ये झालेले आहे, याचा फटका शहरातील जनतेला बसला आहे. मी कोणाचे नांव घेणार नाही, मी कोणाची निंदा करणार नाही, त्या त्या सरकारला त्या त्यावेळी ज्या ज्या अनुषंगिक गोष्ट करणे गरजेचे वाटते त्या त्या गोष्टी ते करतात. आज लोक कार्पोरेशनमध्ये येवुन राहिले आहे, त्यांना याठिकाणावरुन एनआयटी मध्ये पाठविण्यांत येते, ते एनआयटी मध्ये गेले तर त्यांना कार्पोरेशनमध्ये पाठविण्यांत येत आहे. आपल्याला दर पांच वर्षानी हिशोब देण्यासाठी जनतेसमोर जावे लागते, आपल्याला ही जावे लागणार नाही, निश्चितपणे शहरातील जनता अशी मनमानी कधीही सहन करणार नाही. लोकशाहीमध्ये अशी मनमानी चालत नाही. लोकशाहीवर आमचा पुर्ण विश्वास आहे. आपल्या हातुन चुका झाल्या आपण खोटे आश्वासन देवुन या शहरातील जनतेची फस्वणुक केली, एनआयटी बरखासत करण्याचा भ्रम आपण निर्माण केला, येवढेच मी याठिकाणी नमुद करतो. मात्र एनआयटी बरखास्त झाली पाहिजे, या सभागृहाच्या मतासोबत मी आहे, व पुढे ही राहिल, हा शब्द मी आपल्याला देतो व येथेच थांबतो. धन्यवाद.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यह नागपूर विद्यापीठ का नाम है, लेकिन इस सभागृह मे चर्चा मे जब हरीशजी राष्ट्रसंत के विचारो से शुरु होते है, और प्रफुलजी जब राष्ट्रसंत के विचार पर आकर के समाप्त होते है, अभी तानाजी बाकी है, राष्ट्रसंत तो अमर है, तो बडा आश्चर्यसा महसुस होता है, उन्होने राष्ट्रसंत का विचार रखा साथ मे भ्रम उत्पन्न करने की बात कही. मा.महापौरजी, एक विद्यार्थी से विद्यालय मे शिक्षक ने पुछा कि भ्रम और विश्वास मे क्या अंतर है, तो उस विद्यार्थी ने अपने शिक्षक को उत्तर दिया कि, आप हमे पढारहे है यह तो विश्वास के काबिल है लेकिन हम वह समझ् रहे है यह

आपका भ्रम है. फिर उसने दुसरा प्रश्न किया कि अच्छा एक चिज बताओ कि दुर्भाग्य और दुर्घटना मे क्या अंतर है, तो विद्यार्थी बोले आप पढारहे है और स्कुल की छत आपके ऊपर गिरगयी, यह दुर्घटना है और उसके बाद भी आप बचगये तो यह हमारा दुर्भाग्य है. मा.महापौरजी, यह बडे विचित्रसे विषय है, एक क्रोनॉलॉजी आर्डर निकाला प्रफुलजी ने, प्रफुलजी मैं भी एक क्रोनॉलॉजी आर्डर बताता हुँ, मा.महापौरजी, जान गोपाल ने हिंदुस्थान का दौरा करने का निर्णय लिया, उस समय भारत के प्रधानमंत्री स्वर्गीय राजीव गांधीजी थे, और जैसे ही उन्होने  भारत का दौरा करने का निर्णय लिया हिंदु विश्व परिषद के तत्कालीन अध्यक्ष मलकानीजी इन्होने एक प्रेस कॉफ्रेंस लेकर के कहा कि राष्ट्रपिता महात्मा गांधीने जब जॉन गोपाल से मिलने का समय मांगा था तो जॉन गोपाल ने महात्मा गांधीजी से कहां था कि, मैं गुलाम देश के गुलाम नागरिक से नही मिलना चाहता, और जिस आदमीने महात्मा गांधी से यह कहां था उसे मैं हिंदुस्थान के धरती पर पैर नही रखने दुंगा. और मा.महापौरजी, उसी समय सोनिजी घर मे और जो रोम से आरहे है उन्हे आने ना दे यह तो संभव नही था, तो सरकार निर्णय लेती है, सरकार ने प्रभु श्री रामचंद्रजी के जन्मभुमी का ताला खोलने का निर्णय ले लिया. अब मलकानीजी राम जन्म भुमी मे लगगये और जान गोपालजी दौरा करके वापस चले गये. और मुस्लिम नाराज हो गये तो शहाबानो का विषय लाया गया. मा.महापौरजी, ऐसे अनेक क्रोनॉलॉजी आर्डर है जो इस सभागृह मे बताये जा सकते है, मा.महापौरजी, राजकारणी यह शब्द क्यों बना, राजनैतिक निर्णय यह शब्द क्यों बना, हम प्रशासकीय निर्णय क्यों नही कहते, हम गर्व के साथ कहते है कि देवेंद्रजी ने जो निर्णय लिया वह राजकीय निर्णय है तो राजकारणी राजकीय ही निर्णय लेते है. और प्रशासन उसको अंगिकृत करता है, स्विकृत करता है, इसमे किसी भी प्रकार का कोई भ्रम नही है. और हमने राजनैतिक निर्णय लिया मैं तो क्रोनॉलॉजी आर्डर यह देखना चाह रहा था कि, २७ अगस्त २०१९ को महाराष्ट्र के तत्कालीन मुख्यमंत्री ने निर्णय लिया, और अगर वर्तमान पालकमंत्री उस निर्णय से सहमत नही थे तो रास्ते पर खडे होकर के उसी दिन विरोध कर देना चाहिये था, एक प्रेस कॉफ्रेंस लेनी चाहिये थी, बोलना चाहिये था कि पहले व्यवस्था खडी करो, व्यवस्था खडे किये बिना आप इतनी सारी यंत्रणा को कैसे संभालोगें, कुछ नही किया उन्होने और पालकमंत्री क्या कर रहे है, मा.महापौरजी, आज यहां इतने सारे अधिकारी बैठे है कोई मंत्री जब मिटींग लेता है, तो मिटींग को चेअर मिनिस्टर करता है और अधिकारी सामने बैठते है, हमने तो ऐसा भी पालकमंत्री देखा कि उसका एन.आय.टी.से इतना मोह था कि, चेअरमन चेअर पर बैठा रहता था और पालकमंत्री सामने बैठकर देखता रहता था. इतना मोह एन.आय.टी.से कि पालकमंत्री सामने बैठा है और आयएएस चेअर पर बैठा है, मा.महापौरजी, जिन्हे एनआयटी से इतना मोह रहा है उनको तो दुख होंगा ही, और दुख होना कोई गलत बात नही है, मैंने बहोत नजदीक से देखा है, पालकमंत्री सामने बैठा है और चेअर आयएएस अधिकारी कर रहा है, एनआयटी की मिटींग को चेअर चेअरमन ही करेगा वहां तो पालकमंत्री नही बैठ सकते, वह एज ऐ ट्रस्टी बैठा हुआ है आप कल्पना किजीये कि, एनआयटी मे मैंने रहना चाहिये और एनआयटी मेरे पास रहना चाहिये, इसलिये किस स्तर तक आदमी गिर सकता है इससे बडा उसका उदाहरण नही हो सकता. और यह बात इस शहर ने एक दो तीन साल नही पांच साल देखी है. मैं किसी का नाम नही लुंगा, प्रफुलजी ने कहां कि वर्तमान पालकमंत्री का पत्र गया, महानगरपालिका मे आया तो प्रविणजी ने गदारोळ प्रारंभ कर दिया, प्रविणजी को बुरा लगा, गदारोळ यह शब्द अच्छा नही है, प्रविणजी साहित्य मे गदारोळ यह उपमा है, जब युध्द मे लढने के लिये व्यक्ति जाता है, तो पुराने जमाने मे गदा लेकर ही जाता था, इसलिये मैं लडने को तैयार हुँ इसलिये गदा कंधे पर रखता था, आप भी रखयि हम आपके साथ गदारोळ करना चाहते है, आपके साथ सारी की सारी महानगरपालिका गदारोळ करने के लिये तैयार है. इसलिये गदारोळ शब्द के अनुसार हम गदारोळ करने को तैयार है जो हमारे आडे आयेगा उससे दो दो हाथ करने की तैयारी हमारी है, जनता के हित के लिये जिस चिज की आवश्यकता पडेगी वह हम जनता के हित के लिये लेने को तैयार है. मा.महापौरजी, बडी विचित्र विचित्र प्रकार की बाते यहां पर की गयी, मा.महापौरजी, १९३६ मे एक संस्था बनती है, और २०२० मे उसपर निर्णय होता है, पालकमंत्री का मैं नाम नही लुंगा, मैं नाम

लेकर के बोलना चाह रहा था, लेकिन मैं नाम नही लुंगा, वर्तमान पालकमंत्री ने एक पत्र मा.मुख्यमंत्री महोदय को दिया, और मा.मुख्यमंत्री महोदय ने उसपर टिप्पणी लिखी, और टिप्पणी मे लिखा कि मुद्या १ और मुद्या २ का स्पष्टीकरण महानगरपालिका ने देना चाहिये. मा.महापौरजी, यह पत्र प्रविणजी ने माहिती के अधिकार मे मांगा, मा.पालकमंत्री के पत्र मे मुद्या १ कही भी नही है, मुद्या २ कही भी नही है, और मुख्यमंत्री ने लिखा कि मुद्या १ और मुद्या २ पर टिप्पणी लिखो, पुरे पत्र मे मुद्या नही है १ नंबर का कौनसा और २ नंबर का कौनसा, यह तो छोडिये मा.महापौरजी, महाराष्ट्र के नही देश के इतिहास मे पहली बार हुआ होंगा कि पालकमंत्री ने मुख्यमंत्री को जो पत्र दिया वह निगम आयुक्त के पास उसके पन्ने निकालकर भेजा गया, कौनसे पाप की परिभाषा पालकमंत्री ने मुख्यमंत्री को दिये हुऐ पत्र मे लिखी थी वह जनता के सामने आनी चाहिये. पन्ने गायब है, हस्ताक्षर नही है, पेज के पेज गायब है और जिस पत्र के पेज गायब है उसपर निगम आयुक्त किसको मुद्या १ समझे और किसको मुद्या २ समझे.जब मुद्ये ही नही थे तो किस बात का जवाब देते. मा.महापौरजी, सोंची समझी राजनैतिक साजिश के तहत इस पत्र के पन्ने गायब कर दिये गये, मैं तो इस सभागृह से निवेदन करना चाहता हुॅ कि सभागृह ने निर्णय लेकर के मा.मुख्यमंत्री जी से कहना चाहिये. श्री उध्दव ठाकरे के पास एक पत्र देकर के सभागृह ने निर्णय लेना चाहिये, मा.मुख्यमंत्री जी आपके कार्यालय से नागपूर महानगरपालिका के आयुक्त को जो पत्र दिया गया, आपको बदनाम करने के लिये साजिश के अंतर्गत उसके पन्ने फाडकर के अलग फेंक दिये गये कारण आपके थोडे बहोत जो संबंध भारतीय जनता पार्टी से जिंदा है,वह फिर से खराब हो जाये यहां भारतीय जनता पार्टी की सरकार है इसलिये पन्ने फाडकर के फेंक दिये गये है. मा.महापौरजी, मुख्यमंत्री के कार्यालय से आये हुऐ पत्र के पन्ने गायब है, इससे ज्यादा दुर्भाग्य क्या हो सकता है, पन्ने क्यों गायब है, किसने गायब किये, किसके लिये गायब किये यह स्थापित होना नितांत आवश्यक है. मा.महापौरजी ८४ साल से जिस नागपूर सुधार प्रन्यास ने कुछ नही किया, २०२० मे नया साल आया और हर व्यक्ति नये साल की हार्दिक शुभकामनाऐ देता है, आप भी पालकमंत्री बन गये थे, आपने भी शुभकामनाऐ देना चाहिये थी, तो उन्होने २ जनवरी को पत्र लिखा, नया साल एक जनवरी को आया उन्होने २ जनवरी को पत्र लिखा, और मा.मुख्यमंत्रीजी ने देखा कि यह संक्रमण का काल है, इसलये संक्राती के पहले निर्णय हो जाना चाहिये, इसलिये १० जनवरी को उन्होने भी लिख दिया अब गडबड यह हो गयी कि, पतंग कटी और पन्ने फट गये, संक्रांत भी आकर चली गयी, २६ जनवरी भी आकर चले गयी, पन्ने गायब है. मा.महापौरजी, मैं यह जानना चाहता हुॅ कि ८४ साल जिस एनआयटी ने शहर का बंटाधार किया, और चार महिने मे महानगरपालिका वह सारे के सारे पाप को धोडालेगी जिसकी कल्पना आपने कैसे की और इसमे भी आचार संहिता का समय चुनाव का समय वह प्रसववेधना जब मुख्यमंत्री कौन बनेगा पुरा महाराष्ट्र परेशान हो रहा था, साडे तीन महिने तो इसी मे चलेगये और एक महिने मे ३० दिन मे तुमने क्या किया, यह प्रश्न आप कर रहे है, अरे वाह जी वाह, वाह आपको डॉक्टर की उपाधी सही मिली, डॉक्टर के लायक तो आपही है, आपने ८४ दिन तो देना था आप ३० दिन मे पुछ रहे है कि क्या हुआ. मा.महापौरजी, वर्तमान पालकमंत्री उस किचन कॅबिनेट के सदस्य है, जो पालकमंत्री चेअरमन के सामने कुर्सी पर बैठता था, इसलिये दोनो का एनआयटी का मोह एक जैसा है यह कहने मे मैं किसी प्रकार की अतिश्योक्ती नही समझता. मैं नाम नही लेरहा हुॅ लेकिन संजीदगी के साथ कह रहा हु कि मैं जो कह रहा हुॅ वह इस शहर की जनता समझती है और कॉंग्रेस मे गटो की राजनिती करनेवाले तो बहोत अच्छे से समझते है, मा.महापौरजी, मैं एक निवेदन करना चाहता हुॅ कोई भी व्यक्ति, कोई भी सरकार, कोई भी प्रशासन अगर कोई निर्णय लेती है तो उस निर्णय को एक्झीक्युट करनी की जबाबदारी अगर सरकार परिवर्तन हो गयी हो तो आनेवाली सरकार को करनी पडती है. मैं एक उदाहरण देना चाहुंगा कि, कारगिल का युध्द २००२ मे हुआ, सैन्य समितीने एक रिपोर्ट सौंपी कि नॅशनल पॉप्युलेशन रजिस्ट्रेशन होना चाहिये, एनपीआर बनना चाहिये, २००३ मे अटलबिहारी वाजपेयी की सरकार थी, मंत्रीमंडळ के समिती ने एनपीआर की रिपोर्ट तैयार करके सदन के पटल पर रखी, चार दिन के बाद सरकार चली गयी मनमोहन सिंह जी की सरकार आयी, अटलजी ने जो रिपोर्ट सादर की थी उसको कानुन मे परावर्तित करके एनपीआर

कंपल्सरी होना चाहिये, यह निर्णय मनमोहनजी की सरकार ने लिया. और एनपीआर कैसा होना चाहिये, इसकी समिती गठित की, उस समिती मे श्री पी.चिदंबरम, डॉ.कपिल सिब्बल इन सारे लोगो को रखा. और युडीआयने कहां कि आधार कार्ड मे त्रुटीया है इसलिये नया आयकार्ड देना चाहिये, यह क्रोनॉजीकल आर्डर है आनेवाली सरकार पिछले सरकार के निर्णयो की स्वरुप काम करती है, और २०१२ मे तत्कालीन पूर्व राष्ट्रपती प्रतिभाताई शेखावत को उनका आयकार्ड दिया गया, मैं प्रतिभाताई शेखावत इसलिये कहरहा हुँ कि, आयकार्ड मे शादी के बाद का ही नाम लिखा जाता है, इसलिये शेखावत कह रहा हुँ, प्रतिभाताई शेखावत को युडीआय का पहला कार्ड ७ जुलै २०१२ को दिया गया, सरकार बदली लेकिन सरकार के निर्णयो को पुर्ण करने का काम मा.प्रधानमंत्री श्री मनमोहन सिंहजी ने किया, और एनपीआर का आयकार्ड तत्कालीन राष्ट्रपती को दिया गया. यहां पर सरकार बदली सरकार ने निर्णय लिया था, जनता के हित मे निर्णय लिया था अब उस निर्णय को लागु करने के लिये वर्तमान सरकार के पालकमंत्री ने प्रयास करने चाहिये थे मिटींग लेकर उन्होने महानगरपालिका से पुछना चाहिये था कि एनआयटी ने आपको अधिकारी वर्ग दिया है या नही दिया है, कितनी फाईल्स हस्तांतरीत करी, अभी प्रफुलजी ने भाषण बहोत अच्छा दिया, लेकिन वह self contradactory भाषण था, प्रफुलजी ने अपने भाषण मे कहां कि महानगरपालिका क्या क्या करेगी, ७६००० फाईल तो ऐसी है, जिसका नियमितीकरण नही हुआ, उन्होने अपने भाषण मे कहां कि एनआयटी हस्तांतरण का जो निर्णय हुआ है, वह केवल सात स्कीम के लिये हुआ है, यह बात उन्होने अपने भाषण मे कही है. और उन्होने अपने भाषण मे उल्लेख किया कि इतने बडे झुंड को कैसे संभालोगे.

श्री प्रफुल गुडधे :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, याच्यावर काम करावा लागेल, याच्यासाठी आवश्यक असलेला मनुष्यबळ आपल्याला आणावा लागेल, असा मी माझ्या भाषणात उल्लेख केला आहे. निश्चितपणे महानगरपालकेनी हे काम करावे, मी असे नाही म्हटले कि हे काम महानगरपालिका कसे करेल, येवढा काम करणे निश्चित आहे किंवा नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, महानगरीपालिकेनी हे काम नाही केले पाहिजे असे प्रफुलजी म्हणाले असे मी बोललो नाही. प्रफुलजी म्हणाले कि देवेंद्रजी मुख्यमंत्री असतांना जे काही निर्णय घेतले, ते निर्णय एनआयटीच्या सेवन स्कीमसाठीच घेतलेले आहे. उर्वरीत जागेसाठी नाही, हे खरे आहे काय ?

श्री प्रफुल गुडधे -: हो, आणि मा.महापौरजी, मी सोबतच ज्या शासन निर्णयाचा उल्लेख केला, ६ डिसेंबर २००२ च्या शासन निर्णयामध्ये गुंठेवारी कायद्याच्या कलम २१ अनुषंगाने एनआयटी ला अधिकार प्राप्त झालेले होते ते अजूनपर्यंत विथड्राल झालेले नाही त्यामुळे ही स्थिती संभ्रमाची आहे मात्र या संबंधामध्ये माझ्या मनाची निश्चिती अजूनपर्यंत झालेली नाही. त्यामुळे मी या संदर्भामध्ये कधी भाष्य करणार नाही, असे मी बोललो.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, माझा मुद्या आहे कि सरकारनी जो आदेश काढला आहे त्यात स्पष्ट म्हटले आहे कि, अमक्या अमक्या गोष्टी सोडुन सगळे महानगरपालिकेकडे आहे.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, माझे तेच म्हणणे आहे, गुंठेवारीसहित सगळे मात्र या शासन निणर्यामध्ये अजूनही संदिग्धता शिल्लक आहे. माझा स्टेटमेंट Contradactoty नाही. संदिग्धता आहे, मी स्वयं या विषयावर बोलु शकत नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मी स्थापित करतो कि आपले भाषण Contradactoty आहे. आपण स्विकृत केले कि देवेंद्रजीचा निर्णय फक्त सेवन स्कीमसाठी आहे. त्याच्यापूर्वी आपण आपल्या भाषणात म्हणाले कि महानगरपालिकेकडे संख्याबळ उपलबध नाही, ७१००० हजार केसेस तर असे आहे कि ज्याचे नियमितीकरण झालेले नाही. हा Contradactoty भाषण आहे जेव्हा सेवन स्कीममध्ये ७१००० केसेस नाही, मग महानगरपालिका कसा निर्णय घेईल, महानगरपालिका निर्णय घेत आहे याचा अर्थ पुर्ण शहर महानगरपालिकेत येत आहे. आपले भाषण Contradactoty आहे.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, यासंदर्भात खुलासा करतो, माझे काय म्हणणे होते कि सात स्कीम

महानगरपालिकेच्या अखत्यारीत आलेल्या आहेत. गुंठेवारी आले कि नाही या संदर्भातील संदिग्धता माझ्या मनामध्ये अजूनही कायम आहे आणि मी ते मान्य केलेले आहे. सोबत सभागृहाचे म्हणणे, प्रशासनाचे म्हणणे असे आहे कि, गुंठेवारीच्या संपुर्ण योजना याच्यासाठी प्लॅनिंग ॲथारीटी या निर्णयाप्रमाणे महानगरपालिका आहे, महानगरपालिका जर यासाठी नियोजन प्राधिकरण आहे मग महानगरपालिकेकडे ७२००० हजार अर्ज प्रलंबित आहे, असे असतांना नागरिकांच्या तक्रारी येवुन राहिलेल्या आहेत, त्या अनुषंगाने पालकमंत्रीनी पत्र दिले असावे. हा विषय मी मांडलेला आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, हे २००२ लाच काय गुंठेवारीचा आदेश निघाला, नेमका याचे कारण येवढेच आहे कि, १९९७ मध्ये या देशाच्या आजादीची स्वर्णज्यंती होती, आणि त्याचदिवशी नागपूर महानगरपालिकेला भारतीय जनता पक्षाचा पहिला महापौर मिळाला. फक्त देश नाही, नागपूर ही भारतीय जनता पक्षाच्या हाथात आला, तत्कालीन माजी महापौर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात त्यावेळची भारतीय जनता पार्टी व शिवसेनाची सरकार माजी पालकमंत्री, श्री नितीनजी गडकरी यांच्या नेतृत्वात पहिल्यांदा लोकांनी बधितले कि पालकमंत्री काय असते. सरकार बदली चिटणीस पार्क मे भाषण हुआ कि हम हर साल २५ करोड रुपये देंगे, श्री गडकरी १५ करोड देते है, हम २५ करोड देगें. इतना ही नही बार बार लोगो को मुर्ख बनाया गया, इतना ही नही आपका भाषण श्री गुडधेजी भोपळा पर खत्म हुआ, अभी मुझे प्रविणजी ने बताया कि भोपळा क्या होता है, कारण हिंदी मे उसका अर्थ अलग ही होता है. मा.महापौरजी, लोगो की भावनाओ से खेल रहे है, लोगो को मुर्ख बनारहे है, नागपूर शहर मे इंडिया टी व्ही का रिपोर्टर है, योगेंद्र तिवारी उनके पास क्लिपिंग है, विलासराव देशमुखजी से उन्होने पुछा कि मा.विलासरावजी चुनाव मे आपने घोषणा की थी कि आप चुनाव मे जितकर के आये तो किसानो का बिजली का बिल माफ कर देगे क्यो नही किया, विलासरावजी ने हंसते हंसते उत्तर दिया कि चुनाव मे घोषणा करने के लिये होती है निभाने के लिये नही होती, फुटेज के फुटेज उपलब्ध है, और हंसते हंसते उत्तर दिया. और उनके हंसते हंसते उत्तर देने पर माणिक वर्मा ने दो कविता लिख डाली कि बेशरमी जिस चेहरे का श्रृंगार करते है मख्खी भी उसपर बैठने से इंकार करती है. मा.महापौरजी, जिनका इतिहास ऐसा रहा हो, जिनके मुख्यमंत्री इसप्रकार से बोलते हो, वह हमसे प्रश्न कर रहे है और हमारे निर्णय लेने के बावजूद प्रश्न कर रहे है, अरे वाह तुम कतल भी करते हो तो चर्चा नही होती, और हम आह भी भरते है तो हो जाते है बदनाम. मा.महापौरजी, मैं एक निवेदन करने के लिये आया हु, २७ अगस्त को मा.मुख्यमंत्रीजी ने निर्णय लिया, और २७ अगस्त को निर्णय लेने के बाद सप्टेंबर मे आचार संहिता लगी, ८ तारीख को चुनाव डिकलेअर हुऐ, ९ सप्टेंबर को महानगरपिालका के आयुक्त ने एनआयटी से कर्मचारी मांगने के लिये पत्र दिया, आप कल्पना किजीये कि २७ अगस्त और ९ सप्टेंबर के बिच मे कितने दिन का अंतर है, १० दिन का १० दिन के अंदर मे मा.आयुक्त जी ने कर्मचारीयो के लिये पत्र दिया, उसके बाद १३ सप्टेंबर को आयुक्त ने दोबारा पत्र दिया, और २८ नोव्हेंबर को आयुक्त ने हमे इतने कर्मचारी चाहिये, उनके नाम के साथ पत्र दिया, जिसकी कॉपी का वाचन अभी गुडधेजी ने किया, उसमे लिखा है यांनी मा.आयुक्त प्रयास नही कर रहे है ऐसा बिल्कुल नही है, आचार संहिता लगने के बावजूद मा.आयुक्त यह प्रयास कर रहे है कि जनता को तकलीफ नही होनी चाहिये इसलिये यह काम कर रहे थे लेकिन आचार संहिता होने के कारण एनआयटी निर्णय नही ले रही थी, २९ तारीख को जब मा.आयुक्त ने अंतिम पत्र भेजा, यह पत्र २८ नोव्हेंबर का सरकार के पदग्रहण की तारीख है, २८ नोव्हेंबर को सरकार ने पदग्रहण कर लिया, तीन महिने तुमने कर्मचारी नही भेजे ओर २८ नोव्हेंबर से २ जनवरी एक महिने का समय गुजरा नही कि तुमने पत्र दे दिया, यह क्या है. मा.महापौरजी, प्रशासन को समय तो देना चाहिये, लाखो फाईल का निर्णय एक दिन मे नही हो सकता, यह निर्णय लेने के लिये महानगरपालिका को समय देना चाहिये. बगैर समय दिये एक राजनैतिक षडयंत्र के अंतर्गत पत्र को भेजने का काम किया गया, मैं आपको बताना चाहता हुँ कि १९९५ से २००२ तक भारतीय जनता पार्टी की सरकार थी, सरकार बदलने के बाद मुख्यमंत्री बदलने के बाद नागपूर शहर मे एक आयुक्त को भेजा गया, वह तो परंपरा शुरु हो गयी है, और उस आयुक्त के माध्यम

से महानगरपालिका के कामो मे व्याधान उत्पन्न करने की कोशिश् कई बार की गयी है, मा.महापौरजी उनको जब यह पता चल गया कि यह दोबारा जीत करके आजायेगे तो ऐसी अवस्था मे गुंठेवारी के अंतर्गत निर्णय लेने के अधिकार नागपूर महानगरपालिका से छिन करके एनआयटी को प्रदान कर दिये गये. क्रोनालॉजिकल आर्डर देखीये केवल गुंठेवारी नही दलित वस्ती के विकास काम का सारा का सारा पैसा नागपूर महानगरपालिका के स्लम डिपार्टमेंट को आता था, १९९७ ते २००२ तक मैं नगरसेवक था महानगरपालिका के स्लम विभाग ने स्लम की पुरी फाईल बनाई कारण स्लम की लोकसंख्या पर कॅपिटल के आधार पर वह पैसा मिलता था, हम फाईल बनाते थे यह निर्णय भी महाराष्ट्र की तत्कालीन सरकार ने लिया, दलित वस्ती के पैसे भी एनआयटी को दिये, मा.महापौरजी, स्लम विभाग हमारे पास था, स्लम मे काम हम करते है, स्लम मे सोशल वेलफेअर की योजना हम चलाते है, स्लम के आंकडे हमारे पास, ढांचे हमारे पास उसका नियोजन हमारे पास और पैसा एनआयटी खर्चा करेगी, क्यो खर्चा करेगी ? सरकार बदल गयी, पैसे अगर वह देगी तो खर्चा यह करेगी, किस किस प्रकार से महानगरपालिका को जलील किया जा सकता है उसका पुरा प्रयास किया गया. यह बात सही है कि निर्णय पुरे पैसे वहां देने के लिये लिये गये ओर उसके बाद काँग्रेस की २००२ मे सरकार आयी, यह क्रोनॉलॉजिकल आर्डर है किस प्रकार से राजनैतिक षडयंत्रो के अंतर्गत सरकार निर्णय लेकर के महानगरपालिका के रिडरशीप को पंगु करने का काम करती है, इसका सबसे संदिग्ध उदाहरण २००२ मे काँग्रेस की सरकार के व्दारा लिया गया था. इतना ही नही एनआयटी की स्थापना का उद्येश और एनआयटी की व्यवस्थापन यह नितीन राउतजी का पत्र है, और इसमे अगर मैं मुद्या नंबर १ और मुद्या नंबर २ देखु तो क्या है, मुद्या नंबर १ नागपूर सुधार प्रन्यासची स्थापना व्हावी, हा उद्येश आहे. आणि दुसरा पॅरीग्राफ व्यवस्थापन मंडळ अब मुद्या नंबर एक और मुद्या नंबर २ क्रोनॉलॉजिकल आर्डर मे कौनसे हो गये, अब इसपर मा.मुख्यमंत्रीजी ने उत्तर मांगा है, अब क्या उत्तर देगें कि वयवस्थापन मंडळ बना था वह एनआयटी बरखास्ती के साथ भष्ट हो गया. यही देना पडेगा, दुसरा क्या देगें, मा.महापौरजी,

श्री प्रफुल गुडधे -: पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, एनआयटी बरखास्त झालेली आहे काय ? प्रशासनानी उत्तर द्यावे. एनआयटी बरखास्तच झालेली नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- मा. श्री प्रफुलजी मैं भी इस प्रश्न का उत्तर पुछ रहा हुँ, महानगरपालिका उत्तर क्या देगी कि एनआयटी के निर्माण का उद्येश क्या था. इसपर महानगरपालिका उत्तर देगी कि जिस समय वह बनी थी उस समय लिखा हुआ था, मुद्या नंबर १ ओर मुद्या नंबर २ है क्या ? क्या यह पत्र महानगरपालका को भेजते समय मुद्या नंबर १ और मुद्या नंबर २ जो वर्तमान पालकमंत्री का गुप्त अजेंडा है, उसको फाडकर के अलग निकाल दिया गया है, वह डाक्युमेंट है क्या ? और मा.महापौरजी, अगर इस पत्र मे कुछ भी नही है तो हमने इस सभागृहामे निर्णय लेना चाहिये कि जब तक पुरा पत्र नही आयेगा तब तक नागपूर महानगरपालका किसी प्रकार का काई जवाब नही देगी. महानगरपालिका २ अगस्त २०१९ के निर्णय के साथ खडी है, और खडी रहेगी. मा.महापौरजी, बहोत सारे विषय है श्री प्रफुल गुडधे जी ने अपने भाषण मे कहां कि जनता से ना भिडे, भारतीय जनता पार्टी जे काही निर्णय घेते ते खेळीमेळीच्या वातावरणामध्ये घेते, खेळीमेळीच्या वातावरणामध्ये खेळ खेळावाच लागेल. म्हणुन खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आम्ही निर्णय घेतला हे स्विकार करण्यास आम्हाला कोणतीही हरकत नाही. हे मी सपष्टपणे सांगतो. मा.महापौरजी, यह पालकमंत्री का पत्र है, उस पत्र मे उन्होने क्या लिखा है यह बात मैं अच्छे से बताना चाहता हुँ, उन्होने लिखा है कि नागपूर महानगर के परिक्षेत्र मे चार हजार अनधिकृत अभिन्यास थे, इन चार हजार अभिन्यास को गुंठेवारी के तहत नियमितीकरण करने के लिये ६ डिसेंबर २००२ के आदेश के अनुरुप २२०० अभिन्यास को हमने रेग्युलर करने का काम किया. और इस काम के लिये हमने ७०० करोड रुपये खर्च किये यह बात भी उन्होने अपने पत्र मे बताई. यह नही बताया कि जनता से यह पैसे लेकर के हमने खर्च किये, अब मा.महापौरजी, आयुक्त महोदय बता रहे थे कि हमारे तो ठेकेदारो को बिल देने के है वह ४०० करोड के बकाया है, और उन्होने २००२ से २०१९ तक केवल ७०० करोड रुपये खर्च किये. इससे ज्यादा शर्म की काई और क्या बात हो

सकती है. २००२ से २०२० तक केवल ७०० करोड रुपये खर्च किये, उन अनधिकृत अभिन्यास पर खर्च किये यह खुशी की बात है या शर्म की बात है, यह बात वह अपने पत्र मे मुख्यमंत्री को लिख रहे है. मा.महापौरजी, नागपूर महानगरके परिक्षेत्र मे बहोत बडा एनआयटी का क्षेत्र है, एनआयटी की बहोत सारी स्किमे है मैं जिस प्रभाग का नेतृत्व मैं करता हुं, प्रतिनिधीत्व करता हुं उस क्षेत्र मे एनआयटी की शुरुवात मे जो स्कीम बनी उसमे गांधीबाग बगिचा भी है और राष्ट्रसंत तुकडोजी महाराज का नाम निकला है तो गांधीबाग को गांधीबाग का नाम देने का काम भी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ने ही किया था, तब वहां बगिचा नही था, गंदा तालाब था उसको सवच्छ किया, और उसका नाम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ने गांधीबाग रखा था और बगिचा बाद मे बना था. मा.महापौरजी, वहां पर एनआयटी ने लेआउट डाला था और आप कल्पना किजीये कि, यह लेआउट हमको हस्तांतरीत हो गया और हस्तांतरीत होने के बाद वहां पर काम चालु कर दिये गये, काम चालु करने के बाद वहां डेव्हलपमेंट के पुरे काम हम करते है, ग्रांउंट रेंट कौन लेता है, एनआयटी लेती है, लिज के पैसे कौन लेता है, एनआयटी लेती है, पुरे के पुरे काम हम करते है, और पुरे के पुरे पैसे एनआयटी लेती है. इतनाही नही इस परिसर मे अगर कोई खेल का मैदान है तो उसकी मिलकियत भी एनआयटी की होंगी, उस परिसर मे अगर कोई बगिचा है तो उसकी मिलकियत भी एनआयटी की होंगी. एनआयटी मिलकियत देने को तैयार नही है कहती है कि लावारीस संतान को पालने की जिम्मेदारी म.न.पा.की है क्योंकि तुम तो अनाथ आश्रम खोलकर बैठे हो, सबको तुम पाल रहे है इसलिये सबको पालो, ४२ बगिचो की यादी उन्होने चोरपगारजी के पास भेजदी थी. और वह यादी ४२ बगिचो की थी और ४२ की कलम भी तडीपारी की होती है, और चोरपगारजी को उन्होने उप निगम आयुक्त बना डाला, इसी तरह से बगिचे की यादी आती रहेगी तो दो चार बगिचे और लाईन से बन जायेगे लेकिन हमारी मिलकियत इसका क्या ? मा.महापौरजी, बरसो से यह खेल चालु था, मुझे यह सब चिजे नही मालुम थी गलती से १९९७ मे मेरे राजनैतिक पार्टी ने मुझे टिकिट दे दिया, और मैं चुनाव जित गया, महानगरपालिका मे नगरसेवक के रुप मे आ गया, जब मैं महानगरपालिका मे नगरसेवक के रुप मे आ गया तो हमारे एक बहोत ही सज्जन नगरसेवक थे, जिनको महानगरपालिका के पांच साल गुजरने के बाद भी कार्यप्रणाली के बारे मे कुछ समझ मे नही आया, वह इतने सज्जन व्यक्ति थे कि पुर्ण रुपसे कुछ समझ नही सके, उस नगरसेवक का मैं नाम लेना चाहता हुं उनका नाम था, अशोक मोटघरे वह बहोत सज्जन व्यक्ति थे और उस अशोक मोटघरे के वार्ड मे १९९७ मे ४० लाख रुपयो का एक वर्क आर्डर हुआ, सब परेशान हो गये कि अशोक मोटघरे के वार्ड मे ४० लाख रुपये का वर्क आर्डर कैसे हो गया. कृष्णा भैया से मैंने महानगरपालिका का कामकाज सिखा था, और सभागृह सुनिल भैया से सिखा था, इसलिये मैं पिछे लगा कि यह कहां से लाये, कहां से लाये तो पता चला कि, यह ४० लाख रुपये बेडगे कमेटी की रिपोर्ट से मिले है, फिर मैंने कहां कि यह बेडगे कमेटी क्या है तो पता चला कि बेडगे कमेटी गडकरीजी पालकमंत्री बनने के बाद उन्होने बनायी थी कि एनआयटी ने जो लेआउट महानगरपालिका को हस्तांतरीत किये है, उनमे काम अपुरे होने के बावजूद वह लेआउट हस्तांतरीत कर दिये थे, वहां पर और कितने रुपयो के काम बाकी है उसका रिपोर्ट कार्ड तयार किया जाये और वहां पर काम करने के लिये पैसे जो है वह एनआयटी देंगी ओर तब प्रभाग नही वार्ड थे और एक वार्ड के लिये केवल ४० लाख रुपये देने का निर्णय केवल और केवल अशोक मोटघरे के वार्ड के लिये हुआ था, एनआयटी भी उस समय काम नही करती थे, बेडगे समिती के माध्यम से समिती बनाकर तत्कालीन सरकार के पालकमंत्री श्री नितीनजी गडकरी ने जो एनआयटी से प्रभावित भाग थे उन भागो मे पैसे दिलवाये, यह सारी चिज उस समय की है, मनोज सांगोळे ने यह चिज नजदीक से देखी है उनको भी बेडगे समिती से पैसे मिले है. मा.महापौरजी, एनआयटी का काम क्या है नगापूर शहर मे विकास के साथ साथ यह रहिवासी क्षेत्र मे सुविधा उपलबध करवाना यह एनआयटी का काम है मैं इस सभागृह को बताना चाहता हुं कि, नंदनवन की जो कॉलोनी बनी है यह नंदनवन की कॉलोनी की जगह नागपूर महानगरपालिका मे थी नागपूर महानगरपालिका ने नंदनवन की कालोनी को रेसीडेंशीयल डेव्हलपमेंट करने के लिये एनआयटी को हस्तांतरीत किया

एनआयटी ने रेसीडेंशीयल कॉलोनी डेव्हलप करी, तब वहां पर गरीबो को घर मिले, एनआयटी क्या कररही है खाली जगह लेना उसको विकसीत करना और कम किंमतो के उपर नागरिको को घर उपलब्ध करवाकर देना, इसी सभागृह मे विरोधी पक्ष के नेता थे, अर्जुनदासजी कुकरेजा वह यहां से एनआयटी के सदस्य के रुप मे राज्य सरकार के तरफ से एनआयटी मे गये ईडब्लुएस स्कीम के अंतर्गत आज उत्तर नागपूर मे ईडब्लुएस के जितने भी लेआउट बसे है, वह किसने बसाया, अर्जुनदास कुकरेजा ने वह प्रस्ताव रखा, जब पुलोद की सरकार थी हम उसमे मिनिस्टर थे, और हमने यह सब काम किये, मा.महापौरजी, प्रफुलजी ने अच्छी बात की, प्रफुलजी ने कहां कि एनआयटी का वापर सारे राजनेताओ ने किया है, हम स्विकृत करते है कि हमने एनआयटी का वापर जनता की हितो के लिये वारंवार किया. लेकिन हमने एनआयअी का वापर अपने राजनैतिक सवार्थ के लिये नही किया है. मैं किसी का नाम नही लेना चाहुंगा नागपूर शहर मे विकास काम चालु थे, मिहान का विषय आया और मिहान के विषय के लिये एक नेता की कॉलेज की जमिन जारही थी, अब नेता के कॉलेज की जमिन जा रही थी और वह नेता बडा दबंग था, और वह इतना दबंग था कि वह मंत्री होने के बावजूद चेअरमन के सामने कुर्सी पर बैठता था, और मा.महापौरजी, चेअरमन को उसने बोल दिया कि मैं मेरी जमिन वापरने नही दुंगा, वह चेअरमन महानगरपालिका के भी आयुक्त थे, उन्होने कहां कि दयाशंकर एक पत्र लगता है जो जमिन विकास के लिये नही दे रहा है, उसे जो कम किमत पर जमिन दी गयी है वह रेडीरेक्नर के हिसाब से ली जाये इसके लिये एक पत्र लगता है, मैंने पत्र दे दिया तो उस नेता ने जमिन दे दी. इतना ही नही हुआ मा.महापौरजी, हम तो क्षेत्र मे काम करते है मैं आयुक्त महोदय चंद्रशेखर के पास मे गया, मैंने कहां कि मैंने पत्र देकर के दुश्मनी मोल ले ली है, तुम मेरे वार्ड के लिये क्या देना चाहते हुॅ, मा.चंद्रशेखरजी ने ४० लाख रुपये सिव्हर लाईन के लिये दिये, मैंने सभागृह मे भाषण दिया था कि, इंटीग्रेटेड सिव्हर लाईन होनी चाहिये, जब इंटीग्रेटेड रोड हुऐ, उन्होने ४० लाख रुपये दिये, बात यही खत्म नही होती, मैं जिस झोन मे नगरसेवक था उसी झोन मे स्थायी समिती के अध्यक्ष भी थे, उनका नाम गनी लाला था, और मेरे साथ जो दो नगरसेवक थे, तीन के प्रभाग मे वह दोनो स्थायी समिती के सदस्य भी थे, इसका मतलब उस झोन मे तीन स्थायी समिती के सदस्य थे, २८ फाईल्स चंद्रशेखर साहब के टेबल पर गयी, जिसमे से २७ फाईल्स वापस हो गयी एक फाईल मंजूर हुई वह मेरी थी, मा.महापौरजी, जब यह फाईल्स मंजूर हो गयी तो यह फाईल लेकर के तत्कालीन सांसद उस ४० लाख की फाईल लेकर के दिल्ली गये और दिल्ली मे विलासराव देशमुख को जाकर के बताया कि तुमने जिस आदमी को आयुक्त बनाकर के भेजा है, हमने जिनको परेशान करने के लिये उनको भेजा था, वह आदमी उन्ही लोगो की फाईल मंजूर कर रहा है और हमारी फाईल नही कर रहा है. यह सब रेकॉर्ड मेरे पास उपलब्ध है आप देख सकते है. मैं सभागृह के पटल पर विश्वास के साथ यह बात कह रहा हुॅ, इसलिये एनआयटी का उपयोग किस व्यक्तिने अपने स्वार्थ के लिये किया यह बोलने की आवश्यकता नही है, हमने राजनैतिक फायदा जनता के हितो के लिये उठाया हमने एनआयटी के माध्यम से जनता की जमा पुंजी मे से शहर के रोड बनाने के लिये पैसे लिये, हमारे मुख्यमंत्री थे इसलिये हमने यह काम किया. मा.महापौरजी, खेल के मैदान भी हमने विकसीत किये, मा.महापौरजी, मैं एक निवेदन करना चाहता हुॅ कि यह राजनैतिक विषय नही है, इस शहर के भाग्य को बदल करके जनता के हित मे निर्णय लेने का यह विषय है, और तीन महिने का कार्यकाल किसी भी प्रकार से जिसमे से दो महिने आचार संहिता हो, परिपुर्ण नही होता, वह यंत्रणा काम कर सकती है, हमने आदमी मांगे एनआयटी के चेअरमन ने राज्य सरकार को लिखा कि हम आदमी दे सकते है या नही ? आप कल्पना किजीये मेरे पास पांच लोग है जो अनुकंपा पर एनआयटी मे लगे है, उनकी इच्छा है कि वह एनआयटी के माध्यम से महानगरपालिका मे आजाये, लोग आने के लिये तैयार है चेअरमन देने के लिये तैयार नही है, हा एक विषय अभी आया कि वेतन आयोग का क्या होंगा, मा.महापौरजी, इस सभागृह से तो प्रस्ताव पारीत करके हमने भेजा है कि सबको सातवा वेतन आयोग दे दो, इसलिये उस समस्या का भी समाधान हो जायेगा. मा.महापौरजी, मैं केवल एक बात कहना चाहता हुॅ प्रफुलजी जब कह रहे थे तो प्रविणजी ने हस्तक्षेप किया था कि छोटु भोयर ने इस्तीफा दे

दिया था, यह बात प्रफुलजी को बहोत अच्छे से मालुम है, भारतीय जनता पार्टी मे उनके पिताजी ने भी त्याग किया है, छोटु भोयर ने भी त्याग किया था, और भारतीय जनता पार्टी त्याग और बलिदान इसके आधार पर बनी है. मा.महापौरजी, केवल राजनैतिक तौर पर विरोधी पक्ष बेंच पर बैठे होने के कारण हमने इस प्रस्ताव मे सरकार को मदद करना, क्या क्रोनोलॉजिकल आर्डर मे पूर्व मुख्यमंत्री ने निर्णय लिया, पूर्व मुख्यमंत्री का लिया हुआ निर्णय शहर के लिये योग्य है या नही, शहर की जनता के लिये योग्य है या नही, अगर आप अपने संपुर्ण भाषण के उपरांत यह कहते है कि, एनआयटी को बरखास्त करने के विषय को मैं समर्थन करता हूँ तो क्रोनॉलॉजीकल आर्डर पुरा गिनाने की अपेक्षा आपने एक लाईन मे समर्थन कर दिया होता तो शायद बहोत अच्छा होता, महानगरपालिका संभाल सकती है या नही संभाल सकती है, जो लोग आयेगें वह करेगें या नही करेगें, नागरिको के काम होंगे या नही होंगे, इसपर चर्चा करने की आवश्यकता नही थी, दुष्यंत कुमार नाम का एक कवि है, उसने चार पंक्तियॉ लिखी है, टुंटी ठहनी एक दिन पतवार बनती है, और छोटी सी चिंगारी भी अंगार बनती है, और कुच्ली गयी, रौंदी गयी को बेबस ना समझे वह एक दिन मिनार बनती है, इस वक्त महानगरपालिका को मिनार बनने की जरुरत है, और कौन बनायेगा मिनार, कौन होंगा शिल्पकार, इस सभागृह मे बैठे हुऐ सारे के सारे शिल्पकार है, जो महानगर की जनता को न्याय दिलवायेगे, जो महानगरपालिका को मिनार प्रदान करेगा वह शहर की जनता को न्याय दिलवायेगा, मा.महापौरजी, मैं एनआयटी के विषय मे मा. पालकमंत्री ने जो पत्र दिया है उसका मैं निषेध करता हुँ, और यह पत्र परिपुर्ण नही है, इसलिये जब तक पुरा पत्र नही आजाता शासन ने पहले उसको वापस लाने की बात किजीये उसके बाद इसका जवाब देने की आप कोशिश किजीये, यह मैं निवेदन करना चाहता हुँ कारण अपूर्ण पत्र पर पुर्ण उत्तर नही जा सकता मैं इस बात को यहां नमुद करना चाहता हुँ आप उसके अनुरुप निर्णय करे, ऐसी मैं अपेक्षा करता हुँ, धन्यवाद.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.दयाशंकरजी च्या भाषणात सारे मुद्दे उपस्थित झालेले आहे. मा.महापौरजी, जी वस्तुस्थिती आहे, ती या सभागृहात ठेवली पाहिजे, मी पांच मिनिटात माझे भाषण संपवितो. ८४ वर्षाआधी या संस्थेची स्थापना झाली. आणि स्थापना यासाठी झाली होती कि या शराचा विकास समतोल पध्दतीने साधण्यासकरिता त्या काळात ५४ स्कीमचा निर्माण करण्यांत आला होता आणि या ५४ स्कीममध्ये अर्धा नागपूर हे एनआयटीमध्ये गेला होता. मा.महापौरजी, नागपूर शहराचा ५० टक्के भाग एनआयटीकडे दिल्यानंतर जवळपास ८४ वर्ष या संस्थेनी या शहरात काम केले. याचे फलित असे आहे कि ५७२ लेआउट १९०० लेआउट आणि आता २३०० लेआउट आणि त्याच्यानंतर अजून किती लेआउट येतील, त्यामुळे ज्या संस्थेनी या शहराचे आरोग्य बिघडविण्याचे काम केले या शहराचा भुगोलचा सत्यनाश केला, या संस्थेला परत पुर्नजिवित करावे असा दुदैवी पत्र वर्तमान पालकमंत्री यांनी दिला याचा निषेध करण्याकरिता आपण सभागृह बोलावला असे माझे मत आहे याकरिता मी आपले अभिनंदन करतो. आणि कुठल्याही माणसाचा कुठल्याही पक्षाचा निषेध न करता त्या वृत्तीचा निषेध कि नागपूर शहराचा गोर-गरीब सामान्य माणसांनी आपल्या घामाच्या पैश्यातुन प्लॉट घेतला, आपल्या पगारातुन पैसे पैसे वाचुन स्वत:चे घर व्हावे त्याच्याकरीता त्यांनी घेतलेल्या पैश्यातुन घेतलेल्या प्लॉटचा सत्यनाश या एनआयटीनी केला आहे. मा.महापौरजी, पिंटु झलके बोलत होते मी महापौर असतांना श्री हर्डिकर साहेबांसोबत दक्षिण नागपूरात दौ-यात गेलो होतो, दक्षिण नागपूरच्या अनेक नाल्यामध्ये घरे तयार झालेली आहे, मा.महापौरजी, जेथे बगिचा व्हावा, पोलिस स्टेशन व्हावे, जेथे शाळा व्हावी, जेथे पी.यु.च्या लॅन्डवर खेळाचे मैदान व्हावे, अश्या सगळया प्लॉटवर आज घरे झालेली आहे. आणि हे सगळे पाप ज्या संस्थेनी केले त्या संस्थेच्या घशातुन नागपूरच्या सर्वसामान्य नागरिकांना काढण्याचा निर्णय ज्या लोकप्रिय माजी मुख्यमंत्रीनी केला त्यांचे अभिनंदन या सभागृहानी केले पाहिजे. आणि माझी विनंती आहे कि बरखास्तीचा निर्णय झाला त्यावर कोर्टात केस झाली, पण बरखास्त करतांना एक एक पाउल भारतीय जनता पार्टी आणि सोबत शिवसेना तेव्हा होती, आणि या दोघांनी मिळवुन एक एक पाउल समोर आणले. आमची नियम साफ होती म्हणुन आम्ही बरखास्तीचा निर्णय

केला आमची नियम साफ होती म्हणुन आम्ही नियोजन प्राधिकरण केला, मा.महापौरजी, म्हणुन या सगळया विषयावर या सभागृहाचा एकत्रित मत माझी विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे मी परत परत सांगतो आहे कि कुठल्या पक्षाचा कुठल्या नेताचा कुठल्या निर्णयाचा नाही, तर वर्तमान पालकमंत्री यांनी जो पत्र दिला आहे त्या वृत्तीचा आपण निषेध करु. आपण या सभागृहात एक ठराव पारीत करावा आणि त्या ठरावासहित मा.दयाशंकरजी नी जी मागणी केली आहे कि ते जे पत्र आहे ते अपुर्ण आहे, त्या पत्राची पुर्ण प्रत तो विषय आणि तो उत्तर मा.मुख्यमंत्रीकडे पाठवावे, अशी मी आपणांस विनंती करतो, आपण मला बोलण्याची संधी दिली, याबद्यल मी आपले अभिनंदन करतो, आपल्याला धन्यवाद देतो.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, विषय क्रमांक ५६ या विषयाला अनुसरुन आजची ही बैठक आपण बोलाविली आहे, आजच्या बैठकीला नवनियुक्त आयुक्त श्री मुंढे साहेब हे सुध्दा आज याठिकाणी उपस्थित झाले, ते या नागपूर शहराच्या विकासामध्ये मोठा सिंहाचा वाटा घेतील आणि शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधीना सोबत घेवून चालतील अशी मी अपेक्षा करतो. मा.महापौरजी मी या सभागृहामध्ये आपल्या वतीने एक प्रश्न करु इच्छितो. याठिकाणी मला एक माहिती द्या कि, नागपूर महानगरपालिकेनी गेल्या सहा महिन्यापासून गुंठेवारीमध्ये किती प्रकरणे निकाली काढली. आणि त्याच्यापासून महानगरपालिकेला किती उत्पन्न प्राप्त झाले.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, गुंठेवारी नियमा अंतर्गत ज्या नागरिकांनी आपल्याकडे इमारत बांधकाम परवानगीकरिता अर्ज केले होते, असे आपण ८९२ नागरिकांना डिमांड दिल्या आहेत, आणि रेग्युलर लेटरह ३०० दिले आहे, या माध्मातुन आपण १४ कोटी ३ लक्ष रुपयांची डिमांड वितरीत केली आहे, त्यापैकी आपल्याला १० कोटी ६ लक्ष रुपये प्राप्त झालेले आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, एनआयटीमध्ये किती प्रकरणे प्रलंबित आहे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, गुंठेवारी अंतर्गत एनआयटी कडे ३८२२ अभिन्यासापैकी २०८४ अभिन्यास त्यांनी नियमित केलेले आहे. आणि महानगरपालिकेकडे १०७ अभिन्यास हस्तांतरीत केलेले आहे. नियमित केलेल्या अभिन्यासा अंतर्गत १ लक्ष ६७ हजार भुखंडधारकांना मागणी पत्र एनआयटीनी दिलेले आहे आणि २० लख ११ हजार ७३६ भुखंडधारकांना नियमितीकरण पत्र उपलब्ध करुन दिलेले आहे. आणि उर्वरीत जे आहे ते अद्याप ही त्यांच्याकडे प्रलंबित आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या नगररचना विभागात किती पदे मंजूर दर्शविण्यांत आली आहे. आणि मंजूर पदापैकी किती पदे रिक्त आहेत.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, नगररचना विभागामध्ये (वाचले) आणि आता ४५ कर्मचारी कार्यरत आहे.

श्री तानाजी वनवे :- आपण रिक्त असलेली पदे केव्हा भरणार आहे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, आपल्या येथे जी पदे होती, त्याठिकाणी आता काही कार्यरत आहे परंतु या गुंठेवारी अधिनियमा अंतर्गत नियमितीकरण करण्यासाठी उपलबध मनुष्यबळ आवश्यक आहे त्यासाठी आपण एनआयटी कडे मागणी केलेली आहे.

श्री तानाजी वनवे :- त्यांचे कर्मचारी आपल्याकडे येण्यास तयार आहेत काय ?

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, आपण मागणी केल्याच्या अनुषंगाने सभापती नागपूर सुधार प्रन्यास यांनी शासनाला पत्र दिले होते त्यानुसार अद्यापही आपल्याकडे कर्मचारी पाठविण्यांत आले नाही.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, माझी माहिती अशी आहे कि, नागपूर सुधार प्रन्यासचे अनेक कर्मचारी मला येवुन भेटले आहे, आणि त्यांनी हे सांगीतले कि आम्ही नागपूर महानगरपालिकेमध्ये येण्यास तयार आहे, त्यांच्या येथे सातवा वेतन आयोग लागु झालेला आहे. आपल्याकडे सातवा वेतन आयोग लागु झालेला नाही. ते कधी लागु होईल, याची काही परिस्थिती नाही.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, मला असे म्हणावयाचे आहे कि, दोन लाख फाईलचा काम एनआयटी चा जर संपला आहे तर तो नागपूर शहराच्या नागरिकांच्या कराच्या पैश्यातुन ते फुकटाचा पगार कसे घेत आहे, आणि सरकार म्हणुन काही गोष्ट आहे कि नाही. त्यांना आदेश द्यावा आणि त्यांनी काम करावे म्हणजे उद्या आपण काही रिकामे बसणार आहे काय ? दोन लाख फाईल्सचे काम महानगरपालिकेकडे आले आहे, स्टेट विभाग असेल, गुंठेवारी विभाग असेल त्यांचे कर्मचारी सरसकट यावयास पाहिजे. वेतन आयोग आहे, आणखी काही असेल, कोर्ट, सरकार, मा.पालकमंत्री महाविकास आघाडीचे नेते करतील. पण आज जनता होरपळुन राहिली आहे याकडे सुध्दा लक्ष देणे आवश्यक आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, जनता होरपळुन राहिली म्हणुन मी प्रश्न विचारत आहे, कारण जनतेसाठीच मी विरोधी पक्ष नेता म्हणुन कार्यालयात सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत उपस्थित असतो. सातत्याने येवढा वेळ कोणी अधिकारी कार्यालयात बसते कि नाही मला नाही माहित त्याठिकाणी अनेक तक्रारी माझ्याकडे या प्रकरणामध्ये रोज येत असतात. त्याच्यामध्ये लोकांची मागणी आहे कि आम्हाला असे सांगण्यात आले आहे कि एनआयटी बरखास्त झाली आहे, आताच गुडधेजीने त्यावर प्रकाश टाकला आणि दयाभैया म्हणाले कि राजकारणी राजकारणी निर्णय घेतात, प्रशासन अंमलबजावणी करतात तर आम्ही सगळे राजकीय निर्णय घेतो तर राजकीय निर्णय घेण्याला कोणाला मनाई नाही आज जे राज्य सरकार आहे ते काय राजकीय निर्णय घेणार आहे ते तुम्हाला व मला विचारुन घेणार नाही. त्याच्यामुळे तो काही विषय नाही, विषय असा आहे कि लोकांचे प्रश्न सुटत नाही यामुळे अनेक फाईल्स प्रलंबित आहे. लोक हेलपाटे घालतात ते एनआयटीमध्ये गेल्यानंतर त्यांना सांगण्यात येते कि हे प्रकरण मनपा मध्ये आहे आणि मनपामध्ये आल्यानंतर त्यांना एनआयटीमध्ये पाठविण्यांत येते. म्हणजे या सहा महिन्यापासून लोक हेलपाटे घालत आहे त्यांना त्रास होत आहे, लोकांचे नकाशे पास होत नाही, आपण त्यांना नोटीस देतो, याठिकाणी अनेक प्रश्नाच्या संदर्भात श्री गावंडे यांनी माहिती दिलेली आहे. सांगण्याचा तात्पर्य असा आहे कि याठिकाणी एनआयटी फार चांगली आहे असे मी म्हणत नाही. कारण एनआयटी व शहराच्या लेआउटच्या बाबतीमध्ये मला फार माहिती आहे. कारण मी पहिल्यांदा १९८५ ला सभागृहात आलो आहे. आता सुरुवातीला हे जे लेआउट पडलेले होते दया भैयानी बेडगे समितीचा जो उल्लेख केला बेडगे समिती मला चांगल्यानी माहित आहे कारण बेडगे साहेब चेअरमन असतांना मी विश्वस्त होतो आणि हया ठिकाणी जेवढे ईडब्लुएस लेआउट आहे, त्याच्या संदर्भात कुकरेजाजीचा उल्लेख झाला कुकरेजाजी माझ्या सोबत त्यावेळेस सभागृहाचे सदस्य होते ते त्यावेळेस विरोधी पक्षनेते होते, त्यावेळेस जे ईडब्लुएस लेआउट झालेले आहेत, तो एखाद्या पक्षांनी केलेला निर्णय नाही. ते त्यावेळेच्या बोर्ड ऑफ ट्रस्टी ने केलेला निर्णय आहे. त्याच्यामध्ये म्हाळगीनगर असो कि दर्शन कॉलनी असो कि उत्तर नागपूरचे नारा, नारी बाकीचा परिसर असो, किंवा दक्षिण नागपूरचा परिसर असो, लेआउट पडतांना मी पाहिलेले आहे. ज्याठिकाणी एनआयटीने पीयुसीची पाईप लाईन टाकली होती ती पीयुसी ची पाईप लाईन बदलविण्यासाठी एक समिती तयार झाली त्याच्यामध्ये पीयुसी ची पाईप लाईन गडर लाईन,रस्ते याच्यासाठी ती बेडगे समिती तयार झाली. त्या बेडगे समितीमध्ये त्या त्या वस्तीमध्ये सर्व्हे करुन त्याप्रमाणे अहवाल सादर करण्यासाठी सांगीतले गेले होते कि किती पैसे त्या एरीआमध्ये त्या कामासाठी लागेल, म्हणुन दया भैयांनी जो उल्लेख केला मोटघरेच्या वार्डामध्ये जे ४० लाख रुपये त्यावेळेस मिळाले होते ते त्या अनुषंगाने मिळाले नाही. एखाद्या पक्षामुळे मिळालेले नाही, तो निर्णय त्यावेळी बोर्ड ऑफ ट्रस्टी ने घेतलेला निर्णय होता. आम्ही सर्व नगरसेवकांनी आंदोलन केले होते, व त्यांना बाध्य केले होते कि या लेआउटचा विकास एनआयटीनी केला पाहिजे. सुरुवातीला जे अनधिकृत लेआउट होते त्या संदर्भात मा.आयुक्त साहेब, मा.महापौरजी यांच्या माध्यमातुन आपणांस कळवु इच्छितो कि, त्यावेळेस मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब होते, अनधिकृत लेआउट सोसायटया तयार करुन गावामध्ये असलेल्या जमिनी काही दलाल आणि सोसायटयांनी विकल्या. अनधिकृत लेआउट तयार झाले, मुख्यमंत्री यांनी ज्यावेळेस हे सर्व पाहिले, त्यांनी म्हटले कि हा सर्व काय

प्रकार आहे, म्हणुन त्यावेळेस सीएम फार्मुल्याचे घोषणा झाली आणि सीएम फार्मुल्यामध्ये त्यावेळेस तीन रुपये रेटनी डेव्हलपमेंट चार्ज करण्याचा निर्णय झाला. ते जर तीन रुपये ही भरत नसतील तर सरकारनी सांगीतले कि, आम्ही हया लेआउटमध्ये मोफत काम करण्यास तयार आहे. पण विकास झाला पाहिजे आणि शेवटी तो रेट तीन रुपयांचा झाला. तीन रुपयात सीएम फार्मुल्याच्या अंतर्गत अनधिकृत लेआउटला अधिकृत करण्याचा निर्णय झाला. जसा यावेळी गुंठेवारीचा जो निर्णय झाला, १६ रुपयांच्या दरांनी त्याप्रमाणे त्यावेळी तीन रुपये प्रमाणे सीएम फार्मुल्या अंतर्गत लेआउट डेव्हलपमेंट करण्याचा निर्णय झाला. एनआयटीला बरखास्त करण्याचा देवेंद्रजी ने निर्णय घेतला परंतु सरसकट बरखास्त केली नाही, समोर निवडणुक पाहुन तो घेतलेला निर्णय आहे, दयाभैया बोलले कि आम्ही राजकीय निर्णय घेतला, राजकारणामध्ये राजकीय लोक राजकीयच निर्णय घेतात, आणि त्यामुळे या सगळया प्रकरणावर नागपूर शहरामध्ये रोष आहे. लोकांचे लेआउट मंजूर होत नाही म्हणुन लोक पालकमंत्रीकडे गेले. पालकमंत्री यांनी कदाचित नागरिकांच्या भावना लक्षात घेवून पत्र दिले असेल त्यांनी कोणत्या उद्येशाने पत्र दिले हे मला माहित नाही, परंतु माझी जी माहिती आहे, नागरिकांच्या तक्रावरुन त्यांनी पत्र दिले आहे अशी माहिती मला मिळाली आहे. आम्ही राउत साहेबांकडे गेलो होतो त्यांना आम्ही एनआयटीच्या सगळया भानगडी सांगीतल्या आणि त्यांनी त्याठिकाणी सांगीतले कि आमही शासनाला आपल्या भावना कळवु, अश्याप्रकारचे ते बोलले, मी त्यांच्याशी बोललो तर ते म्हणाले कि माझ्याकडे शिष्टमंडळ आले होते, आणि त्या शिष्टमंडळात लोकांचा रोष होता म्हणुन मी एक पत्र शासनाला दिले आहे. त्यांनी मला विचारले मी म्हटले कि आमच्याकडे प्रलंबित फाईल्स आहेत. एनआयटीकडुन फाईल्स आलेल्या नाहीत, आमच्याकडुन निर्णय होवु शकत नाही, शेवटी डेव्हलपमेंटची एकच संस्था असली पाहिजे या मताशी मी सहमत आहे. नागपूर महानगरपालिका जनप्रतिनिधीची आहे, जनप्रतिनिधीच्या हातात कुठलाही अधिकार असेल तर त्याचा दुरुपयोग होत नाही आणि झाला तर त्याचे परिणाम भोगण्यासाठी जनप्रतिनिधीला येणा-या पांच वर्षानंतर त्याचा हिशोब द्यावा लागतो.मा.महापौरजी, याठिकाणी आपले मा.सदस्य, श्री धर्मपालजी मेश्राम यांनी कबुल केले कि, आमच्या हातुन याठिकाणी प्रशासनाच्या व्यवस्थेच्या अभावी कामे आम्ही निकाली काढण्यामध्ये कमी पडलो आम्ही व्यवस्था उभी करु शकलो नाही. मा.सदस्य, श्री झलके यांनी सांगीतले कि एनआयटी बरखासत करा म्हणजे त्यांनी सांगीतले कि, अजून पर्यंत एनआयटी बरखास्त झालेली नाही, बरखास्त करा असा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणामध्ये याठिकाणी केला. मा.महापौरजी, श्री हजारेजी जे आमचे नगरसेवक आहे त्यांनी घाटाची जमिन आणि त्यांच्या प्रभागात दहन घाटाचा मोठा प्रश्न आहे, त्या दहन घाटाच्या प्रश्नावर ती जमिन स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये दिलेली आहे, असे सांगीतले. स्मार्ट सिटी किती बनली किती नाही, त्याचे डायरेक्टर कोण मला ती सगळी परिस्थिती माहित आहे. स्मार्ट सिटी बनवित असतांना आपल्या मोकळया जागेवर स्मार्ट सिटी बनविली पाहिजे. परंतु जेथे घरे आहे त्या घरांना तोडुन त्यांचे पुर्नवसन करुन त्यांना पैसे देवुन शासनाचे किंवा जनतेचे जे पैसे आहे, त्याचा दुरुपोग करुन आम्ही स्मार्ट सिटी तयार करण्याचा काम करीत आहे. त्याच्यासाठी डीपी प्लॉनमध्ये जी दहन घाटाची जागा आहे, त्याचा डीपी चेंज न करता आपण कोणते काम केले, ती जागा आपण स्मार्ट सिटीसाठी देत आहे. या सभागृहामध्ये मी सन १९८५ पासून नगरसेवक आहे, मी मुख्यमंत्रीकडे काम केले आहे, मंत्रीकडे काम केले आहे. मी खरा बोलतो मला पटला तर टेक नाही तर रामटेक मी खरा बोलणारा माणुस आहे. स्थायी समितीचा सभापती मी राहिलो आहे, आता मी विरोधी पक्षनेता आहे. आपल्याला माहित आहे कि माझा स्वभाव स्पष्ट आहे आणि त्यामुळे आपण कुठल्याही कामाला याठिकाणी गुंठेवारीचा जो ॲक्ट आहे त्याच्या अंतर्गत फक्त गुंठेवारीची कामे सोडुन महानगरपालिकेला पुर्ण अधिकार मिळाले पाहिजे या मताशी मी सहमत आहे. परंतु ही जी जगलरी करण्याचा काम भारतीय जनता पार्टीनी केला आहे, त्याच्या माध्यमातुन दया भैयानी फार शेरो-शायरी बोलली आहे, ते फार सुंदर बोलतात, त्यांच्या मुखामध्ये सरस्वती आहे पण सरस्वती सोबत ते फक्त स्वत: पुरते बोलतात, स्वत:च्या पक्षापुरते बोलतात. दुस-याला कसे खाली दाखवावे आणि मी कसा श्रेष्ठ आहे हे दाखविण्याचा

त्यांनी प्रयत्न केला. गुडधेजीवर त्यांनी ताशेरे ओढण्याचा प्रयत्न केला ठिक आहे त्यांचा तो स्वभाव आहे. महाराष्ट्र शासनाच्या मंत्रीमंडळाचा निर्णय झालेला आहे, परंतु नागपूर सुधार प्रन्यास आजपर्यंत बरखास्त झालेली नाही, त्याकरिता जी समिती तयार करण्यांत आली होती त्याचा अहवाल आजपर्यंत सादर झालेलाच नाही. कर्मचा-यांचे अधिका-यांचे समायोजन झालेले नाही तरी सुध्दा जबरदस्तीनी कायद्या बनवुन तत्कालीन फडणवीस सरकारनी नागरिकांना व मनपाला वेठीस धरले आहे. फडणवीसांनी नागरिकांना भ्रमित केले आहे याबाबत नागरिकांची कुठल्याही प्रकारची लेखी मागणी नाही.

श्री विजय (पिंटु) झलके :- मा.महापौरजी, सभागृहात विरोधी पक्षनेते चर्चा न करता विषय वाचत आहे.

श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मी भाषण वाचत नाही, हा जो अहवाल आहे, तो अहवाल वाचतो, जे पिटीशन याठिकाणी कलेले आहे ते वाचत आहे. मला न पाहता भाषण करण्याची खूप सवय आहे मी किती ही तास बोलु शकतो. याठिकाणी जो डिसीजन आलेला आहे. त्याच्यावर जो पिटीशन आलेली आहे ते मी सांगतो आहे. पिटीशन कोणत्या आधारावर याठिकाणी झालेली आहे आणि याच्यामध्ये पिटीशनचा डिसीजन हा पुर्ण आहे. हा फार मोठा लांबलचक भाषण नाही, त्याची कॉपी आहे मी शेवटचा मुद्दा वाचतो, नागपूर सुधार प्रन्यास एम्प्लॉय असोसिएशननी उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती, म्हणजे आजपर्यंत या याचिकेवर निर्णय झालेला नाही. आणि त्याच्यामुळे मा.महापौरजी माझी आपणांस विंनती आहे कि कुठलाही निर्णय घेत असतांना सभागृहाची आणि लोकांची दिशाभुल करु नये याठिकाणी जोपर्यंत किलिअर टायटल येत नाही तोपर्यंत आपण कुठलाही निर्णय घेवु नये, कारण कि सुधार प्रन्यासच्या आम्ही फेव्हर मध्ये नाही आम्ही पहिल्या दिवसापासून एनआयटीच्या विरोधात आहे. आम्ही अनेक आंदोलने केलेली आहे, परंतु याठिकाणी एनआयटी तत्वत: पुर्णपणे बरखास्त झालेली नाही. याच्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे आणि त्याची सविस्तर माहिती पिटीशनमध्ये दिलेली आहे. माझी आपणांस विनंती आहे कि या विषयाला घेवून याठिकाणी खूप चर्चा झालेली आहे, राऊत साहेबांच्याही पत्राबाबत मी खुलासा केलेला आहे, त्यांचा आग्रह असेल कि नागपूर सुधार प्रन्यास लोकांच्या प्रश्नाकरिता पुर्नजिवित करावी, लोकांचे प्रश्न जर सुटत नसतील, लोकांची समस्या जर सुटत नसतील तर शासनाला आपल्या पध्दतीने निर्णय घेण्याचा अधिकार आहे. जसा आपल्या सभागृहाला निर्णय घेण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे शासनाला ही निर्णय घेण्याचा अधिकार आहे. म्हणुन आपण याची स्पष्टता जाहिर करावी अशी मी आपल्याला याठिकाणी विनंती करतो, धन्यवाद.

श्री संदिप जाधव :- मा.महापौरजी, साधारणत: ११ वाजेपासून चर्चेला सुरुवात झाली आणि जवळपास ८ तास चर्चा झाली. सभागृहात जवळपास ३३ मा.सदस्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. १९३६ साली नागपूर सुधार प्रन्यास नागपूर शहरात अस्तित्वात आली, ती अस्तित्वात आली याच्यामागे जो उद्योश होता १९३६ साली नागपूर शहर फार छोटा होता त्याची लोकसंख्या फार कमी असेल अश्यावेळेस नागपूर सुधार प्रन्यास विकास प्राधिकरण म्हणुन नागपूर शहरात आली हे करीत असतांना १९७६ ला पहिल्यांदा डेव्हलपमेंट प्लॉन नागपूर शहरात तयार झाला, १९७६ नंतर २००१ ला दुसरा डीपी प्लॉन तयार झाला त्या २५ वर्षाच्या कालावधीमध्ये नागपूर शहरात असे अनेक लेआउट तयार झाले, आणि नागपूर शहराची जी जनता आहे, नागपूर शहराचे जे गोर-गरीब लोक आहे, जे ताळमेळ करुन ज्यांनी आपले प्लॉट बुक केले असे हजारो लेआउट नागपूर शहरामध्ये तयार झाले. २५ वर्ष जर नागपूर सुधार प्रन्यासनी लक्ष दिले असते बारकाईने तर हे जे अनधिकृत लेआउट आहे नागपूर शहरात हे निर्माण झाले नसते आणि जेव्हा ५७२ असतील त्याच्यानंतर १९०० लेआउट असतील त्याच्यानंतर २३०० लेआउट असतील या प्लॉटची संख्या लाखांच्यावर नागपूर शहरामध्ये आहे त्यानंतर मागील २००१ च्या गुंठेवारी नियमा अंतर्गत नागपूर सुधार प्रन्यासनी जनतेला आव्हान केले कि आपले प्लॉट १००० रुपये भरुन रेग्युलाईज करुन टाका मग कोणाला दोन लाख कोणाला दिढ लाख व कोणाला एक लाख रुपये अश्याप्रकारचे नागरिकांना डिमांड देणे सुरु केले. लोकांनी ते पैसे भरले, आणि पैसे भरल्यानंतर ज्या लेआउटचा विकास व्हावयास पाहिजे होता तो पुर्णपणे विकास

झालेला नाही केवळ थातुरमातुर पध्दतीने खडीकरणाचे रस्ते बनविले, गडर लाईन टाकली, आणि त्यानंतर पैसे संपल्यानंतर ते काम सोडुन दिले. आता आम्ही नागपूर शहराचे जनप्रतिनिधी याठिकाणी आम्ही सगळे बसलेलो आहे. माझा सुध्दा प्रभाग १०० टक्के एनआयटी मध्ये येतो. त्यावेळेस जे थातुरमातुर काम एनआयटीने केले आणि मग सांगीतले कि या लेआउटचे पैसे संपले आहे, आता हे काम कोण करणार आहे, बरेच नगरसेवक याठिकाणी आउटर वार्डाचे प्रतिनिधीत्व करीत आहे, मग तिथली स्थानिक जनता नगरसेवकांच्या पाठीमागे लागते आणि हे काम करुन द्या असे सांगते. हे करीत असतांना नागपूर शहराचा सर्वांगिण विकास करण्याचा जो स्वप्न नागपूर सुधार प्रन्यासनी नागरिकांना दाखविला होता, त्या सर्व स्वप्नामध्ये नागपूर सुधार प्रन्यासनी जनतेची फसवणुक केली नागपूर शहराचे तर सोडा नागपूरच्या जनतेचा अविश्वास केला आणि त्या कामामध्ये नागपूर सुधार प्रन्यास पुर्णपणे फेल झाली. डीपी प्लॉनमध्ये जे रिझर्व्हेशन होते, मग ते गार्डनचे रिझर्व्हेशन असेल, शाळेचे रिझर्व्हेशन असल प्ले ग्राउंडचे रिझर्व्हेशन असेल, प्राथमिक उपचार केंद्राचे रिझर्व्हेशन असेल कालांतरानी नागपूर सुधार प्रन्यासनी हे सगळे प्लॉट लिजवर दिले. बिल्डर्सला विकाले करोडो रुपये नागपूर सुधार प्रन्यासनी आपल्या खात्यामध्ये जमा केले.आणि नागपूर महानगरपालिकेनी काय केले केवळ एक चतुर्थांश जो भाग आहे नागपूर शहराचा त्याची जबाबदारी फक्त नागपूर सुधार प्रन्यासकडे होती. आणि त्याच्यानंतर उर्वरीत जबाबदारी पुर्ण नागपूर महानगरपालिकेची आहे, नागपूर महानगरपालिका मुलभुत सुविधा हे जनतेला पुरवित असते. मग त्याच्यामध्ये पाणी असेल, आठवडी बाजार असेल, स्वास्थ्य केंद्र असेल, शाळा असतील नागपूर सुधार प्रन्यास हे काम करीत नाही. नागपूर महानगरपालिकेची जबाबदारी नागपूर सुधार प्रन्यास पेक्षा फार मोठी आहे. जनतेकडून पैसे नागपूर सुधार प्रन्यासनी घेतले आणि काम नागपूर महानगरपालिका करणार आहे. मा.महापौरजी, आजची ही विशेष सभा केवळ एका विषयासाठी बोलाविण्यांत आलेली आहे मी आपले अभिनंदन करतो कि ज्या तारखेला आपण महापौर झाले त्या दिवशी आपण याठिकाणी अजेंडा जाहिर केला, नागपूर शहरातील मार्केटची समस्या असतील, अतिक्रमणाची समस्या असेल, कच-याची समस्या असेल याबाबत आपण आपली भुमिका स्पष्ट केली. आणि मा.महापौरजी, आजच्या सभागृहामध्ये याठिकाणी जवळपास ३३ नगरसेवकांनी याठिकाणी चर्चा केली आपले मत नोंदविले, मला याठिकाणी एकही नगरसेवकांनी असे म्हटले नाही कि नागपूर सुधार प्रन्यास ही चांगली आहे. असे कोणाच्याही तोंडातुन मी ऐकले नाही. नागपूर सुधार प्रन्यास ही जनतेला त्रास देणारी संस्था आहे, जनतेला लुबाडणारी संस्था आहे. शहराचा विकास करण्यासाठी फेल म्हणुन अशी संस्था आहे आणि म्हणुन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीसनी एक ऐतिहासिक निर्णय केला आणि त्यांनी स्वत: हा निर्णय केला नाही, नागपूरच्या जनतेचा जो आक्रोष होता नागपूर सुधार प्रन्यासवर नाराजी होती. ते पाहुन मा.देवेंद्रजीनी निर्णय घेतला, आणि नागपूर सुधार प्रन्यास ही बरखास्त करण्याची घोषणा केली.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, तात्कालीन मुख्यमंत्री यांनी घोषणा केली कि निर्णय घेतला.

श्री संदिप जाधव :- मा.महापौरजी, मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीसनी नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्याचा निर्णय घेतला.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, तोच तो वादाचा प्रश्न आहे, एनआयटी बरखास्तच झाली नाही आणि आपण कौतुक करुन राहिलो, अभिनंदन करुन राहिलो.

श्री संदिप जाधव :- मा.महापौरजी, नागपूर सुधार प्रन्यासवर नागपूरच्या जनतेचा जो रोष होता, हे पाहुन मा.मुख्यमंत्री यांनी नागपूरच्या जनतेचा सम्मान केला. काही वेळेपूर्वी यांचे नगरसेवक श्री हरीष ग्वालबंसी बोलत होते कि हा जुमला आहे. मा.महापौरजी, हा कशाचा जुमला आहे, ज्यावेळेस विलासरावजी देशमुख महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, त्यावेळेस त्यांनी नागपूरच्या जनतेला आश्वासन दिले होते कि दरवर्षी २५ कोटी रुपये नागपूर शहराच्या विकासाकरिता देवु त्यानंतर पृथ्वीराज चौहान आले त्यांनी सुध्दा नागपूर शहराच्या विकासासाठी एक पैसा दिला नाही, त्यानंतर महाराष्ट्र शासनाचे पूर्व मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी

पुर्ण बॅकलाग काढुन पुर्ण निधी नागपूर महानगरपालिकेला दिला. याला आपण जुमला म्हणणार आहे काय ? माजी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसचे तुम्ही अभिनंदन करावयास पाहिजे. येवढया दिवसाचे थांबलेले पैसे मा.मुख्यमंत्री श्री देवेद्र फउणवीस यांनी नागपूर शहराला दिले. येवढेच नव्हेतर नागपूर शहरामध्ये ज्याठिकाणी नागपूर महानगरपालिका असेल ज्याठिकाणी अनधिकृत लेआउट आहे, त्याठिकाणी अनेक लोकांनी प्लॉट घेतले, त्याठिकाणी राहण्याकरिता गेले, महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्रीनी १०० कोटी रुपये खडीकरणासाठी प्रत्येक मतदार संघात दिले. आणि ज्यावेळेस कॉंग्रेसचे सरकार होते त्यांनी किती पैसे नागपूर शहराला दिले याबाबत त्यांनी आपले आंकडे द्यावे कि त्यांच्या माध्यमातुन किती निधी नागपूर शहराला उपलब्ध करुन देण्यांत आला. मा.महापौरजी, आताच सरकार स्थापन झाले, येवढी काही घाई नव्हती, केवळ एका पत्रामुळे आणि सरकार स्थापन झाल्यानंतर लगेच पत्र देण्याची काही घाई नव्हती. मा.महापौरजी, मी याठिकाणी सर्व सदस्यांचे अभिनंदन करतो, सगळयांच्या चर्चेमध्ये नागपूर सुधार प्रन्यासच्या संदर्भातील बरखास्तीच्या बाबत जो निर्णय झालेला आहे, सगळयांनी त्याचे समर्थन केले आहे. आणि पालकमंत्रीनी जो पत्र महाराष्ट्र शासनाला पाठविले, आणि शासनानी जो नागपूर महानगरपालिकेला पत्र पाठविले मा.आयुक्त महोदय आपण पण सकाळपासून या सभागृहात बसले आहे, आणि सगळयांचे मत काय होते हे आपण पाहिलेले आहे.

श्री प्रफुल गुडधे :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, मा.सत्तापक्षनेते विषयापासून थोडेसे भटकुन राहिलेले आहे. त्या पत्राच्या अनुषंगाने आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे कि हस्तांतरण प्रक्रियेवर चर्चा करुन निर्णय घ्यावयाचा आहे. मा.महापौरजी, मा.सत्तापक्षनेते म्हणुन राहिले कि जो पत्रव्यवहार राज्य सरकारचा नागपूर महानगरपालिकेशी झालेला आहे, त्याच्यावर निर्णयाचा विषय कुठे आहे. हस्तांतरणाच्या प्रक्रियेमध्ये आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे कि प्लॉनिंग ॲथारीटी म्हणुन

श्री संदिप जाधव :- मा.महापौरजी, जे स्पष्टीकरण नागपूर महानगरपालिकेला द्यावयाचे आहे, आज याठिकाणी सगळया मा.सदस्यांनी जो मत नोंदविलेले आहे, ते मत आपण राज्य शासनाला कळवावे, आणि मी पुन्हा एकदा विद्यमान पालकमंत्री यांनी जो पत्र पाठविले त्या पत्राचा मी पुन्हा एकदा या सभागृहात निषेध करतो.

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, मी पुन्हा एकदा त्या तात्कालीन राज्य सरकारचा निषेध करु काय ? ज्यांनी या शहराच्या जनतेची फसवणुक केली, खोटे सांगुन राहिले. मा.महापौरजी, अश्यापध्दतीचे निर्णय घेणे योग्य होणार नाही.

श्री संदिप जाधव :- मा.महापौरजी, त्या पत्राचा मी तो निषेध करतोच आहे, परंतु ज्येष्ठ नगरसेवक श्री दयाशंकर तिवारी यांनी याठिकाणी सुंदर भाषण केले आहे, विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केले आहे, परंतु आपण याठिकाणी बसलो आहे नागपूर शहराचे सगळे जनप्रतिनिधी हे शहर आपले आहे आणि या शहरामध्ये आपण प्रतिनिधीत्व करीत आहे आणि आपल्या नागपूर शहराचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे, नागपूर शहराच्या जनतेला त्रास नाही झाला पाहिजे. हा दृष्टीकोण सगळया लोकांनी आत्मसात करण्याची गरज आहे. ही गोष्ट खरी आहे कि एका शहरामध्ये दोन प्लॉनिंग ॲथारीटी ठेवण्यात येवु नये, नागपूर शहरामध्ये केवळ एकच ॲथारीटी डव्हलपमेंटची असली पाहिजे. आणि मा.महापौरजी, नागपुर सुधार प्रन्यासचे कर्मचारी असेल ते आपल्याकडे येत नसतील तर नवीन अपाईंटमेंट करण्याची गरज आहे. जनतेला न्याय देण्याचा काम नागपूर महानगरपालिका यांनी करावा. आणि हा जो प्रस्ताव आहे, मंजूर करावा. मी आपले अभिनंदन करतो कि आपण याठिकाणी विशेष सभा बोलावुन सगळयांचे मत घेतले. सगळयांनी आपले मत पाजीटीव्ह दिलेले आहे, आणि नागपूर महानगरपालिकेच्या प्रशासनाला माझी विनंती आहे कि, जेवढे नगरसेवक याठिकाणी बोलले त्या सगळयांचे मत आपण राज्य सरकारला कळवावे, आणि याकिाणी मी परत सगळयांचे अभिनंदन करतो, त्यांनी ९ ते १० तास झालेल्या चर्चेमध्ये आपला सहभाग दिले, आणि पुन्हा एकदा मी या पत्राचे याठिकाणी निषेध करतो.

महापौर :- दिनांक २०.०१.२०२० च्या सभागृहामध्ये प्रशासनाला निर्देश दिले होते त्याप्रमाणे गुंठेवारी मधील प्रकरणे हाताळण्यासाठी एक विशेष सेल स्थापन करण्यासाठी सांगीतले होते त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी त्यास मान्यता दिली होती. दिनांक २९.०२.२०२० पर्यंत हा विशेष कक्षाची तातडीने स्थापना करण्यांत यावी. त्याचप्रमाणे सभापती, ना.सु.प्र. यांच्यासोबत या सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक, विरोधी पक्षनेते, सत्तापक्षनेते, त्याचप्रमाणे पूर्व विश्वस्त यांची देखील एक बैठक मा.आयुक्तांनी पुढाकार घेवून ठरवावी, हा निर्णय दिनांक २०.०१.२०२० च्या सभेत देण्यात आला होता त्याप्रमाणे मा.आयुक्तांनी ही बैठक लावून घ्यावी. याठिकाणी सभागृहातील एकुण ३४ नगरसेवकांनी चर्चेत भाग घेतला, त्यात असे लक्षात आलेले आहे कि, या शहरामध्ये दोन नियोजन प्राधिकरण नसावे. एकच नियोजन प्राधिकरण असावे असे एक मत या सभागृहात झालेले आहे, शासन निर्णय दिनांक २७ ऑगष्ट २०१९ अन्वये ना.सु.प्र.कडील नियोजन प्राधिकरणाचे अधिकार म.न.पा.कडे कायम रहावे हे अधिकार नागपूर सुधार प्रन्यासकडे परत देण्यांत येवु नये, बहाल करण्यांत येवु नये, शासन निर्णय दिनांक २७ ऑगष्ट २०१९ अन्वये नागपूर महानगरपालिका पुर्ण शहराकरिता नियोजन प्राधिकरण असल्या कारणाने नागपूर सुधार प्रन्यासनी या संबंधीचा संपुर्ण अभिलेख गुंठेवारीच्या प्रकरणासहित नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरीत करावे, हे सभागृहाचे एकमत राज्य शासनाला कळविण्यांत यावे, त्याचप्रमाणे नागपूर सुधार प्रन्यासचे नियोजन प्राधिकरणाचे अधिकार नागपूर महानगरपालिकेकडे आल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासकडे असलेला अतिरिक्त कर्मचारी वर्ग नागपूर महानगरपालिकेकडे नियुक्त करण्यासाठी शासनाने आदेश करावे, अशी विनंती राज्य शासनाला करावी. नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरणाचा कारभार दिनांक २७ ऑगष्ट २०१९ च्या आदेशान्वये प्राप्त झाल्यामुळे या कामाकरिता आवश्यक असलेला अधिकारी, कर्मचारी वर्ग भरती करण्यासाठी महानगरपालिकेला शासनानी तातडीने मान्यता प्रदान करावी, ही देखील विनंती राज्य शासनाला हे सभागृह करीत आहे.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यात आली.

| | |
|---|---|
| हस्ता:- | हस्ता:- |
| **निगम सचिव/उपायुक्त** | **महापौर** |
| **महानगरपालिका,नागपूर** | **महानगरपालिका,नागपूर** |